रश्मिन

दिवाळी अंक २०१८

Netherlands Marathi Mandal
नेदरलँड्स मराठी मंडळ
सळसळता सांस्कृतिक महाराष्ट्र

'पु.ल.'कित

विशेषांक

Stop Haunting, Settle Now

WE ARE LIKE YOU, WE ARE HERE FOR DOING THINGS SIMPLE AND BETTER

WE ARE HERE TO HELP YOU FIND THE RIGHT PLACE FOR THE RESIDENTIAL OR THE COMMERCIAL PURPOSE. WE KNOW IT IS IMPORTANT TO 'MOVE-IN' AND HENCE, WE HAVE PLENTY OF OPTIONS FOR YOUR PREFERRED LOCATION, BE IT A BUNGALOW, APARTMENT, TENEMENT, PLOT OR A PENTHOUSE; WE KNOW THE VALUE OF LAND AND YOUR DREAMS. WE DO NOT CHARGE MORE THAN WHAT YOUR DREAMS COST. WE ARE HERE TO MAKE YOU STOP HAUNTING. WE WISH TO SEE YOU SETTLED IN YOUR HOME AND BUSINESS. RENT, LEASE OR PURCHASE YOUR OWN DREAMLAND AT THE MOST REASONABLE COST.

WE ARE LIKE YOU, WE WANT OUR BEST MOMENTS TO BE CAPTURED FOREVER.

ONCE SETTLED, YOU MUST CELEBRATE. WE CAN ALSO BE YOUR HAPPINESS PARTNER BY ORGANISING THE MOST IMPORTANT OCCASIONS OF YOUR LIFE. BE IT A FASHION EVENT, PROPERTY SHOWS, HOLI FESTIVAL OR ANY CORPORATE EVENT; WE WILL BE THERE TO ASSIST YOU WITH THE MOST PROFOUND IDEAS AND CREATIVITY. FOR US, CELEBRATION MATTERS THE MOST AND WE WORK HARD TO MAKE YOUR GOOD TIMES 'MEMORABLE'. WE HAVE A DEDICATED BACKSTAGE TEAM, PROFESSIONAL MODELS AND AN ORGANIZED TEAM TO HELP YOU ROCK ON YOUR MOST FAVOURITE DAY.

WE ARE LIKE YOU, WE WANT TO BE FAMOUS IN ALL THE PARTS OF THE WORLD.

WE WORK ABOVE THE LIMITATIONS OF BOUNDARIES AND HENCE, OUR BUSINESS IS CONNECTED WORLDWIDE. FOR US, WORKING WITH DIFFERENT PEOPLE FROM THE DIFFERENT PARTS OF THE WORLD MATTERS THE MOST. WE BELIEVE IN DIVERSIFICATION AND WE FOLLOW IT!

WE ARE COMING TO YOUR CITY SOON!

HAPERTY
HAPPINESS GUARANTEED

TO REGISTER YOUR INTEREST CONTACT:

+353 89 954 6036
www.haperty.com
Dublin, Ireland
info@haperty.com

Send Parcel From

India
↓
Europe
↓
India

- Homemade Sweets
- Commercial parcel
- Express Courier
- Excess Luggage
- Documents

UNIQUE
AIR EXPRESS
Delevering Happiness. Globally.

+91 020 672 00000

Mail- info@uniqueairexpress.com

Branches:- Pune | Mumbai | Banglore | Delhi

Network: China, HongKong, Singapore, Japan, Thailand, S.Korea, Taiwan, UK, Germany
France, Belgium, Netherland, Italy, spain, Switzerland, Denmark, UAE, USA

www.uniqueairexpress.com


SUITS TO SUIT
For office goers & home makers
INDIAN CLOTHING FOR WOMEN.
KURTI / DUPATTA / PALAZZO / PANTS / JACKETS / SKIRTS / FABRICS
PHULKARI / COTTON / RAYON / SILK / LUCKNOWI / KALAMKARI / CHANDERI
UNIQUE DESIGN
COMFORTABLE FABRIC
BEST QUALITY
WE WILL BE LAUNCHING OUR WEBSITE SOON
SEETASMRITI BUILDING, SHIVAJI PARK RD. 4, DADAR (W), MUMBAI-28, INDIA
+91 9833628830
@SUITSTOSUIT

Additional Discounts on any Festivals and Special Occasions
FASHION RAINBOW
It's Beautiful...it's rare...It's me!!
FASHION RAINBOW The Latest In Women's Fashion Is Inviting You To
Visit Our Online Store
www.fashionrainbow.co.in
And Indulge Yourself To Our Latest Range In Women's Wear And Add A Bright Cheer To Your Wardrobe Collection.
CHOOSE FROM OUR TRENDY AND TRADITIONAL COLLECTION OF
Classy Lahengas
Sarees
One Piece Dresses
Kurtis
Tops
Trendy Bralettes
Leggings
Semipatialas
Dress Materials
Palazzo
And Many More...
*T & C Apply
Hurry... And Pamper Yourself Right Now
www.fashionrainbow.co.in
For A Range Of High Quality, Stylish And Affordable Women's Wear!!
Call :+91 7977938705 / Mail: fashionrainbow4u@gmail.com
Find us on facebook.
PLEASE REFER SIZE CHART AND PRODUCT DESCRIPTION BEFORE PLACING ORDERS
People staying outside India may choose either of the below option to book and get their order delivered anywhere in India:
• Place your order online at www.fashionrainbow.co.in and transfer payment by using any of your Indian Bank account
• If you do not have an Indian Bank account or not confident about online shopping, you can contact Whats app no. +917977938705 for booking your order and transfer payment to our bank account.

Netherlands Marathi Mandal
नेदरलँड्स मराठी मंडळ

॥श्री॥

नेदरलँड्स मराठी मंडळ प्रस्तुत,

मराठी शाळा "स्वोजस!"

वयवर्षे ४ व पुढील सर्वांसाठी प्रवेश.
दर रविवारी दु. २ ते ३.३०.
पत्ता: Roland Holstlaan 807, 2624KB, डेल्फ्ट, नेदरलँड्स.

बाराखडी | अंक | रंग
आकार | प्राणी | पक्षी

"स्वोजस" - ठळक उद्दिष्ठ:
१. विद्यार्थ्यांना मराठी लेखन, वाचन आणि संभाषण यामधे पारंगत करणे.
२. स्वतःचे व्यक्तिस्वातंत्र्य जपण्यास प्रेरित करणे.
३. स्पर्धात्मक वातावरणाशी जुळवून घेण्यास शिकविणे.
४. मराठी/भारतीय संस्कार, संस्कृतीशी बांधून ठेवणे.

अधिक माहितीसाठी संपर्क: swojas.nmm@gmail.com

Netherlands Marathi Mandal Chess Club

Excellent opportunity for children to learn CHESS in DEN HAAG area.

Location: Wijkcentrum Bezuidenhout,
Johannes Camphuijsstraat 25,
2593 CH, Den Haag

Timing: Every Sunday
10.00—12.00hrs

Contact: sport.nmm@gmail.com
0642022536 / 0610860195

Kids love games and chess is a game where you have to sit down and concentrate and it just helps in every way."—Magnus Carlsen
(Current World Chess Champion)

"Chess is everything: art, science, and sport."— Anatoly Karpov

Netherlands Marathi Mandal
नेदरलँड्स मराठी मंडळ

अनुक्रम

पुलं एक साठवण १४

पुलं. नावाचे गारूड
अरुंधती मुंजे १५

पुलं, असेच थांबून राहा!
मंदार मोरोणे १८

आठवणीतले भाई
डॉ. मानसी सगदेव २१

तो पुलराजा
गिरीश देसाई २३

आज तुम्ही हवे होतात
दिपाली ओक २६

डॉक्टर पुलं
अमोघ ओक २९

पु.ल. देशपांडे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व
पल्लवी आदमाने/ताकमोगे ३१

निळिये सारणी निळ्या मोत्यांचे गे पाणी
शिरीन कुलकर्णी ३२

पुलं आणि विनोद
गौरी नूलकर-ओक ३५

पोवाड्याच्या निमित्ताने
मकरंद शांताराम ३६

पुलंचं प्रोटोकॉल द फूड ३८

पु.ल. देशपांडे- महाराष्ट्राचे लाडके भाई
सौ. प्रणिता अद्वैत देशपांडे ३९

नटाच्या दृष्टीतून.../उपास उतारा ४०

...तर मराठीची चिंता बाळगण्याचे ४१

इतर लेख

संपादकीय ८

कविराज 'गदिमा'
डॉ. धनश्री साने ५५

आठवणीतील गीतरामायण
शंतनू आणि शीतल नांदगांवकर ५९

बैल
संदीप गावंडे ६०

ती....
कोमल प्रकाश मानकर ६३

द लार्वे : हरवलेला देवमासा
कोमल प्रकाश मानकर ६५

आनंदाचा प्रवास
स्वप्ना मुळे ७१

ऋणानुबंध
चिन्मयी पंडित ७२

इंटरनेट आणि काटकोन त्रिकोण!
आकाश कोकाटे ७५

दिवस ऊन पावसाचे
आकाश कोकाटे ७८

पारंपरिक आहार : शोध आणि बोध
सुकेशा सातवळेकर ८१

मनाच्या गप्पा
सोनल शिंदे-पिंगळे ९५

श्रीमंताची झोपडी
ललित विलास त्रिवेणी आठल्ये ९७

आगळावेगळा अनुभव
अतुल वैशंपायन ९९

ॲडव्हाइस, सलाह सल्ला
मकरंद अयाचित १००

व्यक्त-अव्यक्त
मकरंद अयाचित १०२

प्राध्यापकाचा सत्याग्रह
विजय पांढरीपाडे १०४

चिनी माती
विनया बाम १०७

व्यंगचित्रांच्या चौकटीतून पाहताना...
नीरज सबनीस ११८

अ नु क्र म

भरारी

चवीने खाणार त्याला....
मुलाखतकार : एन.एम.एम. टीम ०९

काव्य

चंद्रकांत बसोले
अनंत रेषा!!! ११
वसंत ऋतूची किमया!!................................ ७०
आपण आहोत तिथेच असतो का?.................. ७३
जखम जिव्हारी ७७
नितीन भट
भाई.. १३
पल्लवी आदमाने/ताकमोगे
आई ५७
विद्या शशिकांत पाटील
पुलकित पुलं ६२
राहुल करुरकर
व्हर्जिन ६९
तिचा मेकअप ७६
डायट.. ८३
कोमल प्रकाश मानकर
मुक्या वेदनांचे वेटोळे.................................. ७४
संदीप शामराव गावंडे
पिकलं पान.. ८०
विजय पांढरीपाडे
श्रद्धांजली : असे फार क्वचित घडते................ ८४
वैभव दातार
पहिला पाऊस ६५
पुनवेचा चंद्र... १०५

मुलाखत

निपुण धर्माधिकारी
मुलाखतकार : एन.एम.एम. टीम **४३**
गिरीश प्रभुणे ४८

मेजवानी

कढई भगर ढोकळा
सपना धुप्पे ८५
भरलेले टमाटे -स्टफ्ट टोमॅटोज्
सुप्रिया सिंगारे...८५
गोंगुरा लोणचे
पूजा मंडलिक-दाशरथे.....................................८६
पोहे वडी
गायत्री मेटे...८६
पंचकाज्य
प्रीती राव ८७
कर्नाटकी चटणी पुडी/पूड चटणी
सौ. सोनाली सताळकर.....................................८७
कणकेचे लाडू
डॉ. मानसी सगदेव..८८

बाल विभाग

पान क्र. ८९-९४

शब्दकोडे

संजीव उपरे ११०

राशीभविष्य

डॉ. प्रसाद गजेंद्रगडकर ११२

संपादक : मुक्ता बापट
प्रकाशक : नेदरलँड्स मराठी मंडळ
संपादन साहाय्य : डॉ. मानसी सगदेव-मोहरील, डॉ. केतकी आपटे
विशेष साहाय्य : सायली जाधव, सुप्रिया दाशरथे-सिंगारे, अक्षय महाशब्दे, संतोष सरजिने
मुखपृष्ठ : डॉ. मानसी सगदेव-मोहरील
मुद्रितशोधन : संजीव उपरे, मुंबई
अक्षरजुळणी, मांडणी व सजावट :
श्रीराम पब्लिकेशन आणि डीटीपी सेंटर, मुंबई.
(संपर्क : ९८३३०१५४२३)

प्रकाशन स्थळ : Kniekas 10, 2614 SZ, Delft, The Netherlands

या अंकातील सर्व लेख, लेखातील मजकूर हे लेखकांचे वैयक्तिक विचार आणि मते असून संपादक आणि नेदरलँड्स मराठी मंडळ या मतांशी सहमत असतीलच असे नाही.

खरंच! पुलं आपल्याला कळले का?

असा मी असामी गोळाबेरीज नसती उठाठेव अपूर्वाई आम्ही लटिके ना बोलू पूर्वरंग वयं मोठं खोटम्। व्यक्ती आणि वल्ली वाऱ्यावरची वरात बटाट्याची चाळ अघळ पघळ जावे त्यांच्या देशा व्यंगचित्रे गणगोत तुका म्हणे आता तुझे आहे तुजपाशी ती फुलराणी तीन पैशाचा तमाशा

असा मी असामी गोळाबेरीज नसती उठाठेव अपूर्वाई आम्ही लटिके ना बोलू पूर्वरंग वयं मोठं खोटम्। व्यक्ती आणि वल्ली वाऱ्यावरची वरात बटाट्याची चाळ अघळ पघळ जावे त्यांच्या देशा व्यंगचित्रे गणगोत तुका म्हणे आता तुझे आहे तुजपाशी ती फुलराणी तीन पैशाचा तमाशा

२०१८ साल. पुलं म्हणजेच पु. ल. देशपांडे, गदिमा म्हणजेच ग. दि. माडगूळकर, बाबूजी म्हणजेच सुधीर फडके. या तीनही अवलिया कलाकारांचे जन्मशताब्दी वर्ष. प्रत्येकाने आपल्या सर्वांच्या आयुष्यात आपला आपला असा विशेष ठसा उमटवलाय.

असे म्हणतात की, शिक्षक समाज घडवितो. शिक्षक जेवढा प्रामाणिक आणि प्रगल्भ तेवढा समाज प्रामाणिक आणि प्रगल्भ होतो, वैचारिक उंची गाठतो आणि समाजाची, परिणामी देशाची प्रगती होते. शिक्षकाप्रमाणेच कलाकार, साहित्यिक हेही आपल्या कलाकृतीतून, संगीतातून, अभिनयातून, साहित्यातून समाज घडवीत असतात. कलाकार, साहित्यिक हा समाजाभिमुख असतो. ज्याप्रमाणे तो समाजाचे प्रतिबिंब आपल्या कलाकृतीत, साहित्यात दाखवीत असतो त्याचप्रमाणे त्याच्या कलाकृतीचे, साहित्याचे अनुकरण समाज करीत असतो. त्याच्या विचारांतून समाजाचा विचार बनत असतात.

म्हणूनच साहित्यिक व कलाकार समाज सुधारण्याचे, समाज घडविण्याचे अति महत्त्वाचे अन् नाजूक काम करीत असतात. समाजाची प्रगती, वैचारिक पातळी उंचाविण्याचे मोलाचे काम करीत असतो.

पुलं हे असंच एक व्यक्तिमत्त्व. हाताच्या बोटांवर मोजण्याएवढी अशी घरे किंवा लोक असतील, ज्यांनी कधी पुलं हे नाव ऐकलं नसेल किंवा ज्यांनी पुलं वाचले नसतील.

पुलंच्या लेखनाची शैली विनोदी होती. समाजामधील विसंगती दाखवीत त्यातून निर्माण होणारा विनोद त्यांनी खूप निखळ आनंद देणाऱ्या भाषेत मांडला; पण आचार्य अत्रेंच्या शिक्षणव्यवस्था व दर्जा याबद्दलच्या थोड्या मिश्कील, परंतु बहुबोधपर भाषणाने प्रभावित होऊन लेखनाचा मार्ग निवडणारे पुलं समाजाचा आरसा समाजाला दाखविण्यात यशस्वी झाले का?

अंतू बर्वासारख्या परखड भाषेत समाजाचे सत्य आणि समाजातील समस्या सांगणाऱ्या वल्लीची कथा ऐकताना आपण हसत हसत हळहळतो. मात्र त्यातून काही बोध घेतो?

आपल्या सर्वांच्या आवडत्या 'म्हैस' या पुलंच्या कथेतून समाजाचे एकदम जवळून दर्शन होते. आपली शासनव्यवस्था, त्यांचे कामकाज आणि त्यातून निर्माण होणारा त्रास आणि माणसांच्या स्वभावाचे कंगोरे पुलंनी विनोदातून मांडले; पण यातून आपण काही शिकलो का?

पुलंची विचार मांडायची शैली फक्त विनोदीच नाही आहे. तेवढेच प्रगल्भ विचारही त्यांनी अनेक भाषणांतून, नाटकांमधून आणि लेखांतून मांडले आहेत. उदाहरणादाखल त्यांची स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दलची भाषणे ऐका. 'सुंदर मी होणार'सारख्या नाटकांतून ते आपल्याला जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन देतात. हे आपल्या लक्षात आलंय का कधी?

असेल तर आपण आपल्या पातळीवर काय करू शकतो याचा कधी विचार केलाय का?

नसेल केला तर पुन्हा एकदा आपल्या लाडक्या लेखकाला, देशप्रेमीला, साहित्यिकाला, कलाकाराला वाचून काढू आणि स्वत:लाच विचारू की, मला पुलं खरंच कळले का?

– मुक्ता वि. बापट
डेल्फ्ट, नेदरलँड्स
muktaxay@gmail.com

समोरच्या माणसाच्या मनात काय चालू आहे याचा डोळ्यांतूनच शोध घेणारे गणेश नरवणे यांना समोरच्या माणसाच्या पोटात शिरायला तो असा कितीसा वेळ लागणार! प्रवाहापेक्षा वेगळी आणि धाडसी वाट आत्मसात करण्याचे बाळकडू मिळालेल्या गणेश नरवणे यांनी मराठी असूनही येथील भारतीयांच्या खऱ्या गरजेला ओळखून दक्षिण भारतीय पदार्थ व इंडो-चायनीज या भारतीयांच्या अतिशय आवडत्या पदार्थांना नेदरलँड्समध्ये आणले. स्वतः मांसाहार करत नसल्याने भारतातून आलेल्या अनेक व अनेक अभारतीय शाकाहारी लोकांसाठी 'कृष्ण विलास' हे एकमेव दिलासा देणारे ठिकाण त्यांनी निर्माण केले आहे. अगदी दोन महिन्यांचे वय असणाऱ्या शुद्ध शाकाहारी जेवण मिळणाऱ्या 'कृष्ण विलास'ने कधी लोकांच्या मनात घर केले आणि सर्वांच्या मुखोद्‌गत झाले ते कळलेही नाही. द हेगमधल्या होईकाडंसारख्या जपानी, इंडोनेशियन, इटालियन उपाहारगृहांची आणि अशा विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची रेलचेल असणाऱ्या खास भागात आपला असा खास भारतीय व्हेजेटेरिअन ठसा उमटवणारे गणेश नरवणे आणि त्यांच्या अर्धांगी स्मिता यांबद्दल थोडे जाणून घेऊयात.

चवीने खाणार त्याला.....!

नेदरलँड्समध्ये अनेक भारतीय उपाहारगृहे असूनही तुम्ही या क्षेत्रात यायचे कसे ठरवले? आणि त्यासाठी तुम्ही द हेग हे शहर का निवडलेत?

लहानपणापासूनच मला स्वतःचे असे काही तरी करायचे होते. मात्र तेव्हा काय हे नक्की नव्हते. त्यामुळे मी व्यवसायाभिमुखच शिक्षण घेतले. काही वर्षे मी स्वीडनला होतो. तेथे प्रथम मला शाकाहारी अन्न मिळणे हे कठीण असते हे समजले. त्यातून मी स्वयंपाक करायला लागलो. लहानपणी आईबरोबर स्वयंपाकघरात तिला मदत केल्याने मला स्वयंपाक करण्यात रस निर्माण झालाच होता. योगायोगाने मी माझ्या करीअरची सुरुवातीची काही वर्षे फूड इण्डस्ट्रीशी संलग्न होतो. त्यामुळे लोकांच्या, प्रामुख्याने भारतीयांच्या गरजा काय आहेत हे मला खूप जवळून पाहता आले. माझ्या अनुभवाचा उपयोग करून मी जर आपल्या लोकांना परदेशात मदत करू शकत असेन तर त्यासारखी देशसेवेची सुसंधी नाही, या विचाराने मी या क्षेत्रात उतरलो.

खरे तर मी द हेगपासून काही अंतरावर राहतो. मात्र, द हेग या शहरात व आसपासच्या भागांत सहलीसाठी भारतातून येणारे व आसपासच्या फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी अशा देशांमधून येणारे सर्व भारतीय येथील प्रेक्षणीय स्थळे पाहून शाकाहारी व भारतीय पद्धतीचे जेवण मिळणारे ठिकाण शोधत असतात हे मी अनुभवलेले आहे. येथे संपूर्ण शाकाहारी असे रेस्टॉरंट नाही आहे आणि तशी मागणी असणाऱ्या आपल्या लोकांची संख्याही जास्त आहे. अशा वेळेला मी जास्तीत जास्त लोकांना येथे सेवा देऊ शकतो, या विचाराने मी या भागात माझे उपाहारगृह चालू केले.

पुढे जाण्याआधी आम्हाला सांगा की, तुम्ही इथे येण्यापूर्वी स्वीडनला राहायचात. तर नेदरलँड्समध्ये कसे आलात?

स्वीडनमध्ये मी शिक्षणासाठी आलो. तेथे शिक्षणानंतर काही काळ नोकरीही केली. त्या वेळी माझा भाऊ नॉर्वेमध्ये राहायचा. मला स्वीडनमध्ये 'होमसिक' वाटायला

लागल्यावर मी माझ्या मोठ्या भावाकडे राहू लागलो. तेथे नोकरी करू लागलो; परंतु भारतात जाऊन काही तरी करायचे, हा विचार मला स्वस्थ बसू देई ना. मी भारतामध्ये असताना शेअर ट्रेडिंगचा व्यवसाय करायचो.

तुम्ही सर्व दक्षिण भारतीय पद्धतीचे खाद्यपदार्थ ठेवले आहेत तसेच इंडो-चायनीज पद्धतीचेही पदार्थ तुम्ही देता. तर याच दोन पद्धतीच्या खाद्यपदार्थांची निवड का केलीत?

आपल्याकडे एक म्हण आहे की, कोणाच्याही मनात शिरण्याचा मार्ग त्याच्या पोटातून जातो. दक्षिण भारतीय जेवण हे सर्व भारतीयांना आवडते तसेच ते शंभर टक्के शाकाहारीही आहे. इंडो-चायनीज म्हणाल तर नेदरलँड्समध्ये ते मिळतच नाही आणि हेही आपल्या सर्वांचं अतिशय आवडते खाद्य आहे. तुम्ही जर पाहिलेत तर साधारणपणे नेदरलँड्समध्ये हे पदार्थ मिळण्याची ठिकाणे अगदी तुरळक आहेत, म्हणजे व्यावसायिक पद्धतीने चालणारी तर अगदी नाहीच असे म्हणू. त्यामुळे मी हा पोटातून जाणारा मार्ग आवडीने स्वीकारला.

कृष्ण विलास हेच नाव द्यावेसे का वाटले?

या नावातच सात्त्विकता आहे. त्यामुळे नावावरूनही हे रेस्टॉरंट शुद्ध शाकाहारी असेल हे लगेच लक्षात येऊ शकते.

तुमचे शिक्षण हे पाकशास्त्रातले नसूनही तुम्ही हा व्यवसाय यशस्वीरीत्या करताय. तुमच्या रेस्टॉरंटमधील पदार्थांची चव बदलत नाही. ही गुणवत्ता तुम्ही कशी कायम ठेवता?

अगदी खरंय, माझे शिक्षण हे पाकशास्त्रातील नसून मॅनेजमेंट क्षेत्रातील आहे. मात्र, तुम्ही जर एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास केलात तर तुम्हाला ती गोष्ट चांगल्या पद्धतीने आत्मसात करता येते या गोष्टीवर माझी श्रद्धा आणि विश्वास आहे आणि माझी तेवढी जोखीम घ्यायची तयारीही आहे आणि नेहमीच असते. त्यामुळे, हे रेस्टॉरंट सुरू करण्याच्या आधी मी स्वतः पाकशास्त्राचा व त्याच्याशी निगडित अनेक कार्यांचा अभ्यास केला. अनेक गोष्टी जसे स्वयंपाक करणे, त्यात विविध नवीन प्रयोग करणे तसेच भाजी आणणे, चिरणे, स्वयंपाक झाल्यावर मागचे स्वच्छ आवरणे या व अशा अनेक गोष्टी मी रीतसर शिकलो, त्यांचा सराव केला. त्या सर्व गोष्टींचा मला माझ्या स्वयंपाकघराची, त्यामध्ये काम करणाऱ्या शेफ्सची व पदार्थांची गुणवत्ता राखण्यात झाला आणि होतो. एवढेच नव्हे, तर जे वेटर्स काम करतात त्यांच्या कामाची गुणवत्ता ठरविण्यासही मला माझ्या या सरावाचा व अभ्यासाचा फार उपयोग होतो. कृष्ण विलासमध्ये तयार होणारा प्रत्येक पदार्थ मला स्वतःला बनवताही येतो, त्यामुळे गुणवत्ता आणणे व ती कायम ठेवणे हे सोपे जाते.

भारतीयांप्रमाणेच बऱ्याच डच व इतर युरोपीय देशांमधील लोकांना आवर्जून येताना मी पाहिले आहे. त्याबद्दलचे तुमचे अनुभव सांगा ना.

अगदी खरंय. भारतीय तर शाकाहारी म्हणून जगात प्रसिद्ध आहेतच, मात्र नेदरलँड्स व इतर युरोपीयन देशातही आरोग्याबद्दल जागरूक लोकांची संख्या मोठी आहे. तसेच शाकाहारी जेवण पसंत करणारे व फक्त शाकाहार करणारेही अनेक लोक आहेत, त्यामुळे येथे अनेक अभारतीय शाकाहारी मंडळीही उत्साहाने येतात व आम्हाला विचारून विचारून नवीन नवीन पदार्थांचा अगदी देशी लोकांसारखाच आस्वाद घेतात. त्यातून जर हे दक्षिण भारतात फिरून आलेले असतील तर ते त्यांना आवडणारा पदार्थही मागून घेतात. भारतीय असो व अभारतीय, आवडीचे जेवण जेवून तृप्त झालेले चेहरे पाहून मला आणि स्मिताला खूप समाधान मिळते.

एक प्रसंग सांगतो. उन्हाळ्याचे दिवस होते. एक वयस्क जोडपे आले. दमलेले दिसत होते. बसले. त्यांना ऑर्डर विचारली असता मांसाहारी जेवण नसल्याने ते तसेच निघून गेले. काही मिनिटांनी परत आले आणि पाणी मिळेल का, असे त्यांनी विचारले. मी लगेच त्यांना बसायला सांगून पाणी दिले. पाण्याचे किती पैसे झाले, असे विचारल्यावर मी काही नाही म्हणालो. त्यावर तुम्ही भारताचे का, असे विचारून भारताचे कौतुक करून मला आशीर्वाद देऊन निघून गेले. आपल्याकडे होणाऱ्या संस्कारांमुळेच असे आशीर्वाद लाभतात. माणसाची गरज काय आहे हे ओळखून जर आपण सेवा देऊ शकलो तर कोणत्याही सर्व्हिस इंडस्ट्रीमध्ये आपण यशस्वी होऊ शकतो.

तुम्ही स्वतः मराठी असूनही कोणत्याही मराठी पदार्थांचा विचार नाही केलात का?

अर्थातच माझा असा विचार व इच्छा आहे. खरे तर, मराठी माणूस हा जसा कलेच्या बाबतीत चोखंदळ आहे तसाच तो खाण्याच्या बाबतीतही आहे. त्यांच्या अपेक्षांना खरे उतरण्यासाठी मी आधी माझा सर्व अभ्यास व तयारी करून मगच असे मराठी पदार्थ आणेन.

तुमच्या रेस्टॉरंटमध्ये काम करणारे सर्व कर्मचारी हे भारतीयच आहेत की अभारतीयसुद्धा आहेत? भारतीय व अभारतीय लोकांना एकाच वेळेस मॅनेज करण्याचा अनुभव कसा आहे?

दोघांना मॅनेज करणे कौशल्यपूर्ण आहे अर्थातच. कारण दोघांची काम करण्याची पद्धत वेगळी आहे. आपले मत मांडण्याची, भावना व्यक्त करण्याची पद्धत वेगळी आहे; पण माझ्या सौभाग्याने मला खूप चांगली माणसे मिळाली आहेत. माझ्याबरोबर काम करणारे सर्व जण सर्व गोष्टी खूपच पटकन शिकले. त्यांनी जी नावे कधी ऐकलीही नव्हती अशी नावे आता त्यांना मुखोद्गत आहेत. कदाचित, तुम्हाला पदार्थ निवडायला

लवकरच ते माझ्यापेक्षाही जास्त चांगले मार्गदर्शन करतील. माझे मुख्य आचारी जे आहेत ते भारतीय आहेत; पण अभारतीय आचारीही तोच पदार्थ आता तेवढाच चांगला करू शकतील असे प्रशिक्षण मी त्यांना दिले आहे. त्यांनाही आपले पदार्थ आवडायला लागलेत आणि तेही तेवढ्याच मनापासून आपले पदार्थ बनवितात. स्वयंपाकघराच्या बाहेर लोकांची आवभगत करणे व ऑर्डर्स घेणे हे काम करणारे कर्मचारी हे सर्व जगभरातील आहेत. फक्त भारतीय, फक्त युरोपीय असा कोणताही भेदभाव आम्ही दोघे किंवा आमच्या टीममधील कोणीही मानत नाही. त्यामुळे खऱ्या आंतरराष्ट्रीय सलोख्याने आम्ही काम करतो.

भारतीय व्यवस्थापन आणि युरोपीय व्यवस्थापन यात काय फरक जाणवतो? त्याचा परिणाम तुमच्या कामावर अथवा व्यक्तिस्वातंत्र्यावर होतो का किंवा होऊ शकतो का?

व्यवस्थापन हे व्यवस्थापनच असते. फक्त ते करण्याची पद्धत ठिकठिकाणी वेगळी असते. मी मघाशी म्हणालो त्याप्रमाणे प्रत्येक समाजाची आपली आपली अशी एक पद्धत, रीती असते. त्याचप्रमाणे त्यांना हाताळावे लागते अथवा त्या समाजाशी वागावे लागते. यामध्ये मला माझ्या लहानपणाच्या अनुभवांचा उपयोग होतो, असे मी म्हणेन. माझे वडील शासकीय सेवेत असल्याने महाराष्ट्रात सर्वत्र त्यांची बदली होत असे. त्यामुळे मला बऱ्याच गावांमध्ये, शहरांमध्ये राहण्याचा योग्य आला. त्यातूनच विविध प्रकारची माणसे माझ्या पाहण्यात आली आणि प्रत्येक गावाची संस्कृती आणि लोकांची त्याप्रमाणे असणारी, होणारी वैचारिक जडणघडण मी जवळून पाहू शकलो, त्यामुळे काम करताना 'भारतीय' व 'अभारतीय' असा कधी प्रश्न उद्भवला नाही.

तरीही, भारतीयांशी वागणे आणि अभारतीयांशी वागणे यांत अर्थातच थोडा फरक करावा लागतो हे तुम्हालाही माहीत असेलच. मात्र, मी त्यामुळे कोणावर अन्याय होणार नाही, पक्षपात होणार नाही याची निक्षून काळजी घेतो.

हा व्यवसाय चालू करताना किंवा केल्यावर शासकीय यंत्रणा, शासनाचे नियम किंवा लोकशाही यांचा कसा अनुभव आला?

भारताप्रमाणे इथेही खूप चांगली लोकशाही पद्धती आहे. मात्र इतर देशातील लोकांसाठी शासकीय यंत्रणा थोडी किचकट आहे. हे लोक नियमांना एकदम पक्के आहेत. त्यांमध्ये त्यांना बदल करणे हे सर्वसाधारणपणे अमान्य असते. परवाना मिळण्यास मला काहीच कठीण गेले नाही. मी माझी आवश्यक ती सर्व कागदपत्रे, माझ्या व्यवसायनिगडित कागदपत्रे, योजना, आर्थिक तरतुदींचे सर्व तपशील वेळेत दिल्यामुळे मला या व्यवसायाचा परवाना मिळण्यास काहीच कठीण गेले नाही. एक गोष्ट मात्र मला येथील यंत्रणेची आवडली की, ही यंत्रणा एकाच क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व व्यावसायिकांना समानतेने वागवते. सर्व नियम व व्यवसाय वृद्धीच्याबाबतीतल्या तरतुदी या सर्वांना समान असतात व त्या शासकीय यंत्रणेकडून आपणहून दिल्या जातात. त्यासाठी परत परत अर्ज करावे लागत नाहीत, की सतत संपर्क करावा लागत नाही.

तुम्ही पूर्ण वेळ 'कृष्ण विलास'मध्ये असता. या आधीही जेव्हा तुम्ही शेअर ट्रेडिंग करायचात तेव्हा जवळजवळ चोवीस तास कामात असायचात. तेव्हा तुम्ही कुटुंबाला किती आणि कसा वेळ देता किंवा दिलात?

अनंत रेषा!!

पाण्यावरती
ओढीत रेषा
मिटल्या होत्या
वाट पहाता
वाळूवरती
ठसे चांगले
चमकत होते
वाळुकणावर
क्षितिजावरती
दिसत होत्या
अनेकरंगी
ढगाळ रेषा
येता पाऊस
मिटल्या साऱ्या
चक्क उजाडे
नभ हे सुंदर!!!
पक्ष्याच्या विहाराने
उमटत होत्या
पंखी रेषा !!
आले वादळ
मिटल्या साऱ्या
पक्षी जातसे
अपुल्या निवाऱ्या
शांत जाहले
आसमंत सारे
मिटल्या साऱ्या
अनंत रेषा !!!

– चंद्रकांत बसोले
chandu.basole@gmail.com
कलोन, जर्मनी

गणेश : या प्रश्नाचे उत्तर माझ्यापेक्षा स्मिता आणि माझे आई–बाबा जास्त चांगले देतील. मी खरं तर कधी विशेष वेळ नाही देऊ शकायचो. माझी आईच माझ्याबद्दलच्या काळजीपोटी माझ्या पुढ्यात वाढलेले ताट आणून ठेवत असे आणि सतत मागे लागून खाऊ–पिऊ घालत असे. आता हे काम स्मिता करते.

स्मिता : आम्ही जेव्हा नेदरलँड्समध्ये आलो त्या वेळेस गणेश त्याच्या व्यवसायासोबत नोकरी करू लागला. मात्र त्याच्यावर कामाच्या इतक्या जास्त जबाबदाऱ्या होत्या, की तो सतत बाहेर असायचा. रात्री उशिरा घरी आल्यावरही पहाटेपर्यंत त्याचे शेअर ट्रेडिंग चालूच असायचे. काम कितीही महत्त्वाचे असले तरी आपली तब्येत आणि आपले नाते हे जास्त महत्त्वाचे आहे याची मी त्याला वेळोवेळी आठवण करून देत असे. आताही

मधूनमधून करून द्यावी लागते, मात्र स्वतःचा व्यवसाय सुरू करणार म्हणजे जो काही वेळ आम्ही एकत्र घालवत असू तोही कदाचित मिळणार नाही, अशी मला भीती वाटत असे; पण माझा गणेशवर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे तो माझ्यासाठी नक्की वेळ काढेल याची मला खात्री होती आणि ती अगदी तंतोतंत खरी आहे. आजही रेस्टॉरंटमध्ये कितीही व्यस्त असला तरी माझ्यासाठी तो नक्की वेळ काढतोच काढतो. अर्थात, मला त्याच्या कामाची आवड आणि मन व्यापून टाकणारी कामाची पद्धत माहीत असल्याने मीही कधी तक्रार करत नाही.

स्मिता, तुमच्या घरी कोणीही व्यवसाय करीत नाही. तुमच्या दोघांच्या घरी शासकीय सेवेची परंपरा आहे. असे असताना जेव्हा गणेशने रेस्टॉरंट किंवा खाद्यसंस्कृतीशी निगडित अशा नाजूक आणि थोड्या बेभरवशाच्या व्यवसायाची निवड केली, त्यावर तुझी प्रतिक्रिया काय होती?

हो, आमच्या दोघांच्या घरी शासकीय सेवेची परंपरा आहे आणि तीही लोकाभिमुख क्षेत्रातीलच आहे. त्यामुळे व्यवसाय करण्यासाठी माझा गणेशला नेहमीच पाठिंबा होता आणि असेल. खाद्य क्षेत्र खरंच सर्वच दृष्टीने खूप नाजूक आहे; पण गणेश जोखीम उचलायला एका पायावर तयार असतो. जोखीम घेणे ही त्याची जणू आवडच आहे. त्याच्या शेअर ट्रेडिंगच्या व्यवसायाच्या दरम्यान मला याचा अनुभव आला आहे. सुरुवातीला मला भीती वाटायची; पण त्याचा सखोल अभ्यास आणि योग्य दिशेने जाणारे कष्ट पाहून त्याला यश मिळणारच याची मला खात्रीही वाटू लागली आणि ती नेहमीच वाटेल. त्यामुळे मला गणेशच्या 'कृष्ण विलास' सुरू करण्याच्या निर्णयाबाबत अजिबातच भीती वाटली नाही की मनात कधी यशाची शंका आली नाही. मी फक्त त्याला महत्त्वाचे निर्णय घेताना पुनर्विचार करण्याचे सुचविते. त्यातून तो मनाने इतका हळवा आहे, की तो कोणाही माणसाला खरचटलेलेही बघू शकत नाही, त्यामुळे तर या क्षेत्रात की ज्यामध्ये आपण थेट माणसाच्या जिवाशी संबंधित असतो, अशा क्षेत्रात तर तो फारच काळजीपूर्वक काम करेल याची मला खात्री आहे.

स्मिता, तुम्हाला स्वयंपाकाची किती आवड आहे? आणि तुमचा या व्यवसायात गणेशला सक्रियपणे साथ देण्याचा काही मानस आहे का?

मला स्वयंपाकाची आवड आहे; पण लग्नापूर्वी मी कधी विशेष स्वयंपाक केला नव्हता. लग्नानंतरच खऱ्या अर्थाने मी स्वयंपाक करू लागले. माझ्या हातचे सर्वच पदार्थ गणेशला आवडतात.

गणेशला व्यवसायात सक्रिय साथ देण्याबद्दल म्हणशील तर ती तशी मी आत्ताही देते. मी माझे ऑफिस संपवून कृष्ण विलासमध्ये आले की त्याला मदत करते किंवा कधी खूपच गर्दी असेल तर मी इथे मदतीला येते; पण मला माझ्या क्षेत्रात म्हणजे एम्बेडेड डेव्हलपमेंटमध्ये काम करायला जास्त आवडेल. अर्थातच, हा व्यवसाय वाढला तर मी नक्कीच आत्तापेक्षा जास्त वेळ देईन किंवा जास्त जबाबदाऱ्या उचलेन; परंतु आमच्या दोघांची वेगळी वेगळी कार्यक्षेत्रे आम्ही दोघांनी मान्य केलेली आहेत त्यामुळे गणेशही माझ्याकडून अशी अपेक्षा करीत नाही. एकमेकांना मदत मात्र नेहमीच करतो.

गणेश: हो अगदी खरंय. जेव्हा तिला असे वाटेल की; ती

जे काही करत्येय ते आता पुरे, तर मी नक्की तिला तिच्या आवडीचे दुसरे काही करायला नेहमीच मदत करेन. मात्र, आम्ही एकमेकांच्या कार्यक्षेत्रात काम करायचे नाही यावर आमची एकवाक्यता आहे आणि आम्हाला दोघांनाही आपापल्या क्षेत्रात मिळालेल्या यशाचे खूप कौतुक आणि गौरव वाटतो.

कृष्ण विलास हे तुमचे उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने तुम्ही लोकांना खाऊ घालण्याचे हे जे काम करता हे काम पुण्याचेच आहे; परंतु सामाजिक बांधिलकीबद्दल एक व्यावसायिक म्हणून तुमचे काय विचार आहेत?

सामाजिक बांधिलकीचे संस्कार आमच्यावर लहानपणापासूनच झालेत. समाजसेवा हे मी माझ्या घरातूनच बघत आलोय. फक्त, त्याचा गाजावाजा ना करता करणे मी पसंत करतो. माझ्या मिळकतीमधला एक ठरावीक हिस्सा मी समाजासाठी वाहतो. समाज आणि संस्कृती याच्या व्याख्या या माझ्या दृष्टीने व्यक्तिसापेक्ष आहेत. जिथे खरंच गरज आहे तिथे, त्यांना मदत करायला मला आवडते. सैनिकी क्षेत्रात मला मदत करायला नेहमीच आवडते. त्यासाठी आम्ही स्वतः शोध घेत असतो. ज्यांना शासनाकडून, इतर सेवाभावी संस्थांकडून, एनजीओकडून किंवा अशा अनेकांकडून मदत मिळत असते अशांना मदत करण्यापेक्षा ज्यांना मदत मिळत नाही अशांना मी आवर्जून मदत करतो. तसेच प्रसिद्धीसाठी, 'टॅक्स बेनिफिट'साठी केलेली मदत ही मला अमान्य आहे. मात्र, जिथे शंकेला वाव असतो किंवा पारदर्शीपणा मला जाणवत नाही तिथे प्रसंगी थोडा कठोर होऊन मी अशा ठिकाणी मदत करणे नाकारतो.

इतक्या धकाधकीच्या आयुष्यात तुमच्यासाठी नि:श्वासाचे किंवा विरंगुळ्याचे क्षण कोणते?

मी एक मिनिट जरी आईशी बोललो तरी मला खूप छान वाटते. अर्थातच स्मिता हे माझे नि:श्वास टाकण्याचे हक्काचे स्थान आहे आणि माझा भाऊ. यांच्याशी बोलल्यावर मला स्फूर्ती मिळते. मात्र, आम्ही आई-बाबांना किंवा भावाला आमच्या अडचणी किंवा दु:ख, त्रास सांगायचे कटाक्षाने टाळतो.

आवडते सहलीचे ठिकाण?

घर, भारतात जाऊन आईवडिलांबरोबर, आपल्या कुटुंबाबरोबर सुट्टीची मजा लुटायची.

नवोदित मराठी उद्योजकांना काय उपदेश कराल?

उपदेश देण्याएवढा मी मोठा नाही; पण मी असे जरूर सांगेन, की मी नेहमीच व्यवसाय करण्याला प्रोत्साहन देईन. कोणावरही अवलंबून राहू नका. कोणाचेही अनुकरण करू नका. तुमच्या आवडीच्या विषयात काम करा. जे करताय त्याचा नीट, सखोल अभ्यास करा. तुमच्या जवळच्या लोकांशी तुमचे सर्व विचार, योजना खुल्या दिलाने बोला. त्यांच्या प्रश्नांची त्यांना स्वीकारार्ह उत्तरे देऊ शकलात तर त्यातून तुम्हाला बळ व स्वत:च्या विचारांबद्दलची स्पष्टता मिळते. तुम्ही व्यवसायांमुळे नोकऱ्या निर्माण करून आपल्याबरोबरच देशाचीही प्रगती करू शकाल. जोखीम पत्करायला शिका. ती पेलायची तयारी करण्यासाठी अभ्यास करा आणि त्यातून यशस्वी होण्यासाठी योग्य दिशेने वाटचाल करा.

कर्मवादी, चांगुलपणा व संस्कारांवर विश्वास ठेवणारे, धाडसी आणि अभ्यासू, एकपाठी असणारे गणेश आणि त्यांना प्रत्येक गोष्टीत सबळ पाठिंबा देणारी त्यांची सहचारिणी स्मिता या अतिशय मृदुभाषी आणि विनम्र व्यावसायिक जोडप्याला 'रश्मिन' दिवाळी अंक व नेदरलँड्स मराठी मंडळातर्फे दिवाळीच्या व त्यांच्या पुढील अनेक योजनांसाठी व समृद्ध आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

– एन.एम.एम. टीम

भाई

दु:खी, कष्टी चेहऱ्यावरती हास्य फुलविले भाई
ज्ञानोबाची मायमराठी तुमची हो उतराई...।।धृ।।

हरितात्या, नारायण, चितळे मास्तर, अंतू बर्वा
थोर चरित्रे तुम्ही घडविली शतजन्माचा ठेवा
व्यक्तिचरित्रे, प्रवासवर्णन, वात्रटिका, वग, गाणी
काव्य, नाट्य, संगीतात घुमली तुमची अमोघ वाणी
आकाशाचा कागद झाला, समुद्र झाले शाई।।१।।

हसता हसता डोळ्यांमध्ये टचकन भरले पाणी
सामान्यांच्या अश्रूंचीही केली अत्तरदाणी
विनोदासही बहाल केली कारुण्याची झालर
तुम्ही ठेवला अखंड तेवत साहित्याचा जागर
रसिकजनांवर मुक्त उधळली अवघी हास्यकमाई।।२।।

सरस्वतीने प्रदान केली तुम्हा लेखणी होती
साहित्यातून तुम्ही उजळल्या शब्दफुलांच्या वाती
तुम्हीच तुमच्या हस्ते भरला अक्षरवाङ्मय प्याला
मराठमोळ्या साहित्याचा कणकण 'पुल'कित झाला
परमेशाचा स्पर्श मानवी होता तुमच्या ठायी।।३।।

– नितीन भट
अमरावती, भारत
nitinbbhat@gmail.com

पुलं एक साठवण

श्री. गणेश शास्त्री जोशी यांनी अमेरिकेचे वर्णन करणारे एक पत्र पुलंना संस्कृतमध्ये पाठविले होते, त्या पत्राला पाठविलेले उत्तर.

पुण्यपत्तनं ४
एप्रिल ६–१९७४

इति श्रीगणेश शर्मा जोशी महोदयेशु गिर्वाणभाषापण्डितवरेषु, अति विनम्रतया पादाभिवन्दनं कृत्वा संस्कृतभाषायामेष पत्रोत्तरलेखनचेष्टां करिष्यामि। जानाम्ये तन्महाधार्ष्ट्यम। आंग्लभाषाधारेणाभवन्मम संकृतभाषाध्ययनम्। यत्र रंभोरू दी। बनानाट्रीथाइड वन् भूता लूट् टू वँलो वा । गिर्वाणभाषादेवता ममेदृक्शारूकं चेष्टीतं दृष्ट्वा मां ममैव पुरातनेन पादत्राणेन ताडयिष्यति । भवतापि च मम गंगभाषापाण्डित्यं यत्पूर्वं कल्पयित्वा ममाभिमतं महाराष्ट्रभाषायां प्रेषितुं कथितम्। किन्तु एतद्दुस्तरेण मोहेन अहं किमर्थं ग्रासित इति ज्ञातुमक्षमोऽहम् । क्षम्यताम् ।

एतत्पत्रप्रेषणेन भवद्भिर्मह्यमाप्तसुहृत्पदं प्रदत्तम्। चिरानुगृहीतोऽसि, भूषि– तोऽस्मि चैतत्स्नेहालंकरणेन। भवद्गीर्वाणभाषायां लिखितं पातालदेशयात्रावर्णनपरं पत्रं माधुर्यगुणसंपन्नम्। न चैवं केवलं भाषाप्रभुत्वकारेण किन्तु आशयसौन्दर्येणापि लक्षणीयं हृदं च। दुहितादौहित्रमिलनप्रसंगवर्णनपठनसमये, आनन्दाश्रुपुर्णं मम नयनयुगलं ममोपनेत्रकाचद्वयमपि बाष्पितम्। कृतार्थगार्हस्थ्यजीवनस्य तदभूतपूर्वं रमणीयं दर्शनमिति मे मतम्। यथार्थ तथैव विश्वविद्यालयस्थितानां संस्कृतभाषाध्यापकानां गुणगानं । ऋषितुल्यास्ते। समाप्त शिशिरे भूतं याद्दत्तवीणावादनं, तस्य निर्देशोऽपि हास्यकारकः ।रुचिरा तथैव हिमपाताय दत्ता कुन्दकुसुमोपमा। स्थाने स्थाने कतिपयानि मनोहराणि शब्दचित्राणि। सरला भाषा शोभना किन्तु मया बुद्धिमन्देनापि कोशाधारेण विना पठितं सम्यक् पत्रम्। अद्य मम पत्रसंग्रहे भवता प्रेषितमेमिदं पत्रं मूल्यातीतं भूषणसदृशं मन्ये। अत्र सुहृद्गणस्य पुरतः तस्य प्रकटं पठनकरवं, भविष्येऽपि करिष्यामि। किन्तु मम पत्रोत्तरपठनमीद्दशं भवता कथमपि न करणीयं, देवभाषाभिमानधारकाः पण्डिताः शम्बूकं स्मृत्वा मम शिरस् च्छेदं कर्तुमुद्युक्ता भविष्यन्ति । अस्तु। दर्शनातुरोऽस्मि । सद्य पुण्यपत्तने मम निवासः। कृतार्थी भविष्यामि, भवच्चरणरजसा मम देहली पदि पुनीता स्यात् । रेगेमणेरिकरपोतदारादी मित्रवत् भवस्नेहभाजनं भवितुमिच्छामि । एत्पत्ररूपेण मम क्षुद्रे कुटीरे आमन्त्रयिष्यामि, तस्य स्वीकारणाब्दन्यं मन्ये । पुनश्च कृतज्ञोऽस्मि पत्रकारणे इति लिखित्वा एतन्ममासंस्कृतपत्रलेखनं समाप्तं करोमीति । आशीर्वचनाकांक्षी,

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

– टीम रश्मिन संपादकीय समिती

पुलं: नावाचे गारूड

पुलंचे नाव ऐकताच मी आयुष्याची पाने उलटत थेट शाळकरी वयात पोचते. जे दिसेल ते अधाशासारखे वाचून फडशा पाडण्याचे ते वय. त्यावरून अनेकदा आईकडून ओरडून घ्यावे लागायचे. अर्थात चूक तिची नसायची. कारण खाताना डाव्या हातात पुस्तक (जे तिला मुळीच आवडायचे नाही), घरातील एखाद्या कोपऱ्यात वाचनाची तंद्री लागल्याने हाका ऐकू न येणे, कामापेक्षा वाचनातच लक्ष, असले प्रकार सुरू असल्याने ती बिचारी कावणार नाही तर काय!

थोडे विषयांतर करून एक गंमत सांगते. मी वाचू नये म्हणून आईने कपाटावर सारलेले एक पुस्तक माझ्या हाती लागले. (तिच्या लपविण्याच्या जागा मला माहिती होत्याच.) त्यातील एक शब्द मला गमतीदार वाटला. तो होता – कुंटणखाना. चौथीतल्या अस्मादिकांनी बालबुद्धीनं त्याचा अर्थ पसारा असा लावला आणि भावाचा खेळण्याचा केलेला पसारा दिसताच 'काय कुंटणखाना झालाय घराचा' असा वाक्यात उपयोग करून तिला चकित केले होते. असे चकित होण्याचे प्रसंग मी त्या काळात तिच्यावर वारंवार आणले हे अलाहिदा. उदा. फडक्यांच्या कादंबरीतील चुंबन दिले, घेतल्याची वर्णने वाचून ही लोहचुंबकासारखी वस्तू असावी अशी माझी कल्पना झाली व मी तिला चुंबन कसे दिसते, हा प्रश्न विचारून चक्कर येण्याचे बाकी ठेवले. असो, विषयांतर जरा जास्तच लांबले.

तर, ह. ना. आपटे, वि. वि. बोकील, चिं. वि. जोशी ते ना. सी. फडके असा वाचन झंझावात सुरू असताना साधारणपणे सातवीत, बटाट्याची चाळ, गणगोत, अपूर्वाई माझ्या हाती आले आणि मी पुलंची भक्तीणच बनले. वर्गातील एक मैत्रीण व मी असा आमचा 'पुलं फॅन क्लब' स्थापन झाला आणि मग काय, मोकळ्या तासांना आणि सुटीत आवडते उतारे वाचन, विनोद आठवून, सांगून, हसत राहणे, असा अगदी ऊतच आला. वर्गातील इतरांना वीटही आला असेल; पण लक्षात कोण घेतो!

पुढे वाढत्या वयानुसार वाचनाची आवड बदलत गेली तरी पुलंची मोहिनी कायमच राहिली. त्यांच्या कुठल्या तरी पुस्तकाची तीव्र आठवण येते आणि वाचन केले जाते. इतकेच नव्हे तर समर्पक ठिकाणी ते विनोद आठवतात व शक्य असल्यास वापरलेही जातात. तेव्हाची मैत्री ही अजून टिकून आहे आणि आम्ही दोघी त्याच भाषेत तेच विनोद करत गप्पा मारतो व मनमुराद हसून घेतो.

पुलंचे लाडके लेखक म्हणून मी वूडहाऊसचे पुस्तक

भाषेचा रसाळपणा आणि सुबोधपणा हा ठळकपणे जाणवत रहाणारा विशेष; ओघवती, संवाद साधणारी शैली. पुलंची भाषा मोजके पण किमती अलंकार घातलेल्या ऐश्वर्यवती, सौंदर्यवतीसारखी. उपमा, उत्प्रेक्षा, अलंकार ह्यांची विनाकारण गर्दी नाही. भाषेचा बोजडपणा नसल्यामुळे त्यांचे लिखाण लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना सुलभतेने समजते व आवडते. त्यांचा विनोद निर्मळ, निर्विषारी, प्रसन्न आहे. तो खळखळून हसवतो. पुलं स्वभाव, परिस्थिती ह्यांतील विसंगती टिपतात जे आपणही अनुभवलेले असते. ते चेष्टा करतात, पण कोणाच्या व्यंगावर, वर्मावर बोट ठेवून टिंगल करत नाहीत. विनोदाशिवाय कधी करुणा, कधी सहभाव, कधी रसिकता, तर कधी 'ते हि नो दिवसा गता:'ची हुरहुर असे भाव आपण पुलंची पुस्तके वाचताना अनुभवतो; पण सर्व सकारात्मक भावना. ह्याच कारणाने आपण त्यांचे कोणतेही पुस्तक आनंद घेत वाचू शकतो. पुलंची भक्त असायला आणखी काय कारण हवे हो!

प्रथम वाचले आणि बनले की फॅन त्यांचीपण. पुलंसारखीच वूडहाऊसवर टीका करतात टीकाकार. म्हणे, लिखाणात तोचतोचपणा आढळतो, जुन्याचे उदात्तीकरण करतात वगैरे वगैरे; पण दोघांच्याही पुस्तकांची मजा कोणतेही पान उघडून रमून जाण्यात आहे. आपल्या काळज्या, ताण विसरून त्यांच्या जगात गेल्यावर, खळखळून हसण्यासाठी आहे हे टीकाकारांना कोण समजावणार!

पुलंच्याच प्रभावामुळे बा. भ. बोरकर वाचले, मासे खाणे, कुमार गंधर्व आणि वसंतराव ऐकणे असे काय काय केले म्हणून सांगू! हे सर्व मनापासून आवडूही लागले. दैनंदिन आयुष्याला पुलंमुळे अशी सुंदर, समृद्ध किनार लाभली.

मलाही पहिला परदेश प्रवास इंग्लंडचाच घडला बरं का! (अर्थात आमच्यातील साम्य इथेच संपते हे सांगणे नलगे.) माझ्या जन्माच्या काळात लिहिलेल्या ‘अपूर्वाई’तील वाक्ये आठवत वयाच्या पन्नाशीत मी पुलंच्या डोळ्यांनी लंडनमध्ये फिरले, भारावून स्ट्रॅटफर्ड, ऑक्सफर्ड पाहिले आणि हरखून जाऊन पिटलॉक्री व इतर स्कॉटलंड बघायचा प्रयत्न केला. पूर्वीच्या खुणा आढळणार नाहीत हे बुद्धीला कळत होते आणि त्या हरवल्या होत्याच; पण मनाचा शोध थांबेना.

आता ह्या लिखाणाच्या निमित्ताने, जरा प्राध्यापकी थाटात, पुलंच्या केवळ माझ्यावरील नव्हे तर माझ्यासारख्या त्यांच्या असंख्य भाबड्या भक्तांच्या मनावरील प्रभावाचा विश्लेषक शोध घेण्याचा प्रयत्न केला. (हुश्श! पुलंनी ह्या वाक्याची चेष्टाच केली असती.) काय हाती लागले म्हणून सांगू!

पुलंनी आयुष्याकडे खिलाडूपणे पहायला शिकवले. कृत्रिम औपचारिकतेतील विनोद ओळखायला शिकवले. वागणुकीतील दांभिकपणा, अहंकार, मानसन्मान मिळावा ह्याची धडपड इ.ची मनात खिल्ली उडवता येऊ लागली. मात्र त्याच वेळी अशा वागणुकीपासून स्वतःला दूर ठेवण्याची शिकवणही नकळतपणे मिळालीच. मराठी व इंग्रजी अभिजात साहित्य, नाटके आणि अभिजात संगीत ह्यांचा परिचय व लागलेली गोडी ह्याचे श्रेयही त्यांचेच. इतकेच काय, पुलंनी ‘खाद्यजीवनात’ व इतरही लिखाणात सांगितलेले व तोपर्यंत न खाल्लेले अनेक खाद्यपदार्थ संधी मिळताच उत्साहाने खाऊनही पाहिले. आता बोला!

थोडेसे मतभेदही झाले पुलंशी आवडीच्या पदार्थांविषयी. मला शंकरपाळी, टोमॅटोची कोशिंबीर, दहीवडे, बंगाली मिठाई आणि अंजीर, लंगडा (आंबा), पेरू इ. फळं हे सर्वच मनापासून आवडतं हो! ‘हसवणूक’मधील ‘खाद्यजीवन’ वाचल्यावर पुलंना हे सर्व आवडत नाही कळले आणि मन थोडं खट्टू झालं, पण चलता है म्हणून समजून घेतले, आणखी काय करणार!

किती रसिकपणे जगले पुलं त्यांचं आयुष्य! खाणे, गाणे, ऐकणे व गाणेही, फिरणे, लिहिणे, वाचणे, अभिनय करणे, किती किती म्हणून सांगावे! ह्या सर्वांचा मनापासून आस्वाद घेत ‘तुझे आहे तुजपाशी’मधील काकाजींसारखेच. जीवनावर आणि माणसांवर भरभरून प्रेम करत त्यांच्या साहित्याचे आवडीने वाचन करणारेही रसिक बनणारच ना! (म्हणजे मीपण रसिक बनलेच हे समजून घ्या बरं का!)

पुलंच्या साहित्यातून, नकळतपणे आईवडिलांनी रुजवलेली अनेक महत्त्वाची जीवनमूल्ये मनात ठसत गेली, पक्की होत गेली हेदेखील अनेकदा लक्षात येते. ह्याशिवाय शब्दसंग्रह वाढला, भाषा सुधारली (ज्याचा निबंधातील आणि एकूणच भाषा विषयातील गुण वाढायला शाळेत खूप फायदा झाला), असे व्यावहारिक उपयोगही झालेच.

पुलं मराठी वाचकांना एवढे का आवडतात बरं?

पुलंच्या प्रवासवर्णनांमध्ये स्थळांची जंत्री नाही, तर त्यांच्या अनुभवांची, त्यांना भेटलेल्या माणसांची मनोज्ञ वर्णने आहेत. त्यांच्या कालातीत असण्याचे हेच तर रहस्य आहे. प्रवासवर्णन असो, त्यांचेच इतर ललित किंवा विनोदी लिखाण असो, की त्यांनी केलेले इतरांच्या लिखाणाचे रसग्रहण असो; पुलं आपल्याला त्यात सहभागी करून, आपल्याशी संवाद साधत स्वतःबरोबर नेतात आणि आपण त्या घटना अनुभवतो आहोत असा वाचकांना प्रत्यय येत रहातो. मी तर पुलंच्या बरोबर केव्हाच सगळे जग हिंडून आले; कुमार, वसंतराव, बोरकरांपासून नारायण, बबडू आणि चितळे मास्तर, नाथा कामत सर्वांना भेटले. एसटीच्या प्रवासातील म्हशीची गंमत आणि माणसे पाहिली, दिनेशचे लाड केले, तसेच मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास वाचून खदखदून हसलेदेखील.

भाषेचा रसाळपणा आणि सुबोधपणा हा ठळकपणे जाणवत रहाणारा विशेष; ओघवती, संवाद साधणारी शैली. पुलंची भाषा मोजके पण किमती अलंकार घातलेल्या ऐश्वर्यवती, सौंदर्यवतीसारखी. उपमा, उत्प्रेक्षा, अलंकार ह्यांची विनाकारण गर्दी नाही. भारंभार दागिन्यांच्या ओझ्याने वाकलेल्या स्त्रीसारखा भाषेचा बोजडपणा नसल्यामुळे त्यांचे लिखाण लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना सुलभतेने समजते व आवडते. वक्तृत्वही तसेच. आणीबाणीच्या काळात ऐकलेले त्यांचे भाषण व वाचलेली इतर भाषणे विसरणे अवघड.

त्यांचा विनोद निर्मळ, निर्विषारी, प्रसन्न आहे. तो खळखळून हसवतो. पुलं स्वभाव, परिस्थिती ह्यांतील विसंगती टिपतात जे

आपणही अनुभवलेले असते. ते चेष्टा करतात, पण कोणाच्या व्यंगावर, वर्मावर बोट ठेवून टिंगल करत नाहीत. विनोदाशिवाय कधी करुणा, कधी सहभाव, कधी रसिकता, तर कधी 'ते हि नो दिवसा गताः'ची हुरहुर असे भाव आपण पुलंची पुस्तके वाचताना अनुभवतो; पण सर्व सकारात्मक भावना. ह्याच कारणाने आपण त्यांचे कोणतेही पुस्तक आनंद घेत वाचू शकतो. पुलंची भक्त असायला आणखी काय कारण हवे हो!

पुलंचा दृष्टिकोन आणि वर्तन किती उदारमतवादी होते हेदेखील वाचकाला त्यांच्या साहित्यातून जाणवत रहाते. जुन्यातील वेचक चांगले त्यांना जेवढे आवडायचे तेवढेच त्यांनी नव्याचे स्वागत केल्याचे दिसते. मग ते साहित्य असेल वा संगीत.

पुलंनी ज्या जीवनमूल्यांचा आपल्या लिखाणातून आयुष्यभर पुरस्कार केला तीच मूल्ये त्यांनी आणि सुनीताबाईंनी नेहमीच आचरणात आणली. 'आहे मनोहर तरी' वाचताना सतत हे लक्षात येत रहाते. ज्या सहजतेने, निर्मोहीपणाने दोघांनीही वेगवेगळ्या पदांचा, मानसन्मानांचा त्याग केला, हाऊसफुल्ल चाललेले एकपात्री प्रयोग नवीन लिखाणाला वेळ मिळणार नाही, आत्मसंतुष्टता वाढेल म्हणून थांबवले, अन्यायाचा प्रतिकार व सत्याचा आग्रह ज्या खंबीरपणे केला ते सर्व भल्या-भल्यांना करता आलेले नाही आणि सामान्य माणसाला तर जमणे अतिअवघड. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असे जेथे प्रत्यक्ष तुकाराम महाराज म्हणतात तेथे आपण काय बोलावे!

इतकेच नव्हे तर 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, उदास विचारे वेच करी' ह्या तुकाराम महाराजांच्या वचनाची तंतोतंत अंमलबजावणी करणारे दुसरे जोडपे मला तरी आठवत नाही. स्वखर्चापुरते धन जवळ ठेवून मिळालेला सर्व पैसा त्यांनी वेगवेगळ्या समाजोपयोगी कार्यांसाठी वाटून टाकला. त्यासाठी सुनीताबाईंनी चोख हिशोब ठेवले, वाईटपणाही पत्करला आणि मग ते धन कमालीच्या निःस्पृहपणे चांगल्या कामांसाठी व्यय केले. किती दुर्मीळ आहे असं वागणं! आणि व्यक्ती म्हणून दोघेही किती थोर माणसे!

नाही म्हणायला 'आहे मनोहर तरी'मध्ये सुनीताबाईंनी पुलंच्या दोषांच्या केलेल्या वर्णनांमुळे थोडे वाईट वाटले आणि खोटं कशाला सांगू, सुनीताबाईंचा जरा रागही आला. एवढा सिद्धहस्त लेखक, वक्ता, कलाकार आणि रसिक, बहुश्रुत जोडीदार असताना सुनीताबाई छोट्या उणीवांचा बाऊ करतायत असंही मनात आलं वाचताक्षणी, पण एक तर जोडा घालणाऱ्यालाच खुपतो ही अक्कल एव्हाना आली होती, सुनीताबाईंचा थोरपणा समजण्याची परिपक्वता होती, तेव्हा पुलंच्या कळलेल्या उणिवा त्यांना दृष्ट लागू नये म्हणूनच आहेत हे पटले आणि मन भक्तिभावानं पुन्हा भरून आले.

माझी आवड, भक्ती माझ्या जोडीदाराला उमगली, कारण तो माझ्याच पिढीचा आणि अगदी भक्त नसला तरी पुलं त्यालाही आवडत होतेच. मुलांमध्ये आवड रुजावी म्हणून खूप खटपटी केल्या मी, पण विनोदी सोडल्यास पुलंचे इतर साहित्य त्यांना माझ्यासारखे जवळचे वाटत नाही हे मान्य करावे लागले. आता माझ्या नातीला तर चिऊताई आणि काऊपेक्षा ती रोज पहाते ते स्वान्स, डक्स ह्यांच्या गोष्टी जवळच्या वाटतात. तिच्यापर्यंत पुलं पोचतील? बघायचे, काळ देईलच सर्व उत्तरे.

– अरुंधती मुंजे
कल्याण, भारत
arundhati.munje@gmail.com

पु. ल. देशपांड्यांचे मजेदार किस्से

✻ एकदा वसंतराव देशपांडे पुलंना म्हणाले, ही मुलगी (सुनीताबाई) म्हणजे एक रत्न आहे.
ह्यावर पुलं लगेच म्हणाले, म्हणूनच गळ्यात बांधून घेतलंय!

✻ एकदा आपली आणि सुनीताबाईंची ओळख करून देताना पुलं म्हणाले, मी 'देशपांडे' आणि ह्या 'उपदेशपांडे'.

✻ एकदा एका भोजन समारंभात पुलंच्या एक बाजूला श्री. ना. ग. गोरे आणि दुसऱ्या बाजूला श्री. भुजंगराव कुलकर्णी बसले होते. पुलं म्हणाले, आफतच आहे. एकीकडे नाग आहे तर दुसरीकडे भुजंग!

✻ एकदा पुलंना एक कुकरी सेट गिफ्ट म्हणून मिळाला. तो सेट सुनीता देशपांडे आपल्या भाचीला दाखवत होत्या. सुनीताबाईंचा सर्व काही जपून ठेवण्याचा स्वभाव माहीत असल्यामुळे भाची सुनीताबाईंना म्हणाली, अगं, एवढा सुंदर सेट फुटू नये या भीतीने तू तो कधी वापरणारच नाहीस का?
त्यावर पुलं पटकन म्हणाले, हो तर! सुनीता मला कधी ऑमलेटसुद्धा करून देत नाही; अंडी फुटतील म्हणून!

✻ पुलंचा वाढदिवस होता. एका मार्केट यार्डाच्या व्यापारी चाहत्याने त्यांच्या गळ्यात सफरचंदांचा हार घातला. पुलं त्या वजनाने थोडे झुकले. हे बघून व्यापारी म्हणाला, काय राव, काय झाले एवढे?
पुलं म्हणाले, बरे झाले तुम्ही फणसाचे व्यापारी नाही! हशा पिकला होता!

पुलं, असेच थांबून राहा!

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे नावाच्या गारुडाने आघात करण्यास सुरुवात केली तेव्हा 'टीनएजर'चा टॅग नुकताच लागला असावा. हे गारूड त्यानंतरच्या प्रत्येक पुस्तक, भाषण, ऑडियो आणि व्हिडीयोगणिक वाढत गेले. त्यानंतरच्या किमान दहा वर्षांत 'देशपांडे'नामक या व्यक्तीने आयुष्यात धुमाकूळ घातला होता. बाजीप्रभूंच्या स्मरणाने बाहू फुरफुरले असतील, तर या देशपांड्यांच्या वाचनाने बुद्धीला आणि भाषेला तरतरी येत गेली. आयुष्य जसजसे पुढे जाते तसतसे मागे सुटलेल्या वाटांकडे असोशीने बघणे वाढत जाते. आपल्या गावातील घराकडे कसे आसुसून बघत असतो आपण! वय चाळिशीकडे झुकत असताना आणि डोक्यावरचे 'सिल्व्हर लायनिंग' वाढत असताना, 'पुलं'कडे वळून बघणे हे असेच असोशीचे आहे.

कामाच्या धबडग्यात कोपऱ्यात किंवा पलंगाखाली ठेवलेल्या बॅट-बॉलचे विस्मरण झालेले असते. मग मध्येच कधी तरी आई किंवा बायको साफसफाईचे काम सांगते. वाढत चाललेले पोट आणि आखडलेली कंबर सावरत वाकल्यावर पलंगाखालचे बॅट-बॉल नजरेस पडतात. तो आनंद शब्दात सांगता येत नाही किंवा ती रुखरुखही असते. आज इंग्रजी-मराठी, रिॲलिस्टिक, फिक्शन, पुरोगामी, प्रचारकी किंवा जडजंबाळ काही तरी वाचत असताना मध्येच टीनएजमध्ये गवसलेल्या 'पुलं'नामक ठेव्याची आठवण येते. बॅट-बॉलवाले फीलिंग पुलंच्या आठवणीने जागे होते.

पुलंचे पहिले वाचलेले पुस्तक म्हणजे 'असा मी असामी'. माझ्या मामांकडे गेलो असताना त्यांच्या संग्रहात मिळालेले पुस्तक. एक किंवा दोन दिवसांत ते वाचून काढले आणि त्यानंतर या देशपांडेशाहीचा अंमल सुरू झाला. पुस्तके विकत घेण्याचा आणि घेऊन देण्याचा शिरस्ता आमच्या घरी आता तिसऱ्या पिढीतही पाळला जातोय. माझ्याबाबतीत बोलायचे झाले तर 'जादूची चटई', 'महेश उडाला भुर्रर' अशी खरेदी थांबली होती त्याच काळात घरात 'फास्टर फेणे'च्या जोडीने 'पुलं' येऊ लागले. त्यांच्या पुस्तकातील मध्यमवर्गीय माहोल डोळ्यासमोर चित्रे निर्माण करू लागला. वर्णन कसे करावे, शब्दांचा वापर कसा करावा, शब्दांच्या निरनिराळ्या अर्थांच्या चमत्कृती, लेखनात त्यांचा कसा वापर करावा अशा अनेक गोष्टी रुजत गेल्या. तिरकस नजरेने एखाद्या गोष्टीकडे कसे बघावे, विरोधाभासातून होणारी गंमत कशी टिपावी, गंभीर बाबींमागे दडलेला विनोद कसा समजून घ्यावा हे कळू लागले ते याच पुलंच्या लेखनातून. हे सगळे करतानाही भाषा सहजसोपी कशी राखावी याचे

सुरुवातीच्या काळात आपल्या रोल मॉडेल्समध्ये अनेक मान्यवरांचा समावेश असतो. हळूहळू त्यातल्या अनेकांचे पाय मातीचेच होते हे कळल्यावर ते आकर्षण कमी होत जाते. सुदैवाने 'पुलं'च्या बाबतीत असं काही घडलेलं नाही; किंबहुना ते घडूच द्यायचे नाही. विशेषत: सध्याच्या टोकाच्या, आक्रस्ताळ्या, असंख्य विद्वेषांच्या काळात आणि मनामनांत फूट पडलेल्या काळात पु.ल. देशपांडे हे मनाला आल्हाद देणारे 'आनंदनिधान' ठरतात.

सुरुवातीचे धडे कदाचित याच काळात बुद्धीच्या कोपऱ्यात रुजत गेले असावेत असे आता जाणवत राहते. विशेषत: पत्रकारिता करताना सोपे, सहज आणि लहान वाक्ये लिहिण्यावर सातत्याने भर दिला जातो. शेवटपर्यंत आपल्याला असं सोपं लिहिता येतंय की नाही याचा संभ्रम कायम असतो. याबाबत ज्या ज्या वेळी शंका निर्माण होते त्या त्या वेळी पु. ल. देशपांडे यांची आठवण येते. सोपे लिहीत असतानाही शब्दांचे खेळ, त्यांचे लालित्य, त्यांच्यातील अर्थवैविध्यता, त्यातून निर्माण होणारी गंमत हेही जपता आले पाहिजे असे वाटत राहते. ते करायचे तर शब्दसंच जितका समृद्ध हवा आणि तितकाच तो चपखलपणे लिखाणातून उतरायलाही हवा. हे असे वाटण्यामागील प्रेरणा नि:संशयपणे पुलंच आहेत. संशोधनाच्या पद्धतीने त्यांचे साहित्य कधीही अभ्यासले नाही. मात्र या गोष्टी थोड्या फार जमू लागल्या. हे त्यांच्या लिखाणाच्या वारंवारच्या वाचनातूनच आले आहे.

साधीसोपी वाक्यरचना करतानाही एखादे शब्दचित्र कसे उभे करावे याचा वस्तुपाठ त्यांच्या प्रत्येक लिखाणातून येत राहतो. पत्रकारितेच्या मागच्या १३-१४ वर्षांच्या काळात सातत्याने मुलाखती घेत आलो आहे. या मुलाखती लिहिताना त्या त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आपल्या लिखाणातून उभे राहावे याची काळजी वाटत राहते. आणि या काळजीतून ज्या वेळेस लिखाण सुरू होते त्या प्रत्येक वेळी अनाहूतपणे संदर्भ असतात ते पुलंच्या व्यक्ती आणि वल्लीचे! त्यातील एकेक व्यक्तिरेखा म्हणजे वारंवार अभ्यासावी अशीच आहे. त्याचा परिणाम निश्चितपणे आपल्याही लेखनावर होत राहतो. एखादी व्यक्ती बसते, उठते, चालते कशी, तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव, हालचाली, एखाद्याची विचार करण्याची पद्धत कशी असेल हे सगळं टिपलं पाहिजे. टिपलेलं हे सगळं आपल्या लिखाणात आलं पाहिजे आणि आलंच तर ते कसे यावे? तर मग 'पुलं'सारखे यावे, ही सगळी विचारप्रक्रिया मनात ठसली आहे. व्यक्तिआधारित लेखनाचा आदर्श किंवा वस्तुपाठ कोण असावा? तर पु. ल. देशपांडेच. इतका त्यांचा प्रभाव जवळपास दोन दशकांनंतरही टिकून आहे.

पत्रकारांसाठी किंवा कोणत्याही लेखनासाठी निरीक्षण ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ते जितकं चांगलं तितक्या अधिकाधिक गोष्टी तुम्हाला तुमच्या लेखनातून मांडता येतात. 'पुलं' या दृष्टीने अभ्यासणं हेदेखील रंजक आहे. चितळे मास्तरांच्या कोट-टोपीपासून ते त्यांच्या फाटक्या चपलेपर्यंत, सखाराम गटणेच्या डोक्यावरच्या टोपीपासून ते पेस्तनकाकांपर्यंत प्रत्येक गोष्ट डोळ्यासमोर खणखणीतपणे उभी राहते. त्यांच्या कोणत्या तरी लेखात त्यांनी 'मठ्ठ गोदी' असा शब्दप्रयोग केला होता. त्यातून जे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले, ते आजही त्या प्रकारची एखादी मुलगी समोर आली की आठवून जाते अन् नको त्या वेळी अकारणच ओठांवर हसू उमटते. ऑल क्रेडिट गोज टू मि. पीएल! निरीक्षणाच्या या त्यांच्या ताकदीचे आजतागायत अप्रूप वाटत आले आहे.

पण, या जरा तांत्रिक गोष्टी झाल्या. सर्वात महत्त्वाची गोष्ट पुलंनी काय दिली असेल, तर ती म्हणजे विनोद कळण्याची समज! दुसरे एक ते तिरकसपण आणि तिसरे शब्दांशी खेळत होणारी विनोदनिर्मिती. चौथे आयुष्यात अकारण उद्भवणारे गंभीरपण. काही काही लोकांच्या आयुष्यात हे गंभीरपण जरा जास्तच डोक्यावर येऊन बसलेले असते. म्हणजे अशा लोकांना गंभीर राहणे आणि गांभीर्य असणे, यात फरक असतो, हेच बहुतेक कळत नाही. थँक्स टू पुलं, माझ्या मानगुटीवर हे अवास्तव गांभीर्याचे भूत मानेवर बसले नाही. अनेक कठीण गोष्टी आणि घटना आपल्या आयुष्यात घडत असतात. आजूबाजूची परिस्थिती गंभीर असतेही. क्वचित मनावर दडपणही असते; पण अशाही परिस्थितीत त्या घटनेतील गंमत टिपण्याची क्षमता थोडीफार अंगी आली असेल तर ती पुलंच्या साहित्याच्या वाचनातून आली हे निश्चितच. पहिल्या संस्कारांचे श्रेय पुलंचेच! आपल्या अवतीभवती एखादा ध्येयवादी, टिपिकल माणूस दिसला की आपसूक 'सखाराम गटणे' आपल्याला आठवतो, घरोघरी खपणारे नारायण आपण टिपू लागतो, हे सगळे श्रेय कुणाचे? निर्विवाद पुलंचेच! दासबोध, तुकाराम गाथा आणि ज्ञानेश्वरी यानंतर मराठीत काही लिहिले नाही तरी चालेल, असे व.पु. काळे यांनी कुठे तरी लिहिल्याचे स्मरते. व्यक्तिरेखा मांडण्याच्या बाबतीत, व्यक्ती आणि घटनांमधील विसंगती टिपण्याच्या बाबतीत आणि त्या सगळ्यातून विनोदनिर्मिती करण्याच्या बाबतीत पुलंनी केलेल्या कामानंतर पुढे काही लिहिले नाही तरी चालेल.

पुलंच्या सगळ्याच साहित्यांत एक मध्यमवर्गीय वातावरण आणि जुन्या काळातील भारलेपण काठोकाठ भरलेले आहे. त्या काळातील मध्यमवर्गीय मूल्ये, ते संस्कार आधुनिक काळात धूसर होत चाललेले आहेत. मधल्या काही वर्षांमध्ये मध्यमवर्गीय आणि त्यातही ब्राह्मणी मूल्यांना नाकारत सुटण्याचा एक खेळ महाराष्ट्रात सुरू झाला जो आजतागायत कायम आहे. महाराष्ट्राच्या समाजकारणात जे लोकमान्य टिळकांचे झाले ते साहित्य आणि लेखनाच्या क्षेत्रात पु.ल. देशपांड्यांचे करण्याचाही खेळ काही जणांनी खेळून पाहिला. या तथाकथित पुरोगामीपणाचा पगडा मनावर बसलाही; पण आता सर्वत्र आक्रस्ताळेपणाचा कळस झालेला दिसत

असताना पुलंच्या साहित्याचे महत्त्व आणखीच अधोरेखित होते. आपल्या प्रत्येक कलाकृतीतून वाचक–श्रोते आणि प्रेक्षकांना निखळ आनंद महाराष्ट्रात सर्वाधिक कुणी दिला असेल तर तो पु.ल. देशपांडे यांनीच दिला आहे हे नाकारता येत नाही. हे सगळे करीत असताना त्यांनी स्वीकारलेली 'एक होता विदूषक' प्रकारची भूमिकाही अनुकरणीय ठरते. तेच मध्यमवर्गीय वातावरण, लहानसहान गोष्टींमधून आनंद शोधण्याची वृत्ती आणि गतकाळातील चांगल्या गोष्टींना आस्थेने कवटाळणे याचे अप्रूप आहेच; किंबहुना ते सगळे पुढील पिढीपर्यंत जावे असेही आवर्जून वाटते. या सगळ्यांसाठी आयुष्यात 'पुलं' नावाचं भारावलेपण कायम राहावे, ही अपेक्षा अवास्तव ठरणार नाही.

पुलंनी माझ्यासह असंख्य सामान्यांच्या आयुष्यात ज्या दोन गोष्टींची सहज पेरणी केली त्या म्हणजे संगीत आणि बंगाली भाषा! माझ्यासारख्या ज्यांना शास्त्रीय किंवा कोणत्याच संगीतातील काहीच कळत नाही अशांमध्ये ख्याल, ठुमरी, रागदारीपासून सुगम संगीतापर्यंत विविध गायन प्रकारांची गोडी निर्माण करण्याचे काम जितके पुलंनी केले ते इतर कोणत्याही संगीत क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी केले नाही. हीच गोष्ट बंगाली भाषेची! म्हणजे सशस्त्र क्रांतिकार्यामुळे महाराष्ट्राच्या मनात बंगाल वसला आहेच. त्यानंतरच्या काळात बंगाली भाषा, साहित्य, संगीत आणि अर्थात शांतिनिकेतन यांच्याबद्दलची ओढ पुलंमुळेच निर्माण झाली आहे. जग फिरून आल्यावरही अद्याप शांतिनिकेतन बघितले नाही, अशी रुखरुख व्यक्त करणारेही लोक माझ्या ओळखीचे आहेत. या अवस्थेमागील कारण पुलंनी रवींद्रनाथ, त्यांच्या कलाकृती आणि शांतिनिकेतन यांच्याबद्दल मराठीतून केलेली वातावरणनिर्मिती हेच आहे. हे आकर्षण इतके आहे की, वेगळ्या भाषा शिकण्याच्या यादीत अद्यापही बंगालीच पहिल्या क्रमांकावर आहे.

सुरुवातीच्या काळात आपल्या रोल मॉडेल्समध्ये अनेक मान्यवरांचा समावेश असतो. हळूहळू त्यातल्या अनेकांचे पाय मातीचेच होते हे कळल्यावर ते आकर्षण कमी होत जाते. सुदैवाने 'पुलं'च्या बाबतीत असं काही घडलेलं नाही; किंबहुना ते घडूच द्यायचे नाही. विशेषत: सध्याच्या टोकाच्या, आक्रस्ताळ्या, असंख्य विद्वेषांच्या काळात आणि मनामनांत फूट पडलेल्या काळात पु.ल. देशपांडे हे मनाला आल्हाद देणारे 'आनंदनिधान ठरतात'. मध्यमवर्गीय म्हणून हिणवा, अभिजात आहे की नाही यावर लाख चर्चा करा, आम्हाला 'पुलं' हवे आहेतच. पुलं, तुम्ही आयुष्यात असेच मस्तपैकी अस्ताव्यस्त पसरलेले राहा. माझ्याच नाही तर माझ्या पुढच्या आणि त्याही पुढच्या पिढीपर्यंत असेच कायम राहा! आम्हाला तुम्ही हवेच आहात!

– मंदार मोरोणे
नागपूर, भारत
mandarmoroney81@gmail.com

पु. ल. देशपांड्यांचे मजेदार किस्स्से

✻ एकदा पुलं प्रवासात असताना त्यांना कोणी तरी भेटला. तो त्यांचा चाहता होता. तो म्हणाला की, माझी फक्त दोन व्यक्तींवर श्रद्धा आहे, एक ज्ञानेश्वर आणि दुसरे तुम्ही.
माझ्या खोलीत मी ज्ञानेश्वराच्या फोटोसमोर तुमचाही फोटो ठेवलाय.
तर पुलं म्हणाले, अहो, असं काही करू नका. नाही तर लोक विचारतील, ज्ञानेश्वरांनी ज्याच्याकडून वेद म्हणवून घेतले तो रेडा हाच का म्हणून?

✻ पुलं एकदा चितळ्यांच्या दुकानात गेले, मिठाई खरेदी केली आणि खोक्यात बांधून द्यायला सांगितले. दुकानातील व्यक्ती म्हणाली, खोक्याचा चार्ज पडेल.
त्यावर पुलं म्हणाले, अरे वा, म्हणजे मिठाई फुकट?

✻ एकदा पुलं एका खेड्यात उतरले होते. तिकडच्या शाळेच्या प्रिन्सिपलनी त्यांना शाळेत बोलावून त्यांचा सत्कार केला. पुलंनी दिलेल्या खुर्चीवर बसताच त्या खुर्चीचा हात मोडला. सगळी पोरं खो खो हसायला लागली. ओशाळलेले प्रिन्सिपल पुलंना म्हणाले, माफ करा; पण हजार वेळा सांगूनही इकडच्या सुतारांकडून नीट कामच होत नाही.
पुलं मिश्किलीत म्हणाले, अहो, करवत (!) नसेल!

✻ स्वत:च्या खास विनोदी पद्धतीत पुलं एके ठिकाणी म्हणतात, मुलगी अगर मुलगा सरळ वळणाची अगर वळणाचा कसा असतो कोण जाणे! कारण वळण म्हटल्यावर ते सरळ कसे असणार? भूमितीला बुचकळ्यात ढकलणारी ही सरळ वळणाची आडवळणी व्याख्या आहे.

✻ भारती मंगेशकर ह्या दामुअण्णा मालवणकर ह्या प्रसिद्ध विनोदी कलाकाराची कन्या. त्या दिसायला अतिशय सुरेख होत्या आणि दामुअण्णा तसे दिसायला खास नव्हते व चकणे होते. त्यामुळे पुलंनी जेव्हा तिला पाहिले तेव्हा म्हणाले, ही मुलगी बापाचा डोळा चुकवून जन्माला आली आहे.

आठवणीतले भाई

सोमवार होता. दुपारची वेळ साधारण ३-३:३०ची, शाळेच्या सुट्यांमुळे घरी भावंडं जमलेली. आम्ही गच्चीवर दंगा घालून परत खाली आलो तर आत्या - मामा, आई - पप्पा एका बातमीमुळे शांतपणे एकमेकांचे चेहरे पाहत बसले होते. अर्रर्र, फारच वाईट झाले, मामांच्या तोंडून निघालेल्या उद्‌गाराने आम्ही जरा धास्तावलोच. पुन्हा तीच बातमी, 'पु. ल. देशपांडे ह्यांचे वृद्धापकाळाने निधन.' दोन मिनिटं काय कसं व्यक्त व्हावं कळलंच नाही.

खरं तर खूप वाचन नव्हतं माझं. कॉमिक्स वगैरे ठीक आहे, पण कधी अशा मोठ्या लेखकांची पुस्तकं नव्हती वाचलीत मी. तेवढा मला रस नव्हताच; पण आजोबांच्या घरी एका फळीवर ठेवलेल्या पुस्तकांमध्ये गोलमटोल चेहऱ्याचे, कुरळे केस असणारे आणि मोठ्ठा चष्मा लावलेले पुलं मी नेहमी पाहायची. लहान मुलांना आकर्षित करतील असे हसमुख आजोबा मला तिथे दिसायचे. मी त्या फळीवरच्या त्या पुस्तकाला हातात घ्यायची ते फक्त त्या हसमुख, गोलमटोल आजोबांना पाहायला. पुढे म्हटलं तसं, मला वाचनाची फार आवड नव्हती, त्यामुळे प्रत्येक पुस्तक अर्धवट वाचून किंवा एकदा चाळून झालं की, माझं लक्ष भरकटायचं; पण हा चेहरा मात्र माझ्या खूप जवळचा होता. दूरदर्शनवर लागणाऱ्या मालिका, कथाकथनाचे व्हिडीओ किंवा नाटकं मी वारंवार पाहायचे. 'गुळाचा गणपती' हा सिनेमा तर कित्येकदा बघितला. 'व्यक्ती आणि वल्ली'बद्दल मला प्रचंड आकर्षण होतं ते त्यावर आधारित मालिकेमुळे. त्यांच्याबद्दल टीव्हीवर किंवा ऑडिओ कॅसेट्समधून जेवढं ज्ञान होतं तेवढंच. आयुष्यातल्या १२-१३ वर्षांत मला पुलं कळलेत ते ह्याच माध्यमांमधून.

पण त्या दिवशी ती बातमी ऐकली आणि मन खरंच सुन्न झालं. त्यांच्यावर प्रसारित झालेला प्रत्येक कार्यक्रम त्या दिवसानंतर मनात एक पश्चात्तापाची भावना घेऊन पाहिला. त्यांच्याबद्दल जवळपास ३-४ आठवडे सतत अग्रलेख छापून येऊ लागले. राजकारणी, अभिनेते, साहित्यिक, सामान्य जनता सगळीच हळहळ व्यक्त करत होती आणि मन आणखीनच उदास होऊ लागले.

त्यांच्या पुस्तकांबद्दल, लिखाणाबद्दल सगळे चर्चा करत. त्यांनी लिहिलेल्या पात्रांबद्दल बोलत. त्यांचा हजरजबाबी स्वभाव, त्यांचं साधं राहणीमान, त्यांचे कष्ट, त्यांचं काम, त्यांचं लिखाण, त्यांचं संगीत, त्यांची गायकी, त्यांचं व्यक्तिमत्त्व अशा अनेक पैलूंवर बोललं जात होतं; पण मला ह्यातलं काहीच ठाऊक नव्हतं. का? वाचनाच्या अभावामुळे? मला अपराधी वाटू लागलं. एवढा मोठा लेखक, त्याचं इतकं अमूल्य साहित्य आपल्या इतक्या जवळ असताना आपण वाचलं नाही, ह्याची खंत सतत मनाला त्रास देत होती.

आणि मग मी वाचनाचा झपाटाच लावला. त्याकरिता शाळेच्या लायब्ररीचा आधार मिळाला. पेपरमध्ये छापून आलेले साहित्य आणि लायब्ररीची पुस्तकं आणि मी. 'व्यक्ती आणि वल्ली'पासून सुरुवात झाली, मग 'अघळ-पघळ', 'अपूर्वाई', 'गोळाबेरीज', 'बटाट्याची चाळ', 'नसती उठाठेव' अशा अनेक पुस्तकांमध्ये मी डोकं खुपसून बसायचे. एखादं पुस्तक वाचत असताना दिवसरात्र त्याच्यातील पात्रं माझ्या अवतीभोवती जिवंतपणे वावरत आहेत असा भास

भाईंची कथाकथनाची शैली अतिशय विलक्षण! त्यांनी उभं केलेलं पात्र; हो, उभं केलेलं पात्र असंच मी म्हणेल, कारण ते ज्या प्रकारे त्या पात्राचं वर्णन करत, ते पात्र अगदी जसंच्या तसं आपल्यापुढे उभं राही; तर त्यांनी उभं केलेलं पात्र हे अगदी आपल्या आजूबाजूचा एखादा व्यक्ती असावा इतकं जवळचं आणि आपल्या ओळखीचं असे. त्यात आपल्याला आपलेच एखादे मास्तर, आपलाच एखादा सखा, आपल्याच वर्गातला एखादा आगाऊ विद्यार्थी, आपलाच घरगडी असे सगळे दिसतात. काळ बदलला असला तरी ती पात्रं अजूनही तशीच आहेत. संदर्भ तेवढे बदलले आणि म्हणूनच की काय, हे कथाकथन मात्र मला फार आवडतं.

होऊ लागे. आजूबाजूच्या लोकांमध्ये पुलंची पात्रं मी शोधू लागले आणि मग एक दिवस भक्ती बर्वेची एक जुनी मुलाखत पाहिली. त्यात त्या मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीच्या तोंडून सतत फुलराणीबद्दल ऐकून माझं मन त्यात गुंतलं. 'फुलराणी' ही कविता तशी लोकप्रियच, पण या नाटकाबद्दल तेवढं माहीत नव्हतं. मग एकदा हे नाटक बघण्याचा योग आलाच. तेव्हा त्या नाटकातले भाव समजण्याइतकी समज माझ्यात नव्हती कदाचित; पण तो अनुभवसुद्धा एक वेगळंच सुख देऊन गेला. हळूहळू मला पुलंचा सहवास घडत गेला. मी अधिकाधिक साहित्य वाचू लागले. त्यातून मला कधी गंभीर तर कधी मिस्कील पुलं भेटू लागलेत.

विनोद हा त्यांच्या साहित्याचा एक भाग असला तरी आयुष्याचे धडे देणारं साहित्यसुद्धा मनाचा ठाव घेऊन जात.

माझं लिखाण सुरू असतानाच, मी एक वाचकसुद्धा बनत चालले होते. साध्या सरळ, सोप्या भाषेचा वापर करूनसुद्धा एखादं साहित्य किती सुंदर प्रकारे सादर करता येतं हे मी पुलंकडून शिकले. बोली भाषा आणि लेखी भाषेतला फरक कसा जपायचा आणि दोन्ही भाषांचा मान राखून त्यांना आपल्या लेखणीत कसं उतरवायचं हे त्यांना चांगलंच ठाऊक होतं आणि म्हणूनच कदाचित त्यांचं लिखाण प्रत्येकाला जवळचं वाटतं.

आता वयाच्या तिशीत आल्यावर पुन्हा एकदा त्यांचं साहित्य वाचताना त्या प्रत्येक पुस्तकातील, नाटकातील अनेक अर्थ नव्याने समजू लागले आहेत. प्रत्येक पुस्तक वाचताना त्या लिखाणामागचे अनेक नवे अर्थ मला लागत आहेत. ती खंत अजूनही मनात आहेच की, ते हयात असेपर्यंत कधीही मला त्यांच्या साहित्याचं मोल कळलं नाही, (म्हणजे मी त्यांना व्यक्तिश: भेटू शकणार होते हे दूरदूरपर्यंत माझ्या मनात नव्हतं, तशी शक्यतासुद्धा नव्हती; पण हा विचार का मनात सारखा येतो आणि त्रास होतो कुणास ठाऊक?) पण ते गेल्यामुळे आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली होती आणि नंतर त्यांनीच ती भरूनही काढली. गोलगोल चेहऱ्याचे, कुरळ्या केसांचे, मोठ्ठा चष्मावाले ते आजोबा दृष्टिआड गेलेत, पण मागे त्यांचा दृष्टिकोन ठेवून गेलेत. त्या चित्रातल्या लोभसवाण्या चेहऱ्यामागे कित्येक पैलू होते हे मला कळले.

आता प्रसारमाध्यमांनी आणि सोशल मीडियाने भाईंना आपल्या आणखीनच जवळ आणले आहे. पूर्वी प्रसिद्ध झालेलं साहित्य हाच एक स्रोत असे; पण आता त्यांनी लिहिलेली पत्रंसुद्धा वाचायला मिळतात. डॉ. श्रद्धानंद ठाकूर ह्यांच्या संकलनातून अनेक छान छान गोष्टी मला वाचायला मिळाल्यात.तसेच भाई आपल्या वैयक्तिक आयुष्यात कसे होते, त्यांची जीवनशैली, लिखाणाची पद्धत, त्यांचा हजरजबाबी स्वभाव, दैनंदिन आणि घरगुती जीवनातील आणखी अनेक गमतीजमती मला गिरीश व वृंदा ठाकूर यांच्याकडून (जे सुनीताबाईंचे भाचे आहेत) ऐकायला – वाचायला मिळाल्यात. ह्या दोघांकडून आम्हाला भाईंच्या आणि सुनीताबाईंच्या आयुष्यातील अनेक प्रेरणादायी प्रसंगसुद्धा ऐकायला मिळाले.

बरं, फक्त पुस्तकांमधूनच नाही तर इतर माध्यमांतूनसुद्धा आपण साहित्याच्या जवळ जाऊ शकतो हेसुद्धा भाईंनीच शिकवले आणि मला नाटक आणि कथाकथन हे दोन नवे मित्र मिळाले. भाईंची कथाकथनाची शैली अतिशय विलक्षण! त्यांनी उभं केलेलं पात्र; हो, उभं केलेलं पात्र असंच मी म्हणेल, कारण ते ज्या प्रकारे त्या पात्राचं वर्णन करत, ते पात्र अगदी जसंच्या तसं आपल्यापुढे उभं राही; तर त्यांनी उभं केलेलं पात्र हे अगदी आपल्या आजूबाजूचा एखादा व्यक्ती असावा इतकं जवळचं आणि आपल्या ओळखीचं असे. त्यात आपल्याला आपलेच एखादे मास्तर, आपलाच एखादा सखा, आपल्याच वर्गातला एखादा आगाऊ विद्यार्थी, आपलाच घरगडी असे सगळे दिसतात. काळ बदलला असला तरी ती पात्रं अजूनही तशीच आहेत. संदर्भ तेवढे बदलले आणि म्हणूनच की काय, हे कथाकथन मात्र मला फार आवडतं. कदाचित त्यातलं प्रत्येक वाक्य हे आपल्या जीवनाशी निगडित असतं म्हणून किंवा तो आपलाच एखादा अनुभव असतो म्हणून असेल, पण मला त्यांचं लिखाण आणि ती शैली अतिशय जवळची वाटते. भाईंचं कथाकथन असो किंवा सुनीताबाईंचं काव्यवाचन; ऐकलं की ऐकतच रहावंसं वाटतं. त्यांचा साधेपणा आणि आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हा खूप काही शिकवून जातो. भाई गेल्याचे कळले त्या क्षणापासून ते आजपर्यंतचा माझा वाचनातला एकूणच प्रवास खूप विलक्षण घडला. मला व्यक्ती म्हणून घडवण्यात अनेक लेखकांचा हातभार लागला; पण त्याची सुरुवात झाली भाईंमुळे! ते आबालवृद्धांचे लाडके होते, ते प्रत्येकाचे आपले आणि जवळचे होते किंवा मी म्हणेन ते त्यांच्या प्रत्येक श्रोत्यासारखे / वाचकांसारखे होते आणि म्हणूनच ते अजूनही आपल्या तितक्याच जवळ आहेत!!

– डॉ. मानसी सगदेव
द हेग, नेदरलँड्स
Manasi.mohril@gmail.com

अमेरिकेत आमचा बराच काळ कारमध्ये कामाला जाताना वाया जातो. खास करून अटलांटातील हायवेवरील गर्दी तर विचारायलाच नको. त्या वेळी पुलंच्या या व्यक्तिरेखा व इतर श्राव्य माध्यमातील साहित्य मोठा दिलासा असतो. सखाराम गटणे, नारायण वगैरे तर जणू रोजच माझ्यासोबत कामाला जातात असे वाटते. 'असा मी असामी', 'बटाट्याची चाळ' वगैरे लांबच्या प्रवासात बऱ्याचदा ऐकली. मुलांनी आधी विरोध दर्शविला; परंतु हळूहळू त्यांनाही हे विनोद समजू लागले. अशा रीतीने भाई आमच्या अमेरिकेतील कौटुंबिक सफरीचे सदस्य बनले.

तो पुलराजा

'भांडारकर रोडवरील पुलंच्या बंदिस्त फ्लॅटवर चोरीचा प्रयत्न' अशी बातमी काही वर्षांपूर्वी वाचली आणि एका तपानंतरसुद्धा पुलंनी सर्वांना हसविण्याची भूमिका चालू ठेवली आहे याचा प्रत्यय आला. वास्तविक पाहता तिथे चोरीला जाण्याचे धाडस कुणी मराठी माणूस करेल असे वाटत नाही. चोराला पुस्तकांखेरीज काही मिळाले नाही हे सांगायची गरज नाही; परंतु पुलंचा आत्मा त्याला खूप हसला असेल. पुलंचे वैभव हे बँक लॉकर किंवा शेअर बाजारात कधीच नव्हते. तमाम मराठी जनांच्या ह्रदयात त्यांनी स्थान मिळवले होते आणि त्याची किंमत कुणीच करू शकणार नाही.

१९७० च्या दशकात शाळेत असताना दूरचित्रवाणी जेव्हा कृष्णधवल होता, एकच वाहिनी होती तेव्हा पुलंचे प्रथम दर्शन घडले. आमच्या चाळीत आमच्याकडे टीव्ही व टेपरेकॉर्डर होता. हौशी पिताश्रींनी तेव्हा सादर झालेले पुलंचे कथाकथनाचे कार्यक्रम आवर्जून सर्वांना बसवून बघितले. शेजारी कॅसेट रेकॉर्डर ठेवून ते कार्यक्रम रेकॉर्ड केले. मग त्यात आमच्याही हसण्याचा, गाण्यांचा, आवाज रेकॉर्ड झाला. लहानपणी रेकॉर्ड झालेल्या त्या आठवणी, जुने दिवस ताजे करतात. पुलंमुळे जणू आम्हाला ही आयुष्यभराची भेट मिळाली. त्याच आसपास 'गुळाचा गणपती' हा चित्रपट प्रभात टॉकीजमध्ये पाहिला. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व काय असू शकते याचा प्रत्यय आला. लेखन, दिग्दर्शन, संगीत, कलाकार वगैरे विविध भूमिका पुलंनी चोख बजावल्या. मराठीच नव्हे तर आयुष्यात पाहिलेल्या सर्वात सुंदर चित्रपटात मी याची गणना करेन. पुलंनी आणखी असे चित्रपट का काढले नाहीत हे एक न उलगडलेले कोडे आहे. विनोदी लेखक म्हणून त्यांनी मिळवलेल्या अफाट लोकप्रियतेमुळे त्यांचे चित्रपट व कला दिग्दर्शन क्षेत्रातील कर्तृत्व किंचित झाकोळले गेले.

भारतात दूरदर्शनची मुहूर्तमेढ रोवण्यात त्यांचा फार मोठा मोलाचा वाटा होता. अनेक मानसन्मान, पुरस्कार मिळूनदेखील त्यांचे पाय जमिनीवर होते. पद्मभूषण, महाराष्ट्र भूषण वगैरे उच्च पुरस्कार मिळून त्यांनी महाराष्ट्रातीलच नव्हे तर सर्व भारतातील लोकांच्या मनावर राज्य केले. अभिजात हिंदुस्थानी संगीताचे ते मोठे जाणकार होते. स्टॅण्ड अप कॉमेडी हा प्रकार त्यांनी भारतात लोकप्रिय केला. अंतू बर्वा, रावसाहेब, सखाराम गटणे, नारायण, चितळे मास्तर अशा अनेक व्यक्तिरेखा त्यांनी अजरामर केल्या. प्रत्येक व्यक्तिरेखा त्यांनी बारकाईने उभी केली. विनोदाचे अंग न सोडता वाचकांच्या काळजात हात घातला. रावसाहेब, नारायण

या व्यक्तिरेखा मांडताना मानवी पैलू किती विलक्षणपणे हाताळले हे लक्षात येते. खास करून श्राव्य माध्यमातून ऐकताना तर हे कधी संपूच नये असे वाटते. कितीही वेळा ऐकले तरी कंटाळा येत नाही. ही कॅरेक्टर्स खरोखरीच अस्तित्वात असतील असे भासते; किंबहुना पुलंना हा प्रश्न नेहमी विचारला जायचा, ''काय हो भाई, तुम्हाला खरोखरीच अंतू बर्वा भेटला का? बेळगावला रावसाहेब कुठे राहायचे?'' असे हमखास विचारले जायचे. सिद्धहस्त लेखकाचे हेच तर वैशिष्ट्य असते नाही का?

अमेरिकेत आमचा बराच काळ गाडीरमध्ये कामाला जाताना वाया जातो. खास करून अटलांटातील हायवेवरील गर्दी तर विचारायलाच नको. त्या वेळी पुलंच्या या व्यक्तिरेखा व इतर श्राव्य माध्यमातील साहित्य मोठा दिलासा असतो. सखाराम गटणे, नारायण वगैरे तर जणू रोजच माझ्यासोबत कामाला जातात असे वाटते. 'असा मी असामी', 'बटाट्याची चाळ' वगैरे लांबच्या प्रवासात बऱ्याचदा ऐकली. मुलांनी आधी विरोध दर्शविला; परंतु हळूहळू त्यांनाही हे विनोद समजू लागले. अशा रीतीने भाई आमच्या अमेरिकेतील कौटुंबिक सफरीचे सदस्य बनले. तसं पाहिलं तर भाईंचा विनोद व एकंदरीत भाषा उच्च कोटीची. कंबरेखाली विनोदाची पातळी कधीही गेली नाही. त्यामुळे ते प्रत्येक कुटुंबाचा हिस्सा बनले. पुलं ऐकणे किंवा वाचणे हा एके काळी सुसंस्कृत असल्याचा स्टेट्स सिंबॉल होता. पुलंची पुस्तकं संग्रही असणं हा आमच्या पिढीतील नियमच होता. समकालीन शंकर पाटील, द.मा. मिरासदार यांचे विनोद निखळ व काहीशा साध्या भाषेतील असायचे. मात्र कधीही वाचक विभागले गेले नाहीत. पुलंचे वर्चस्व हे निर्विवाद होते. अर्थात तेव्हा व्हॉट्सअॅप नसल्याने उगीचच टीका होणे व दुफळी होणे टाळले गेले.

आमच्या घरी पुलंची बहुतांश पुस्तके होती. याच वयात ती वाचल्याने काही अजाणतेपणी संस्कार घडत गेले. उदा. 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा' वगैरे पर्यटनपर पुस्तकांची पारायणे झाली. त्यामुळे दूरदेशी जाण्याची स्वप्ने पाहिली. कुतूहल जागृत झाले. देश कसे बघावेत याचे मार्गदर्शन मिळाले. कुठे तरी माझ्याही पर्यटनपर लिखाणावर तो छाप पडला हे अभिमानाने सांगू इच्छितो. बारकाईने केलेला पर्यटनाचा अभ्यास विनोदी पद्धतीने केवळ पुलंच कथन करू शकतात. आजही आमच्या पुण्याच्या घरात ती पुस्तके कपाटात व्यवस्थित आहेत. कदाचित बांधणी सैल झाली असेल, परंतु बहुतांशी पुस्तकांवर खरकटे डाग, वरणभाताची शिते, आमटीचा शिक्का तसाच आहे. जेवतानासुद्धा पुस्तक सोडवत नसायचे. ते डाग एक आठवणी म्हणून ठेवल्या आहेत बालपणीच्या; जसे टेपरेकॉर्डवरील आमचे आवाज. आजही जेव्हा कपाटातील पुस्तक काढतो तेव्हा उलगडताना असे डाग त्या स्मृती जाग्या करतात. पुलंच्या लिखाणाचे वैशिष्ट्य म्हणजे कुठूनही सुरुवात केली तरी फरक पडत नाही. वाचकाला टिकवून ठेवण्याचे कौशल्य प्रत्येक शब्दात तेवढेच दडलेले असते.

पुलंची बहुतांशी पुस्तके वाचली; परंतु 'बटाट्याची चाळ' हे सर्वात महत्त्वाचे पुस्तक न वाचल्याची खंत लागून राहिली होती. पहिल्यांदा भारताबाहेर आलो ते थेट न्यूयॉर्क इथे. घरापासून पहिल्यांदाच दूर आलो होतो. इथल्या जनसमुदायाशी व जगण्याशी समरस होण्याचा प्रयत्न करत होतो. एक वर्षाचा प्रोजेक्ट चौदा वर्षे वनवासासारखा भासत होता. घरची आठवण सतावत होती. क्वीन्स मधल्या घरात कंटाळवाणं वाटत होतं. शनिवार-रविवार मनसोक्त भटकत असे. न्यूयॉर्कमध्ये असताना गाडीची गरज भासत नाही. तिथल्या जगप्रसिद्ध पब्लिक लायब्ररीत गेलो. बाहेरील सिंहाच्या वास्तूला मुजरा करून आत शिरलो. ते भव्यदिव्य पुस्तकांचे प्रदर्शन पाहून डोळे दिपले. वरच्या मजल्यावर परदेशी विभाग दिसला. तिथे डोकावलो. काय आश्चर्य! तिथे मराठी विभाग दिसला. अधाशीपणे पुस्तके चाळली. कमी प्रमाणात असली तरी न्यूयॉर्कमध्ये मराठी पुस्तके मिळणे म्हणजे खजिना सापडल्यासारखेच वाटले. तिथे 'बटाट्याची चाळ' दिसली. ते तात्काळ चाळून पाहिले. पुढील दोन आठवडे ते अधाशासारखे वाचून काढले. कल्पना करा- 'बटाट्याची चाळ' मी न्यूयॉर्कच्या चाळीत वाचले. केवढा योग होता नाही का? १९४०-५० सालात मुंबईचं विशेषतः गिरगावातलं वर्णन. पुलं किती समरस झाले होते. चित्रपटातसुद्धा जेवढे बारकावे व्यक्त करता येऊ शकणार नाहीत एवढे बारकावे त्यांनी व्यक्त केले आहेत. शाळा-कॉलेजात त्यांची पुस्तके धडारूपाने अभ्यासली. मात्र तो अभ्यास कधी वाटलाच नाही.

युनिव्हर्सिटीत असताना 'रविवारची सकाळ' असा आम्ही प्रयोग सादर केला. कॉम्प्युटर सायन्सचे आम्ही विद्यार्थी. वार्षिक स्नेहसंमेलनासाठी सारे उत्साहाने कामाला लागले. नाटकात वगैरे काम करण्याचा कुणालाही विशेष अनुभव नव्हता. तरीही पुलंच्या प्रभावामुळे सारे उत्साहात होते. एक सोपस्कार म्हणून प्रयोगासाठी पुलंकडे परवानगीसाठी गेलो. अर्थात भाईंनी आमचे कौतुक करत परवानगी दिली. काहीही खळखळ केली नाही. त्यांच्या आशीर्वादाने प्रयत्न खूप छान झाला. भाईंनी व सुनीताबाईंनी समाजोपयोगी भरपूर कामे केली. मुक्तांगण, वेश्यांच्या मुलांसाठी वसतिगृह, अंधांसाठी रंगमंच, अंधश्रद्धा निर्मूलन अशा अनेक

कामांसाठी आर्थिक मदती केल्या. शक्य होते तेव्हा ते स्वत: झोकून देऊन काम करायचे. अपत्य नसल्याची त्यांनी कधीही खंत व्यक्त केली नाही. सारा महाराष्ट्र त्यांना पोटच्या पोरासारखा होता आणि अर्थातच साऱ्या महाराष्ट्राने त्यांच्यावर भरभरून प्रेम केले.

पुलं गेले तेव्हा सारा महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. एक लाडके व्यक्तिमत्त्व पडद्याआड गेले. मात्र त्यांच्या पुस्तकांतून, दृक्श्राव्य माध्यमातून ते सतत जिवंत राहिले. सर्व पिढ्यांवर त्यांनी राज्य केले. तरुण पिढीसुद्धा त्यांच्यावर तितकेच प्रेम करते. पिढ्यांमधील भिंती मोडून त्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अशी व्यक्ती विरळीच नाही का?

मराठी समाज नुसता महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नाही. युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व इतर अनेक भागांत विखुरला; परंतु नाट्य, संगीत, वाङ्मय याची आवड या समाजाने जपली. शिवजयंती, गणेशोत्सव देशोदेशी साजरे केले. वाचनालये सजवली. पुलंच्या आठवणीशिवाय किंवा त्यांच्या लिखाणाशिवाय हा समाज अपूर्णच भासतो. व्यक्तिरेखा, पर्यटन, ललित वगैरे विषयांवर आपल्या अफाट भाषाप्रभुत्वाने लिखाण करून कित्येक पिढ्यांचे निखळ मनोरंजन करणाऱ्या या लाडक्या व्यक्तिमत्त्वाला मानाचा मुजरा.

पुलं संवादिनी उत्तम वाजवायचे. त्याचा प्रत्यय काही कार्यक्रमांत आला. विनोदी लेखक हा उत्तम संगीतकार असू शकतो यावर विश्वास बसणे कठीण. ते मुंबईकर होते तसेच पुणेकरही. सह्याद्रीच्या घाटातून त्यांनी मराठीची गाडी कौशल्याने कोकणातून देशावर आणली.

मुंबईकर, पुणेकर, नागपूरकर यात खुमासदारपणे त्यांनी त्या भागातील वैशिष्ट्ये अंगीकारली. टीका केली, परंतु बोचरी कधीच नव्हती. टीका करून घेणाऱ्यालादेखील त्यात गंमत यायची. 'म्हैस'मध्ये 'आमाला पॉवर नाय' हा डायलॉग बरंच काही सांगून जातो. जातीवाचक, धर्मावरील मर्मभेद, त्यांनी नेहमीच टाळले. अत्र्यांप्रमाणे ते सरकारवर जहरी टीका करू शकले असते; परंतु राजकारणापासून ते नेहमीच अलिप्त राहिले. म्हणूनच कदाचित लोकांच्या मनाच्या देव्हाऱ्यात ते नेहमीच राहिले. संस्कार म्हणजे काय याची व्याख्या जडबंबाळ शब्द न वापरता किती सुंदर केली आहे नाही? एखादा चित्रकार कुंचल्यातून जसे अचूक चित्र काढून हुबेहूब व्यक्तिमत्त्व दाखवतो त्याचप्रमाणे भाईंनी केवळ शब्दांच्या फटकाऱ्यातून व्यक्तिरेखा जिवंत उभ्या केल्या आहेत. चित्रात फक्त चेहरा व शरीर दिसते. भाईंच्या शब्दांतून व्यक्तीचे अंतर्बाह्य दर्शन घडते. तीच गोष्ट पर्यटनाची. मग ते सॅनफ्रॅन्सिस्कोतील चायनीज असो वा हंगेरीतील गुल्लाश सूप असो, आंधळ्या माणसालासुद्धा सारे स्पष्ट दिसावे असे ते लिखाण असते.

गर्दीचा रस्ता असो अथवा मैलोन्मैल वैराण हायवे असो, भाईंची सीडी गाडीत वाजत असते तेव्हा माझे मन मायदेशात जाते. कधी कोकणात, कधी गिरगावात, तर कधी पुण्यात. त्यांचा आवाज 'संवाद' साधतो. विनोदाच्या अंगाला कधी संस्कारांची झालर असते, तर कधी निखळ विनोदाखेरीज काहीही नसतं.

जुन्या कॅसेट्स, खरकटे डाग पडलेली पुस्तके वाट पहात असतात. बालपणीचे स्पर्श पुन:पुन्हा खुणावू लागतात. किमान त्यासाठी का होईना मायदेशी जाण्यासाठी हुरूप येतो. पुलं, आम्ही तुमचे खूप ऋणी आहोत. त्यांच्या घरी चोरीला गेलेला किती खजील झाला असेल या विचाराने हसू येते.

– गिरीश देसाई
अटलांटा, यू.एस.ए.
gudesai@gmail.com

पुलं आणि बोरकर यांचे संबंध

वेळ होती पुण्यात रुपाली येथे, पुलं यांची साठी. (६० वा वाढदिवस.) सुनीताबाईंनी याची चोख व्यवस्था केली होती. पुणेकरांनी पुलं यांचा वाढदिवस ४–५ दिवस अगोदरच साजरा करायला सुरुवात केली. बा. भ. बोरकर यांनी सकाळी फोन करून भाईंशी गप्पागोष्टी केल्या व आशीर्वाद दिला. याचपूर्वी त्याच दिवशी रात्री ३ वाजेपासून मन्सूरजींनी पहाटेचे राग गाऊन त्यांच्या वाढदिवसाची सुरुवात केली. त्या दिवशी सुनीताबाईंच्या अंदाजाप्रमाणे सुमारे ७०० लोक येतील असा कयास होता, पण लोक त्याच्याहून किती तरी जास्त आले.

सगळे लोक गेले आणि रात्री ११ ला बेल वाजली. पाहिलं तर बोरकर दारात उभे होते. सुनीताबाई दचकल्याच. म्हणाल्या, अप्पा, तुम्ही सकाळी गोव्यात होता ना? बोरकर बोलले, हो तर काय भाईला आशीर्वाद फोनवर द्यायचा का? तो भाईंच्या डोक्यावर हात ठेवून, भाईला स्पर्श करून द्यायचा.

– बोरकरांची एक अजून आठवण. बोरकर गाण्यात गं फार उच्चारायचे. पुलं बोरकरांच्या समोर सुनीताबाईंना म्हणाले की, बोरकरांना गं ची बाधा झाली आहे. त्यावर बोरकर बोलले; सुनीता – चावट गं तुझा नवरा.

इतक्या जिव्हाळ्याचे संबंध होते पुलं आणि बा. भ. बोरकरांचे....

आज तुम्ही हवे होतात...

अलीकडेच माझ्या अमेरिकेतल्या मैत्रिणीचा निरोप आला, पुण्यातल्या मासिकात आमच्या इथल्या हास्य क्लबवर लिहिलंय. जरा तीन-चार कॉपीज घेऊन ठेव. मला खूप आश्चर्य वाटलं! अमेरिकेत अन् हास्य क्लब? तिथे तर लोक आनंदी, स्वातंत्र्य उपभोगणारे, सुखवस्तू असतात असे ऐकलेले. मग हे हास्य क्लब कशासाठी?

लेख हाती पडल्यावर लक्षात आले, की त्या हास्य क्लबमध्ये अमेरिकन स्त्रिया नाहीत. सिलिकॉन व्हॅलीत वेगवेगळ्या देशांतून आलेल्या स्त्रिया एकत्र जमतात. सकाळी व्यायाम, चालणे व एरवी सण, समारंभ, संमेलने यातून सांस्कृतिक देवाणघेवाण करतात. ओळखी आणि वेळ घालविण्याचे साधनही. त्याचाच एक भाग म्हणजे हास्य क्लब.

आपली संस्कृती तिथे रुजवणाऱ्या ह्या स्त्रिया आपली दुःखे, काळजी, नैराश्य सगळे बरोबर घेऊन का गेल्या? ते सर्व इथेच का नाही सोडून दिले? इथे भारतातही हास्य क्लब आहेत. त्यांची गरजही वाढते आहे. हास्ययोग जरी उत्तम व्यायाम असला तरी खोटे हसणे म्हणजे स्वतःलाच गुदगुल्या करण्यासारखे नाही काय? पुलं तुम्ही म्हणजे हास्य क्लबचे साक्षात मॅनेजर. तुम्ही गेलात आणि आमचे हसणेच हिरमुसले. कितीही वेळा ऐकल्या तरी वीट न येणाऱ्या कॅसेटवर आम्ही भागवतो आहोत. परवा 'अंतू बर्वा' ऐकली आणि पुन्हा एकदा हसता हसता डोळे कधी पाणावले हेच कळले नाही.

दारिद्र्य आणि नकारात्मक परिस्थितीत जगणाऱ्या अंतूची

आता कुठे तरी काही तरी बिनसतंय. पैसा आहे, पण समाधान नाही. हातात सोन्याचे घड्याळ पण पहायला वेळ नाही; पण म्हणूनच वाटतंय पुलं, तुम्ही हवे होतात आज. याही परिस्थितीत तुम्ही माणसातला वेगळेपणा नेमका हेरला असता. कदाचित विनोदनिर्मितीच्या खूप शक्यता निर्माण झाल्या असत्या आणि कुणालाही न दुखावणारा ताजा, टवटवीत, स्वच्छ विनोद निर्माण झाला असता. माणसे खळखळून हसली असती.

वरची वरात | बटाट्याची चाळ | अघळपघळ | जावे त्यांच्या देशा | व्यंगचित्रे | गणगोत | तुझे आहे तुजपाशी | ती फुलराणी | तीन पैशाचा तमाशा

कथा सांगताना हसता हसता रडवायची ही किमया कशी केलीत तुम्ही? अंतू बर्व्याचे अगम्य व्यक्तिमत्त्व किती सहज उलगडले आहे. तैलबुद्धी आणि विनोदबुद्धी असलेल्या बर्व्याच्या व्यक्तिमत्त्वाला तुम्ही तुमच्या भाषेने अमरत्व प्राप्त करून दिले आहे. कोकणातली माणसे तुमची जास्त लाडकी दिसतात. कारण म्हैस कथेतही तेच. एक एक व्यक्तिमत्त्व अगदी मुळापासून उभे केले आहे. तो पोलीस काय, मलुष्टे काय नि तो फडणवीस काय! कोकणातली माणसे अजून साधीच आहेत. थोडा पैसे येतोय पर्यटनातून; पण उगीच कर्ज नाही. कर्जमाफी नाही. आत्महत्या नाही. बलात्कार, हुंडाबळी नाही की छेडछाड नाही.

सखाराम गटणेसारखा विद्यार्थी तुम्हाला भेटला आणि अफाट वाचणाऱ्या तुम्ही, सामान्य वाचकाने वाचन, ज्ञानार्जन व करमणुकीसाठी करावे, त्याचा अतिरेक करू नये हा कानमंत्र दिलात. आपण हवे तेवढे फोटो काढावे किंवा हवे तसे घर बांधावे; पण दुसऱ्याला ते बघण्याची इच्छा नसताना दाखवण्याचा सोस कसा टाळावा अशा कानपिचक्या हसवत दिल्यात, न दुखावता. तो घर बांधणारा एक कुलकर्णी तुम्हाला भेटला काय अन् तुम्ही समस्त घर बांधणाऱ्या लोकांना प्रेमळ धडा शिकवला!

पेस्टनकाका, हरीतात्या, नारायण, नंदा प्रधान अशा व्यक्तिरेखांतून त्यांचे समाजातले वेगळेपण किती सहजपणे अधोरेखित केलेत. प्रत्येक व्यवसायातल्या जसे बँका, प्राध्यापकी, कॉर्पोरेट किंवा सरकारी कार्यालयातील लोकांच्या वागण्यात, बोलण्यात एक प्रकारचा साचलेपणा येतो. त्या व्यवसायातली वागण्याची पद्धत मुरत जाते. ते नेमके हेरून तुमच्या पौष्टिक जीवनातून पोस्टातल्या वातावरणाचे हुबेहूब वर्णन केलेत. आज पोस्ट ऑफिसेस थोडी सुधारलीत, पण स्थितप्रज्ञता तीच. पूर्व आणि पश्चिमेकडील देशांचे वर्णन वाचताना आपण तिथेच आहोत असे वाटत राहते. शब्दांचा खेळ खेळत वाचकाला गुंतवून ठेवण्याची तुमची कला औरच. कुठेही गेलात तरी तुमच्या खोडकर निरीक्षणाचा तिसरा डोळा सदैव उघडा असणार ज्यातून सामान्य माणूस अगदी सही सही उतरला. 'अपूर्वाई'मधल्या 'तुमची ती द्राक्षं आणि आमची रुद्राक्षं' ह्या बाणेदार उत्तराला मात्र थोडे गालबोट लागते आहे. थोडीशी घेणे म्हणजे सभ्यता असा प्रघातच आता शहरी मध्यमवर्गात दिसायला लागलाय. ती संस्कृती इथेही मूळ धरायला लागली आहे. रुद्राक्ष कपाटात आणि द्राक्षीण कुठेही, अगदी रांगा लावून. तरुण मुले-मुलीसुद्धा. पुरुषांची मक्तेदारी नको का मोडायला. हल्ली अनेक जण परदेश यात्रा करतात पण तत्पूर्वी तुमची प्रवासवर्णने वाचली तर आणखी मजा येते. जसे 'पूर्वरंग' आणि 'अपूर्वाई'.

चितळे मास्तर हा तुमच्या लिखाणातील आणखी एक उत्कृष्ट योग. आपल्या शिक्षकांवरचे निरतिशय प्रेम, शिक्षकांची शिकवण्यावरची निष्ठा, त्यांच्यावरील पालकांनीही दाखवलेला विश्वास हा त्या काळातील शिक्षणाचा भक्कम पाया होता. कारुण्याची किनार असलेली ती कथा आमच्याही मनात एक हळवा कोपरा आजही राखून आहे.

एक ना दोन, सांगावे तरी किती. मागे एकदा भूगोल विषयातील व्याख्यानाच्या वेळी प्रास्ताविकाच्या वेळी मी म्हटले, आता भूगोल विषय चितळे मास्तरांच्या कथेतील गोदेच्या पदरापुरता मर्यादित नसून तो जी. आय. एस. जी. पी. एस. व रिमोट सेन्सिंगपर्यंत पोहोचला आहे. यावर ज्या उत्स्फूर्त टाळ्या मिळाल्या त्या तुमच्या कसदार लेखणीलाच होत्या निःसंशय!

असो. लोकांना हसवत ठेवण्याचा वसा घेतलेल्या तुमची उणीव आज प्रकर्षाने जाणवते आहे. कारण खळखळवून हसवणारे, निर्मळ विनोद असलेले ना साहित्य ना कार्यक्रम. टीव्हीवर विनोदाच्या नावाखाली अचकट विचकट विनोद, अंगविक्षेप, पुरुषाचा स्त्रीवेश प्रवेश विनोदाची पातळीच खाली आणतात. मालिकेचे नाव काय तर 'माझ्या नवऱ्याची बायको'. आवर्जून वाचावे, ऐकावे असे विनोदी काही विरळाच. आता लोकांनी इंग्रजी वेब सीरिजेसचा आधार घेतलाय. मुळातच मोकळेपणा कमी झालाय. हल्ली माणसे गप्पा मारायला सहज भेटत नाहीत. आधी वेळ ठरवून किंवा समारंभात नटून-थटून, एकमेकांशी तुलना, खुशामत करत रमत थोडा वेळ. कुणाकडे एकमेकांना द्यायला वेळही नाही.

नाही म्हणायला तरुण मुले मात्र आनंदात दिसतात. विशेषतः पुण्यातल्या जागोजागी उगवलेल्या कावळ्याच्या छत्र्यांप्रमाणे दिसणाऱ्या हॉटेलमध्ये कॉफी किंवा सुरापान करण्यात वेळ घालवताना दिसतात. एकमेकांच्या तोंडाला केक फासून मध्यरात्री वाढदिवस साजरे करतात, अगदी सुशिक्षितांच्या वस्तीतही. व्याख्याने, संगीताच्या कार्यक्रमात अभावानेच. नवी प्रयोगशील नाटके मात्र दाद द्यावी अशीच. तुम्ही हवे होतात ती नाटके पाहायला.

तुम्ही गेल्यावर एक नवीनच जादू हाती आली आहे. त्याला सेल फोन किंवा मोबाइल फोन म्हणतात. सगळं जग मुठीत घेणारी जादूई वस्तू. सगळ्यांकडे असते. श्रीमंत-गरीब, सुशिक्षित-अडाणी, स्त्री-पुरुष, वृद्ध, प्रौढ, तरुण, बाल अशा सगळ्यांकडे दिसणारी. भ्रमणध्वनी म्हणतात त्याला. म्हणजे उठताबसता, खातापिता, चालताना आणि सकाळी अगदी मागील दारीसुद्धा वापरता येणारा. कुणाशीही कधीही बोलता येते. व्हॉट्सॲप नावाची जादू म्हणजे काळ, वेळ,

स्थळ यांना पुरून उरणारी. हजारो कि.मी. लांब असणाऱ्या व्यक्तीशी काही क्षणात संपर्क साधणारी. या व्हॉट्सॲपवर असंख्य संदेश, माहिती, स्फुट लेख, फोटो, आरोग्य टिप्स, देव, धर्म, संस्कृती काहीही यायचे राहिलेले नाही आणि हो, अगदी फुकट! विनोद तर गळक्या नळासारखे ठिबकतच असतात. अलीकडे सरदारजीच्या विनोदाची जागा पुणेकरांनी घेतलीये. कंजुषी, माज, तुसडेपणा यावर विनोद लिहायचा आणि खाली चक्क 'एक पुणेकर' लिहायचे. विनोद वाऱ्याच्या वेगाने पसरतो. त्यातले फार थोडे असतात दाद देण्यासारखे. मास्तर व गणू नावाचा एक विनोदाचा प्रकार बोकाळलाय. त्यात गणूचे उत्तर ऐकून मास्तरांना भोवळ येते, ते राजीनामा देतात व बरेच काही. पूर्वी विद्यार्थी मास्तरांची नक्कल करीत, खोड्या करीत; पण आतून प्रेम असे. आता जाहिरातीत 'टीचर काल तुम्ही पालक खाल्ला होता का?' म्हणून लहान मुले फिदीफिदी हसतात. शिक्षकांची कुचेष्टा अशी 'जाहीर'रीत्या होत नव्हती. चितळे मास्तरांसारख्या झिजलेल्या चपला बऱ्याच जणांच्या घरी होत्या. दोरा बांधलेले चष्मे होते; पण जिव्हाळा शाबूत होता. आता काळ खूप बदललाय. यांत्रिक प्रगतीने माणसेही यंत्रासारखी कोरडी होताहेत. सिमेंटच्या जंगलात राहणारी माणसेही सिमेंटसारखी अभेद्य, पाझर नसलेली होत चालली आहेत हळूहळू. तुमचा तो, बाई असेल तर हिच्याकडून खणानारळाने ओटी भरून घेईन, हा विनोद अंगावर वागवणाऱ्या लकडी पुलावर इन्चभरसुद्धा जागा नाही. ओटीचा पदरही नाही आणि ओढणीही नाही. पूर्वी भोवतालची माणसे चलाख, बेरकी असली तरी मनाने प्रेमळ होती, साधी सरळ होती. मुख्य म्हणजे कनिष्ठ मध्यमवर्गीय होती. सर्वांची आर्थिक परिस्थिती साधारण सारखीच असायची. श्रीमंत गरिबांना, विद्वान, शिकलेला अशिक्षितांना कमी लेखत नव्हता. मालक भाडेकरू यात कटुता नव्हती. जो तो आपल्या जागी समाधानी होता. या साधेपणातल्या माणसातच तुम्हाला विनोद सापडत होता. चाळी होत्या, वाडे होते. घराची दारे उघडी असत. एकमेकांशी संवाद असे. असलेल्या कमाईची जमवाजमव करून माणूस जगत होता, मुलांना शिकवत होता. थोडे लोक श्रीमंत होते, पण असूया नव्हती.

आता कुठे तरी काही तरी बिनसतंय. पैसा आहे, पण समाधान नाही. हातात सोन्याचे घड्याळ पण पहायला वेळ नाही; पण म्हणूनच वाटतंय पुलं, तुम्ही हवे होतात आज. याही परिस्थितीत तुम्ही माणसातला वेगळेपणा नेमका हेरला असता. कदाचित विनोदनिर्मितीच्या खूप शक्यता निर्माण झाल्या असत्या आणि कुणालाही न दुखावणारा ताजा, टवटवीत, स्वच्छ विनोद निर्माण झाला असता. माणसे खळखळून हसली असती. सर्वच काही बिघडले आहे असे नाही. लोकांजवळ बऱ्यापैकी पैसा आहे; पण नोकरीसाठी वणवण करणारे आहेत. साहित्यिक संगीतकार नाहीत असे नाही; पण...? उच्चशिक्षितांची संख्या खूप; पण परदेशात नशीब अजमावायला जाणारीही खूप. प्रगतीही होते आहे. शहरे अमर्याद, उभीआडवी वाढत आहेत. खेडी आणखीनच रिकामी होताहेत. निराशा, एकटेपणा आणि अनिश्चितता यांना सामोरे जाणारे ज्येष्ठ कट्ट्यांवर, बाकांवर बसलेले दिसतात. वरिष्ठ आपल्या काळातल्या सुवर्ण दिनांची आठवण काढत उदासी लपवत 'कशाची तरी' वाट पाहत बसलेले दिसतात. कारण घरासमोर व्हरांडे नाहीत, इमारतीचे बंद दरवाजे, यामुळे संवाद तुटत चाललेत. कुठे तरी चुकतंय. विस्कळीतपणा आलाय काहीसा. बदलतंय सगळं झपाट्याने.

म्हणूनच वाटतंय पुलं, तुम्ही हवे आहात. लोकांना हसवायला, मोकळं व्हायला. पूर्वी खूप नातेवाईक असायचे, जिव्हाळ्याची माणसे होती. त्यातली अर्धीअधिक पोचली तुमच्याकडे. म्हणूनच नव्या संदर्भात विनोदी साहित्य आम्हाला हवे आहे. खूप विषय आहेत. मॉलवाले, आय.टी.वाले, समाजातील विक्षिप्त, पैशाच्या मागे धावणारी, अंगावर सोने मढवलेले राजकारणी, गब्बर झालेले बिल्डर अशा व्यक्ती आणि वल्ली, अनेकानेक. राजकारणात तुम्ही कधी फारसा रस घेतला नाही; पण त्यामुळे आचार्य अत्रेंचीसुद्धा गरज आहे; खरपूस समाचार घ्यायला. माननीय डॉ. अब्दुल कलाम, भीमसेन जोशी, देव आनंद, पाडगावकर आणि किती तरी. शेकडो लोकांना मंत्रमुग्ध करणारे सुधीर फडके, माणिक वर्मा, अरुण दाते; सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलवणारे व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण, तेंडुलकर, अलवार कविता लिहिणारे रामायणकार कविवर्य ग.दि.मा., तर आयुष्याचे अंतिम सत्य सहज सांगणारे गझलकार सुरेश भट आणि अगदी अलीकडे गेलेले अमोघ वक्तृत्व असलेले सहृदय आदरणीय वाजपेयी. साहित्यिक, कलाकार, गायक, लेखक, कवी समाजाला आपापल्या कर्तृत्वाने बांधून ठेवणारी, समाजाला अर्थ देणारी, अशी किती माणसे निघून गेली.

याच पोकळीतून निर्माण झालेत हास्य क्लब, खोटे हसायला शिकवणारे. कुठल्या चतुर माणसाने हास्य क्लब सुरू केले देव जाणे? त्यापेक्षा मला वाटतंय तुम्हीच या. आम्हाला मोकळं व्हायला, हसवण्यासाठीची आपली ड्युटी लीव्ह देवाकडे टाकून.

– दीपाली ओक

पुणे, भारत

geodeepali@gmail.com

डॉक्टर पुलं

'पुलं' ह्या दोन अक्षरांमध्ये मराठी साहित्याचं आणि अनेक पिढ्यांचं एक गोंडस भावविश्व सामावले आहे. पुलं म्हणजे खुसखुशीत लेख, पुलं म्हणजे सहज सुंदर पेटी, पुलं म्हणजे एक आखीवरेखीव व्यक्तिचित्र आणि एखाद्या व्यक्तिचित्राइतकीच जिवंत प्रवास वर्णनं. प्रत्येकासाठी, प्रत्येक वयासाठी, प्रत्येक भावनेसाठी एक वेगळं आणि हल्लीच्या भाषेत सांगायचं झालं तर एक कस्टमाइज्ड सोल्यूशन म्हणजे पुलं. पुलंची विविध रूपं, त्यांचे कलाविष्कार यांच्यावर अनेकांनी आजवर लिहिलेलं आहे, त्यावर अनेक कार्यक्रमही होत असतात. ह्यातूनच पुलं आपल्या पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत राहातील; परंतु पुलंच्या नकळत त्यांनी अनेकांच्या आयुष्यात अनेक भूमिका बजावल्या आहेत. काहींचे मार्गदर्शक, काहींसाठी मित्र, काहींसाठी एक गुणवंत सहकलाकार, तर अनेकांसाठी एक हास्यवादळ. माझ्या आयुष्यात पुलंनी बजावलेली भूमिका ही एका डॉक्टरची.

माझा जन्म कल्याणचा, पण माझं संपूर्ण बालपण गेलं डोंबिवलीमध्ये. डोंबिवली म्हटलं की, डोळ्यासमोर येते ती भयानक गर्दी, उकाडा आणि घरट्यांसारखी बांधलेली घरं. आमचं घर मात्र ह्या गर्दीपासून लांब, डोंबिवलीच्याच एका हिरव्यागार परिसरात. डोंबिवलीच्या गर्दीपासून जरी आम्ही लांब असलो तरी डोंबिवलीच्या राष्ट्रीय प्राण्यापासून आमची काही सुटका नव्हती.

सुट्टीत पुण्याला मावशीकडे राहायला आल्यावर डोक्यावर मच्छरदाणीची वात्सल्यपूर्ण छाया नसल्यामुळे पहिले काही दिवस नीट झोप लागायची नाही. प्रत्येक घरात दरवर्षी एक जण तरी मलेरिया, डेंग्यूसदृश आजाराने आडवा असायचा. वर्ष १९९६, इयत्ता चौथीच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मलेरियाच्या यादीत माझा नंबर लागला. तेव्हा मलेरिया ह्या रोगापेक्षा त्याचा बागुलबुवाच अधिक होता.

मला स्पष्ट आठवतंय – रात्री ११ च्या सुमारास मी झोपलोय असं समजून आईबाबा मला ॲडमिट करण्याविषयी बोलत होते. ह्या सगळ्याची त्या वयात मला प्रचंड भीती वाटत होती. त्यात अजून भर म्हणजे मलेरियाची कडवट औषधं, जीवघेणा उकाडा आणि पहिल्यांदाच अनुभवलेली, तापामुळे झालेली भ्रमिष्टता. ह्या सगळ्या प्रकारांनी माझ्या उन्हाळ्याच्या सुट्टीचा पार चेंदामेंदा करून टाकला होता. डोळ्यांवर शीण येत असल्याने वाचायची व टीव्ही बघायचीपण सोय नव्हती. सुदैवाने

४-५ दिवसांत ताप कमी होऊ लागला; परंतु अशक्तपणा प्रचंड आला होता. डॉक्टर म्हणाले, अजिबात बाहेर खेळायला जायचे नाही. उन्हाळ्याच्या सुट्टीत, इयत्ता चौथीच्या मुलाला जेव्हा हे बोल कानावर पडतात तेव्हा काय दुःख होतं हे शब्दातून वर्णन करून नाही सांगता येत.

अशा ह्या उदास आणि क्षीण प्रसंगी कॅसेट स्वरूपात मला भेटले माझे डॉक्टर पुलं. आत्याकडून 'विकत घेण्याआधी ऐकून पाहू' ह्या चित्पावनी धोरणाअंतर्गत आमच्याकडे पुलंच्या दोन कॅसेट आल्या. माझा शत्रुपक्ष, सखाराम गटणे, पाळीव प्राणी आणि पेस्तनकाका ही सर्व औषधे त्या कॅसेट्समध्ये होती आणि तीही डॉक्टर पुलंच्या मिस्कील आवाजात. इंग्लिश मीडियममध्ये शिकूनसुद्धा मराठी उत्तम असलं पाहिजे, हा आईचा आग्रह होता. त्यामुळे मराठी वाचनाची सवय होतीच. तर अशाच एका कंटाळवाण्या संध्याकाळी माझ्या कुरकुरण्याला कंटाळून तीर्थरूपांनी ती कॅसेट लावली आणि माझं भावविश्व कायमचं बदलून गेलं.

अगदी माझ्या बालबुद्धीलादेखील समजेल अशा सहज सोप्या शब्दांतली पुलंची विनोदशैली माझ्यावर जादू करू लागली. नवीन घर दाखवून बेजार करणारा कुलकर्णी, छापील भाषा बोलणारा सखाराम गटणे, आमच्या मोतीसारखे पाळीव प्राणी व आमच्यासारखे वेडे श्वानप्रेमी, ह्या सगळ्यांनीच माझ्या मनात घर केलं होतं. मी ह्या दोन्ही कॅसेट्स रोज दिवसातून दोन वेळा ऐकायचो. कुणी चुकून म्हटलं की, रोज रोज ऐकून वीट आलाय, की मी पुलंचे, 'एखाद्या गोष्टीचा कंटाळा येण्याला वीट येणे का म्हणतात हे आज मला कळलं' हे वाक्य म्हणून स्वतःच हसायचो.

औषधं आता पटकन घेतली जाऊ लागली होती. एकदा तर मी कॅसेट ऐकायच्या तंद्रीत पपई खाल्लेली पाहून, झोपेतदेखील 'सगळी फळं खात जा रे कार्ट्या' असं म्हणणाऱ्या माझा आईच्या डोळ्यांत पाणी आले असावे. बघता बघता मी बरा झालो; पण डॉक्टर पुलंशी आता नातं कायमच जुळलं होतं. आजही माझ्यासाठी विनोद म्हणजे पुलंच. लहान मुलांना दाखवू व ऐकवू नये असे अंगविक्षेप व डबल मीनिंग असलेल्या हल्लीच्या विनोदांना मी कंटाळलो, की आजही माझं हे औषध माझ्या कामी येतं.

मी बरा झाल्यावर अनेक वर्षांनी मला कळलं की, आईचा एक विद्यार्थी मंदार जोशी ह्याच्या 'पुलं मला असे भावले' ह्या निबंधाला कुठले तरी मोठे बक्षीस मिळाले व त्याला स्वतः पुलंनी भेटायला बोलावले. त्याने भेटून आल्यावर तो एकदा घरी आला असता त्याने मला सांगितले की, त्या भेटीत त्याने माझी मलेरिया स्टोरी पुलंना सांगितली व त्यांनी मला बरे केले, हे माझे म्हणणेही त्यांना सांगितले. तेव्हा पुलं त्याला म्हणाले, नाही रे बाळा, कुणाला बरं वगैरे करावं इतका काही मी मोठा नाही. माझा हा अनुभव त्यांच्यापर्यंत पोहोचल्याचा मला इतका आनंद झाला की मी ह्यावर काही बोलूच शकलो नाही. पुढे कॅसेटची सीडी झाली आणि आता एक ऑडिओ फाइल; पण आजही दुःख झालं, बरं नसेल किंवा एखाद्या गोष्टीचा वीट आला, की मी वळतो माझ्या लाडक्या डॉक्टरांनी दिलेल्या त्या विनोदाच्या रामबाण औषधाकडे आणि सगळ्या त्रासांवर पुन्हा मनमुराद हसता येतं. असे माझे डॉक्टर पुलं.

– अमोघ ओक
पुणे, भारत
amoghoak@gmail.com

पुलंच्या उपास कथेतील उतारा....

बटाट्याच्या चाळीत लपून म्हणून काही राहत नाही! अण्णा पावशयाच्या मुलीच्या कुंडल्या त्यांनी खणातून केव्हा बाहेर काढल्या, गुपचूप स्वतःच्या खिशात केव्हा टाकल्या आणि सोमण बिल्डिंगमधल्या उकिडव्याच्या घरी केव्हा नेल्या, ही गोष्ट पावशीनकाकूंना कळायच्या आत आमच्या कुटुंबाला कळली! एच्च्य मंगेशराव हे चाळीतले संगीतज्ञ; परंतु त्यांना कुठल्या चिजांचे अंतरे येत नाहीत हे एरव्ही गाणे संपले एवढेच गाण्यांतले कळणाऱ्या राघुनानांनादेखील ठाऊक. बाबलीबाईंच्या पाटल्या गहाण पडल्याची गोष्ट गहाणखतावरची शाई वाळण्यापूर्वी सर्वांच्या तोंडी झाली आणि रतन समेळ (न्यू गजकर्ण फार्मसीच्या समेळकाकांची मुलगी) हिने द्वारकानाथ गुप्त्यांच्या मधूने लिहिलेले प्रेमपत्र मधूच्या हातात पडण्यापूर्वी काशिनाथ नाडकर्ण्यांच्या मुलाने ग्यालरीत उभे राहून परवच्या म्हणतात तसे खाडखाड म्हणून दाखवले! सगळे बहिर्जीचे वंशज नाना जातींत आणि पोटजातीत जन्मून बटाट्याच्या चाळीत वस्तीला आल्यासारखे आले आहेत. वास्तविक माझ्या उपासाचा निर्णय मी आधी 'माझ्या मना'खेरीज 'येरा कोणा'लाही सांगितला नव्हता; पण उपासाला सुरुवात करून पुरे चार तास लोटले नाहीत तो वर्दळ सुरू झाली.

पु.ल. देशपांडे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

''आपल्या देशात इतके संत जन्माला यायच्या ऐवजी ऐहिक जीवनाला विज्ञानाचे अधिष्ठान देणारे शास्त्रज्ञ जन्माला आले असते तर हा देश अधिक सुखी झाला असता.''

''मला कुठल्याही संतापेक्षा ॲनेस्थेशियाचा शोध लावून वैद्यकीय शस्त्रक्रिया वेदनारहित करणारा संशोधक हा अधिक मोठा वाटतो.''

असे थोर आधुनिक विचारांचे पुलं मला खूप भावले. पु.ल. देशपांडे यांच्याबद्दल लिहिण्यासाठी शब्दच कमी पडतात; पण मला जेवढे भावले, समजले त्यांच्याबद्दल माझे विचार मांडण्याचा हा खूपच छोटा प्रयत्न. पुलं म्हणजे साहित्याचा जणू महापूरच होय. त्यांचे साहित्य हे खूपच अगाध आहे. पुलंबद्दल खूप ऐकले होते म्हणून वाचनास सुरुवात केली आणि मी कधी त्यांच्यात समरस होऊन गेले समजलेच नाही. तसे त्यांचे साहित्य आणि माझी पिढी यांमध्ये खूप अंतर वाटलं समजायला आणि समजून घ्यायलाही. खूप सारी पुस्तके वाचल्यानंतर पुलंची भाषा समजायला लागली. हळूहळू मला पुलंमधला अवलियाही समजला.

पु.ल. देशपांडे म्हणजेच पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे. पुलं हे महाराष्ट्राचे भूषणच होय. त्यांचे साहित्य म्हणजे आपल्याला मिळालेली एक लाख मोलाची देणगीच होय. पुलं हे फक्त शिक्षक, लेखक, कवी नव्हते, तर ते नाटककार, संगीतकार, दिग्दर्शक, विनोदकार, नट, नकलाकार, गायक, कथाकार, पेटीवादक, वक्ते, साहित्यकार, असे सर्वगुणसंपन्न होते. त्यांनी आपल्या गुणांच्या जोरावर एकपात्री, बहुपात्री, नाटकं, चित्रपट, दूरचित्रवाणी अशा सर्व क्षेत्रांत अनेक आघाड्यांवर यश संपादन केले. म्हणून तर मला म्हणावेसे वाटते 'ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व' होते.

पुलंच्या लोकप्रिय पुस्तकांपैकी 'अघळपघळ', 'असा मी असामी', 'गोळाबेरीज' ही विनोदी पुस्तके; 'बटाट्याची चाळ' (एकपात्री प्रयोग), 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा', 'व्यंगचित्रे' (प्रवासवर्णन), 'गणगोत', 'व्यक्ती आणि वल्ली' (व्यक्तिचित्रे), 'तुका म्हणे आता', 'तुझे आहे तुजपाशी', 'ती फुलराणी', 'तीन पैशाचा तमाशा (नाटक)', इत्यादी पुस्तके माझ्या वाचनात आली आणि समजले की, पुलंकडे किती वाचन आवड, जिज्ञासा, अभ्यासूवृत्ती, कल्पनासूचकता होती. मला भावले जास्त ते विनोदकार म्हणूनच. त्यांच्यात समयसूचकता, विनोद करण्याची पद्धत आणि त्यांच्यात सर्वांना एकबद्ध करून ठेवणे हे फक्त आणि फक्त पुलंच करू शकतात.

एकदा वसंतराव देशपांडे पुलंना म्हणाले, ''ही मुलगी (सुनीताबाई) म्हणजे एक रत्न आहे!'' त्यावर पुलं लगेच म्हणाले, 'म्हणूनच गळ्यात बांधून घेतलंय!'' यावरून समजते की, ते किती सहज पद्धतीने विनोद करायचे. मला त्यांच्यातील अंतू बर्वा, हरी तात्या आणि नारायण ही 'व्यक्तिचित्रे खूप आपलीशी वाटली. पुलं यांच्या सान्निध्यात कोणीच दुःखी राहिला नाही. ते नेहमी आपल्या विनोदबुद्धीने सर्वांना हसवायचे, कारण ते एक विनोदी नट होते. त्यांच्यात एवढ्या कला म्हणजे त्यांना लाभलेले जन्मजात वरदान होय.

(पान क्र. ३४ पाहा...)

लहानपणापासून मला निळ्या रंगाचे आकर्षण वाटत आले आहे. निळ्या रंगाच्या सर्व छटा मला मोहवतात. माझ्या कवितांमधूनही निळा पक्षी, आकाशाचं निळेपण यांचे उल्लेख येतात. मी त्यामुळे अनेक वेळा विनोदाचा विषयही होते. एकदा कोकणात गेले असताना आकाशाचा कोरा करकरीत निळा रंग पाहिला आणि त्या निळेपणाच्या प्रेमातच पडले. अंदमानला जाताना बोटीने गेलो आणि त्या निळ्याशार पाण्यात एक डुबकी मारून ते निळेपण अंगाभोवती वेढून घ्यावं, असं वाटत राहिलं.

कॉलेजमध्ये शिकत असतानाच पुलंचं ‘जावे त्यांच्या देशा’ वाचलं होतं; पण त्यातला ’निळाई’ हा लेख खोलवर जाऊन भिडला तो अकरावीच्या विद्यार्थ्यांना शिकवताना! शिक्षक म्हणून पुरा कस लागला होता माझा! त्यातलं चिंतन उलगडून दाखवताना सौंदर्याच्या छटा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायच्या आणि त्याही त्यांची चिरफाड होऊ न देता; हे मोठं आव्हानच होतं. ते मी मनसोक्त तास घेऊन पुरं करीत असे. त्यामुळे तो लेख मनात कोरला गेला.

इटलीला पोचता पोचताच ‘निळाई’ने पुलंचं मन ओढून घेतलं होतं. भूमध्य समुद्राच्या निळ्या रंगाने त्यांना तृप्त केलं होतंच; पण निरभ्र, निळ्याभोर आकाशानेही त्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं. सोरेंतोला गेल्यावरही खोलीतलं सगळं सामान निळ्या रंगाच्या छटा दाखवणारंच होतं. त्यामुळे निळाईची अधिकच ओढ लागली होती. काप्री बेटावर असलेल्या ‘ब्लू ग्रॉटो’ म्हणजेच ‘नीलकुहर’ असं अत्यंत समर्पक नाव पुलंनी ज्याला दिलं; ते बघायला त्यांना जायचं होतं आणि ते ठराविक वेळेतच पाहाणं गरजेचं होतं.

काप्रीकडे जाणारी बोट निळ्याभोर नितळ पाण्यातून चालली

सकाळच्या ठराविक वेळात पाण्यावर पडलेले सूर्यकिरण परावर्तित होऊन त्या कुहरात कोंदतात. त्यामुळे पाण्यातून बाहेर पडणारा प्रकाश निळं तेज घेऊन बाहेर पडतो आणि त्या कुहरात सर्व बाजूंनी दाटतो. पुलं म्हणतात, ’ते पाणी म्हणजे साक्षात वितळलेला निळा प्रकाश होता. प्रकाशाचे पाणी झाले होते. त्या पाण्यात हात घातला की हाताला रुपेरी झालर लागल्यासारखी वाटते. त्या निळ्यातली ती चंदेरी झळाळी तर अपूर्व.’ हा अनुभव त्यांचं नातं ‘शांताकारं भुजगशयनम्’ या श्लोकातल्या ‘मेघवर्णं शुभाङ्गम्’शी जोडून देतो; हे मोठं विलक्षण आहे.

निळिये सारणी
निळ्या मोत्यांचे गे पाणी

होती. पुलंना ते पाणी पाहून आनंदाश्रूंनी डबडबलेल्या निळ्या डोळ्यांची आठवण येत होती. त्या डोळ्यांनी जसं काही तरी सांगू पाहावं, तसंच हे पाणीही जणू काही सांगू पाहात होतं. काप्री बेटाला जवळजवळ प्रदक्षिणा घालतच त्यांना एका ठिकाणी यावं लागलं. तिथे लाँचमधून होडक्यात जावं लागलं, कारण आता कुहरात म्हणजे गुहेत शिरायचं होतं. एका वेळी एकच होडी गुहेच्या तोंडातून आत शिरू शकते. गुहेत होडी शिरताना होडीत सपाट आडवं व्हावं लागतं, इतकं गुहेचं तोंड लहान आहे. आतमध्ये दीडशे फूट लांब, सुमारे पन्नास फूट रुंद आणि सुमारे पन्नास फूट खोल आहे. समुद्रातून हे पाणी त्या गुहेत शिरतं. त्या गुहेला दोन्ही बाजूला एकच होडकं एका वेळी घुसेल अशी लहानशी दारं आहेत. नीलकुहरात शिरल्यावर पुलं म्हणतात, 'जे पाहिले ते सत्यात आलेले स्वप्न म्हणावे; तर असले स्वप्नही पडण्याचे भाग्य यापूर्वी लाभले नव्हते.'

खरं म्हणजे ही सगळी प्रत्यक्ष अनुभवाची केवळ प्रस्तावना आहे. पुलंच्या प्रवासवर्णनांमधला हा भाग मला सर्वात जास्त भावतो. पुलंच्या मनाच्या सौंदर्याचे इथे पुरेपूर दर्शन घडतं, असं मला वाटतं.

सकाळच्या ठराविक वेळात पाण्यावर पडलेले सूर्यकिरण परावर्तित होऊन त्या कुहरात कोंदतात. त्यामुळे पाण्यातून बाहेर पडणारा प्रकाश निळं तेज घेऊन बाहेर पडतो आणि त्या कुहरात सर्व बाजूंनी दाटतो. पुलं म्हणतात, 'ते पाणी म्हणजे साक्षात वितळलेला निळा प्रकाश होता. प्रकाशाचे पाणी झाले होते. त्या पाण्यात हात घातला की हाताला रुपेरी झालर लागल्यासारखी वाटते. त्या निळ्यातली ती चंदेरी झळाळी तर अपूर्व.' हा अनुभव त्यांचं नातं 'शांताकारं भुजगशयनम्' या श्लोकातल्या 'मेघवर्णं शुभाङ्गम्'शी जोडून देतो; हे मोठं विलक्षण आहे.

लहानपणापासून निदान आमच्या पिढीतल्या सगळ्यांनी हा श्लोक परवचा म्हणताना रोज म्हटलाय; पण तो पोपटपंची करून! त्याच्या अर्थाकडे कुणी लक्ष दिलंय? ना त्याचा अर्थ आम्हाला कोणी समजावला; ना आम्ही तो समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा अर्थ समजलेला असल्याशिवाय अशा अनुभवाचं नातं त्याच्याशी जोडता येणं कसं शक्य आहे? तितकीच उत्कट आणि उंच अशी संवेदनशीलता असायला हवी.

अनेक कवींनी निसर्गात परमेश्वराचं रूप पाहिलं. बहिणाबाई चौधरी म्हणतात, 'हिरिदात सूर्यबापा दाये अरूपाचं रूप.' मर्ढेकरांनी' या गंगेमधि गगन वितळले, शुभाशुभाचा फिटे किनारा' असा साक्षात्कार होतो; तर 'मी कधीच नाही म्हटलं, की तू दे मज दर्शन', असं म्हणणारे पाडगावकर 'या धारांतून तुझे कृपामय हात दिसावे' असं म्हणत निसर्गात सामावलेला परमेश्वर पाहतात. इथे तर पुलं निसर्गानुभवाला पारंपरिक संस्कृत श्लोकाशी जोडतात आणि त्यातून त्यांच्या चित्तवृत्ती प्रफुल्लित होतात.

'शांताकारं भुजगशयनम्' हा विष्णूचं वर्णन करणारा श्लोक आहे. त्यातल्या 'मेघवर्णं शुभाङ्गम्' या ओळीचा केवळ अर्थच पुलंना उमजतो असं नव्हे; तर त्यांना त्या ओळींचा प्रत्यय येतो. आपल्या संस्कृतीमध्ये विष्णूचा आणि त्याचेच अवतार असलेल्या राम आणि कृष्णाचा रंगही निळा मानला गेला आहे. त्यांचा देह शुभ, पवित्र आहे. त्यांच्या निळ्या रंगाला या पावित्र्याचं शुभ्र तेज आहे. ते पुलंना त्या निळ्या पाण्यातून उमटलेल्या प्रकाशात दिसतं. त्या प्रकाशाला पाण्याचा निळेपणा तर लाभला आहेच; पण त्या निळेपणाला त्या प्रकाशाचं शुभ आणि शुभ्र तेज लाभलं आहे. ते त्याला त्या पाण्यातल्या चंदेरी झळाळीने लाभलं आहे. शिवाय हे तेज डोळ्यांपुढे अंधारी आणणारं झगझगतं नाही; तर हा प्रकाश अत्यंत कोवळा आणि सुखद आहे. पुलं म्हणतात, 'एखाद्या रोपाला पहिला कोंब फुटताना जो रंगाचा कोवळेपणा असतो, तसला तो कोवळेपणा होता.'

राम आणि कृष्ण या देवांप्रमाणेच आकाशाचाही निळाच रंग आहे. तिथे परमेश्वराचं निवासस्थान आहे, अशीही आपल्या संस्कृतीची धारणा आहे. म्हणूनच आकाशाचा निळा रंगही परमेश्वरी तत्त्वाचं प्रतिनिधित्व करतो. परमेश्वर निर्गुण, निराकार आहे आणि आपण त्याचं नातं निळ्या रंगाशी जोडलं आहे. कदाचित त्यामुळेच या 'निराकार नीलस्वरूपाच्या' गाभाऱ्यात जाऊन त्याचं दर्शन घेतल्याची भावना पुलंच्या मनात येत असावी.

'गाभाऱ्यात धूप कोंदतो, तसा तिथे निळा प्रकाश कोंदला होता,' असं पुलं म्हणतात. भक्तिमार्गाच्या साधकांना सामीप्य, सायुज्य इत्यादी पायऱ्या चढल्यावर शेवटी समाधी अवस्था प्राप्त होते. त्या वेळी त्यांच्या डोळ्यांसमोर असा दिव्य प्रकाश येतो, अशी कल्पना आहे. भंडाऱ्याच्या डोंगरावर तुकारामाला कदाचित हाच अनुभव आला असेल. म्हणूनच 'आनंदाचे डोही आनंदतरंग' उसळले. ज्ञानेश्वर तर परिणतप्रज्ञ होते. पुलं म्हणतात, ''ज्ञानेश्वरांनी वर्णिलेला कोटिचंद्रप्रकाश असाच निळा आणि शीतल असणार! त्या घननील स्वरूपालाच त्यांनी 'कृष्णा हाल का रे डोल का रे गुज बोल का रे' अशी आर्जवी हाक घातली होती.''

'कोटिचंद्रप्रकाश' या शब्दाचीही मला मोठी गंमत वाटते. चंद्राचा प्रकाश शीतलतेसाठी प्रसिद्ध आहे. म्हणूनच चंद्राला सुधांशु, सुधाकर, हिमांशु, शीतकर अशी नावे आहेत; पण एक कोटी चंद्रांचा प्रकाश एके ठिकाणी एकवटला, तरी तो

तितकाच शीतल असेल का? तर तो नक्कीच असेल, कारण तो परमेश्वराच्या तेजाचं वर्णन करण्यासाठी एकवटलेला आहे. परमेश्वर हा दयाळू, कृपाळू असल्यामुळे तो प्रकाश तरी त्रासदायक कसा असेल? मग पुलंना नीलकुहरात एकवटलेला प्रकाश पाहून या 'कोटिचंद्रप्रकाशाचं' स्मरण झालं; तर त्यात नवल काय? विश्वरूपदर्शन होताच अर्जुनाचे अष्टसात्त्विकभाव जागृत झाले, असं भगवद्‌गीता सांगते. या नीलप्रकाशाच्या दर्शनाने पुलंचंही मन उचंबळून आलं असावं; कारण परतीच्या प्रवासात युरोपीय प्रवाशांदेखत पुलंचंही मन उचंबळून आलं असावं; कारण परतीच्या प्रवासात युरोपीय प्रवाशांदेखत 'तुझिये निटिली कोटिचंद्रप्रकाश कमलनयन हरीचे वदन भासे' हा अभंग त्यांना विनासंकोच खुल्या आवाजात गावासा वाटत होता.

'निळाई' या लेखाचा शेवट करताना पुलं म्हणतात, 'आत माथ्यावरच्या निळ्या आकाशाला मी मोठ्या अभिमानाने सांगतो की, तुझ्या निळाईचा अर्थ सांगणाऱ्या त्या नीलकुहरातल्या पाण्याला मी भेटून आलो आहे.' आकाशाच्या निळेपणाशी निगडित परमेश्वरी तत्त्वाचा प्रत्यय त्यांना निसर्गाच्या या चमत्कारामुळे मिळाला. तो त्यांना नीलकुहरातल्या या पाण्यात गवसला.

परमेश्वरी अस्तित्वाविषयी दुमत असेल किंवा त्याविषयी मतमतांतरंही असतील; परंतु महाराष्ट्राच्या मातीवर संतकाव्याचे फार खोलवर संस्कार आहेत. भारतीय संस्कृती या ना त्या स्वरूपात परमेश्वराचं अस्तित्व मानते. कोणी तिला एक मोठी नियंत्रक शक्ती म्हणेल, कोणी नियती म्हणेल किंवा कोणी आणखी काही म्हणेल, पण पुलंच्या अस्सल मराठी मनावर इथल्या मातीचे, त्यातल्या संस्कृतीचे आणि संतकाव्याचे सखोल संस्कार आहेत. त्यांची सौंदर्यग्राही वृत्ती त्यांना निसर्गातल्या सौंदर्याकडे खेचून नेते; तर त्यांची तरल अशी बुद्धिमत्ता आणि हळुवार रसिकता त्यांना सगळ्याची एकमेकांशी सांगड घालायला लावते.

म्हणून पुलंच्याच भाषेत सांगायचं तर मला 'निळाई' या लेखाला असं सांगावंसं वाटतं की, पुलंची सगळी पुस्तकं वाचली; पण त्यांचं जे अगदी आतलं भावनाशील, सुंदर मन आहे; ते मला तुझ्यात सापडलं आहे.

– शिरीन कुलकर्णी
वाशी, भारत
shirin511@gmail.com

(पान क्र. ३१ वरून...)

लहानपणापासूनच त्यांच्यात सर्व गुण होते. पुलंना त्यांच्या घरी लहानपणापासून पुस्तकं वाचन करायला आणि रेडिओवरील संगीत ऐकायला मिळाले. ते म्हणायचे, ''पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील... पण कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचं हे सांगून जाईल.''

पुलं हे थोर लेखक तर होतेच, पण ते एक अभ्यासू रसिक कलावंतही होते. त्यांच्या लिखाणात त्यांनी जास्त तर आपले अनुभव व्यक्तिचित्रण, प्रसंगी विनोद यावरच लिखाण केलेले दिसून येते. त्यांचे विचार विनोदी, आधुनिक, प्रसंगावधान असेच होते. तेही प्रभावी होते. ते म्हणायचे, ''कुठेही बोलताना आपल्या शब्दांची उंची वाढवा, आवाजाची उंची नको. कारण पडणाऱ्या पावसामुळेच शेती पिकते, विजेच्या कडकडाटामुळे नव्हे!''

पुलंनी अनेक एकपात्री, बहुपात्री नाटके सादर केली. त्यांच्या विनोदाची छटा नेहमीच त्यांनी सादर केलेल्या व्यक्तिरेखांवरून समजते. ते त्यामध्ये एकरूप होत असे. त्यांची अनेक नाटके लोकप्रिय आहेत. त्यांनी प्रत्येक पात्राला योग्य तो न्यायही दिला आणि ती अजरामर व्यक्तिरेखा ठरली. ते म्हणायचे, ''आपण कितीही स्वतंत्र असल्याचा आव आणला तरी जीवनाच्या एका विराट नाटकातील आपण पात्रं आहोत. इथे सगळेच संवाद पदरचे घालून चालत नाहीत.'' असा सखोल विचार ते करत असत.

पुलंच्या आजवरच्या पुस्तकांवर मला फक्त त्यांची व्यंगचित्रंच दिसली. मोठा चष्मा, दोन पुढील मोठे दात, तर कधी पुढे आलेले मोठे पोट. यावरून समजते की, त्यांच्यात एक व्यंगचित्रकारही दडला आहे. ते एके ठिकाणी म्हणाले होते, ''मला रोज व्यंगचित्राच्या कल्पना सुचतात, कारण माझी व्यंगचित्रकार होण्याची इच्छा होती, ती मी रंगमंचावर पूर्ण करून घेतली. बहुरूपी खेळ म्हणजे स्वतःच्या शरीरातून उभे केलेले व्यंगहास्य चित्रच.'' असे थोर अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या पुलंना १९६६ साली पद्मश्री आणि १९९० साली पद्मभूषण हा किताब देण्यात आला.

आज पुलं आपल्यात नसले तरी त्यांच्या साहित्याद्वारे अजूनही जिवंत आहेत. ते अजरामर आहेत. मंगेश पाडगावकर म्हणतात,

''पुलस्पर्श होताच दुःखे पळाली
नवा सूर, आनंदयात्रा मिळाली
निराशेतूनी माणसे मुक्त झाली
जगू लागली, हास्य गंगेत न्हाली''

– पल्लवी आदमाने/ताकमोगे
राइजवाईक नेदरलँड
pallaviadmane123@gmail.com

पुलं आणि विनोद

'व्यक्ती आणि वल्ली' हे माझ्या हाती आलेलं पुलंचं पहिलं पुस्तक. त्यातले लोक आणि त्यांचं विश्व माझ्या ७ वर्षांच्या अननुभवी डोळ्यांसमोर एका सुंदर परिकथेसारखं उभं राहिलं. नंतर जसा जसा जगाशी संपर्क वाढत गेला, तशा पुलंच्या व्यक्ती आणि वल्ली भेटत गेल्या आणि पुलंचं जग मला आपलंसं वाटू लागलं.

साधा, सोपा, पण अत्यंत मार्मिक विनोद हे पुलंच्या लेखनाचं वैशिष्ट्य. दैनंदिन जीवन, नेहमी भेटणारे लोक आणि रोज घडणारे प्रसंग यातला विनोद पुलं आपल्यासमोर आणतात. तुम्हा-आम्हासारख्यांना हा विनोद एरवी दिसत नाही, पण पुलंना ऐकलं / वाचलं की तो दत्तासारखा समोर उभा ठाकतो.

पुलंचा विनोद गालातल्या गालात हसवणारा आणि सुखवणारा आहे. त्यात आरडाओरडा नाही, अंगविक्षेप नाही. मात्र त्यात मानवी स्वभावाचं आणि समकालीन समाजाचं सूक्ष्म आणि अभ्यासपूर्ण निरीक्षण आहे. असं म्हणतात की, न्यूटन जर पुन्हा पृथ्वीतलावर आले, तर ते आजचं जग बघून आश्चर्यचकित होतील, मात्र ॲरिस्टोटल होणार नाहीत, कारण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांनी कितीही प्रगती केली, तरी शतकानुशतके मानवी स्वभाव तसाच आहे. ॲरिस्टोटल सारखंच मला पुलंचंही वाटतं. त्यांनी रेखाटलेली व्यक्तिमत्त्वं आपल्याभोवती आहेत आणि असतील, कारण विनोद हा माणसात, जीवनात आणि समाजात भिनला आहे. असं म्हणतात की, comedy is tragedy turned inside out; जगात जोपर्यंत शोकांतिका आहे तोपर्यंत विनोद आहे आणि हा विनोद पुलंनी त्यांच्या लेखनात विलक्षणरीत्या टिपला आणि जपला आहे.

पुलंचा विनोद पोकळ नाही. त्यात मराठी मध्यमवर्गाची चांगलीच टीका आहे. मराठी मध्यमवर्गाचे एका ठरावीक चौकटीत(च) बसणारे तेच तेच विचार, त्याचा भित्रेपणा, अलिप्तपणा आणि पैसा आणि ताकदीसमोर लाचारी यांची पुलंनी पोटभर टिंगल केली आहे. पुलंच्या टीकेत मर्म आणि चातुर्य आहे, पण कटुता नाही. उलट पुलंचं लोकांवरचं प्रेमच त्यांच्या लेखनातून दिसून येतं. त्यांच्या लेखनाची शैली ही दोन इंग्रजी लेखक पी.जी. वूडहाऊस आणि जेरार्ड डर्रेल यांच्या शैलीशी मिळतीजुळती आहे. पुलंना स्वतःला पी. जी. आवडत असं मी ऐकलं आहे आणि ते खरं असेल तर त्यात काहीच आश्चर्य नाही, कारण पी.जीं.नी इंग्रजी खानदानी घराण्यांची अत्यंत मार्मिक आणि विनोदी पद्धतीनं खिल्ली उडवली आणि पुलंनी मराठी मध्यमवर्गाबाबतीत तेच केलं. दोघांचं साहित्य विचार करायला लावणारं, भाषेचं सौंदर्य जपणारं आणि अत्यंत मनोरंजक आहे.

काही दिवसांपूर्वी भारतीय अर्थ मंत्रालयाचे मुख्य आर्थिक सल्लागार श्री. संजीव सन्याल यांनी एका कार्यक्रमात इतिहासाकडे बघायचा एक नवीन दृष्टिकोन सांगितला. आपला समाज आणि अख्खं जग हे 'chaotic' म्हणजे गोंधळाच्या परिस्थितीत आहे. इतिहास म्हणजे हा गोंधळ-अनेक लोकांचं, प्रसंगांचं, स्वभावांचं मिश्रण! या गोंधळाकडे बघून परावृत्त न होता, त्या गोंधळाला आवर घालायचा प्रयत्न न करता, तो आहे तसा समजून घेणं आणि त्यातलं सौंदर्य टिपणं हे फार महत्त्वाचं आहे. पुलं ज्या जगात जगले, त्या जगाच्या गोंधळाचं सौंदर्य त्यांनी बरोबर हेरलं, त्याला सुंदर विनोदाची साथ दिली आणि आपल्या व आपल्या पुढच्या पिढींसाठी लिहून ठेवलं. मग एक प्रकारे पुलं इतिहासकारही झाले, नाही का?

पुलंचं व्यक्तिमत्त्व उलगडण्याचा अनुभव आजही विलक्षण आणि वैयक्तिक आहे. प्रत्येकाला पुलंमध्ये काही तरी वेगळं दिसतं, भावतं. पुलंचा माणसावर प्रेम करणारा चतुर विनोद हा माझा 'वीक पॉइंट'. पुलंच्या विश्वात तुमचा 'वीक पॉइंट' काय आहे?

- गौरी नूलकर-ओक
पुणे, भारत
noolkargauri@gmail.com

पोवाड्याच्या निमित्ताने

उमलते वय (इंग्रजीमध्ये टीन एज) हे विभूतिपूजेचे वय असते. प्रत्येक नवतरुणाचा एक हिरो असतो. त्याच्याप्रमाणे दिसावे, त्याच्याप्रमाणे बोलावे असा कळतनकळत तो मुलगा प्रयत्न करीत असतो. हेच प्रयत्न विधायक दृष्टीने होत असतील, तर त्या नायकाच्या चांगल्या गुणांचे अनुकरण करण्याचा, ते गुण आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न त्या भक्ताकडून होत असतो. म्हणूनच क्रिकेटपटू होण्यासाठी धडपडणारा मुलगा त्याच्या खोलीच्या भिंती सचिन तेंडुलकरच्या किंवा विराट कोहलीच्या फोटोंनी भरून टाकतो, तर सिनेमा, नाटकात चमकू पाहणारा अमिताभ बच्चनच्या फोटोंनी. लहानपणापासून पुस्तकांच्या दुनियेत रमणाऱ्या, आपल्या हातून पांढऱ्यावर काळे व्हावे (चांगल्या अर्थाने) अशी इच्छा बाळगणाऱ्या माझ्यासारख्याचे पौगंडावस्थेतील हिरो पु.ल. देशपांडे हे होते.


१ रुपाली
पुणे ४
30.८.९५

प्रिय मकरंद,

तुझी कविता मिळाली. कवितेतून माझ्याविषयीच्या केलेल्या सद्भावनांबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

तुझा
पु.ल. देशपांडे

हायस्कूलच्या वयात केव्हा तरी माझ्या हातात 'व्यक्ती आणि वल्ली' हे पुस्तक आले आणि त्याने मला अतोनात झपाटून टाकले. त्यातील व्यक्ती अगदी आपल्या आजूबाजूला वावरत आहेत असे मला वाटत असे. सखाराम गटणे हे व्यक्तिचित्र तर माझ्यावरूनच लिहिले आहे असे वाटावे इतका मी त्या वयात वाचनवेडा, स्वप्नाळू आणि छापील भाषेत बोलणारा होतो. (तसे तर आजही नारायण आणि हरितात्यांचा थोडा फार अंश माझ्या स्वभावात आहे असे मला वाटते.) 'व्यक्ती आणि वल्ली'ची बरीच पारायणे झाल्यावर पुलंची इतर पुस्तकेही मी अधाशासारखी मिळवून वाचली. जाणत्या वयात ती पुस्तके पुन:पुन्हा वाचली, त्यानंतर पुलंचे साहित्यिक मोठेपण हळूहळू कळू लागले. त्यांच्यावर फक्त एक विनोदी लेखक असा शिक्का मारणे चुकीचे आहे. त्यांच्या विनोदाला एक वैचारिक अधिष्ठान आहे. व्यक्तींचे दोष हसत हसत दाखवताना त्यांच्यातील एखादा असा गुण ते लेखाच्या शेवटी दाखवतात, की गुणाचे पारडे खाली जाते; किंबहुना त्यांनी लिहिलेल्या एका व्यक्तिचित्रांच्या पुस्तकाच्या नावाप्रमाणे 'गुण गाईन आवडी' ही त्यांची सहजप्रवृत्ती आहे. साहजिकच दोषांचे दिग्दर्शन ते अगदी नाइलाजास्तव करतात. त्यांना दोष दिसत नाहीत असे नव्हे. दिसतात; पण त्यांचा गाजावाजा करणे ही त्यांची प्रवृत्ती नव्हे.

पुलंची प्रवासवर्णनेही त्यांच्या वैचारिक वृत्तीमुळेच वेगळी ठरतात. पाहिलेल्या स्थळांचा भूगोलीय तपशील देण्यात ते रमत नाहीत. त्या स्थळाच्या दर्शनाने त्यांच्या मनावर जो ठसा उमटला त्याचे वर्णन ते करतात. उदाहरणासाठी 'जावे त्यांच्या देशा' ह्या पुस्तकातील 'निळाई' हे प्रकरण वाचावे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रवासात पाहिलेल्या स्थळांपेक्षा ते माणसांना भेटण्यास जास्त उत्सुक असतात. 'पूर्वरंग'मध्ये त्यांनी स्वत:च तसे म्हटले आहे. त्यामुळे इंडोनेशियात भेटलेले मणिभाई मुख, न्यू यॉर्कमधल्या आजीबाई आणि व्हेनिसमध्ये दिसलेला चार्ली चॅप्लिन ह्यांना ते आपल्यापुढे साक्षात जिवंत उभे करतात. पुलंच्या प्रत्येक पुस्तकावर सविस्तर लिहिता येईल, पण ह्या लेखाचा तो उद्देश नाही.

वाचनाची आवड असणे ही लेखनाची पूर्वअट आहे किंवा असेही म्हणता येईल की, वाचनाची आवड असलेला माणूस बरेचदा लेखनाकडे वळतोच. मीसुद्धा वयाच्या तिसाव्या वर्षाच्या आसपास थोड्या फार कविता लिहू लागलो. त्या सुमारास १९९४ साली पुलंच्या वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली. या अमृतमहोत्सवी वर्षात मी त्यांच्यावर एक कविता लिहिली, 'पोवाडा' नावाची. पोवाडा हा शब्द पवाड गाणे ह्यावरून आला आहे. त्याचा अर्थ गुणगान करणे. आधी म्हटल्याप्रमाणे ज्या लेखकाच्या गुणग्राहक वृत्तीमुळे आपल्याला रवींद्रनाथ ठाकूरांपासून ते शिल्पकार फडक्यांपर्यंत आणि बाबा आमट्यांपासून कुमार गंधर्वांपर्यंत किती तरी गुणिजनांची महती कळली आहे त्या लेखकावरील कवितेला 'पोवाडा' हेच नाव मला योग्य वाटले. ती कविता अशी आहे–

पोवाडा

हा आहे पन्नास वर्षांची हास्यरंजित कारकीर्द
गाजवणाऱ्या एका राजाचा पोवाडा
हा आहे ओठावर सतत हसू आणणाऱ्याच्या पायावर
वाहिलेला कृतज्ञतेचा एक अश्रू – नाही कोणता निवाडा

साहित्य सोनियाच्या खाणीतून
सोने वेचणारे अनेक
पण तिथून परीस हुडकणारे फक्त तुम्हीच
मराठी घराघरांत नारायण आणि हरितात्या नातलगांपेक्षा जवळचे झाले.
ह्या परीसस्पर्शाचं नवल करावं तेवढं कमीच
बहुरूप्याचे विविध खेळ मांडून
महाराष्ट्राचं नवं गोकुळ केलं
खरोखर बाळकृष्णाच्या खोड्यांनंतर
फक्त तुमच्या महाराष्ट्राने इतकं कौतुक केलं
वाचक विषाद योग
तुम्ही सदैव झाडून टाकलात
योग विनोदसु कौशलमचा
नवा पुरुषोत्तम योग घडवलात
आजही, भरलेल्या गप्पांच्या मैफलीत
कोणाला आठवतो तुमचा अंतू बर्वा
कोणाला हसवून बेजार करतो दामलेमास्तर हिरवा
आजूबाजूच्या बालकांमध्ये कोणाला दिसतो दिनेश
तर कोणाच्या अंगात संचारतो रावसाहेबांचा आवेश
भरलेल्या मैफलीच्या मनात चांदणं हसतं
माणसंच काय पण घरदेखील उजळलेलं दिसतं
साठाव्या वर्षी नवं बालपण सुरू होतं, असं म्हणतात
पण तुमच्या साहित्यात आधी ते संपलंय केव्हा,
हाच एक प्रश्न आहे
पण ह्या हिशोबाने सोळाव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या हे चिरकिशोरा
तुझ्या वाणीने आणि लेखणीने
आम्हाला असंच हसवत आणि हसता हसता अंतर्मुख करत राहावं
हेच त्याचं उत्तर आहे.
हेच त्याचं उत्तर आहे.

कविता लिहून झाल्यावर माझ्या मनात पहिला विचार आला. तो असा की, ही कविता घेऊन आपल्याला पुलंना भेटता येईल? आपल्या हिरोला पाहाण्याची, त्याच्याशी बोलण्याची संधी मिळेल. ७७७, रुपाली अपार्टमेंट, शिवाजीनगर हा त्यांचा पत्ता तोंडपाठ होताच. कमला नेहरू पार्कसमोरच्या गल्लीत ही इमारत आहे हेही माहीत होते. मग उत्साहाने एके दिवशी सकाळीच रुपाली अपार्टमेंट गाठले. त्या काळात मी काही कारणाने दाढी वाढवली होती. अंगात झब्बा, गळ्यात शबनम पिशवी आणि वाढलेली दाढी असा कवीचा परफेक्ट युनिफॉर्म करून मी रुपालीत गेलो. पार्किंगमधून सात–आठ पायऱ्या चढून गेल्यावर पहिलाच फ्लॅट पुलंचा दिसला. दारावरल्या पितळी पाटीवरील पु.ल. देशपांडे ही अक्षरे वाचून मन मोहरले.

दारावरची बेल वाजवल्यावर सौ. सुनीताबाईंनी दार उघडले. येण्याचे प्रयोजन सांगितल्यावर त्या म्हणाल्या, भाई, सध्या खूप आजारी आहेत. तुम्ही दोन दिवसांनी त्यांना फोन करा. पुलंना त्या वेळी कंपवाताचा आजार जडला होता. त्यांच्या उतरत्या प्रकृतीच्या बातम्या वर्तमानपत्रांत येत होत्या. त्यामुळे सुनीताबाईंनी जे सांगितले त्यात अनपेक्षित किंवा चुकीचे काही मला वाटले



नाही. दोन दिवसांनी सकाळी फोन केला, तो पुलंनी स्वतःच घेतला. कोण बोलतंय, असा त्यांचा चिरपरिचित आवाज कानावर पडला. मी एवढा भारावून गेलो की, त्यानंतर मी काय बोललो आणि माझे काम नेमक्या कोणत्या शब्दात सांगितले ते मला काहीही आठवत नाही. ते काय म्हणाले ते मात्र आठवते. ते म्हणाले, सध्या मला बरे वाटत नाही. आताही मी डॉक्टरांकडेच चाललो आहे. तुम्ही तुमची कविता माझ्या घराखाली असलेल्या लेटरबॉक्समध्ये ठेवा. मी वाचून नंतर कळवतो.

पुलंची भेट होणे शक्य दिसत नाही हे लक्षात आल्याने मन खट्टू तर झालेच, पण त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी रुपाली अपार्टमेंटच्या लेटरबॉक्समध्ये ती कविता ठेवून आलो. पुढले काही दिवस पत्राची वाट पाहाण्यात गेले. ते आपल्याला भेटायला कदाचित बोलावतील अशी अंधूक आशाही वाटत होती. त्या काळात मी बरेचदा पुलंना भेटलो आहे अशी स्वप्नेही पडली. दोन–तीन महिन्यांत काही पत्र आले नाही तेव्हा माझी आशा मावळत चालली, किंबहुना मी आता तो विषयच डोक्यातून काढून टाकला आणि एके दिवशी संध्याकाळी कामावरून परत आल्यावर मला कळले, की माझ्या नावाने पुलंचे पत्र आले आहे. पत्रात त्यांनी कवितेबद्दल मला धन्यवाद दिले होते. पत्र अगदी त्रोटक आहे; पण कंपवात असतानाही त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात पत्र लिहिले हेच महत्त्वाचे आहे.

आता ह्या घटनेला किती तरी वर्षे झाली. त्यानंतर मी राहण्याची पाच–सहा घरे बदलली. सामानाची अनेकदा हलवाहलवी झाली, पण ते पत्र मी जपून ठेवले आहे. (मी म्हणण्यापेक्षा माझ्या पत्नीने) कधी तरी ते पत्र पाहिल्यावर त्या थरथरत्या हातांनी लिहिलेली ती अक्षरे बघून मनाला आनंद होतो. एका महान साहित्यिकाची छोटीशी भेट आपल्याकडे आहे ह्याचा अभिमान वाटतो.

ते पत्र आल्यानंतर मात्र एकदाही मला पुलंच्या भेटीचे स्वप्न पडले नाही!

– मकरंद शांताराम
पुणे, भारत
bhjagyamkulkarni@gmail.com

पुलंचं प्रोटोकॉल द फूड

खाण्याचंसुद्धा शास्त्र आहे.

रागांना वर्ज्यबिर्ज्य स्वर असतात, तसे खाण्यालासुद्धा असतात.

उदाहरणार्थ, श्रीखंड घ्या. बाकी, जोपर्यंत मला प्रत्यक्ष काही द्यावं लागत नाही तोपर्यंत 'घ्या' म्हणायला माझं काय जातं म्हणा!

तर श्रीखंड पावाला लावून खा म्हटलं तर तो खाणार नाही.

वास्तविक पाव हादेखील पुरीसारखा गव्हाचाच केलेला असतो; पण श्रीखंडाच्या संदर्भात तो वर्ज्य स्वर आहे. पाव आणि अंड्याचं आमलेट ही जोडी शास्त्रोक्त आहे.

पुरी आणि आमलेट हे एकत्र सुखानं नांदणार नाहीत.

जिलबी आणि मठ्ठा यांचा संसार जसा सुखाचा होतो तसा जिलबी आणि... छे!

जिलबीला अन्य कुणाशी नांदायला पाठवण्याची कल्पनाच रुचत नाही.

खाण्याचे हे कायदे सांभाळून खाण्याला खानदानी मजा आहे. सुरांचे वर्ज्यावर्ज्य नियम पाळून गाण्याला जसं खानदानी गाणं म्हणतात तसंच पदार्थाची कुठली गोत्रं जुळतात त्याचा विचार करून ते पानात वाढण्याला खानदानी खाणं म्हणतात.

रागांप्रमाणेच खाण्याच्या वेळा सांभाळल्या पाहिजेत.

सकाळी यमन बेचव वाटतो.

सकाळी थालीपीठही बेचव वाटतं.

मारवा राग जसा संधिकालातला, तसंच थालीपीठदेखील साधारणतः भीमपलास आणि पूरिया धनाश्री या रागांच्या वेळांच्या मधे बसतं.

सारंगाच्या दुपारच्या वेळेला थालीपीठ खाऊन पहा आणि संध्याकाळी साडेपाच-सहाच्या सुमाराला नको म्हणून पहा.

बाहेर पाऊस पडत असताना ज्याला गरम भजी म्हणून खावीशी वाटली नाहीत तो मनुष्य चळलाच म्हणून समजावं. सकाळी तीन भजी खाल्ली तरी अधिक; पण बाहेर पाऊस पडतो आहे, हवेत गारवा आहे, रमी किंवा ब्रिजमध्ये आपण जिंकतो आहोत, अशा वेळी शेकडो भजी खाल्ली तरी ती अधिक नाहीत.

अधिकचं हे असं आहे.

लोक भलत्या वेळी, भलत्या ठिकाणी आणि भलतं खातात. हॉटेलात जाऊन भेळ खाणाऱ्याचं पोट नव्हे, मुख्यत: डोकं बिघडलेलं असतं.

शहाळ्याचं पाणी हापिसात बसून पिणाऱ्याची प्रमोशनं थांबवली पाहिजेत.

मसाल्याच्या दुधावर पान खाल्लं पाहिजे

आणि चहावर धूम्रपान केलं पाहिजे.

खाण्यापिण्याचंही काही शास्त्र आहे. ह्या भारतात एके काळी हे शास्त्रवेत्ते होते.

उपासाचं खाणंदेखील शोधून काढणारी ती विद्वान माणसं माझ्या माहितीत आहेत. 'उपास लागणाऱ्या माणसाइतकीच उपासाचे पदार्थ जास्त झाल्यामुळं जरा जड वाटतंय म्हणणारी माणसं आहेत.'

लग्नाला पंक्ती, गावजेवणं, समाराधना वगैरेचा तो जमाना होता. 'हरहर महादेव' ही आरोळी रणक्षेत्राप्रमाणं वरणक्षेत्रातदेखील उठत असे.

माणसं बसल्या बैठकीला शंभर जिलब्या तोंडी लावणं म्हणून उठवत, त्यानंतर आग्रह सुरू होई.

साऱ्या सणांतून खाणे काढून टाका नि काय उरते पाहा.

सारी भारतीय संस्कृती खाण्याभोवती गुंतली आहे; नव्हे, टिकली आहे.

होळीतून पोळी काढली की उरतो फक्त शंखध्वनी, तोदेखील पोळी मिळणार नसेल तर क्षीणच व्हायचा.

दिवाळीतून फराळ वगळा, नुसती ओवाळणीची वसुली उरते.

संक्रांतीच्या भोगीला जोवर तीळ लावलेली बाजरीची भाकरी, वांग्याचं भरीत आणि तिळगूळ आहे तोवर 'गोड गोड बोला' म्हणतील लोक.

कोजागिरी पौर्णिमेतनं आटीव केशरी दूध वगळा, उरेल फक्त जागरण आणि कुठल्या तरी सस्त्यात मिळालेल्या उमेदवार गवयाचं गाणं.

गणेशचतुर्थीला मोदक नसले तर आरत्या कुठल्या भरवशावर म्हणायच्या?

रामनवमीचा सुंठवडा, कृष्णाष्टमीच्या दहीलाह्या, दत्तापुढले पेढे, मारुतरायापुढलं साधं खोबरं अन् खडीसाखर...

साऱ्या देवांची मदार या खाण्यावर आहे. हेच गाळलं की हल्लीच्या लग्नासारखं व्हायचं. पाहुण्यांचे हात ओले करण्याऐवजी आहेराच्या रूपानं स्वतःचे हात धुऊन घेण्याचा कार्यक्रम.

पंगती उठवण्याऐवजी कर्कश कर्ण्यातून रेकॉर्ड्स ठेवून येणाऱ्याचं डोकं उठवायचं.

(पु. ल. देशपांडे)

शुभ खाद्यान्न !

– टीम रश्मिन संपादकीय समिती

असा मी असामी | गोळाबेरीज | नसती उठाठेव | अपूर्वाई | पूर्वरंग | वयं मोठं खोटम् | व्यक्ती आणि वल्ली | वाऱ्यावरची वरात | बटाट्याची चाळ | अघळपघळ | जावे त्यांच्या देशा | व्यंगचित्रे | गणगोत | तुझे आहे तुजपाशी | ती फुलराणी | तीन पैशाचा तमाशा



पु.ल. देशपांडे-महाराष्ट्राचे लाडके भाई

पु.ल. देशपांडे म्हणजेच महाराष्ट्राचे लाडके भाई. जन्म ८ नोव्हेंबर १९१९ आणि मृत्यू १२ जून २०००. एक बहुरंगी, रंगतदार, गमतीदार व्यक्तिमत्त्व. या कलाकाराने ज्या कलेला आपला परिसस्पर्श केला त्या कलेला त्यांनी उंच शिखरावर पोहोचवलं. मग ते नाटक असो, एकपात्री प्रयोग, प्रवासवर्णन, सिनेमा, कथा अथवा संगीत असो, पुलंनी विनोद, व्यक्तिचित्रण, प्रवासवर्णन, नाटक असे चौफेर लेखन करून मराठी माणसांच्या अनेक पिढ्यांच्या मनात घर केलेले आहे.

भाईंची सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि माणसांबद्दल असलेली कणव हे त्यांच्या लेखनातून दिसून येते. हे सारे गुणविशेष ध्यानात घेतले तरीही पुलंचे सर्वात मोठे मला जाणवलेले वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या लेखनातून सतत व्यक्त होणारी मराठी मध्यमवर्गीय संस्कृती आणि त्यामुळेच एक लेखक आणि एक माणूस या नात्याने पुलंनी अपरंपार लोकप्रियता संपादन केली आणि बहुसंख्य मराठी माणूस हा या लेखनाची निर्मितीच जणू असं वाटतं. म्हणून तिचा नेहमी प्रचार करणारे पुलं मराठी वाचकांना इतके आवडले आणि हा लेखक त्यांना अगदी आपल्या घरातल्या व्यक्तीप्रमाणेच वाटला.

'नसती उठाठेव', 'अपूर्वाई', 'असा मी असामी', 'आम्ही लटिके ना बोलू', 'पूर्वरंग', 'गोळाबेरीज', 'वयं मोठं खोटम्।' (बालनाट्य), 'व्यक्ती आणि वल्ली', 'वाऱ्यावरची वरात', 'बटाट्याची चाळ' इ.. अशी असंख्य न मोजता येणारी साहित्यसंपत्ती पुलंच्या मालकीची आहे. ह्या साहित्यामध्ये सर्वसामान्य जनतेला आपलेच प्रतिबिंब आढळते.

मराठी साहित्यावर प्रेम करणारी अमाप मराठी मने आजही आहेत. समोरच्या माणसाला त्याच्या गुणदोषांसहित स्वीकारण्याची शिकवण पुलंच्या साहित्यातील पात्रे आजही देतात. आजही पुलंचा संग्रह वाचता वाचता माझे नकळतपणे डोळे ओले करतो. आजही भाई, तुमची सर्व पात्रे आम्हाला या माणसांच्या गर्दीत सोबत करतात. आज पुलंचे उतारे फेसबुकवर फिरत असतात. त्यांची पुस्तके पुस्तक प्रदर्शनात असतात. पुलं आवडणारा एक मोठा वर्ग अस्तित्वात आहे. आम्ही देशपांडे असल्याचा आजही अभिमान वाटतो. भाई, तुम्ही नसल्याची जाणीव आम्हाला कधीच होत नाही. तुमच्या साहित्यलेखनाद्वारे तुम्ही आमच्या शेवटच्या श्वासापर्यंत आमच्याबरोबर असाल. भाई, तुम्ही अमर आहात.

– सौ. प्रणिता अद्वैत देशपांडे
द हेग,नेदरलँडस
advpranita@gmail.com

नटाच्या दृष्टीतून दिग्दर्शक

अति आधुनिक नव्या मंत्रतंत्रांचा दिग्दर्शक आणावा तर प्रत्यक्ष नाटकाला तोंड घालण्यापूर्वी महिनाभर त्याची बौद्धिकंच ऐकावी लागतात. एका दिग्दर्शकानं तर नवतंत्राचा इतका खच्चून अभ्यास केला होता, की नाटकाच्या दिवशी तो शिवाजीला दाढी लावायला तयार होईना! खऱ्या नटाचं काम हे भास निर्माण करणं आहे. आभासाच्या भासात्मक प्रक्रियेतून प्रेक्षकांच्या आगळ्या जाणिवा निर्माण केल्या पाहिजेत, असं काहीसं बोलून त्यानं बिनदाढीचा शिवाजी करून रंगभूमीवर पाठविण्याचा चंग बांधला होता. मी दाढीसाठी रुसून बसलो. रामाचा चंद्रासाठी हट्ट या चालीवर शिवाजीचा दाढीसाठी हट्ट ही कथा आमच्या चाळीत लोक त्यानंतर कित्येक वर्षे सांगत होतो. शेवटी दाढीवर तडजोड झाली. पुढं निघाला आवाजाचा प्रश्न. आरडाओरडा म्हणजे अभिनय नव्हे. दिग्दर्शकाने आमच्या कानीकपाळी ओरडून ओरडून हे ठसवलं होतं. शेवटी रंगभूमीवर शिवाजी, तानाजी, शेलारमामा वगैरे मंडळी कुजबुजायला लागली तेव्हा लोकांच्यातून आवाज, आवाज असा आरडाओरडा सुरू झाला. दिग्दर्शकानं आमच्यावर संवादाची सहजता लादलेली. त्यामुळं आमचा तानाजी 'आधी लगीन कोंढाण्याचं आणि मग रायबाचं हे वाक्य आधी आंघोळ उरकतो आणि मग जेवायला बसतो असं म्हटल्यासारखं सहजतेनं म्हणाला. ज्या तानाजीच्या मिशीवर लिंबं लोंबत त्याला मिशा लावायला आमचा तो नवा दिग्दर्शक तयार नव्हता. त्याला शिवाजी, तानाजी वगैरे मंडळी अत्याधुनिक रीतीनं 'प्रेझेंट' करायची होती. त्याचा सगळा विश्वास लायटिंगवर. प्रकाश योजना अशी नवलाची, की नाटकभर एकही पात्र प्रेक्षकांना दिसेना. शिवाजी बोलायला लागला की पुढल्या तबलजीवर लाइट आणि तानाजीची भाषणं सुरू झाली की ऑर्गनवाल्यावर प्रकाश पडायचा. पहिला अंक संपेपर्यंत प्रेक्षकांनी आणि आम्ही नटांनीदेखील सहन केलं. बाहेरून आणि शिट्यांच्या जोडीला जेव्हा इतरही विसंवादी वस्तू रंगभूमीवर आल्या, त्या वेळी दिग्दर्शकाला धाब्यावर बसवून दणदणीत आवाजात उरलेलं नाटक ठोकलं. 'गड आला, पण सिंह गेला' हे वाक्य म्हणताना माझ्या मनात नाटक झालं, पण दिग्दर्शक गेला हे वाक्य उगीच रेंगाळून गेलं आणि तशा परिस्थितीत खुदकन हसू आलं. भलत्याच वेळी हसून सीनची घाण केल्याबद्दल पडदा पडल्यानंतर तानाजीनं माझी दाढी खसकन ओढून माझ्या तोंडात भडकावली होती.

रेडिओवरील भाषणे आणि श्रुतिका

उपास

मी मात्र या सर्व जनांचे ऐकून मनाचे करायचे ठरवले होते.

पहिला उपाय म्हणून तीन-चार निरनिराळ्या काट्यांवर वजन करून पाहिले. प्रत्येक ठिकाणी निरनिराळे वजन आले, परंतु एकशेएक्यांशीच्या खाली जायला कोणताही काटा तयार नव्हता! शेवटी रेल्वे-पार्सल हापिसातल्या काट्यावर हुंडेकऱ्याच्या वशिल्याने मी उभा राहिलो आणि शेरा- मणाच्या बंगाली मण, देशी मण ह्या भानगडीत माझे वजन कधी शंभर पौंडाखाली, तर कधी दोनशे पौंडावर असे बदलू लागले. तिकीटवाल्या काट्यात तर वजनाबरोबर भविष्येही बदलत होती. एका तिकिटावर मी स्वभावाने धूर्त, आपमतलबी आहे असे छापले होते, तर दुसऱ्यावर माझ्याइतका साधा माणूस 'दुनिया में क्वचितही मिलेगा' असे वर्तविले होते. एका काट्याने माझे वजन दोनशेतीन पौंड दाखवून, माझ्यावर कौटुंबिक संकट कोसळणार असल्याची पूर्वसूचना दिली होती! ह्या साऱ्या प्रकारात मला फक्त चौदाचा पाढा चौदा सोळे चोविसे दोनपर्यंत येऊ लागला, एवढाच फायदा झाला. शेवटी आपले वजन हपीससमोरच्या इराण्याच्या काट्यावर करायचे ठरवून मी 'आहार परिवर्तन' सुरू केले.

****

एकदा नित्याप्रमाणे सकाळची इडली उडवत आम्ही आमच्या ठरलेल्या हॉटेलात बसलो होतो. सत्यवादी हरिश्चंद्रानंतर आपणच अशा थाटात सोन्याची, हल्लीच्या भाषेत सांगायचं म्हणजे फेकाफेक चालली होती. त्याच्या सत्यवादीपणाचा फुगा फोडायचा म्हणून मी म्हटलं, सोन्या, थापा मारू नकोस. खोटं बोलत नाहीस काय? अरे, शंभर वेळा सिक नोट्स टाकता आणि सिनेमे बघता. ह्या हॉटेलातल्या त्या वरवंट्यासारख्या टणक तब्येती लेको तुमच्या- सिनेमा बघायला जायचंय असं लख्ख का लिहीत नाही रे? तिथं ॲज आय एम इंडिस्पोजड्ची थाप का?

मला वाटलं, सत्यवादी सोन्या निपचित पडेल, पण नाही. त्यानं उलट मलाच ठणकावलं, शहाणे आहात! सिनेमा पाहण्यासाठी रजा मागितल्याबरोबर, घ्या म्हणून रजा देणारा हेडक्लार्क आणखी सात वर्षांनी जन्माला यायचाय.

सात वर्षांनी? तुला काय ठाऊक?

सात वर्षांनी मी हेडक्लार्कच्या जागेवर जाईन त्या वेळी. अरे, सगळ्यांना सांगेन, मिस्टर रजा घ्या, पण खरं कारण सांगून घ्या. अरे, माझ्यासारख्या सत्याच्या उपासकाला आजच्या जगात जगताना हीच अडचण आहे, की सत्याला आज किंमत नाही. म्हणून तर असत्याची कास धरावी लागते.

श्रीयुत कामचुकार

रे.भा.आ.श्रु.भा.१

(उपास कथेतून साभार...)

...तर मराठीची चिंता बाळगण्याचे कारण नाही

महाराष्ट्र टाइम्स १२ जून २००८– ३ जुलै १९८७ ला अमेरिकेत न्यू जर्सीला झालेल्या बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात पुलंनी केलेल्या अध्यक्षीय भाषणातील अंश..

इंग्रजीमध्ये एक म्हण आहे की, साँग हॅज द लाँगेस्ट लाइफ. गाणं हे चिरंतन असतं. या मराठी मुलांच्या ओठांवर, मनामध्ये तुम्ही मराठी गाणी दिलंय. अशी पाचपन्नास गाणी दिलीत, तर मराठी संस्कृतीची चिंता करण्याचं तुम्हाला काहीही कारण उरणार नाही. हे गाणं या बालकांबरोबर त्यांच्या वयाच्या ऐंशिव्या–नव्वदाव्या वर्षापर्यंत जाईल, कदाचित शंभराव्या वर्षापर्यंतसुद्धा जाईल. जोपर्यंत एक मराठी गाणं तुमच्या ओठांवर आहे, तोपर्यंत तुम्ही अमेरिकेत राहा, नाही तर टिंबक्टूत राहा, कुठंही राहा, तुम्ही मराठीच आहात. त्यात काही चिंता बाळगण्याचं कारण नाही.

❋ तुकारामासारख्या संतानंसुद्धा म्हटलंय की, 'माझिया जातीचा मज मिळो कोणी'. इथे 'जातीचा' याचा अर्थ माझ्यासारखी ज्याला विठ्ठलाची ओढ आहे, देवाची ओढ आहे अशा प्रकारचा कोणी तरी मला मिळो. तुकारामांच्याच उक्तीप्रमाणे बोलायचं तर 'माझिया भाषेचा मज मिळो कोणी' या भावनेनं आपण इथे एकत्र आलेले आहोत आणि इतक्या संख्येनं इथे एकत्र जमलेले आहोत की, मला तर असं वाटतं, कोणी तरी तिथून 'न्यू जर्सीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे', असं म्हणेल की काय!

...म्हणजे प्रश्नातून सुटका नाही. माझीच नव्हे, कुणाचीच नाही! मग जगणे म्हणजे नुसते श्वासोच्छ्वास घेणे, का लक्ष–लक्ष प्रश्नांच्या उत्तरांमागून धावणे? शेवटी प्रश्न म्हणजे तरी काय किंवा उत्तर म्हणजे तरी काय? हादेखील एक प्रश्नच. मी त्या प्रश्नचिन्हाकडेच निरखून पाहतो आणि युरेका! त्या प्रश्नचिन्हातच माझे उत्तर कसल्याशा सांकेतिक भाषेत दडवले आहे हे मला ठाऊक नव्हते. प्रश्नचिन्हाच्या त्या आकड्याखालीच शून्य हे त्याचे उत्तरही असते. विरामचिन्हे इतकी विचारपूर्वक बनवली असतील याची मला कल्पना नव्हती!

पु.ल. देशपांडे
एक शून्य मी

❋ परदेशात आपल्या भाषेचा शब्द कानांवर पडणं मुश्कील. म्हणूनच तर तो 'परदेश' होतो ना! मला खात्री आहे की, इथे अगदी अनोळखी प्रदेशातून प्रवास करताना कानांवर बालकवींची कविता वगैरे जाऊ दे, पण 'च्यायला' अशी शिवी जरी ऐकू आली, तर ती ओवीसारखी वाटेल आपल्याला त्या वेळी.

❋ हे जीवन सुंदर व्हावं, आनंददायक व्हावं, हाच हेतू सगळ्या संस्कृतींच्या मुळाशी असतो. गुलाबाचं फूल आणि मोगऱ्याचं फूल ही फुलं भिन्न आहेत, म्हणजे त्या फुलांचं वैर आहे असं नव्हे. त्यातलं फूलपण एकच आहे. 'ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा' असं चोखोबांनी म्हटलंय. ऊस वाकडा, पण रस वाकडा नसतो. गाय काळी म्हणून दूध काळं नसतं. तसं हे फुलातलं फूलपण खरं. तिथे पुष्पसृष्टीचेच कायदे लागू पडतात. प्रत्येक माणसाला, तो कुठलाही असला तरी जीवसृष्टीचेच कायदे लागू पडतात. दाढ ठणकायला लागली की, कानडी मनुष्य 'अय्यय्यो' म्हणून कानडीत ठणाणा करील. तो कानडीतून असला, इंग्लिशमधून असला किंवा जपानीतून असला, तरी दाढ ठणकण्याची वेदना तीच आहे. त्याच्यामध्ये काही फरक नसतो. एकात्मतेत विविधता आणि विविधतेत एकात्मता 'युनिटी इन डायव्हर्सिटी' म्हणतात ती हीच. एकात्मता हे जसं सत्य आहे, त्याचप्रमाणे विविधता हेही सत्य आहे.

❋ कुसुमाग्रजांची एक कविता आहे, 'नवलाख तळपती दीप विजेचे येथ, उतरली जणु तारकादळे नगरात, परि स्मरते आणिक करिते व्याकुळ केव्हा, त्या माजघरातील मंद दिव्याची वात.' आपल्या माणसांपासून, आपल्या भाषेपासून हजारो मैल दूर असलेल्या आपल्यासारख्या मराठी माणसांच्या मनाच्या माजघरामध्ये आजूबाजूला एवढं सारं ऐश्वर्य असूनही जिवाला व्याकूळ करणाऱ्या मंद दिव्याच्या वाती या असणारच. या मेळाव्यात अशा माजघरातल्या मंद दिव्याच्या वातींचं स्मरण न होणारं असं कुणी असेल, असं मला वाटत नाही. ती रुखरुख नसती, तर मराठी भाषेची ज्योत तशीच पेटत राहावी, या भावनेनं तुम्ही असे एकत्र आला नसता. ज्या भाषेचे संस्कार तोंडावाटे शब्द फुटण्याच्या

आधी आपल्या कानांवर झाले, त्या भाषेची नाळ ही नुसती कानाशी जुळलेली नसते, प्राणाशी जुळलेली असते. शरीरातून रक्त वाहावं तशी आपल्या व्यक्तिमत्त्वातून भाषा वाहत असते, तो प्रवाह थांबवणं अशक्य असतं. आईच्या दुधाबरोबर शरीराचं पोषण होत असताना तिच्या तोंडून येणाऱ्या भाषेनं आपल्या मनाचं पोषण होत असतं. केवळ देहाच्या पोषणानं माणसाचं भागत नाही; किंबहुना मानव म्हणजे ज्याला मन आहे तोय मन एव मनुष्यः अशी योगवासिष्ठामध्ये माणसाची व्याख्या केलेली आहे. या मनाचं पोषण भाषा करत असते. त्या पोषणाचे पहिले घास ज्या भाषेतून मिळतात, ती आपली भाषा...

✻'पुंडलिक वरदा' म्हटल्यानंतर तुम्ही आस्तिक असा की नास्तिक असा, 'हारी विठ्ठल' तोंडातून येणारच तुमच्या. तो प्रतिसाद तुम्हाला कळण्यापूर्वी उमटलेला असतो. अशा नेणिवांतून, आपोआप उमटणाऱ्या प्रतिक्रियांतूनच समाजमानस तयार होत असतं. 'छत्रपती शिवाजी महाराज की' म्हटल्यानंतर ज्याच्या तोंडून आपोआप 'जय' येत नाही, तो मराठी माणूस आहे असं आपल्याला वाटतच नाही.

✻ खुद्द महाराष्ट्रात आज मराठीपेक्षा इंग्रजी भाषेलाच जास्त मान आहे. इंग्रजाच्या आमदानीमध्ये तिला राजभाषा म्हणून मान मिळत होता. इंग्रजी शिकायची सक्ती होती, आता तशी सक्तीही नाही; पण इंग्रजी भाषेची किल्ली हातात असली की, अभ्युदयाची अनेक दारं उघडली जातात, हे अनेक लोकांनी ओळखलेलं आहे; किंबहुना पुण्याहून मुंबईला जाताना नव्यानेच कारखानदारीत शिरलेले जोशी-कुलकर्णीसुद्धा एकमेकांशी इंग्रजीत बोलत असतात. आता त्यांचं इंग्रजी ऐकल्यावर इंग्रज हा देश सोडून का गेला, हे आपल्याला कळतं.

✻ अमेरिकेमध्ये आल्यानंतर केवळ डॉलर्सचा संचय हे एकमेव उद्दिष्ट राहू नये, तर नवी निर्मिती करण्याचे जे जे काही प्रकार इथे चाललेले आहेत, चांगले आहेत, सुंदर आहेत, त्याच्यामागे आपली मुलं कशी लागतील, त्याची त्यांना आवड उत्पन्न कशी होईल, याची तळमळ हवी. आजच्या काळामध्ये मी एकच विनंती करणार आहे. इथं तुम्ही जमलेले आहात, फार मोठे तंत्रज्ञ-शास्त्रज्ञ आहात, तुम्हाला महाराष्ट्राची सेवाच करायची असेल, तर तुमचा जो विषय आहे, त्याच्यावरचे लेख मराठीत लिहून ते महाराष्ट्रात पाठवा. ही मराठी भाषेची सगळ्यात मोठी सेवा होईल. तळमळ खरीखुरी असेल तर अशक्य काहीही नाही.

✻✻✻✻✻

श्रीयुत खादाड

हे पहा सध्या जरा अन्नटंचाई आहे. जरा बेतानं खा. माझ्या ऑफिसमधला मित्र काही कारण नसताना मला उपदेश करायला लागला. मला खरं म्हणजे कुणीही कुणालाही उपदेश केलेला आवडत नाही. मी कुणाला उपदेश करायला जात नाही आणि कुणी मला करायला लागला की ते मला खपत नाही. विशेषतः मी काय खावं आणि प्यावं ह्याविषयी कुणी मला बोलायला लागला, की माझं पित्त भडकतं. माझ्या खाण्यात दुसऱ्यांना तोंड घालायचं कारणच काय? मान्य आहे, मी इतरांच्यापेक्षा जास्त खातो; पण खातो म्हणजे कुणाचा खून करत नाही ना? माझी भूक सणसणीत आहे, याचा मला वाटतं, बऱ्याच लोकांना हेवा वाटतो आणि दुसरं असं की, त्या लोकांना खाणं म्हणजे काय हेच कळलेलं नाही. खाणं ही केवळ इंजिनात कोळसे भरण्याची क्रिया थोडीच आहे? खाणं ही गाण्यासारखी एक कला आहे. खाणं आणि गाणं म्हणजे दोन्ही क्रिया करताना तोंड उघडावं लागतं, ह्याच केवळ साम्यामुळं मी म्हणतो असं नाही. गाण्याला जसे सूर आणि लय असतात त्याचप्रमाणं खाण्यातही आहे. बकाबक खाणं हे बेसूर आहे. चतुर गायक ज्याप्रमाणं हळूहळू सुरावट करत करत रागाचं स्वरूप दाखवत असतो, त्याचप्रमाणं खाणंदेखील सावकाश सावकाश सुरू करून चांगल्या खानदानी गाण्यासारखं तास-दीड तास घोळवायचं असतं. उदाहरणार्थ, सणासुदीचं भोजन. काही पक्वान्नं केलेली असतात. चटण्या-कोशिंबिरींच्या नाना तऱ्हा असतात. त्यात एकदम तोंड घालून चालत नाही. चांगला गवई जसा एकदम तानाबाजी करत नाही, आधी आलापी करतो, मधूनच छोटीशी तान घेतो, तसं आधी भाताची आलापी केली पाहिजे, म्हणजे जेवणाचा पाया भक्कम होतो आणि मग त्याच्यावर लाडू-जिलब्यांची इमारत रचायला सुरुवात केली पाहिजे. मधूनच एखादी छोटीशी तान मारावी त्याप्रमाणं उगीच थोडी तिखट चटणी जिभेवरून फिरवून टाकली पाहिजे, म्हणजे खरी रसनिष्पत्ती होते. आहाहा! सुंदर सुंदर विविधरंगी पदार्थांनी भरलेलं ताट पाहिलं, की मला आधी काही काळ त्या दृश्याकडे डोळे भरून पाहत राहावंसं वाटतं. आस्वाद हा सावकाश घ्यावा. आधी डोळ्यांनी सौंदर्य पहावं. नाकानं तो वास घ्यावा. पापड मोडताना कुर्रऽ असा होणारा मंजूळ आवाज कानानं ऐकावा आणि मग हळूच हे सारं ओठाशी घ्यावं. पानात अन्न पडल्याबरोबर त्याच्यावर तुटून पडणारा हा जातिवंत खवय्याच नव्हे!

।। रेडिओवरील भाषणे आणि श्रुतिका ।।

– टीम रश्मिन संपादकीय समिती

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त लेखक, दिग्दर्शक
निपुण धर्माधिकारी

आपल्या आवडत्या विषयात किंवा आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करणं कुणाला आवडत नाही? पण आजकाल अशी संधी फार थोड्या लोकांना प्राप्त होते. जिथे 'मेरा बेटा इंजिनीअर बनेगा' असा नारा जोर धरतोय, तिथेच शिक्षणासोबत कलेची आवड जोपासणे आणि त्यालाच आपला व्यवसाय म्हणून स्वीकारणे ही दिशा नव्या पिढीला आता प्राप्त झाली आहे आणि त्या मार्गावर त्यांचा यशस्वी असा प्रवासदेखील सुरू झाला आहे आणि ह्याच प्रवासातला एक प्रवासी आहे नॅशनल ॲवॉर्डचा मानकरी लेखक, दिग्दर्शक, अभिनेता निपुण धर्माधिकारी!

निपुण, सर्व प्रथम तुझे हार्दिक अभिनंदन. तुला नुकताच नॅशनल ॲवॉर्ड प्राप्त झालाय, ह्याबद्दल नेदरलँड्स मराठी मंडळातर्फे तुझे अभिनंदन!

नाट्य क्षेत्रात पदार्पण करण्याची इच्छा तुला कशी झाली? तुझ्या कुटुंबात कुणी ह्या क्षेत्रात होतं का?

माझ्या कुटुंबात कुणीही ह्या क्षेत्रात नाही, तशी पार्श्वभूमीही नाही. खरं तर माझ्या घरात संपूर्णतः ॲकॅडमिक पार्श्वभूमी आहे. माझे आईबाबा दोघेही प्रोफेसर आहेत. आता रिटायर झालेत; पण स्टॅटिस्टिक्स्चे ते प्रोफेसर. माझा भाऊ इंजिनीअर झाला आणि यू.एस.मध्ये त्याने एम.एस. केलंय आणि सोबतच तिथे लॉचा अभ्यास केला. तर आता तो तिथे ॲटर्नी आहे आणि इंजिनीअरसुद्धा आहे. माझी वहिनी इंस्ट्रुमेंटेशन आणि रेडिएशन ह्या विषयातील पीएच.डी. आहे. तर साधारण सगळेच व्यवस्थित काम करणारे आहेत.

जसे सगळ्या आईवडिलांना वाटतं की, आपल्या मुलांनी डॉक्टर किंवा इंजिनीअर व्हावं तसंच माझ्या आईवडिलांना आणि मलासुद्धा शाळेत असताना तसंच वाटायचं. फार काही वेगळा विचार मी केला नव्हता; पण जसजशी शाळा संपत आली तसं लक्षात यायला लागलं की, सायन्समध्ये आपल्याला मार्क्स चांगले मिळत असले तरी फार आवडतंय असं नाही. मग हट्टामुळे सायन्स घ्यायचं नाही असं ठरवलं; कारण जे आवडत नाही ते का करायचं? पण मग आर्ट्स हा विकल्प नव्हताच; ह्याचा आत्ता विचार केला तर मला वाईट वाटतं, कारण ह्या विषयाचा आणखी सखोल अभ्यास करता आला असता; पण मग मी कॉमर्स हा विषय निवडला आणि बी.एम.सी.सी. पुणे येथे ॲडमिशन घेतली. बी.एम.सी.सी.ची अजून एक खासियत ही की, त्यांचा नाटकांवर

जोर फार चांगला आहे. त्यामुळे मी कॉलेजच्या दुसऱ्याच दिवशी तिकडे ओढला गेलो. शाळेत नाटकाचं वातावरण नव्हतंच; तिथे आर्ट क्लासला फक्त ड्रॉइंग आणि क्राफ्ट एवढंच असायचं आणि इथे हे सगळं अनुभवायला मिळाल्यावर नाटकाची खरी गोडी मला कॉलेजमध्ये लागली. मला आईवडील नाटकाला न्यायचेत, पण त्यांनाही हे पुढे जाऊन माहीत नव्हतं की, मी ह्या क्षेत्राची व्यवसाय म्हणून निवड करेन. तर मुळात बी.एम.सी.सी.मुळे मी ह्याचा विचार करू लागलो.

बी.एम.सी.सी.पासूनच तुमचा 'नाटक कंपनी'चासुद्धा प्रवास सुरू झाला. ह्याविषयीसुद्धा आम्हाला जाणून घ्यायला आवडेल, की असा एखादा संघ तयार करावा ह्याबद्दल तुम्ही कसा विचार केला?

आम्ही कॉलेजकडून नाटक करत असताना इतर प्रायोगिक नाट्य संस्था होत्या, त्यांच्यातर्फेसुद्धा आम्ही काम करायचो; पण कुठे तरी असं वाटायला लागलं की, आपण अजून कुठल्याच संस्थेची स्थापना केलेली नाही, तिथे आपलेपणाची भावना नव्हती, आपण काही तरी केल्याचा आनंद तेवढा येत नव्हता; त्यामुळे ते काम करताना आणि कॉलेज संपत आलं असताना असं लक्षात येऊ लागलं की, आपल्याला आपल्या एका बॅनरची गरज आहे, कारण आता ह्यापुढे बी.एम.सी.सी.कडून आपण हे करू शकणार नाही आणि फक्त काम करायचे म्हणून पुन्हा ॲडमिशन घेण्यात काही अर्थ नव्हता. म्हणून मग असा एक विचार झाला की, आपण आपली एक संस्था स्थापित करावी, समवयस्क आणि समविचारी लोकांना सोबत घेऊन आपली ही नाटकाची आवड आपण पूर्ण करू या; पण तेव्हाही हा विचार केला नव्हता की, आपण अशी मोठी संस्था काढू आणि दहाव्या वर्षाचा असा मोठा कार्यक्रम ठेवू! केवळ समविचारी लोकांनी एकत्र येऊन काम करण्याविषयी जी ओढ होती त्या ओढीमुळे नाटक कंपनीची सुरुवात झाली.

निपुण, आम्हाला सगळ्यांना माहितीये की, तू एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेस. तू एक अभिनेता आहेस. लेखक, दिग्दर्शक आहेस. तेव्हा ह्या सगळ्यांमधून दिग्दर्शनाचीच निवड तू का केलीस?

खरं तर हे तुम्हाला वाटतं, पण मी अजूनही एक अभिनेता म्हणूनसुद्धा स्वतःकडे अजून त्या दृष्टिकोनातून पाहत नाही. दिग्दर्शन हा प्रकारसुद्धा मी म्हणेन की, तो माझ्यावर लादला गेला. कॉलेजमध्ये अमेय आणि मी फर्स्ट इयरला असताना सीनिअर असल्याने आमच्या दोघांपैकी कुणी तरी दिग्दर्शन करावं असं ठरत होतं आणि तेव्हा अमेयने अगदी शिताफीने ती जबाबदारी माझ्यावर टाकली. त्यामुळे मला ते करावं लागलं; पण ते करताना मला ते आवडायला लागलं आणि मग मी पुढे ते सुरू ठेवलं आणि अभिनयाला ज्या प्रकारची एक निष्ठा लागते, एक प्रकारे स्वत:वर खूप काम करणं आवश्यक असतं. त्याच काळात मी सी.ए.पण करत होतो; तेव्हा अभिनयापासून मी थोडा दूर गेलो आणि दिग्दर्शन म्हणजे ह्या क्षेत्रात काम करण्याचा एक चांगला मार्ग मला तेव्हा वाटला. कुठल्याही परिस्थितीत म्हणजे अगदी रात्री चार तास कमी झोपलो तरी मी एका नाटकाचं दिग्दर्शन करू शकतो आणि प्रत्येक प्रयोगाला तिथे तुम्ही नाही गेला तरीही

चालतं. अभिनेता असतो तर प्रत्येक प्रयोगाला जाणं महत्त्वाचं होतं; पण अभ्यासामुळे सगळीकडे जाता येणं जरा अवघड वाटत होतं. तेव्हापासून अभिनय जो मागे पडायला लागला तो आत्ता भा.डि.पा.मुळे पुन्हा लोकांच्या नजरेस पडायला लागला आहे

आम्ही तुला वक्ता म्हणूनसुद्धा ऐकलंय (पुलोत्सव पूर्वरंग २०१७, दि हेग नेदरलँड्स येथे) आणि तू खरंच एक चांगला वक्ता आहेस. तर त्यावर तुला पुढे काम करायला आवडेल का?

तो अनुभव माझ्या दृष्टीने वक्ता म्हणून नव्हे तर, तो एक अभिनयच होता आणि त्याच्या लिखाणाकरिता आम्हाला मदत मिळाली होती. वक्ता म्हणाल तर त्याचं वाचन खूप असलं पाहिजे, त्याला त्या त्या वेळी योग्य शब्द सुचणं हे अत्यंत गरजेचं आहे; पण माझी तयारी नसेल तर मी सहसा बोलत नाही; पण मला आधीपासून कल्पना असेल, तर मला त्याची संपूर्ण तयारी करून बोलायला आवडेल. तयारी केल्याशिवाय बोलायला मला आवडतही नाही किंवा मी बोलू शकणार नाही. ही वक्त्याची लक्षणं नाहीत खरं तर! त्यांच्या हाती माइक आल्या आल्या ते बोलू शकतात; पण माझं तसं नाहीये; पण तरीही मला एक

उत्तम वक्ता बनायला आवडेल. मला आवडेल एक असा वक्ता बनायला ज्याला खूप माहिती आहे आणि जो आत्मविश्वासाने मंचावर योग्य ते बोलू शकतो.

'फोर्ब्स'मध्ये तुझं नाव वाचलं, खरंच खूप अभिमानास्पद आहे ही गोष्ट 'अंडर ३०'मध्ये नाव येणं. तिथे तुझा उल्लेख '५ अंकी संगीत नाटकाला पुनरुज्जीवित करणारा दिग्दर्शक' असा झालेला आहे. तर हे संगीत नाटक पुनरुज्जीवित करण्यामागचा तुझा उद्देश काय होता?

उद्देश विचारशील तर, मी पहिल्यांदा पाश्चिमात्य नाट्यसंस्कृती अनुभवली ती इंग्लंडमध्ये! मी सुदैवाने लंडनसारख्या शहरात होतो आणि माझ्याकडे बराच वेळ होता, म्हणून ठरवलं की, आपण इथलं नाटक बघायचं; पण तिकिटाच्या किमती बघितल्यावर वाटलं की, एवढी महाग तिकिटं नाटकाची? तेव्हा २००८ साली ५० पाऊंड तिकीट, म्हणजे जवळजवळ ४००० रुपये; मग एवढं तिकीट काढून मला काय बघायला मिळणार ह्याची प्रचंड उत्सुकता होती; पण एवढे पैसे देऊन मला ६-७ नाटकं बघायला मिळाली असती; पण इथे आलोय तर बघायला हवंच म्हणून मी दोन नाटकं पाहिली आणि ती पाहिल्यावर मला कळलं की, ते किती भव्य होतं. एका नाटकाचं सादरीकरण तर फारच छान होतं आणि एक जे पाहिलं ते 'ले मिझेराबल' होता, जे सर्वात जास्त चालणारं संगीतनाट्य होतं. नव्या नाटकांसोबतच जुन्या, वर्षानुवर्षे यशस्वीरीत्या चालणाऱ्या नाटकांचे प्रयोग सुरू होते. जसा 'ले मिझेराबल' हे संगीतनाट्य झालं किंवा 'दि माऊसट्रॅप' हे 'जगातील सगळ्यात जास्त काळ चालणारं नाटक' अशाच प्रकारे त्याबद्दल लिहिलं गेलं होतं. तिथला असा एक भाग जिथे ५०-५५ थिएटर्स आहेत, तिकडे मी अनेक जाहिराती पाहिल्या. तेव्हा माझी फार नाटकं आली नव्हती. दिग्दर्शन केलेली माझी चार ते पाच नवीन नाटकं आली होती आणि ह्यांची ही नाटकांची ओढ पाहिली तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की, हे लोक जुनी नाटकंसुद्धा खूप चांगल्या प्रकारे नवीन तंत्रज्ञान वापरून सादर करत आहेत; मग आपल्याकडे का नाही त्याचा प्रयत्न होत? मला शेक्सपीअरच्या कथांवर काम करायलासुद्धा आवडेल. मग असं जाणवलं की, आपण का नाही संगीत नाटकाकडे लक्ष द्यावं, जे आता मागे पडत चाललंय; पण नुसतं बोलण्यापेक्षा आपण काही तरी करावं ह्या विचारात असतानाच सुदैवाने राहुल देशपांडे ह्यांच्या संपर्कात मी आलो. त्यांनी नुकतीच 'कट्यार'ची निर्मिती केली होती आणि त्यांना 'संशयकल्लोळ'ची निर्मिती करायची होती. त्यांनी मला विचारलं आणि मलासुद्धा त्या क्षेत्रात काम करायचं होतं, शिवाय राहुलसारखा उत्तम गायकसुद्धा माझ्यासोबत होता जो एक उत्तम नटसुद्धा आहे. मी लगेच हो म्हणालो आणि बघता बघता आम्ही साधारण दीड वर्षांत तीन नाटकं केली.

त्याचाच परिणाम म्हणून मी नाही म्हणणार; पण सध्या 'देव बाभळी' नावाचं नाटक खूप गाजतंय; जे एक नवीन संगीत नाटक आहे आणि त्यालासुद्धा प्रेक्षकांचा खूप छान प्रतिसाद मिळतोय, ही खूपच आनंदाची बाब आहे.

तू जेव्हा हे काम हातात घेतलं तेव्हा तुला कुठल्या अडचणींना सामोरं जावं लागलं? जसं संगीत नाटकाकडे पुन्हा वळताना मिळणारा प्रतिसाद म्हणा किंवा तांत्रिक अडचणी किंवा मग इतकं मोठं नाटक करण्याबद्दलचा प्रतिसाद?

मला आतापर्यंत खरं तर प्रोत्साहनच मिळालंय; पण बरेचदा असं होतं की, त्यातले डायलॉग बदलणे किंवा तत्सम बदल घडवून आणलेले लोकांना आवडत नाही. पाच अंकी नाटकाचं दोन अंकी करताना मी एवढी काळजी घेतो की, मी त्याची कथा बदलत नाही, त्याचा मूळ अर्थ बदलत नाही.

जर तुला शेक्सपीअरच्या लिखाणावर काम करायचं असेल तर तू कुठलं नाटक करशील आणि कुणासोबत तुला ते करायला आवडेल?

आता परत शेक्सपीअर होऊ लागलं आहे. 'हॅम्लेट' आता आलाय तसेच हिंदीमध्ये अतुल कुमार सध्या शेक्सपीअरच्या लिखाणावर काम करतायेत, तेसुद्धा खूप छान सादरीकरण असतं. त्यामुळे मला माहीत नाही, मी ते करेन का? कारण मला शेक्सपीअरची नाटकं माहिती आहेत, त्यातली पात्रं माहिती आहेत; पण मी अजून ती पुस्तकं त्या दृष्टीने वाचली नाहीत. तर आता मला वाटतं की, ती पुस्तकं घेऊन आता फडशा पाडला पाहिजे.

आता सध्या तू 'वन्स मोअर' हे नाटक करत आहेस, जे मूळ गुजराती नाटक आहे; ज्याचा संपूर्णतः वेगळा प्रेक्षकवर्ग आहे; तर त्यावर काम करताना तुला काही अडचणी आल्यात का?

अर्थात त्यांची काम करण्याची पद्धत फार वेगळी आहे. गुजराती नाटक हे जास्त सामाजिक पातळीवरच आहे, त्यात थोडे 'स्पून फीडिंग' आपण ज्याला म्हणू; त्या प्रकारची नाटकं असतात आणि अगदी साधी नाटकं असतात. त्यांच्या कथा फारच रोचक असतात, मनोरंजक अशा असतात. अनेक गुजराती नाटकं सध्या मराठी रंगभूमीवर आलेली आहेत, त्यावर अनेक चित्रपटसुद्धा आले आहेत. त्यामुळे मी हे केलं. जेव्हा पहिल्यांदा मी 'लगोरी' हे नाटक बघायला गेलो, तेव्हा मला फार रस नव्हता. माझ्या मनात असा भ्रम होता की, हे नाटकसुद्धा कुठून तरी घेतलेलं असेल किंवा मग आता आपल्याला रिमेकच्या भानगडीत पडायचं आहे का? अशा अनेक शंका माझ्या मनात होत्या; पण मी ते नाटक पाहिलं आणि मला ते फारच आवडलं. त्यात एक

राजकीय चित्र दिसत होतं, तो गंभीर विषय असला तरी नाटक फारच मनोरंजक होतं आणि ते पाहिल्यावर मला कुठल्याही इंग्रजी चित्रपटाची आठवण झाली नाही हे विशेष, त्यामुळे मी ते करायचं ठरवलं. नंतर काही महिन्यांनी मला विचारलं की, भरत जाधव ह्यांनी काम केलं तर चालेल का? तेव्हा तर मी शिक्कामोर्तब करून टाकलं की, हे नाटक करायचंच. त्यानंतर मग त्याची तीन महिन्यांची सगळी प्रक्रिया झाल्यावर आम्ही हे नाटक सादर केलं आणि त्याला लोकांचा उत्तम प्रतिसाद लाभतोय.

नुकताच तू आता एक स्विच केलास, 'बापजन्म'चं दिग्दर्शन तू केलंस, तेव्हा तू सिनेसृष्टीत दिग्दर्शक म्हणून आलास; पण ह्यापूर्वीही तू हिंदी सिनेमात काम केलं आहे. ह्या दोघांमध्ये तुला काही फरक जाणवला का किंवा मी म्हणेन हा स्विच करताना तुला काही त्रास झाला का?

मला मुळात हा स्विच वाटतच नाही. मला मागे एका मुलाखतीत विचारण्यात आलं होतं, आता तुम्ही सिनेमा करताय, तर पुढे तुम्ही नाटक कराल का? पण ह्या दोन्ही इतक्या रिलेटेड गोष्टी आहेत, काही कथा ह्या मंचावर सांगायच्या असतात, तर काही स्क्रीनवर सांगायच्या असतात किंवा जेव्हा कुठलं तरी नाटक, सिनेमा होतो; तेव्हा त्याचं रूपांतर होतं, त्याची सांगण्याची भाषा बदलते, चित्रभाषा बदलते. त्यामुळे मला स्विच वाटत नाही, तर हा एक वेगळा प्रकार आहे, ती कथा लोकांपर्यंत पोहोचवण्याचा. त्यापूर्वी मी एक हिंदी चित्रपट लिहिला आहे, 'नौटंकी साला' नावाचा. तो माझा एक लिहून, प्रदर्शित झालेला सिनेमा आहे. त्यापूर्वीसुद्धा मी प्रयत्न केला; पण यश आलं नाही आणि मग 'बापजन्म' लिहिला गेला माझ्याकडून आणि मग त्याच्या निर्मात्याच्या शोधात ३ वर्षे गेलीत, पाच वर्षांनी तो चित्रपट थिएटरमध्ये आला.

तू म्हणालास त्याप्रमाणे बरीच वर्षे लागतात एका सिनेमाला साकार व्हायला, बरेचदा अपयशाला सामोरं जावं लागतं; ह्या परिस्थितीला तू कसा हाताळतोस?

मला वाटतं अशा वेळी आपली फॅमिली आणि मित्रमैत्रिणी सोबत असणं खूप महत्त्वाचं असतं आणि हे क्षेत्र निवडलं आहे म्हटल्यावर त्याचे फायदे-तोटे, चांगल्या-वाईट सगळ्याच गोष्टींना निवडलं आहे आणि ते स्वीकारलंही आहे. जेव्हा यश मिळतं, लोक ओळखतात, तेव्हा खूप छान वाटतं. ज्यांनी त्यांनी स्वतः ची मानसिकता आणि आजूबाजूचे लोक पाहून ते हाताळायचं असतं. माझं म्हणायला गेलं तर माझ्या आजूबाजूला खरंच खूप छान माणसं आहेत, खूप चांगला ग्रुप आहे ज्यांचा विश्वास आहे माझ्यावर, ज्यांची साथ आहे. बरेचदा माझं एखादं काम जर घडत नसेल तर मी इतर बाकी कामांत स्वतःला गुंतवून घेतो. मला वाटतं की; माणूस जगण्याकरिता संघर्षाच्या शोधात असतो, समाधानी माणूस सापडणं अवघडच! सापडलाच तर त्याच्याकडून काही नवीन होण्याची अपेक्षा सोडून द्यावी.

असं म्हटलं जातं की, मराठी चित्रपटसृष्टी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत बराच फरक आहे. तू दोन्हीकडे काम केलंय, तर तुला काय वाटतं ह्याबद्दल?

मला असं वाटतं, हा आर्थिक फरक जास्त आहे. एक अजून चांगली गोष्ट आपल्या मराठी सिनेसृष्टीत आहे, की ती एका संहितेवर आधारित असणारी आहे. जर कुठल्या फिल्म्स यशस्वी होत असतील तर त्या एका चांगल्या कथेमुळे, पटकथेमुळे, ना की अभिनेत्यांमुळे, जे तिकडे जास्त होतं. तिकडे तुम्ही स्टार घेतला आणि कथा कशीही असली तरी सिनेमे चालतात. अर्थात एक-दोन अपवाद आहेत.

तुला नुकताच 'धप्पा' ह्या सिनेमाकरिता नॅशनल ॲवॉर्ड प्राप्त झाला, तर ह्या फिल्मचा प्रवास कसा होता? तू ही कथा का निवडलीस?

मी हा सिनेमा निवडला म्हणण्यापेक्षा, ह्या सिनेमाकरिता माझी निवड झाली, असं म्हणायला हवं. गिरीश कुलकर्णी ह्यांची ही कथा आहे आणि त्यांना हा सिनेमा करायचा होता आणि ते एका दिग्दर्शकाच्या शोधात होते. तीन वर्षांपूर्वी त्यांनी मला हे विचारलं आणि आम्ही २०१५ मध्ये चित्रीकरणाला सुरुवात केली. आता ही कथा पूर्ण होऊन, त्याला नॅशनल ॲवॉर्ड मिळून ती प्रदर्शनाच्या वाटेवर आहे.

तुझा मूळ पिंड हा विनोदी आहे असं आतापर्यंतच्या तुझ्या कामावरून कळतं; पण तू गंभीर विषयांवरसुद्धा काम करतोस. जेव्हा तू दोन्ही प्रकारची कामं एकाच वेळी हाताळत असतोस तेव्हा तुला काही अडचणी आल्यात का?

खरं तर नाही. माणसाच्या स्वभावातला भाग त्याच्या कलाकृतीमध्येपण उतरतो असं मला वाटतं. मूळचाच असा स्वभाव असल्यामुळे विनोदी छटा येतेच, पण ह्याचा अट्टहास मात्र मी करायला जात नाही, म्हणजे 'नाही, हे असलंच पाहिजे', असं काही नाही. गरज नसेल तर ती छटा दिसणारच नाही. बरेचदा असं होतं की, समोरची व्यक्ती आपल्यामुळे हसतेय हे दिसल्यावर हसवायची आवड निर्माण होते; पण माझा लेखक किंवा दिग्दर्शक म्हणून समोरच्या माणसाला हसवण्यापेक्षा त्याला त्या गोष्टीचा अनुभव देण्यावर जास्त भर असतो. एखाद्या कथेमध्ये गरज नसेल तर मी अजिबात हसवायचा अट्टहास करत नाही.

विनोदी लिखाण किंवा सादरीकरणाचा विचार केला तर, आत्ताच तू एका पॉडकास्टमध्ये म्हणाला आहेस की, पु.ल. देशपांडे हे 'पहिले स्टॅन्ड अप कॉमेडियन' होते. सध्या खूप स्टॅन्ड अप कॉमेडियन येत आहेत, पण त्यांचा विनोद आणि सादरीकरण हे फारच अल्पायुषी असतं, बरेचदा तर ते तेवढं

मनोरंजकसुद्धा नसतं. ह्याविषयी तुला काय वाटतं? ही कला कुठे तरी हरवत चालली आहे का?

ह्यात खरं तर दोन गोष्टी आहेत. एक तर तेव्हा हे असं सादर करणारी माणसं कमी होती, त्यातले पुलं होते. त्यांचं लिखाण अत्यंत मार्मिक आणि साधं होतं. त्यांचे शब्द आणि वाक्यरचना अशी असायची जी तुम्हीआम्ही बोलतो. क्लिष्टता नव्हती, त्यात कुठलाही आव नव्हता. त्यामुळे ते सगळ्यांना आपलंसं वाटायचं. आता असं झालं आहे की, आता हे काम करणारी माणसं खूप झाली आहेत. तसेच बघाल तर पुलंच्या व्हिडीओ किंवा ऑडिओ क्लिप ह्या साधारण २०-२५ मिनिटं चालणाऱ्या असत, त्यांचं वाचन तेवढ्या वेळ चालायचं. आता आपण तितक्या वेळेच्या क्लिप पाहू की नाही ह्याची शंका आहे. आपल्याला आता एक ते दीड मिनिटांत जे काय मिळतं ते आपण पाहतो, नाही तर कुठून तरी फार ऐकिवात असलेले व्हिडीओ आपण पाहतो. गुणवत्ता घसरतेय का, हा मुद्दा नाहीये, पण त्यासाठी काय प्रयत्न केले जात आहेत किंवा ह्याकरिता आपण प्रेक्षक म्हणून कसा प्रतिसाद देतो हे खूप महत्त्वाचं आहे.

पुलंसारखा विलक्षण माणूस ५०-६० वर्षांतून एकदा येतं असेल, जो लिहितो, सादर करतो, दिग्दर्शन करतो, पेटी चांगली वाजवतो, तो चांगला वक्ता असतो, दूरदर्शनची स्थापना करतो, अभिनय करतो; एक माणूस एवढं सगळं कसं काय करू शकतो? हे फारच विलक्षण आहे. त्यांच्यानंतर असा कुणी माणूस होईल असं मला तरी वाटत नाही. आपण वाट पाहू, थोडा वेळ देऊ; बघू, असा कुणी माणूस येतोय का.

तुझ्या पुलंविषयीच्या आठवणी काय आहेत?

खरं सांगावं तर माझ्या फारशा आठवणी नाहीत. मी फार लहान असतानाच ते गेले. तोपर्यंत माझं फार वाचन नव्हतं त्यांच्याबद्दल. मी त्यांच्या पश्चातच सगळं वाचलंय, पाहिलंय; त्यामुळे मला खरं तर फार वाईट वाटतं की, ते माझ्या काळात नाही! ते असते तर खूपच मजा आली असती. तेव्हा टीव्हीवर जेवढं बघायला मिळालं तेवढंच.

भा.डि.पा. सुरू केल्यापासून तुम्ही सगळे खूप चर्चेत आहात आणि तुम्ही वेबसीरिजचं माध्यम खूप छान प्रकारे हाताळताय; पण ह्याचा उपयोग प्रत्येक जण योग्य प्रकारे करेलच अस नाही. तर तुला ह्याबद्दल लोकांना काय सांगायला आवडेल?

आता हे एक माध्यम लोकांच्या हाती आलं आहे, ज्यावर तुम्हाला पाहिजे ते तुम्हाला बोलता येईल, जे तुमचं मत आहे ते मांडता येईल, मग ते कौतुक असो वा द्वेष असो. अजूनही आम्ही त्या माध्यमाबद्दल चाचपडतोय, आम्ही अजूनही त्यावर प्रभुत्व मिळवलेलं नाही. आता भाडिपावरसुद्धा पॉला, सारंग, आशीष जे काम करत आहेत ते फारच चांगलं आहे. त्यांनी पुन्हा स्टॅन्ड अप कॉमेडी सुरू केली मराठीमध्ये. तसेच आपल्याकडे सेन्सरचे नियमपण फारच कडक आहेत; पण त्यासोबतच नैतिकतेचा विवाद (मॉरल सेन्सरशिप) सुद्धा आहे. तेव्हा हे एक असं माध्यम आहे ज्यावर तुम्हाला हवं ते तुम्ही लिहू शकता, बोलू शकता, तुमच्या समवयस्कांना जर ते आवडलं तर त्यावर चर्चा होईल, त्याबद्दल बोललं जाईल. त्यामुळेच आपण इतक्या शिव्यासुद्धा वाचतो आजकाल, पण त्यात शिवी आहे म्हणून ती कलाकृती वाईट होते असं अजिबात नाही; पण ती त्या कलाकृतीची गरज आहे का, ह्याचा विचार करायला हवा. जितक्या प्रकारची माणसं आहेत त्यानुसार सोशल मीडियाचा दर्जा ठरणार. त्याकरिता मीडियाला दोष देण्यापेक्षा माणसांचा दर्जा सुधारण्यावर भर दिला पाहिजे.

बरेचदा आम्ही पाहतो की, लोक खूप वाईट शब्दांत तुमच्या कलाकृतीबद्दल, तुमच्याबद्दल बोलतात (ट्रोलिंग), ते तुम्ही कसं हाताळता?

आम्ही त्या टिप्पण्या वाचणं सोडून दिलं आहे, कारण आपला एकंदरीत स्वभाव असा असतो की, आपण चांगलं बोललं गेलं त्याकडे दुर्लक्ष करतो आणि वाईट बोललेल्याकडे जास्त लक्ष देतो. चांगल्या १०० कॉमेंट्स असतील आणि ७ वाईट असतील तर त्या ७ वाईट कॉमेंट्सकडे माझं जास्त लक्ष जातं आणि त्याचा त्रासही मलाच होणार. म्हणजे काम करायचं, मेहनत घ्यायची आणि एखाद्यानी अशी कॉमेंट् देऊन मला त्याचाच त्रास व्हायचा! शेवटी त्या माणसाची अभिरुची मी बदलू शकत नाही, त्यामुळे मी सहसा दुर्लक्ष करतो.

तुला नॅशनल ॲवॉर्ड प्राप्त झाला, त्या वेळी तुझ्याशी बोलणं झालं असता तू अगदी साधेपणाने आणि सहजतेने त्याबद्दल बोललास, तर इतकं मोठं यश प्राप्त करूनही तू अजूनही तितकाच विनम्रतेने बोलतोयस, तर हे कसं?

खरं तर हा पूर्णपणे संस्कारांचा आणि स्वभावाचा भाग असतो. आपण एका अशा देशात राहतोय, जिथे अजूनही आपण एक राजेशाही पद्धत बाळगतो. एखादा जर नामांकित अभिनेता असेल तर त्याच्या मुलांना आपोआपच प्रसिद्धी प्राप्त होते; जसे तैमूर अली खानकडे सध्या प्रसारमाध्यमांचे लक्ष आहे; पण आपण सगळे मध्यमवर्गीय परिवारातून आलोय आणि आपण ते तथ्य अनुभवलंय. त्यामुळे आपली मुळं अजूनही खोलवर रुजलेली आहेत.

धन्यवाद तू आम्हाला इतका वेळ दिलास. ही मुलाखत किंवा मी म्हणेल चर्चा, फारच छान रंगली. तुझ्या पुढील कारकीर्दीकरिता नेदरलँड्स मराठी मंडळातर्फे तुला हार्दिक शुभेच्छा!

– एन.एम.एम. टीम

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे भटक्या-विमुक्त समाजाच्या पुनर्वसनासह अनेक प्रकारचं समाजकार्य गेली अनेक वर्षं अहोरात्रपणे करत आहेत. सध्या स्वित्झर्लंडमध्ये असलेल्या आणि मराठी साहित्याची आवड असलेल्या आरती आवटी यांनी गिरीश प्रभुणे यांच्या संघर्षमय वाटचालीबद्दल जाणून घेण्यासाठी सुमारे १० वर्षांपूर्वी त्यांची पुण्यात प्रदीर्घ मुलाखत घेतली होती. आतापर्यंत अप्रकाशित असलेली ही मुलाखत म्हणजे खूप महत्त्वाचा सामाजिक, सांस्कृतिक दस्तऐवज आहे. त्यांच्या कार्याची सविस्तर ओळख घडविणारी ही मुलाखत 'बाइट्स ऑफ इंडिया'वर दहा भागांत प्रसिद्ध झाली. त्यातील काही भाग 'रश्मिन'च्या वाचकांसाठी प्रकाशित करत आहोत.

भटक्या-विमुक्तांच्या पुनर्वसनासाठी अखंड कार्यरत असलेले ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. गिरीश प्रभुणे

गिरीश प्रभुणे म्हणजे पारध्यांचे 'परभुणे' काका असं समीकरण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात रूढ झालेलं आहे; पण त्यापूर्वीही तुम्ही सामाजिक क्षेत्रात कार्यरत होतात, त्या वाटचालीबद्दल सांगा.

गिरीश प्रभुणे : पारधी समाजातल्या कामाच्या आधी मी दोन प्रकारच्या कामांत होतो. पुण्यात 'ग्रामायण' नावाची एक संस्था काम करायची. १९७२ ला जो दुष्काळ पडला, त्या दुष्काळी परिस्थितीत खेड्यातून शहराकडे, पुण्या-मुंबईकडे माणसांचे लोंढे यायला लागले. 'माणूस'चे संपादक श्री. ग. माजगांवकर आणि पुण्यातील गोखले अर्थशास्त्र संस्थेत असलेले व्ही. डी. देशपांडे, प्रामुख्याने या दोघांनी आणि अजून काही जणांनी मिळून दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी ग्रामायण ही संस्था स्थापन केली होती. त्यात वेगवेगळ्या विचारसरणींचे म्हणजे समाजवादी, कम्युनिस्ट लोक होते, काही संघाची मंडळी होती, तर काँग्रेसचे लोकही होते. ग्रामीण भागाचा विकास कशा पद्धतीने करावा याची थोडीशी मांडणी त्यांनी त्या वेळी केली. त्यातून काही दुष्काळी भाग निवडला. पुणे जिल्ह्याच्या शिरूर, दौंड अशा तीन-चार तालुक्यांतून सर्व्हे केला. मी त्या वेळेला संघाचा प्रचारक म्हणून थांबलो होतो आणि चिंचवडला स्थायिक झालो होतो. 'असिधारा' नावाचे एक साप्ताहिक मी त्या वेळेला चालवत होतो. सगळ्या नवीन घडामोडी घडत होत्या, जयप्रकाश नारायणांची चळवळ सुरू होती. त्या सगळ्या वातावरणामध्ये काही तरी केलं पाहिजे असं वाटत होतं; पण काय केलं पाहिजे याची दिशा ठरली नव्हती. माजगावकरांच्या संपर्कात आल्यानंतर माजगावकरांनी 'ग्रामायण'चं सगळं काम सांगितलं आणि एकदम वेगळं विश्व लक्षात आलं. खेड्यापाड्यांमध्ये रोजगार नाही, पाणी नाही, उद्योग नाही. त्यामुळे सगळं सोडून म्हणजे अनेक पिढ्या ज्या ठिकाणी राहिल्या, ते गाव सोडून लोक चालले आहेत. गावंच्या गावं उठून शहराकडे यायला लागलेली आहेत. त्या ठिकाणी काही तरी करणं गरजेचं आहे हे लक्षात आलं. जे मुंबईला गेले होते, त्यांच्यामध्ये राहून त्यांना पुन्हा गावी आणणं, असा एक चळवळीचा भाग होता. काही ठिकाणी बंधारे बांधणं, काही ठिकाणी पाणलोट विकासाची कामं, तर काही ठिकाणी वनीकरण, अशा १०-१२ विषयांवर कामं करायची होती. या सगळ्याच्या जोडीला अजून एक महत्त्वाचा विषय होता, तो म्हणजे महिला वर्ग. मजूर म्हणून काम करणाऱ्या, तसेच परित्यक्ता महिलाही त्यात होत्या. असे हे सगळे विषय घेऊन 'ग्रामायण'च्या कामाला सुरुवात



झाली आणि मी त्यांच्यात सहभागी झालो.

गावात राहण्याचा अनुभव कसा होता?

गिरीश प्रभुणे : निमगाव नावाच्या एका गावामध्ये मी जवळजवळ दहा वर्षं राहिलो. गाव सोडून मुंबईला गेलेल्या सगळ्या दलितांना परत आणण्याची ती योजना होती. मी त्या कामात सहभागी झालो आणि माझ्या असं लक्षात आलं, की आपण आतापर्यंत जे जीवन जगलो, जे काम आतापर्यंत केलं, त्या संपूर्ण अनुभवापेक्षा या लोकांचं जीवन वेगळं आहे. १००-१०० एकर जमिनी आहेत, विहिरी आहेत, पाणी आहे. तरीसुद्धा त्या पाण्याचे नियोजन नाही. जमीन आहे, मग त्या जमिनीत काय लावलं पाहिजे, यासाठी गेल्या ५०-१०० वर्षांत कुणीही शेतकऱ्यांना प्रशिक्षित केलेलं नाही. सरकारं आहेत, अनेक योजना जाहीर झालेल्या आहेत, ग्रामपंचायतींच्या योजनांचा तर पाऊस पडतो; पण त्यातलं काहीही खेड्यांमध्ये पोहोचत नाही/राहत नाही. म्हणूनच गावपातळीवर नियोजन करणं आवश्यक आहे. जे गाव सोडून गेलेत, त्यांच्याविषयी कुणाकडे नोंद नाही. का गेलेत, का आलेत, कुठे राहतात, कसे राहतात, काही माहिती नाही. जे मुंबईत जाऊन राहतात, त्यांच्यामध्ये मी स्वतः सहा महिने जाऊन राहिलो. झोपडपट्टीमध्ये घराघरांत समुद्राचं पाणी शिरायचं, सगळी घाण घरात यायची. झोपडी म्हणजे रेल्वेतील 'थ्री-टायर'प्रमाणे असायची. उभ्याने स्वयंपाक करायचे. दिवसातले पाच-सहा तास पाणी घरात असायचं, घाण यायची; पण लोक त्याच्यातही जीवनातले ताणतणाव, आनंद, जे काय आहे ते त्यातच सगळं साजरं करायचे. मुलं शाळेत जात नसत. मुंबईला मुंबई विद्यापीठाच्या जवळ काही झोपड्या आहेत. त्या झोपड्यांमध्ये जी मुलं राहतात, ती शाळेत जातच नाहीत.

म्हणजे एकीकडे जगातले ज्ञान देणाऱ्या संस्था आहेत आणि तिथेच अंगठासुद्धा उठवायचा हे कळत नाही, अशी नवीन पिढी तयार होत होती. अशा सगळ्यांना मी परत गावात आणलं आणि पुढच्या दहा वर्षांत पुन्हा एकदा नव्याने नव्या रचनेचा अभ्यास होत गेला. काम करताना खूप काही नवीन शिकलो, नवीन गोष्टी लक्षात आल्या. मी नेहमी हे उदाहरण देतो. गावात बंधारा बांधायचा ठरला होता. तज्ज्ञ मंडळी असं समजायची, की खेड्यातल्या लोकांना काही कळतच नाही, खेड्यातल्या लोकांना काही ज्ञान नाही. म्हणून पाऊस किती पडतो, एका दिवसांत पाऊस किती पडला तर हा बंधारा किती भरेल, अशी सगळी माहिती घेऊन शहरातून मंडळी आली; पण प्रत्यक्षात ज्या दिवशी बंधारा बांधायला सुरुवात केली, त्या दिवशी एक गावकरी आला आणि म्हणाला, 'इथे बंधारा बांधू नका, तो वाहून जाईल.'

आमच्याबरोबर असणारे इंजिनीअर त्यांना म्हणाले, 'असं कसं शक्य आहे? आम्ही सगळा अभ्यास केलेला आहे. हा बंधारा वाहून जाऊ शकत नाही. तुम्हाला काय कळतंय? आम्ही तज्ज्ञ आहोत!' मी थोडासा तटस्थ राहून त्या सर्वांचं निरीक्षण करत होतो, कारण मी इंजिनीअरही नव्हतो, की खेड्यातूनही आलेलो नव्हतो. त्यामुळे ते सांगतात ते, की हे सांगतात ते, नेमकं बरोबर काय, हे काही कळत नव्हतं. चार महिन्यांनी तो बंधारा उभा राहिला. दहा वर्षं न पडलेला पाऊस त्या वर्षी पडला, तोही दोन दिवसांत म्हणजे २४ तासांत पडला. २४ तासांत बंधारा भरला आणि सर्व गाव, आम्हीसुद्धा, फोटोबिटो काढण्यासाठी तिथे जमलो. आमच्या डोळ्यासमोर तो बंधारा वाहून गेला. लक्षात असं आलं, की ज्या लोकांनी श्रम केले होते, तो बंधारा बांधला होता, त्या लोकांना आनंद झाला. म्हणजे त्यांनी दहा-पंधरा वर्षांनी एवढं पाणी पाहिलं, ते वाहून गेल्याचा आनंद का झाला? माझ्यासमोर प्रश्न आला. पुन्हा एकदा तटस्थपणे विचार करताना असं लक्षात आलं, की यांना एवढा आनंद का झाला, तर 'आपण जे सांगत होतो ते ऐकलं नाही. बंधारा वाहून गेला आणि आम्ही सांगितलं ते कसं खरं आहे' या भावनेने त्यांना आनंद झाला होता. तेव्हापासून ठरवलं, की आपण कुठलंही काम करत असताना, समोरचा सांगेल त्याच्याकडे मूळचं काही असणार आहे. ते काय आहे हे आधी बघावं, त्याला धरून मग आपली बांधणी, उभारणी करावी. पुढची दहा वर्षं त्याप्रमाणेच काम केलं. गावातल्या पहिल्या तीन महिन्यांत जे अनुभव आले त्यातला हा एक अनुभव होता.

गावात पाणी आलं. जिथे टँकर आणून पाणी घ्यावं लागत होतं, तिथे पाणी तर आलं. वॉटरशेड आले, विहिरींनाही पाणी आलं. जी मुलं आमच्याबरोबर मुंबईतून आणली होती, जी तिथे शाळेत जात नव्हती, ती आता गावातल्या शाळेत जायला लागली. सहा-सात वर्षांनी त्यातली काही जणं दहावीला आली. त्यातल्या एका मुलाचे वडील आले. म्हणाले, 'माझा मुलगा दहावी होईल. तुम्ही चिंचवडला राहता. त्याला कुठे तरी नोकरीला लावून द्या.' दहा वर्षांपूर्वी जे संपूर्ण गाव उजाड होतं,

ते सात–आठ वर्षांमध्ये पूर्ण हिरवंगार झालं. पाण्याचे ८–१० बंधारे बारमाही पाण्याचे झाले. विहिरींमध्ये पाणी टिकू लागलं. सगळीकडे उत्तम परिस्थिती झाली. पूर्वी एकदा इथे एक अपघात घडला होता. सहा–सात जण जागेवर मरण पावले होते. त्यांच्या पिंडाला शिवायला कावळा नव्हता गावात. कावळे बसण्याकरिता झाडं लागतात. गावात झाडं नाहीत. शिवारात धान्य असेल, तर पक्षी येतात, तेही नाही. आता ते सगळे पक्षी परतले होते. माणसं परत आली होती; पण गावातल्या व्यवस्थेत जे शिक्षण आहे, त्या शिक्षणामुळे माणसं परत चालली होती. म्हणजे 'मायग्रेशन' थांबलेलं नव्हतं. सर्व गाव सुस्थितीत आलेलं होतं. पाऊस आला, निसर्ग आला, सगळं काही आलं; पण माणसांना तो पैसा नको होता, कष्ट करून मिळणारा. त्यांना नोकरी हवी होती आणि हे जे गावामधलं शिक्षण होतं, ते त्याला पाणलोटापासून, शेतीपासून, गावापासून, घरापासून पुन्हा दूर नेणारं होतं. मग लक्षात आलं,

की आजही परिस्थिती साधारण तशीच आहे. पाणलोटामध्ये पाणी भरपूर आहे, गावामध्ये रस्ते झालेले आहेत; पण गावात राहणारा शिकलेला तरुण नोकरीच्या शोधात शहराकडे जातोच आहे. अशा वेगवेगळ्या समस्या या दहा वर्षांत लक्षात आल्या आणि त्याच्यावर काम केलं. दुसरी समस्या म्हणजे पत्रकार. कुठे अत्याचार झालेले कळले, की हे तिकडे जायचे आणि पेपरला बातमी द्यायचे. मग चळवळ, आठ दिवस आंदोलनं वगैरे व्हायची, पुन्हा आहे तिथेच. मी 'ग्रामायण'मध्ये ज्या क्षेत्रात काम करत होतो, त्यात प्रामुख्याने दलित वर्ग होता.

गावातली सामाजिक स्थिती कशी होती?

गिरीश प्रभुणे : दलित वर्गामध्ये महिला आणि पुरुष अशा दोन घटकांमध्ये काम करत असताना असं लक्षात आलं, की माझी बायको, माझी मुलगी, माझा (शहरातल्या लोकांचा) त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि इथला जो न शिकलेला आहे, त्याचा बघण्याचा दृष्टिकोन यांमध्ये सूक्ष्मपणे पाहिलं, तर फार फरक नाही. मुलाला अधिक प्राधान्य, मुलीला कमी प्राधान्य, शिकायला गेली तर शाळेत जाईल इथपर्यंतच. मग तिला कपडे आहेत की नाहीत बघणार नाहीत. मुलाला बूट वगैरे सगळं देणार, मुलीला काही देणार नाहीत. शिकून काय करायचं आहे, तुझं लग्न करून द्यायचं आहे, परक्याचं धन आहेस. तिच्यावर खर्च कमी. नवरा आजारी पडला, तर तो चटकन दवाखान्यात जायचा. म्हणजे १० किलोमीटर, १५ किलोमीटर लांब जायचा. बायको आजारी पडली तर ती आडवी झाल्याशिवाय ती आजारी आहे हे कळतच नसे आणि पुरुषांना थोडा खोकला आला, तरी लगेचच औषध घ्यायला जाणार. पाणी आणायचं, दळण आणायचं अशा सर्व कामांच्या ठिकाणी बाई. म्हणजे गावात पहाटेचा कोंबडा आरवायच्या आधी बाई उठते. सर्व झोपले की बाई झोपते. त्यांच्यासाठी पाणी, दळण अशा सगळ्या गोष्टी तिने आणलेल्या आहेत. हा काय करतो? काही नाही. आंघोळबिंघोळ करणार, जाणार, चव्हाट्यावर बसणार, कुठे आणखी तालुक्याच्या ठिकाणी जाणार, हेलपाटे घालणार, पैसे कुठून फुकट मिळतात का पाहणार.... अशी सगळी खेड्याची रचना, त्याच्यामध्ये आम्ही नवीन विचार रुजवले. नवीन लागवड, पाणी अडवा, पाणी जिरवा, असं सगळं केलं. तरीसुद्धा सुधारणा नाही. कारण योग्य शिक्षण नव्हतं. शिक्षण त्या गावाशी, गावातल्या समस्यांशी जोडलेलं नव्हतं. एकीकडे या सगळ्यातून मार्ग काढणं चाललं होतं. दुसरीकडे दलित चळवळ. दलितांमध्ये आंबेडकरवादी आणि इतर असे वेगवेगळे गट होते. मग त्यांचा सारखा कुठल्या ना कुठल्या कारणावरून वाद. गावात दळण घेऊन गेले, दळण ठेवलेलं असतं, कुणी तरी आलं, दळण मागे गेलं... यांची लगेच जातीवरून भांडणं. पाणी भरायला गेले, पाण्यावरून भांडणं. एकदा मंदिराच्या पुढे रिकाम्या जागेत बैठक घेतली. शहरातल्या सगळ्या मंदिरांमध्ये सगळ्यांना प्रवेश असतो. त्यामुळे कोण दलित आहे आणि कोण अमुक आहे, हे काही पाहिलं जात नाही; पण इथे मात्र दलित सगळे बाहेर थांबले होते. संपूर्ण गावाच्या विकासात दलित आघाडीवर होते; पण गावातल्या बैठकीत दलित मागे. मी या म्हटले, तर नाही म्हणाले! त्यांनी वरती यायचं नसतं. मग मंदिरप्रवेशाचं लक्षात आलं. गावाचा विकास झाला; पण मानसिक विकासामध्ये गावातला सामाजिक स्तर तसाच राहिला होता. मग आम्ही त्यात सुधारणेसाठी प्रयत्न सुरू केले.

त्याची अंमलबजावणी नेमकी कशी करण्यात आली?

गिरीश प्रभुणे : गावामध्ये 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ झाली होती. ही चळवळ बाबा आढावांनी केली होती. आढावांच्या चळवळीला सर्व जण एकत्र आले, की गावातील सर्वांची बैठक व्हायची. सर्व एकत्र यायचे. गावातला पाणवठा

सर्वांकरिता खुला व्हायचा. आढावांची पदयात्रा पुढे जायची. दुसऱ्या दिवशी विहिरीवरती पाणी भरायला आले, तर त्यांना विरोध व्हायचा. 'एक गाव एक पाणवठा' झालाच नाही. मग सरकारी योजनांमध्ये गावागावांत जिथे जिथे पाणवठे खणता येतील, विहिरी खणता येतील, तिथे खणल्या. दलित वस्तीमध्ये स्वतंत्र विहिरी झाल्या. स्वतंत्र विहिरी झाल्यामुळे त्यांना पाणी मिळालं; पण सवर्णांच्या विहिरीवर म्हणजे गावच्या विहिरीवर येऊन दलित पाणी भरू शकत नव्हते. आजही खूप मोठ्या प्रमाणात असं सर्वत्र आहे. त्याच काळामध्ये आम्ही काही प्रयोग केले. बाबासाहेब आंबेडकरांचं चरित्र दलितांनी वाचलेलंच नव्हतं. दलितांचे 'आंबेडकर जयंती'सारखे जे कार्यक्रम असायचे त्यात सवर्णांना शिव्या, ब्राह्मणांना शिव्या, सगळ्यांना शिव्या असं सगळं चालायचं. बाबासाहेब आंबेडकरांना जाऊन इतकी वर्षं झाली, तरी अजून त्या काळात जी भाषा होती, तीच भाषा होती. म्हणून मग बाबासाहेबांचं चरित्र सांगायचं ठरलं. ते चरित्र सांगता सांगता, अन्य सगळ्या महापुरुषांची चरित्रं त्यांच्यापुढे ठेवायचं ठरलं. विवेकानंदांचं, महात्मा फुलेंचं, हेडगेवारांचं, लोकमान्य टिळकांचं, अशी विविध जणांची चरित्रं त्यांच्यासमोर ठेवून पूर्वी स्थिती कशी होती? आज आहे का? नाही. आज 'एसटी'मध्ये सगळे एकत्र बसतात, हॉटेलात सगळे एकत्र येतात, रेल्वेमध्ये सगळे एकत्र बसतात. एकत्र येण्याबद्दल पूर्वी अत्यंत टोकाची म्हणजे कुणी एकत्र आला तर खून होईल, मारामारी होईल, अशी भूमिका होती. आता तसं राहिलेलं नाही.

अशी वेगवेगळी उदाहरणं देऊन त्या चरित्रवाचनातून त्यांची मानसिकता तयार करणं चालू केलं. जे बौद्ध झालेले आहेत, त्यांना बुद्धवंदना येत नव्हती. पूजा–अर्चा कशी करायची ते माहीत नव्हतं. रोज दारू पिऊन येऊन बसायचे आणि बाबासाहेबांचा जयजयकार करायचे. मग आंबेडकर जयंती कशी साजरी करावी इथपासून ते शेतीतल्या कामापर्यंत असे वेगवेगळे प्रशिक्षण वर्ग घेतले. महिलांना मारणं हे सर्रास असायचं. काठी प्रत्येकाच्या घरात असायचीच. काठीचा उपयोग काय? तर दिवसा शेळ्यांना, गुरांना मारायला आणि रात्री बायकोला मारायला. बायकोला का मारलं जातं? काहीही कारण नाही. एका बैठकीमध्ये आम्ही असे दोन वर्ग घेतले. एक महिलांचा घेतला, एक पुरुषांचा. त्यांना म्हणालो, 'यादी करू आपण. तुम्ही बायकांना का मारता?' तू तुझ्या बायकोला का मारतोस? मुलीला का मारतोस? मग विचारलं, की तुम्ही काय काय कामं करता? तुमच्या आणि तिच्या सगळ्या कामांची यादी. बायकोला का मारता, हे जसं महत्त्वाचं, तसंच तेपण महत्त्वाचं. कामाच्या यादीमध्ये असं लक्षात आलं, की शेतीत नांगर धरायचं काम सोडलं, तर बाकी कुठलंही काम पुरुष करत नाहीत. एवढं एकमेव काम यांच्या नावावर आणि बाकीची शंभर कामांची यादी बायकोच्या नावावर आली. सगळंच

MANASI SAGDEO
EXPATS HOMEO CLINIC
B.H.M.S., M.D. (PG Hom London)

Praktijk Klassieke Homeopathie
111, Jan van Nassaustraat, 2596 BS
The Hague, The Netherlands
info@expatshomeoclinic.com
www.expatshomeoclinic.com
Phone: +31 6 12378250

INDIAN HOMEOPATHIC PHYSICIAN IN DEN HAAG !

- REGISTERED HOMEOPATHIC PRACTITIONER IN THE NETHERLANDS
- TREATMENT COVERED UNDER ALTERNATIVE MEDICAL INSURANCE
- PARENTING AND CHILD CARE CONSULTATION
- GARBHA SANSKAR & PREGNANCY CARE

Visiting Hours	Monday to Friday – 10.00 AM to 05.00 PM
Consultation Fees	First Consultation : € 65 / Follow-up : € 45 Discounted Fees for Students and Sr. Citizens

Book your appointment on www.expatshomeoclinic.com

EXPATS HOMEO CLINIC

बायको करते, तर ती आजारी केव्हा पडते ते पाहिलं आहे का? नाही! आजारी केव्हा पडते? पडतच नाही आजारी. आडवी झाली किंवा बाळंतपण असेल तर बाळंतपणाच्या आदल्या दिवसापर्यंत ती सर्व कामं करत असते आणि मग दोघांच्या पुढे मांडलं सगळं. 'आता ठरवा तुम्हीच, काय केलं पाहिजे. आजपासून बायकोला मारणार नाही?' सगळे गप्प बसले आणि उभे राहिले एकदम. ते म्हणाले, 'असं कसं होईल? बाईची जात आणि कांद्याची पात सारखीच.' कांद्याची पात म्हणजे काय? कांद्याचं वरचं साल काढलं, तर आत परत कांदा असतो, ते काढलं की पुन्हा कांदा असतो. सगळ्यात शेवटी कोंब असतो, त्यातही पुन्हा कोंब असतो, कोंबात कोंब. कांदा हे उदाहरण असं आहे, की आत, आत, आत. बाईचं मन हे कुणालाही समजलेलं नाही. बाईच्या मनामध्ये काय आहे, कुणालाही कळत नाही. त्यामुळे कांद्याची पात आणि बाईची जात. मग म्हणाले, 'तिशी दिवस बाईला मार लागतो. जसं गुराला तिशी दिवस मार लागतो, (तिशी दिवस म्हणजे ३६५ दिवस) मारलं तरच ती चालते.' इतकी टोकाची भूमिका. मग म्हटलं, 'ठीक आहे, तिशी दिवस मार पाहिजे आहे ना, काही तरी कारण घडलं तरच मारायचं. कारण नाही घडलं तर मारायचं नाही. कारण सांगा काही तरी.' असं त्यांना कारणावरती आणलं. शेवटी पुरुषांच्या मीटिंगमध्ये ठरलं, की कारण घडलं तरच मारणार. 'छड्या सगळ्या माझ्याकडे आणून ठेवायच्या. तुला वाटलं आज मारायचं आहे बायकोला, तर माझ्याकडे यायचं, छडी घेऊन जायचं, मग मारायचं.' असं आम्ही जवळजवळ दोन महिने केलं आणि छडी न्यायला यायचे ना ते! कारण काय घडलं? 'बायकोने असं असं केलं.' मग तिला बोलावून आणायचं. इतक्या कौटुंबिक समस्यांपर्यंत शिरल्यानंतर बायकांचा मार थोडाफार कमी झाला.

बायांना आम्ही विचारलं, की तुमचं काय? तर त्यांच्यामध्ये खुरपताना चर्चा ऐकायला यायच्या. चर्चा काय असायच्या... नवीन लग्न होऊन मुलगी आली की, 'नवऱ्याने मारलं का? अरे, मारत नाही बायकोला? म्हणजे बायल्या नवरा आहे,' अशी चर्चा असायची. म्हणजे नवऱ्याने मारलं नाही, तर तो बायल्या आणि म्हणून बायको नवऱ्याला सांगायची, की तुम्ही मला मारलं नाहीत, तर बायल्या म्हणतात तुम्हाला. मला चिडवतात सगळे तुमच्या नावाने. म्हणून तुम्ही मारलं पाहिजे. मग लाडातून मारता मारता तो खरं लाथा-बुक्क्यांनी मारायला लागतो. हे सगळं समजावून सांगणं जिकिरीचं काम आहे. बाईने मार खाल्ला नाही, तर ती बाईची जात कसली? तिनं मार खाल्लाच पाहिजे, अशी मानसिकता. सासू-सुना हा अजून एक प्रश्न. सामाजिक चर्चेतून हळूहळू सगळे मार कमी झाले.

बी, बियाणं, शेती, पाणी यांत गावकरी तज्ज्ञ झाले. गुलाबाच्या वेगळ्या जाती, आंब्याच्या वेगळ्या जाती, बोराच्या वेगळ्या जाती अशा सर्व प्रयोगांत तज्ज्ञ झाले. आंबेडकरांबरोबरच डॉ. हेडगेवार, विवेकानंद असे अनेक महापुरुष त्यांना माहिती झाले. नाही तर त्यांना आंबेडकरांच्या पलीकडे जगामध्ये दुसरं काहीही माहिती नव्हतं. समजायला लागलं त्यांना. जग पाहायला लागले ते. गावामधले वादविवाद सारखे पोलीस स्टेशनला जायचे, ते प्रकार बंद झाले. नवरा-बायकोची भांडणं चव्हाट्यावर यायची बंद झाली. असे अनुभव दहा वर्षांच्या कालावधीत आले. मला लिखाणाचं अंग असल्यामुळे या सगळ्यावर 'माणूस'मध्ये लिहून आणलं. अनेक ठिकाणी जाऊन मांडायचो. पाठिंबा मिळत गेला.

भाग २ : 'माणूस हा सारखं शिकवावं लागणारा प्राणी'

'ग्रामायण'साठी काम करतानाच्या काही अनुभवांबद्दल सांगा. त्यातूनच पुढे 'पारधी' हा विषय कसा सुरू झाला?

गिरीश प्रभुणे : पाणलोटाच्या क्षेत्रात रोप लावलं, बी लावलं, की काही दिवसांत झाड फोफावतं; पण माणसाचं तसं नाही. ज्या झाडाचं बी घेतलं, त्या झाडाला त्याच जातीचं फळ येतं. तितकंच मधुर. माणसाचं वेगळं आहे. याला शिकवलं म्हणजे त्याचा मुलगा आपोआप शिकेल, असं नाही. त्यालाही शिकवावं लागतं. त्याला जन्मापासून सर्व द्यावं लागतं. मनुष्य हा जगातला एकमेव प्राणी असा आहे, की त्याला सतत शिकवावं लागतं. कुत्र्याचं पिल्लू कुत्रा बनतं, सापाचं पिल्लू साप बनतं. म्हणजे प्राण्यांमध्ये आपल्या आई-बापाचे गुणधर्म आहेत. पिल्लांमध्ये आपोआप येतात. माणसामध्ये आई-वडिलांचे गुणधर्म त्याच्या मुलांमध्ये बिलकूल येत नाहीत. ते शिकवले, त्याला संस्कार दिले तरच येतात आणि त्यामुळे हे सतत करण्याचं काम आहे. या पिढीत केलं, तर पुढची पिढी तशी होईल म्हणाल, तर तसं नाही. पुढची पिढी बिघडणार आणि म्हणून शिक्षणाची रचना प्राचीन काळापासून आहे.

नामांतराच्या चळवळीमध्ये जो सगळ्यात महत्त्वाचा घटक होता, बौद्ध मंडळी, वडार मंडळी. मी प्रामुख्याने त्यांच्याच-बरोबर काम करत होतो. त्यांचे पुढारी यायचे, बघायचे आणि मग त्यांना फितवायचे, 'अरे, हे काय? हे पुण्याचे संघवाले आहेत. बामणं आहेत.' कारण आमच्या ग्रुपमध्ये सर्व विचारांचे लोक असले, तरी सुदैवाने म्हणा, की दुर्दैवाने म्हणा, कशानेही म्हणा, समाजवादी, कम्युनिस्ट, संघ आणि काँग्रेस या सगळ्या विचारांतले जे होते, ते एका विशिष्ट जातीतलेच म्हणजे सगळे ब्राह्मणच होते. त्यामुळे कुणीही आला, कुठल्याही विचारांचा आला, तरीसुद्धा त्याला ते 'बामण' समजायचे, 'संघवाला' समजायचे आणि 'जातीयवादी' समजायचे. म्हणजे त्यांना कशातला फरकच कळत नसे. त्यातून त्यांना हळूहळू लक्षात आलं, की हे काम वेगळं आहे. संघ काही तरी वेगळा आहे, हिंदुत्ववाद वेगळा आहे.

म्हणजे आधीच्या जयंत्या, पुण्यतिथ्यांमध्ये सतत शिवीगाळ असायची, ती नंतर कमी झाली. मग तिथे प्रकाश आंबेडकर आले, रामदास आठवले येऊन गेले, शंकरराव खरात येऊन गेले, रा. सु. गवई येऊन गेले, दलितांचे जेवढे पुढारी आहेत, ते सगळे येऊन गेले. निमगाव माडुंगे जल प्रकल्प म्हटलं, की सगळे म्हणायचे 'वेगळं आहे.' सर्व कौतुक करायचे. याचं कारण असं, की बाबा देवलांचा महिसाळचा जो प्रकल्प होता, तिथे त्यांनी हे सर्व 'प्रयोग' केलेले होते.

आम्हाला हे प्रयोग करत असताना सर्वांना सांभाळून घेणं आणि त्याप्रमाणे काम यशस्वी करणं शक्य झालं होतं. या अनुभवातून, त्याच्या आधीची ३०-३५ वर्षं जे शिकलो, त्या काळात आणि शालेय जीवनामध्ये जे शिकायला मिळालं नाही, तेवढं सगळं मला या कालावधीत शिकायला मिळालं. मानवी संबंध, जातीजातींतले संबंध, बी-बियाणं, नियोजन, नियोजनाकरिता काय करावं, इत्यादी इत्यादी. दुष्काळ होतेच. त्या गावामध्ये पाणी भरपूर आलं, पीक चांगलं आलं, तरीसुद्धा लोक तिथं जाताना तलाठ्याला पैसे देणार. सांगणार, की 'नाही नाही आठ आणे लावू नको, चार आणे वारी लाव.' चार आणे वारी लावली की, गावात दुष्काळ आहे हे कळतं, सरकारी योजना मिळतात. म्हणजे खोटी आकडेवारी जमा होऊन नियोजन मंडळाकडे जाते आणि मग प्लॅनिंग होतं. सर्व खेड्यापाड्यांमध्ये आणेवारी लावली जाईल, त्याच्या आधारावर दुष्काळ ठरवला जातो. त्याच्या आधारावर पाण्याचे टँकर, त्या आधारावर कामं, अशी भ्रष्टाचाराची एक साखळी आहे. त्यामुळे आम्ही विकास करत होतो; पण कागदोपत्री तो दिसत नव्हता. दुसरीकडे प्रस्थापित वर्ग, शासकीय सेवेतला आणि गावातला, सगळा जसाच्या तसाच. त्याच्यात बदल करण्याची कुठली यंत्रणा नाही. या सगळ्यांच्यात बदल करायचा असेल, तर पुन्हा मुळातून काही तरी केलं पाहिजे, हा विचार आला.

मग संघाच्या बैठका, समरसता मंचाच्या बैठका, 'ग्रामायण'च्या बैठका, यातून आम्ही ते मांडायचो. हे आपलं काम आहे. जमीन सुधारते, माणसं नाही सुधारत आणि म्हणून जमिनीवर काम केलं, ती हिरवीगार झाली. पाणी अडवलं, पाणी अडलं. राळेगणचा तोच अनुभव. तिथे 'पाणी अडवा, पाणी जिरवा' केलं. गाव, शिवार सगळं हिरवंगार झालं. दुसरी पिढी गावात नाही राहिली. ती शहराकडे गेली. यासाठी काय करणार आपण? त्याला काही उपाय नाही? म्हणून मग शासनाकडे काही मांडणी करणं, शासनानं काही योजना आखणं, असं सगळं सुरू झालं. योजना म्हणजे, मुंबईत सरकारने प्रवेश बंद करावा, शहरात प्रवेश बंद करावा. झोपडपट्ट्यांना नंबर द्यावेत. सध्या जेवढी कुटुंबं आलेली आहेत, त्यात नवीन कुणाला येऊ देऊ नये, असे काही बदल शहरी कायद्यात नव्याने झाले. तरी शहराकडचा ओघ काही थांबला नाही. हळूहळू 'ग्रामायण'ची गरज संपली. शासनानं पाणलोटाचे कार्यक्रम स्वीकारले, शासनानं वनीकरण स्वीकारलं, शासनानं महिला विकासाच्या योजना स्वीकारल्या. महिला हळूहळू ग्रामपंचायतीमध्ये येऊ लागल्या. म्हणजे वीस वर्षांपूर्वीचा खेडेगावातला जो मागासलेपणा होता, तो सुधारला. या सगळ्या पार्श्वभूमीवर त्याच वेळेला सामाजिक समरसता मंचाची स्थापना झालेली होती. समरसता मंचाच्या एका बैठकीत असं ठरलं, की आता आपण अशी कामं करावीत, की दोन जाती, सगळ्या जातीजातींमधील जे भेदभाव आहेत, ते कमी होतील. मग त्यातून भटक्या-विमुक्तांमध्ये काम करावं, असंही ठरलं. मी निमगावला असताना पारधी, वडार, कैकाडी, गोसावी, गोंधळी अशा वेगवेगळ्या जातींमध्ये (प्रामुख्याने बौद्धांव्यतिरिक्त) कामं केली. त्यामुळे मला त्यातला अनुभव होता. माझ्या मांडणीमध्ये, अनुभवातून सांगण्यामध्ये सतत त्या कामाचे उल्लेख यायचे. पोलीस स्टेशन, कायदे अशा सगळ्याची माहिती झाली होती. त्यामुळे असेल कदाचित, हे काम/ही जबाबदारी माझ्याकडे आली आणि मग तो 'पारधी' हा विषय सुरू झाला. म्हणजे भटके विमुक्त विकास परिषदेची स्थापना झाली. भटके विमुक्त विकास परिषदेची स्थापना १९९० साली डॉ. हेडगेवार जन्मशताब्दीच्या निमित्ताने झाली. ती करत असताना एकदम 'पारधी' हा विषय काही आला नव्हता. काही तरी काम करावं, कसं करावं, काय करावं, असा तोपर्यंत थोडासा संभ्रमाचाच विषय होता.

भटके विमुक्त विकास परिषद सुरू करावी, ही कोणाची कल्पना होती?

गिरीश प्रभुणे : संघामध्ये दोन प्रकारची कामं सुरू झाली होती. महिलांची कामं ९० साली सुरू झाली होती. सामाजिक समरसता मंच सुरू होऊन जवळपास सात-आठ वर्षे झाली होती आणि असं लक्षात आलं होतं, की केवळ या कामांनी भागत नाही, तर जो अधिक वंचित घटक आहे, त्यासाठीही वेगळे काम आवश्यक आहे. त्याच वेळेला लक्ष्मण मानेंची चळवळ चालू होती. 'उपरा' प्रसिद्ध झालेलं होतं. 'उचल्या' प्रसिद्ध झालेलं होतं आणि प्रामुख्याने ख्रिश्चनीकरण किंवा इस्लामचं आक्रमण... या मुस्लीम होणाऱ्या जमातींमध्ये भटकणाऱ्यांचं प्रमाण जास्त होतं. तेव्हा म्हटलं, की आपण भटके-विमुक्तांमध्ये काम करावं. इथे तर परिषदेच्या नावापासूनच सुरुवात होती. त्या वेळी दामुअण्णा दाते, दादा इदाते, रमेश पतंगे, नामदेवराव धाडगी, मोहनराव गवंडी अशी मंडळी होती. आम्ही सगळे बसून चर्चा करत होतो, की हे भटक्या विमुक्त जातीजमाती अशा प्रकारचं नाव घ्यावं का? पण भटकी, भटक्या हा शब्दप्रयोगही जरा चुकीचा आहे. कारण मग 'भटकी' म्हणावं, तर भटकी कुत्री असा शब्दप्रयोग तयार

होतो. 'भटक्या' म्हणावं, तर तेही उपेक्षित झालं. मग 'भटके' असं ठरलं.... भटके विमुक्त विकास परिषद. भटक्या जमाती, विमुक्त म्हणजे गुन्हेगार जमाती आणि मग या सगळ्यांचा विकास करायचा, अशा प्रकारे त्याची चर्चा होत गेली. भटके विमुक्त विकास परिषदेची स्थापना झाली. दादा इदाते त्याचे अध्यक्ष होते. मग संपूर्ण महाराष्ट्रातली गावं, ४२ जाती-जमातींमध्ये काम करायचं ठरलं. ते कसं करायचं, त्यांना कुठे शोधायचं याबद्दल चर्चा झाली. मग माझ्याकडे काम दिलं. मला त्यातला जेवढा अनुभव या निमगावचा होता, त्या पुरचुंडीवरती मी ते सुरू केलं. संघटनमंत्री अशी जबाबदारी माझ्याकडे होती; पण संघटनमंत्री म्हणजे काय? अन्य संघटनांमध्ये काही ना काही तरी संघटित समाज असतो. बाकीच्यांना एकत्रित करायचं. इथं जायचं तर हे म्हणणार 'तुम्ही कोण?' माझा पहिला अनुभव असा होता.

मी पुण्यात वेगवेगळ्या व्याख्यानांना जायचो. लक्ष्मण माने एका कार्यक्रमाला पुण्यामध्ये आले होते. तिथे मी जाऊन भेटलो. भटके विमुक्त विकास परिषदेचं असं असं काम माझ्याकडे आहे, असं सांगितलं. म्हणाले, 'नाव काय तुमचं?' म्हटलं, 'गिरीश प्रभुणे.' 'तुम्ही करूच शकत नाही काम.' 'का नाही करू शकत?' तर म्हणाले, 'जातीकरिता माती खावी लागते.' आता मला काही कळेना, जातीकरिता माती का खावी लागते? मातीचा काय संबंध? नंतर आलं लक्षात, माती खाणं किती कठीण आहे ते. ते म्हणाले, 'तुम्ही करणारच नाही, पळून जाल आणि तुम्ही काम करणार म्हणजे काय?' मी म्हटलं, 'मी संघाचा स्वयंसेवक आहे, कामाचा अनुभव आहे.' मग तर म्हणाले, 'बिलकूलच शक्य नाही. जातीयवादी संघटना आहे ती.' त्यांनी खूप निर्भर्त्सना केली आमची. म्हटलं, 'ठीक आहे.' दहा वर्षांनंतर माझी आणि लक्ष्मण मानेंची पुन्हा भेट झाली. त्यांनी लेख लिहिला होता एके ठिकाणी. यमगरवाडीचं काम सुरू झालं होतं. अनेक आंदोलनं झालेली होती. ते ज्या स्तरापर्यंत पोहोचले होते, त्यापेक्षाही किती तरी स्तरापर्यंत आत पोहोचलो होतो आम्ही. त्यांच्या एका कार्यक्रमाला मी गेलो होतो लातूरला. एका उद्यानात मोठी बैठक होती. मी आपला सगळीकडेच जात असतो. त्यामुळे त्याही कार्यक्रमाला गेलो होतो. त्यांनी तिथे जाहीररीत्या उल्लेख केला, 'संघाचे लोक बघा, यमगरवाडीला कसं काम सुरू केलं आहे. आपण ३०-४० वर्षं एक चळवळ करतो; पण आपण एक काम नाही उभं करू शकलो. सरकारच्या मदतीशिवाय त्यांनी केलेलं आहे.' म्हणजे एके काळी जो टीका करत होता, त्यांनी या सर्व कामाचा सन्मानपूर्वक उल्लेख केला होता.

या दहा वर्षांच्या काळात देवदत्त दाभोळकर, प्रभाकर मांडे, असे अनेक जण आले. संघाची, हिंदुत्वाची विरोधक मंडळीही त्या ठिकाणी आली. त्यांनी हे सगळं बघितलं. मला जो अनुभव निमगावला आला, तोच इथं आला. ते म्हणाले, 'हे कसं काय केलंत?' मग त्यांना सांगितलं, हे कसं काय झालं आणि ही मुलं शिकायला का लागली! सरकारी आश्रमशाळा जवळपास २०० आहेत. भटक्या विमुक्तांच्या आणि आदिवासींच्या ३०० ते ४०० आहेत. म्हणजे महाराष्ट्रात अशा किमान ४०० ते ५०० आश्रमशाळा आहेत, की ज्यांना सरकारी अनुदान मिळतं. तरीसुद्धा केवळ चार वर्षांत ३००-३५० मुलं कुठेच नव्हती. एकाच जमातीची, पारधी जमातीची मुलं कुठेच नव्हती. टिकतच नाहीत आणि इथे तर लोक स्वतः आणून सोडत होते. मग त्यांना प्रश्न पडला, की हे काय आहे नेमकं? सुरुवातीला आम्ही सांगायचो, की इथे शाखा आहे संघाची. समितीची शाखा आहे यमगरवाडीला. शिवाय इथं आम्ही प्रातःस्मरण शिकवतो. मग हे प्रातःस्मरण काय? त्यात अगदी प्राचीन काळच्या ऋषी-मुनींपासून, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी अशा ३०० ते ४०० महापुरुषांची नावं आहेत. एवढ्या सगळ्या गोष्टी या कार्यक्रमात आहेत. त्या सगळ्या आम्ही त्यांना समजावून सांगतो. आम्ही फक्त आंबेडकरच सांगतो असं नाही, आम्ही सर्व काही सांगतो. शिवाय त्यांच्यामध्ये जे गुण आहेत.. म्हणजे पळण्याचे, शिकार करण्याचे, उंच उडी मारण्याचे, त्यांचा उपयोग कसा करता येईल, हे पाहतो. हे मारामारी करायला लागले, तर दगड, धोंडे अचूकपणे एकमेकांच्या डोक्यात घालतील. हाही त्यांचा एक गुण आहे. त्याचा उपयोग अन्यत्र करता येईल का, तो कसा करता येईल, त्याचा विचार केला.

आम्ही आमची अभ्यास करण्याची एक पद्धत लावून घेतली. शाळा आहे; पण शाळेशिवायच्या अनेक गोष्टी आम्ही यांना शिकवायचं ठरवलं आणि त्यातून आता ही सगळी विकासाची गंगा आलेली आहे आणि त्यामुळे तुम्हाला जी प्रगती दिसते आहे ती आहे. पारधी कुटुंबच्या कुटुंबं मुलं, महिला आणून इथं सोडतात. आता त्यांना विश्वास वाटायला लागला, की आपली मुलं इथं चांगली सुधारायला लागली आहेत. मग ती दुसरीकडे शाळेत का जात नाहीत? अन्य ठिकाणच्या शाळेत का जात नाहीत? तिथला शिक्षक हा केवळ त्या शाळेपुरता मर्यादित राहतो. इथला शिक्षक हा त्यांच्या पालापालापर्यंत जातो. इथला कार्यकर्ता हा त्यांच्या कोर्टकचेऱ्या, अत्याचार, अन्याय या सगळ्यापर्यंत जातो. त्यामुळे मुलगा, आई-वडील आणि सर्व अत्याचारितांशी ही शाळा, आमचा हा प्रकल्प जोडला गेलेला आहे. या सगळ्या आखणीमुळे, कामामुळे महाराष्ट्रात विविध ठिकाणी या प्रकल्पाचा उल्लेख सर्वदूर व्हायला लागला आहे.

- आरती आवटी

(ही मुलाखत http://www.bytesofindia.com या पॉझिटिव्ह मीडिया पोर्टलवर आधी प्रसिद्ध झाली असून, त्यांच्या सौजन्याने ती येथे प्रकाशित करत आहोत.)



ग. दि. माडगूळकर हे मराठी काव्य आणि गीत परंपरेतील एक महत्त्वाचे नाव! 'गीतरामायण' आणि 'गीतगोपाल' या गीतकथा, शेकडो चित्रपटांसाठी लिहिलेली हजारो चित्रपटगीते, भावगीते, भक्तिगीते, लावण्या, पोवाडे, देशभक्तिपर गीतांचा खजिना म्हणजे गदिमांनी मराठी साहित्याला दिलेली अमूल्य देणगी. गदिमांच्या काव्यगंगेतील सर्वात मोठा प्रवाह म्हणून ज्याचे वर्णन करता येईल तो म्हणजे 'गीतरामायण' या लोकप्रिय अशा अलौकिक गीतकाव्याचा.

कविराज 'गदिमा'

ज्ञानियाचा वा तुक्याचा, तोच माझा वंश आहे ।
माझिया रक्तांत काही ईश्वराचा अंश आहे ।।

असा स्वतःविषयीचा सार्थ अभिमान आपल्या दोन ओळींच्या कवितेतून व्यक्त करणाऱ्या कविश्रेष्ठ गदिमांचे म्हणजेच ग. दि. माडगूळकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष!

गेली अनेक दशके श्रोत्यांच्या, रसिकांच्या मनामनांवर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांच्या विपुल काव्यसंपदेचा धावता आढावा घेणे हा एक अतिशय अवघड वाटत असला तरी आनंददायक अनुभव आहे.

ग. दि. माडगूळकर हे मराठी काव्य आणि गीत परंपरेतील एक महत्त्वाचे नाव! 'गीतरामायण' आणि 'गीतगोपाल' या गीतकथा, शेकडो चित्रपटांसाठी लिहिलेली हजारो चित्रपटगीते, भावगीते, भक्तिगीते, लावण्या, पोवाडे, देशभक्तिपर गीतांचा खजिना म्हणजे गदिमांनी मराठी साहित्याला दिलेली अमूल्य देणगी.

गदिमांच्या काव्यगंगेतील सर्वात मोठा प्रवाह म्हणून ज्याचे वर्णन करता येईल तो म्हणजे 'गीतरामायण' या लोकप्रिय अशा अलौकिक गीतकाव्याचा.

गदिमा आणि गीतरामायण जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणता येतील. पन्नास वर्षे लोटून गेली तरी अजूनही जनमानसावर त्याची मोहिनी टिकून आहे. आजही तीन पिढ्यांना संमोहित करण्याची किमया गीतरामायणात आहे.

गीतरामायणाची रचना करीत असताना गदिमांनी वाल्मीकींची रामकथा आदर्श मानलेली होती. कुश-लवच्या मुखी असणाऱ्या गीतांतून त्यांनी ते उद्‌धृत केले आहे.

'वाल्मीकींच्या भाव मनीचे'

कधी कधी त्यातील तपशील घेऊन गदिमांनी स्वतःच्या प्रतिभेने एक वेगळा नवाच प्रसंग रंगविला आहे. गीतरामायणातील निम्म्याहून अधिक गीते वाल्मीकी रामायण जिथे बोलत नाही तिथे गाताना दिसते. वाल्मीकींच्या रामायणातील अव्यक्त जागा अचूक हेरून त्यात गदिमांनी आपले शब्द पेरले आहेत.

गीतरामायणाचा प्रारंभ
'स्वये श्री रामप्रभू ऐकती,
कुश-लव रामायण गाती'

असे लिहून गदिमांनी त्या प्रसंगातील नाट्य नेमकेपणाने हेरून पुनर्भेटीचा महोत्सव रंगविला आहे. आपण पितापुत्र आहोत हे उभयतांनाही ठाऊक नसणे हे नियतीचे करुणनाट्य गदिमांनी उत्कटपणे रेखाटले आहे. या पहिल्या गीतातच रामायणाची भव्यता, भावोत्कटता, कोमलता, कारुण्य, श्रीरामाची अलौकिक प्रतिमा, रामकथेचा आविष्कार या सर्वांचेच दर्शन घडविले आहे.

यातील एक एक गीत रसिकांना, श्रोत्यांना मंतरलेल्या स्थितीत नेते. 'उगा का काळीज माझो उले' या गीतात कौसल्येच्या पुत्रवात्सल्याने तृषार्त झालेल्या मनीचे दुःख आहे, तर 'सावळा गं

रामचंद्र' हे गीत कौसल्येच्या वात्सल्यमूर्तीचे कृतार्थ भाव व्यक्त करणारे आहे.

'आकाशाशी जडले नाते' या सीता स्वयंवराच्या प्रसंगाच्या गीतात सीतेच्या मनाची अवस्था, उत्कंठा, भयभीतता, साशंकता, आनंद अशा अनेक भावभावनांचे दर्शन अतिशय सुंदर घडविले आहे.

गीतरामायणातील प्रत्येक गीत स्वतंत्रपणे आस्वाद्य तर झाले आहेच, त्याचबरोबर या सर्व गीतांची परस्परांशी अंतर्गत सुसंगतीही आहे. यात पौराणिक कथेचे अलौकिक रूप कायम ठेवले आहेच, याशिवाय त्यातील पात्रांना मानवी भावभावनांचा स्पर्शही दिला आहे. जसे कौसल्येच्या पुत्रवियोगाचे दुःख, लक्ष्मणाचा राग, जोश, आवेश 'रामाविण राज्यपदी कोंण बैसतो?' अशा शब्दांतून व्यक्त झाला आहे. भरताने एका गीतातून आपल्या आईवरचा राग, तर दुसऱ्या गीतात रामभक्ती व्यक्त केली आहे. हनुमंताच्या मुखी असणाऱ्या गीतातून रामभक्तीचे दर्शन घडविले आहे. श्रीराम जन्माचे गीत, श्रीराम वनी जात असताना प्रजाननांना झालेले अनिवार दुःख यांसारख्या समूहगीतातून 'नकोस नौके परत फिरू ग, नकोस गंगे कर भरू' या नावाड्यांच्या समूहगीतांतून गदिमांनी समूहमनाची सुख-दुःखाची लय नेमकी अचूक व्यक्त केली आहे.

सात्त्विक आणि उदात्त भावांचे दर्शन गीतरामायणात ठायी ठायी होते. 'पराधीन आहे जगती' या गीतामधून सात्त्विकतेचे दर्शन होते. त्यातील सुभाषितवजा ओळींनी या गीताला अमरच केले आहे. 'वियोगार्थ मीलन होते नेम हा जगाचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' यासारख्या ओळींबरोबरच क्षणिक संगतीचा दृष्टान्त देताना गदिमांनी-

'दोन ओंडक्यांची होते सागरात भेट
एक लाट तोडी दोघां पुन्हा नाही गांठ'

असा माणसांचा क्षणिक मेळ दाखवून एक त्रिकालाबाधित सत्यच सांगितले आहे.

गीतरामायणातील गीतांमध्ये व्यक्तिगीते, समूहगीते, संवादगीते, नाट्यात्मक गीते, वीरश्रीयुक्त गीते, भक्तिगीते, कथनपरगीते अशा आशयानुसार, प्रसंगानुसार गीत प्रकार स्वीकारला आहे.

गीतरामायणातील गीतांमधून प्रसंगाला साजेशा रसांचा आविष्कार केल्याचे दिसते. वीररस, करुणरस, शृंगाररस यांची अभिव्यक्ती नेमकेपणाने केली आहे. हनुमंताने केलेले लंकादहन, राम-रावण युद्ध, त्राटिकावध यामधून वीररसाचे चित्रण उत्तम रीतीने साधले आहे. शृंगाररसाच्या विविध छटा काही गीतांमधून रंगविल्या आहेत. सीतास्वयंवराच्या वेळी मुग्ध, लाजऱ्या सीतेचे भावचित्रण, लज्जाशील, विनम्र जानकीचे केलेले वर्णन, तर शूर्पणखेच्या गीतांतून शृंगारभाव आला आहे.

करुणरसाचे चित्रण अधिक उत्कटता निर्माण करीत असल्याचे गीतरामायणात दिसते. 'बोलले इतुके मज श्रीराम', 'दाटला चोहिकडे अंधार', 'मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे' अशा गीतांतून याचा वारंवार प्रत्यय येतो.

संपूर्ण गीतरामायणाचा साकल्याने विचार करता त्यातून श्रीरामांची विविध रूपे डोळ्यांसमोर उभी राहतात. निसर्गप्रेमी, तत्त्ववेत्ते, विचारी, कुलाभिमान बाळगणारे, उदात्त वृत्तीचे, उदार अंतःकरणाचे, सीतेवर अपार प्रेम करणारे, धर्माचे पालन करणारे, युद्धनिपुण, पराक्रमी, उपभोगशून्य वृत्तीचे श्रीराम आपल्या अंतःकरणावर ठसतात.

अवघे गीतरामायण चित्रमयशैलीने विणलेले आहे. चित्रपट क्षेत्रातील दिग्दर्शनाच्या अनुभवामुळे रामायण श्रोत्यांच्या मनःपटलावर जणू काही घडते आहे अशा परिणामकारकतेने रंगविले आहे.

शतकानुशतके लोकमानसात मुरलेल्या श्रीरामकथेचे रंग घेऊन साकारलेल्या गीतरामायणामुळे गदिमांना कवी म्हणून काव्यकीर्ती, मोठेपणा मिळवून दिला हे निःसंशय आहे. गदिमांनी निर्मिलेल्या या गीतकथेचे स्थान पूर्णपणे अद्वितीय आहे हे निश्चित.

गीतरामायणाच्या अभूतपूर्व यशानंतर गदिमांनी त्याच धर्तीवर श्रीकृष्णकथेवर आधारित 'गीतगोपाल' ही गीतकथा रसिकांना सादर केली. श्रीकृष्णाच्या जन्मापासून मधुरागमनापर्यंतचा कथाभाग यात गुंफला आहे.

'गीतगोपाल' ही श्रोत्यांच्या मनःपटलावर चित्रित परिणाम साधणारी एक चित्रकथाच आहे. कृष्णराधेच्या भावजीवनाची अभिव्यक्ती असून राधेच्या अंतरीची व्यथा यामधून कथारूपाने आली आहे.

गीतरामायणाएवढाच दर्जा असूनही 'गीतगोपाल' लोकप्रियतेत किंचित उणे ठरते. या दोन गीत-कथांबरोबरीनेच गदिमांची कविता विविध अंगांनी बहरून आलेली दिसते. त्यांच्या गीतरचनांमध्ये विपुलतेबरोबरच वैविध्यताही आहे. ओवी, अभंग, लावणी, पोवाडा, सवालजबाब यांसारख्या अस्सल मराठी छंदात्मक रचना जशा त्यांनी केल्या तशीच आधुनिक पद्धतीची भावगीतेही रचली. तसेच बालगीते, ग्रामीण गीते, शास्त्रीय रागदारीवर आधारित ठुमरीवजा बैठकीची गीते, भूपाळ्या, संघगीते, अंगाईगीते हे रचना प्रकारही लीलया हाताळले आहेत.

मराठी चित्रपटसृष्टीत वग, सवालजबाब गदिमांनीच आणले. लावणीलाही प्रतिष्ठा दिली. गदिमांना चित्रपटसृष्टीतील गीतलेखक, गीतकार म्हणून खूपच श्रेष्ठ स्थान आहे. गदिमांच्या रचनांबाबत शांता शेळके यांनी म्हटले आहे. 'चित्रपटगीत रचनेचा मानदंड ठरावा अशी त्यांची गीते आहेत.'

गदिमांची चित्रपटगीते ही केवळ रचना नसून त्या गीतांच्या केंद्रस्थानी लोकमन आहे. आपल्या सांस्कृतिक जीवनातून ती उमलली आहेत. भारतीय संस्कृतीच्या संकेतांना मानणारी आहे.

चल ग सये वारूळाला वारूळाला वारूळाला गं!
नागोबाला पूजायाला पूजायाला पूजायाला गं!

'जिवाचा सखा' चित्रपटातील या गीतात जुन्या प्रतिमांचा त्यांनी अर्थपूर्ण उपयोग करून घेतला आहे. लोकसंस्कृतीतील स्त्रीगीताची लय साधली आहे.

'वनांत सांग कानात आपुले नाते'
'मी भल्या पहाटे येते'

यासारख्या गीतांत अनुप्रास आणि ताल यांचे एक उल्हसित रूप व्यक्त होते.

घनश्याम नयनी आला।
सखे, मी काजळ घालू कशाला?

या गीतात मेघांची आर्द्रता, काळसरपणा, जणू काजळ होऊन डोळ्यांत अलगद उतरते.

'जगाच्या पाठीवर' चित्रपटातील गीतात जीवनाच्या तीन अवस्था गदिमांनी केवळ आपल्या चमकदार कल्पनेच्या साह्याने तीनच ओळींतून मांडल्या आहेत.

मुकी अंगडी बालपणीची
रंगित वसने तारुण्याची
जीर्ण शाल मग उरे शेवटी, लेणे वार्धक्याचे ।

या गीतात लयबरोबरच आशय अधिक गडद आणि भारून टाकल्यासारखा वाटतो.

लोकमानसामध्ये रुजलेल्या अध्यात्मप्रवणतेचा गदिमांनी मोठ्या कौशल्याने उपयोग केलेला दिसतो. त्यांच्या गीतांत अनेकदा उमटणारा अध्यात्माचा सूर आणि आध्यात्मिक आशय हा श्रोता, प्रेक्षक श्रद्धाळू असो वा नास्तिक, त्यांच्या मनाला हुरहुर लावून जातो.

'एकवार पंखवरूनी फिरो तुझा हात ।
शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात ।।'

'वरदक्षिणा' या चित्रपटातील लोकप्रिय गीतात देवाच्या भेटीसाठी असलेली भक्ताच्या मनाची आर्त ओढ आणि त्याच्या हृदयातील तळमळ दिसते, तर–

मलिनपणे कैसा येऊ, तुझ्या मंदिरात ।

या ओळीने त्या भक्ताचे भावतरल मनही आपल्याला कळते.

फिरत्या चाकावरती देसी मातीला आकार
विठ्ठला तू वेडा कुंभार ...

या 'प्रपंच' चित्रपटातील गीतांतून माणसाची नियती, अज्ञाताचा अंधार, प्रत्येकाचे वेगळे असलेले दैव हे सारे भाव प्रकट होतात.

प्रीती हे भक्तीचेच एक रूप असते हे तत्त्व मराठी लोकमानसात खोलवर रुजलेले आहे. त्याचा आविष्कार म्हणजे 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटातील नायिक म्हणते–

कधी भक्त का पाहतो ईश्वराला?

आई

आईचा तो हळवा स्पर्श
कधी झाला हे कळलंच नाही
कोमजलेलं हे फूल कधी
फुलत गेलं माहीतही नाही

तिची माया तिचं प्रेम
सारं हळवं असतं
म्हणून तर गाय वासरासाठी
हंबरडा फोडतं

तिला पाहताच मन
समाधानाने प्रसन्न होते
प्रेमाच्या ओंजळीत तिच्या
झोळी माझी भरून जाते

तिच्या डोळ्यात अश्रू
कधी नाही दिसले
कांदा चिरताना मात्र तिने
दुःख सारे पाडले

आईची ही माया
अजबच असते
स्वतःसाठी नाही तर
दुसऱ्यांसाठी तिचं जगणं असतं

तिचे ते प्रेमाचे शब्द मनाच्या
पैठणीत कोरून राहतात
आठवण तिची येता
अश्रूंची फुले होऊन जातात

माया, छाया,
त्याग, प्रेम, कठोरता
हे तिचे आहे सत्त्व
म्हणून तर आईला
साऱ्या जगती आहे महत्त्व

– पल्लवी आदमाने/ताकमोगे
राइजवाईक नेदरलँड
pallaviadmane123@gmail.com

नदी न्याहळी का कधी सागराला?

अशा गीतांच्या उदाहरणावरून म्हणता येते की, गदिमांची काव्यसृष्टी ही मराठी माणसाच्या मनात मुरलेल्या अध्यात्मातून साकार झाली आहे, संपन्न झाली आहे.

गदिमांच्या गीतांचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या गीतांमधून श्रमातूनच परमेश्वराचा शोध घ्यायला लावणारे तत्त्वचिंतन आहे. म्हणून 'संथ वाहते कृष्णामाई' या चित्रपटात ते म्हणतात,

घाम न आता पडो कुणाचा कोठे निष्कारणी
गंगा आली रे अंगणी ।

आणि त्यातून श्रमधर्माची थोरवी सांगतात. 'अन्नपूर्णा' चित्रपटात माणसाच्या दैन्यावर एक साधा सोपा उपाय ते गीतांतून सांगतात.

मज नकोत अश्रू घाम हवा, हा नव्या युगाचा मंत्र नवा ।
मोल श्रमाचे तुला कळू दे । हात मळू दे घाम गळू दे ।।

माणूस सुखी व्हावा, समाधानी व्हावा या इच्छेपोटीच गदिमा अशी गीते लिहीत.

गदिमांच्या चित्रपटगीतांच्या यादीवरून नजर फिरविली तरी एकापेक्षा एक सुंदर, श्रवणीय गीतांची लड उलगडत जाते.

'बाळा जो जो रे', 'मायाबाजार', 'सांगत्ये ऐका', 'पाठलाग', 'मोलकरीण', 'वरदक्षिणा', 'जगाच्या पाठीवर', 'प्रपंच', 'ऊन-पाऊस', 'मधुचंद्र', 'अन्नपूर्णा', 'एकटी', 'मानिनी', 'मुंबईचा जावई', 'सुखाची सावली', 'गंगेत घोडं न्हालं', 'देवबाप्पा', 'जिव्हाळा', 'सुवासिनी' अशा १९६० ते १९८० च्या दशकातील उत्तमोत्तम चित्रपटांतील त्यांची गीते अजरामर, अवीट अशीच आहेत.

'तुझ्या कांतिसम रक्तपताका', 'पूर्व दिशी फडकती', 'त्या तिथे पलीकडे तिकडे माझिया प्रियेचे झोपडे', 'नाविका चल तेथे, 'दरवळते जेथे चांदण', 'डोळ्यांत वाच माझ्या, तू गीत भावनांचे', 'आज कुणी तरी यावे', 'हे चिंचेचे झाड दिसे मज चिनार वृक्षापरी', 'देवा दया तुझी की शुद्ध देवलीला', 'या डोळ्यांची दोन पाखरे फिरतील तुमच्या भवती', 'दैव जाणिले कुणी?', 'नाचनाचुनी अति मी दमले', 'पोटापुरता पसा पाहिजे', 'मज नकोत अश्रु घाम हवा', 'कशी करू स्वागता', 'का रे दुरावा का रे अबोला', 'जिवलगा कधी रे येशील तू?' यांसारखी अनेक असंख्य गीते आजही रसिकांना पुनःपुन्हा ऐकाविशी वाटतात. त्या गीतांची मोहिनी तसूभरही कमी झाली नाही.

'तू सुखी रहा' चित्रपटातील गरीब आईवडिलांच्या मुलाचे एक सुखद कल्पनानाट्य आगगाडीच्या गीतातून गदिमा रंगवितात.

'झुक झुक झुक झुक आगिनगाडी
धुरांच्या रेषा हवेत काढी...'

मामाचा मोठा गाव, तिथली प्रेमळ माणसे, सुगरण मामी, कर्तृत्वमान मामा असे सुंदर कुटुंबचित्र त्यातून रेखाटले आहे. असेच एक कुटुंबचित्र एका संवादगीतातून खूप छान रंगविले आहे.

'आई आणखी बाबा यांतील कोण आवडे अधिक तुला?' या गीतामध्ये बालमनातील गोड संघर्ष चित्रित केला आहे. मुलगा आईची तर मुलगी वडिलांची कैफियत गोड शब्दांत मांडते. 'जिव्हाळा' चित्रपटातील 'या चिमण्यांनो परत फिरा रे घराकडे अपुल्या' हे गीत म्हणजे संध्याकाळच्या वेळी कातर झालेल्या मातेच्या मनातील चिंता अचूक भावभावनांसह व्यक्त करते.

'गंगेत घोडं न्हालं' या चित्रपटातील माता बाळाला दूध पाजताना वात्सल्याचे अद्भुत रंग मिसळून जसे गीत म्हणते, 'हरि थेंब घे रे दुधाचा, चांदण्यांच्या रंगल्याचा गोडवा रे मधाचा.' हॅन्स ॲन्डरसनच्या अग्ली उकलिंग या परिकथेचे जणू गदिमांनी शुद्ध भावगीत तयार केले, ते म्हणजे अतिशय लोकप्रिय बालगीत 'एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख, होते कुरूप वेडे पिल्लू तयांत एक'.

गदिमांची बालगीतेसुद्धा किती सांगावीत! 'गोरी गोरी पान', 'नाच रे मोरा', 'इवल्या इवल्याशा टिकल्या टिकल्यांचे', 'शेपटीवाल्या प्राण्यांची पूर्वी भरली सभा' यांसारखी अनेक गीते झरझर नजरेसमोर येतात.

गदिमांच्या फक्त काव्यसंपदेवर टाकलेला हा एक ओझरता परामर्श आहे. गदिमांची अनेक गीते, चित्रपटगीते, बालगीते, कविता अनेक वर्षे महाराष्ट्रातील घरोघरी पोचलेली आहेत. कवीच्या हयातीतच कालातीत होण्याचे भाग्य त्यांच्या गीतांना लाभले आहे. त्यांच्या गीतांनी आपली अक्षरमुद्रा रसिकांच्या अंतःकरणावर, मनःपटलावर कोरली आहे. जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याचा मान त्यांच्यासारख्या ज्येष्ठ-श्रेष्ठ कवींनाच प्राप्त होतो.

गदिमांच्या लोकप्रियतेचे, रसिकप्रियतेचे गमक म्हणजे त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने नेदरलॅन्डसारख्या जगाच्या एका टोकाला असलेल्या देशात त्यांचे स्मरणरंजन दिवाळी अंकाच्या माध्यमातून केले जात आहे.

मराठी जीवनाच्या वळणावळणांवर माडगूळकरांची गीते झाडाप्रमाणे उभी आहेत, असे शांता शेळके म्हणतात ते सर्वार्थाने खरे आहे.

- डॉ. धनश्री ध. साने
डोंबिवली, भारत
dhananjay.sane@gmail.com

आठवणीतील गीतरामायण’

‘गीतरामायण’ गेली सहा दशके महाराष्ट्र आणि भारतात विविध भाषांतून जनतेच्या मनावर अधिराज्य करणारे आधुनिक वाल्मीकींचे महाकाव्य!

रामायणाच्या घटनांचा प्रत्येक व्यक्तीच्या मनामनांतून आलेल्या विचारांना भावविभोर शब्दवेलीत गुंफून अलौकिक, तरल रागदारीच्या स्वरात फुलविणे हे फक्त गदिमाजी आणि सुधीरजींसारखे गंधर्वच करू शकतात. गदिमांचे शब्द सहज, सुंदर, समर्पक आणि बाबूजींचे श्रवणीय स्वर भावुक पण तितकेच उत्कट, सूक्ष्म भावना प्रकट करणारे. या दोन्हीचा अभूतपूर्व मिलाफ साधला गेला तो फक्त गीतरामायणातच!

मला हे काव्य ऐकण्याची पहिली संधी मिळाली ती माझ्या शाळेत. दर शनिवारी आमचा शारीरिक शिक्षणाचा तास असायचा. शाळेचे प्रांगण खूप मोठे. त्यामुळे या तासाची आम्ही आतुरतेने वाट बघायचो; पण पाऊस असला की सर्वांचा हिरमोड व्हायचा. एके शनिवारी असाच पाऊस पडत होता आणि सरांनी एक नवीन खेळ सुरू केला, ज्या कोणाला आपली कला, प्रतिभा सादर करायची असेल त्यांनी समोर जाऊन सादर करावी. माझा वर्गमित्र कपिल फार छान गाणे म्हणायचा तो पटकन म्हणाला, सर, मला एक गाणे म्हणायचे आहे आणि त्या दिवशी त्याने ‘स्वयंवर झाले सीतेचे’ हे गीतरामायणातील गीत सादर केले. त्याला डफ, लेझीम आणि टाळ्या वाजवून काही मुलांनी साथही केली. बाहेर पडणारा पाऊस, हे गीत यांनी वातावरण भरून गेले आणि ते ऐकताना माझ्याबरोबर सर्व विद्यार्थी माना डोलवत त्या गीतात भान हरपून गेले.

गाणे संपताच मी कपिलला विचारले, इतके सुंदर गाणे कोठून शिकलास तू व हे गाणे कशातले आहे? त्याने सांगितले, हे गाणे त्याचे आजोबा ग्रामोफोन आणि रेडिओवर ऐकायचे. हे गाणे गीतरामायणातील आहे. त्या दिवशी तेच गाणे गुणगुणत मी शाळेतून घरी आलो ते गीतरामायणाची कॅसेट्स मिळवायची या विचारानेच!

मी घरी हट्ट धरला की, मलाही गीतरामायणाच्या कॅसेट्स हव्या आहेत. लगेच वडिलांनी कॅसेट्स आणून दिल्या आणि तेव्हापासून माझ्या मनात गीतरामायणाचे अढळ स्थान निर्माण झाले.

पुढे गीतरामायणाच्या ‘सेतू बांधा रे सागरी’, ‘जय गंगे जय भागीरथी’, ‘स्वये श्री राम प्रभू ऐकती’, ‘त्रिवार जयजयकार रामा’ या गाण्यांवर आम्ही विविध गुणदर्शनांत नृत्यनाट्यही सादर केले. पुढे उच्च शिक्षणासाठी दिल्लीला गेलो. तेथेही न विसरता गीतरामायणाच्या कॅसेट्स सोबत घेऊन गेलो, त्या अगदी नेदरलँड्सपर्यंत माझ्या सोबत राहिल्या. भारतीय संगीत मनःशांती देते, त्यामुळे मला त्याची आवड होतीच. गाव, शहर, राज्य, देश तसेच विदेश कुठेही गेलो तरीही गीतरामायणाची गोडी कमी झाली नाही.

माझ्या मुलीला ही गाणी फार आवडतात. आमच्या घरच्या चार पिढ्यांनी ह्या दैवी काव्याच्या अवीट गोडीचा आस्वाद घेतला नि पुढची पिढीही घेत राहील.

रामनवमीला प्रत्येक मंदिरात ऐकू येणारे, ‘राम जन्मला’ असू दे किंवा लग्नात ‘स्वयंवर झाले सीतेचे’ ही गीते अविभाज्य घटक बनली. ‘पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा’सारखे जीवनाचे सार सांगणारे गीत अजरामर आहे. ‘गा बाळांनो’ श्री रामायणात सांगितल्याप्रमाणे ‘काव्य नसे हा अमृत संचय.’

मला कुणी विचारले की, तू कोणते रामायण वाचलेस, वाल्मीकी की तुलसीदास? तर मी सांगतो की, मी फक्त गदिमांचे गीतरामायण ऐकले आहे.

गदिमांच्या शब्दांत हीच प्रार्थना की,
रामकथा नित वदनें गावी
रामकथा या श्रवणीं यावी
श्रीरामा, मज श्रीरामाविण दुसरा छंद नसावा
जोंवरि हें जग, जोंवरि भाषण
तोंवरि नूतन नित रामायण
सप्त स्वरांनी रामकथेचा स्वाद मला द्यावा

शंतनू आणि शीतल नांदगांवकर
फोरबर्ग, द हेग, नेदरलँड्स
Shantanusiitd@yahoo.co.in

गुरुजी म्हनलं की सबन गावाले वाटते की फार हुशार माणूस; पण तसं काही असते का राज्या? जो तो ज्याच्या त्याच्या जागेवर हुशारच असते. कधी कधी वासरांत लंगडी गाय शायनी असं होत रायते; अन् गुरुजीचा नाई नाई त्या गोष्टीत इन्ट्रेस वाढत जाते. पन आपलं आथरून पाहून पाय पसरा माणसानं. आमच्या सारोकार गुरुजीचीच घ्याना. जवा गावात दवाखाना, दुकानं अन् पायजे तसे वाहनंबी पोहचले नव्हते. फारच मोजक्या लोकाईजोय सायकली, एखांद्या दुसऱ्याजोय मोटार सायकल, चार-पाच गावांत एखांदी जीप, खटल्यातच एखांद टॅक्टर होतं. तवा नीरा ज्यात त्यात आपली शेखी मिरवायची जलमजात खोड गुरुजीले जलमताच चिकटून आली.

गावात गाय, म्हैस अडली की गुरुजी हजर. पोरग्यापासून म्हताऱ्यालोक कोनी बी बिमार पडलं की गुरुजी हजर. एवढंच काय, गावातल्या कोनत्याही इंजनंन आंग टाकलं की गुरुजी हजर. कोनतंही वाहान बिघडलं की गुरुजी हजर. भले त्यात अपेश का येवो ना, पन गुरुजीची सल्ला घ्यायची आदतच पडली गावाले.

एक दिवस गाऱ्या-पान्याचं एकनाथ पाटलासंग चहा घेता-घेता सारोकार गुरुजीन ईचारलंच, पाटील ब्वा, अजून लेक ढोराईच्या बजारात जायचा योग नाई आला!

काय करता जाऊन तठीसा? तुमाले काय पोरं सोडून ढो आवडायले लागले काय गुरुजी?

नाही हो, पन आल्या जन्मी सारं कसं असते? पाहून घ्या मानसानं.

हे बेजाचं झाली गुरुजी तुमची. मी म्हनतो, ज्या वाटीनं जायचंच नाई ते पहाचं कायले लागते पन असं काय घायबऱ्यासारखं हाय त्यात? जायचं एकडाव पाहायले, अन् पाह्यलं का डबल जायचंच तिकडे कायले?

पहा बुवा, तुमाले सांगनं महा काम. आयक्याचं की नाई हे तुमीच ठरवा तुमचं. झालं सारोकार गुरुजी बजारच्या दिवसाची देवासारखी वाट पहायले लागले. गुरुवार उजयला अन् सकाऊनची शाळा करून गुरुजीनं बजारासाठी ३०० रुपये, एक झोरा अन् बजारची यादी संग घेऊन सायकलवर टांग टाकली. पहूरपासून खामगांव दोन मैल अंतर. गुरुजीनं सायकलीनं तहाचं तं पार केलं अन् सायकल सागर कटलरीवर लावून शिदा ढोराईचा बजार गाठला. गेल्या गेल्या बजाराचा रिकामा झोरा खांद्यावर दप्तरासारखा घेऊन बजाराच्या एका चौथऱ्यावर गुरुजी चढले. सारा बजार 'याची देही याची डोया' निरखून पायता पायता गुरुजी तल्लीन झाले. त्यायची लागेल समाधी खांद्यावर पडनाऱ्या एका आपुलकीच्या हातानं भंगली. गुरुजीनं वचकूनच खांद्यावर हात ठेवनाऱ्याले ईचारलं, काहो, काय म्हनता?

बैल

वयखलं काय गुरुजी मले?

नाई ब्वा?

आमी गरीब मानसं, तुमी बापा गुरुजी. तुमी काय वयखसानं गरिबाले?

पन तुमी कोनच्या गावचे?

जाऊ द्या ना गुरुजी ते. चला, आपून चहा घिऊ. काय म्हनते पहुरची शाळा?

गुरुजीले ह्या सवालानं थोडीशी खात्री झाली. एक तं हा ईसम कोनी गाववाल्याचा नात्यातला अशीन, नाई तं आपल्या जुन्या वयखीचा. आपलं तेच ते ईचारनं की तुमी कोन? कुठूल्ले? हे काही बरोबर नाई. ह्या ईचारात असतानाच त्या मानसानं गुरुजीचा हात धरून सरळ चहाची टपरी गाठली. दोन हाफ कडक-मिठी चहाची ऑर्डर देऊन गुरुजीची ईचारपूस केली अन् सरळसोट मुद्द्याले हात घातला.

गुरुजी, एक काम होतं आज तुमच्याशी.

सांगानं ब्वा. काय काम हाय ते?

मले बजारातला एक बैल पायजे. अवंदा ऊस पेरला. पोट्ट्याले एक रसवंती टाकून द्या वाटते. तो लागते त्याच्या पोटा-पान्याले. अवंदा नांगदिवाई झाली का उरकून टाकू त्याचंबी. त्याच्यासाठी कामधंदातं दाखवा लागीन्ना काही तरी?

बरोबर हाये तुमचं. पोरगा कामाले लागल्याशिवाय कोन, कसं पोरगी देईल त्याले?

हो ना. म्हणून आलतो बजारात एक बैल घ्याले.

मंग काय झालं? घेतला काय बैल?

नाही ना. सौदा करता करता त्या मारवाड्याशी ईचकलं मा. आता तो मले बैल देत नाही म्हनते अन् आपल्याले रसवंतीसाठी जसा बैल पायजे तसा अख्ख्या बजारात त्याच्याच जोड हाये.

मंग कसं करता?

तेवढा एक सौदा करून द्या ना आपला. आपल्याले तो ७०० रुपयाले भेटला तरी चालते. पन तो मारवाडी बेज्याचं खडूस हाये. तो म्हनते की दुसऱ्याले फुकटात देईन, पन तुले हजारालेबी नाही देत आता.

मंग मले काय करा लागीन?

डोये बंद करून ७०० रुपयाले सौदा करा. १००-२०० त्याच्या हातावर टेकवून ॲडव्हान्स द्या. मग लिखापढीसाठी मी माया नावावर खरेदी करून घेतोच. एकडाव तुमच्यासंग सौदा झाला, की मंग फसला तो माह्या कचाट्यात.

बरं पन तवर तुमी कुठी थांबता? तुमाले मायासंग पायलं का बुजाडीन ना तो.

बरोबर हाय तुमचं. मी अठीच चहाच्या टपरीवर बसतो तुमचा सौदा होयेलोक.

सारोकार गुरुजीले समाजसेवेची चालून येल संधी सोन्यासारखी वाटायले लागली. गुरुजी मारवाड्याचे ठिकान अन् सारी माहिती घेऊन मोहीम फत्ते करायले निंगले. मारवाड्याला रामराम करून गुरुजीनं बैलाची किंमत ईचारली. तसा मारवाडी बिथरला, कायले पायजे तुमाले बैल? माया जोयचा घेसानं, अन् इकसान कसायाले. मले नाई ईक्याचा बैल तुमाले.

नाही हो शेठजी. मी गुरुजी व्हय ना, असं करीन काय राज्या?

मग तुमाले कायले पायजे हा बैल? तुमी शाळेतल्या पोट्ट्याईले शिकवा, आमाले नका शिकवू. असा डंगरा बैल कसायाशिवाय कोनीच घेत नाई आजकाल.

नाई ना शेठजी, मले रसवंतीसाठी पायजे होता बैल.

हां, एक तं हा रसवंतीले चालते, एक तं कसायाले.

मले तं रसवंतीसाठी पायजे ना.

दारी मरू द्या लागीन हा बैल. रसवंतीचं काम झाल्यावर कसायाले नाई ईका लागनार बैल. पटत असंन त बोला.

कबूल आपल्याले.

बैल पाहून घ्या एकदा डबलं. सौदा झाल्यावर नाई बोलू देनार.

बैल पसंत हाय मले. गुरुजीनं बैल न पायताच होकार देऊन टाकला.

सांगा शेठजी किंमत.

फारच घाई झाली तुमाले तं? काही दगाफटका नाही ना होनार? हा बैल जिवाच्या आत वागोयेल हाय मीनं. पन पोट्टे लेकाचे करत नाहीत आजकाल ढोराईचं. म्हनून ईक्याले आना लागला माहा सर्जा. याच्या पाठचा बैल दीड वरीस झाले मेला. तवापासून हा झुरनी लागला. आता याले एकट्याले काय करता ठेवून. म्हनून पहिल्यांदाच बजार दाखोला. याचे पुरे ९०० रुपये लागतीन.

नाही ना शेठजी, जास्त होतात. जराक कमी कराना.

तुमीच सांगा काय कमी करा अजून? पन तुमी कसायाले ईकनार नाई म्हनता त सांगा तुमची किंमत.

६०० रुपये.

फारच कमी होतात ना हे. ७५० रुपये तरी द्या.

चला ७०० रुपये देतो. मंजूर?

घ्या ब्वा, तुमी घरीचं वागोनार म्हनता, ७०० द्या.

मी पैसे घेऊन आलोच.

ओ गुरुजी, येडं समजता काय मले? आपला सौदा पक्का झाला, काही रीतभात माहीत हाय का नाई तुमाले बजाराची? बोलीचे पैसे ठेवा आंदी.

अरे हां, सध्याचे हे ३०० घ्या, बाकीचे घेऊन येतो मी.

हां, याले म्हनतात सौदा.

गुरुजीनं बजारासाठी घरून आनेल ३०० रुपये शेठजीले देऊन सरळ चहाची टपरी गाठली.

टपरीवर भयान गर्दी, पन जो पायजे तोच दिसत नव्हता. ज्या मानसासाठी गुरुजीनं बैलाचा सौदा केला तो कुठी उपयला तेच ना समजे गुरुजीले. त्याले झाबल्ता झाबल्ता २–३ घंटे गेले. सरा बजार तीन–चारदा पालथा घातला, पन तो काही दिसला नाई.

गुरुजी बेजार होऊन डबल शेठजी जोड गेले. सारं महाभारत शेठजीले सांगतलं. शेठजी रागानं लालबुंद झाला. आतालोक म्या दहा गिराईकं वापस पाठोले तुयासाठी. ३ घंटे झाले वाट पाहून रायलो तुही. हा काय भाजी–बजार वाटला काय तुले? झकं मार्याले आला काय बजारात? चाल्ला मोठा दुसऱ्याचे सौदे करायले. चुपचाप ४०० रुपये टाक अन् बैल घेऊन जाय. नाईतं याद राख. कसा जात पहुरले? तं पायतोच मी. सारोकार गुरुजीनं ४–५ लोकं जमा केले तेबी गुरुजीवरच उलटले. ४०० रुपये दिल्याशिवाय आपली सुटका नाही हे गुरुजीच्या चांगलं ध्यानात आलं. गुरुजीनं सागर कटपीसवर सायकल गहान ठेवून ४५० रुपये आनले. २० रुपयांचा दोर, ३० रुपयांची गवताची पेंडी अन् ४०० रुपये शेठजीच्या हाती टेकवून बैल ताब्यात घेतला.

मग गुरुजीनं आपल्या बैलाकडे निरखून पायलं. बैलाचे दोनही शिंग मुडून लोंबले होते. डोयातून सारखे आसू गयत होते. नाकाभोवती माशाईचा गलका सुरूच होता. आंगावरचं मांस हाडकांशी एकजीव झालं होतं. पोट पाठीच्या दांडाले अन् छातीच्या पिंजऱ्याले घायबरून अंधर लपून बसलं होतं. तोंडातल्या दाताईनं कवाचाच आपला राजीनामा सादर करून स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. आंगावर गोचीड अन् माशा मावत नव्हत्या. शेपूट हालवून माशाईले तरास देन्यासारखी ताकद बैलात उरली नव्हती. साऱ्या आंगावर सुरकुत्या पोराईनं लिखापडी करून भरेल वहीच्या पानासारख्या आंगभर दिसत होत्या.

हा आपला सर्जा २ मैल पायदल पहुरले जाईल की नाही या कायजीतंच गुरूजींनं रिकाम्या दप्तरासारखी बजाराची थैली खांद्यावर अन् त्याच हातात बैलाचा दोर, दुसऱ्या हातानं डोक्यावर गवताची पेंडी सावरत बजारातून वाट काढून जसा बजार वलांडला, तसा मारवाडी कोनाले तरी आवाज देत असल्यानं गुरुजीच थांबले. पायतात तं काय सामने चहाच्या टपरीवर थांबतो म्हनून सांगनाऱ्या माणसानंच गुरुजीले रामराम केला. रामराम गुरुजी. मंगाशी आपला रामराम राहूनच गेलता. कसा काय वाटला बैल?

ओ भयताड्या, त्या गुरुजीले काहून तकलीफ देतं बे आता. देले नं आनून समदे पैसे त्याईनं. हे घे तुये २०० रुपये अन् सोड गुरुजीचा रस्ता. मारवाड्यानं ५०० रुपये खिशात टाकत २०० रुपये त्याच्या हातावर ठेवले. गुरुजी काही बोलनारच तं दोघंही एकमेकाईच्या हातात हात घालून पसार झाले.

आपल्याले बजारात बैल बनवलं, हे अदलोक गुरुजीच्या ध्यानात आलं होतं.

जबरदस्तीनं का होवोना आंगावर पडेल जबाबदारी मोठ्या मनानं आपली समजत अन् डोईवरची गवताची पेंडी, बजारचा रिकामा झोरा, नव्या कोर दोराच्या टोकाले बांधेल डंगरा बैल; हे सारं संभायत गुरुजी पहुरच्या वाटेनं गपगुमान चाल्याले लागले.

– संदीप शामराव गावंडे
खामगाव, बुलढाणा, भारत
sandip.gawande15@gmail.com

पुलकित पुलं

पुलं म्हणजे सदैव बहरलेले फूल होते
उदासीनतेला घालवणारे ते एक जणू मूल होते

त्यांची प्रत्येक कलाकृती म्हणजे महाराष्ट्राची दौलत
मराठी माणसाला कायमच हवी होती त्यांच्या लेखणीची सोबत

पुलंच्या कारकीर्दीत महाराष्ट्र खळखळून हसला होता
त्यांच्याचमुळे कित्येक वर्षे मराठी बाणा बहरला होता

पुलं म्हणजे महाराष्ट्राचे लाडके भाई होते
नकलाकार, लेखक, कवी, कलाकार या पैलूंनी भारलेले
दिलखुलास वक्ते होते

अजूनही महाराष्ट्र त्यांच्या किश्शात हसतो आहे
त्यांच्या पुणेरी टोमण्यात रमतो आहे

पुलंच्या कविता होत्या मराठीचा आत्मा
आणि नाटक–साहित्य होते प्राण

पुलं होते मराठी अस्मितेचे भाग्य
त्यांची पोकळी भरणे कदापिही ना शक्य

– सौ. विद्या शशिकांत पाटील
पुणे, भारत
patil.vidya02@gmail.com

दिशा एक भावनिक व्यक्तिमत्त्व आहे! दिशा एक भाषा आहे! दिशा एक अभिनेत्री आहे! मुलाखतीत बोलतानाची दिशा आणि सिग्नलवर उभी राहून पैसे मागणारी दिशा यांच्या भूमिका, पेहराव जसे वेगळे तशीच त्यांची भाषाही वेगळी – शिवराळ भाषा! आणि आपण जर त्या शिवराळ भाषेवरून दिशाला जज करत असू, तर त्यांची भाषा चांगली व्हावी म्हणून आपण वैयक्तिक किती प्रयत्न केले, हा प्रश्न आपण स्वतःलाच विचारावा, असं दिशा म्हणते! दिशा एक समानतावादी व्यक्तिमत्त्व आहे! दिशाचे विचार ऐकल्यानंतर मनात वणवा पेटल्याखेरीज राहत नाही! बऱ्याचदा 'हिजडे की औलाद' असं शिवी म्हणून बोललं जातं; पण उद्या एखाद्या तृतीयपंथीयाने एक अपत्य दत्तक घेतलं, तर काय बिघडलं?

'ती'
हा सन्मान मिळण्यासाठी धडपड

शब्दवेडी दिशाच ती शब्दवेडी दिशा, असं मी का म्हटलं असावं तिला?

तुम्ही जाणू शकता तिच्या शब्दाला आणि जगू शकता तिच्या अर्थबोध करणाऱ्या वाक्य अन् वाक्याला!

मी सलाम करते दिशाताईच्या लेखणीला. तिला जाणून घ्यायचा योग आला मला तिच्या लेखणीतून. तिच्यातली स्त्री झळकत होती तिच्या बोलण्यातून. आवाजच काय तो तिचा बाईपणा मिरवत नव्हता; पण तिच्या बोलण्यातून स्त्री जीवनच काय ते अंतर्मुख होत होतं. दिशा स्त्रीपरिवर्तनासाठी खरंच धगधगती ज्वाला आहे.

आणि माझ्या हृदयात खोलवर तिच्यासाठी प्रचंड आदर. तिची आणि माझी ओळख झाली ती तिच्या मुलाखतीतून. नाही तर हे दिशा नावाचं महान व्यक्तिमत्त्व मला कधी कळलंच नसतं.

जाणून घ्या दिशा कोण आहे?

दिशा.. ना तिला जात ना धर्म ना आपल्यासारखं विशिष्ट माणूस म्हणून तिला कधी मिरवता आलं. असचं भटक्या–विमुक्त असलेल्या जातीत तिचा जन्म झाला आणि पंधरा सेकंदही लागले नाहीत तिच्या जन्मानंतर कळायला ती कोण आहे?

आपल्याकडे मुलं जन्माला आल्यावर त्याचा चेहरा कसा दिसतो, तो दिसायला कसा आहे हे काहीच न बघता त्याच्या कंबरेखालचा भाग बघितला जातो.

Gender male or female आणि त्याहीपेक्षा वेगळेपण एका अलौकिक शरीररचनेत अडकलेली दिशा. आईबाबांना

ती जन्मतःच डॉक्टरकडून समजली; पण तिच्या आईच्या मातृत्वानेही तिच्या भावनांना ओळखलं नाही. तिचं शिक्षण सर्वसामान्यांसारखं होत गेलं; पण मुलं–मुली तिला चिडवायचे. ती घरी सांगत यायची तर घरचे तिलाच ओरडायचे.

वय वाढत गेलं तसं दिशाच्या आवडीनिवडी बदलू लागल्या. तिला कानातले आवडू लागले. स्त्रियांसारखं नटणं आवडू लागलं; पण घरातून तिच्या अशा वागण्याचा विरोध व्हायला लागला.

पक्या, मक्या, छक्या.. एक ना अनेक नावांची संबोधने तिला घरच्यांकडून लावण्यात आली; सख्ख्या चुलत भावाकडून, आईबाबांकडून. घालमेल होणारच तिच्या मनाची. घुसमट व्हायची दिशाची. तेराव्या वर्षी दिशाने घर सोडले आणि इथूनच सुरुवात झाली तिच्या प्रवासाला.

दिशा हेही नाव तिने स्वतःच दिले स्वतःला.

एका सामाजिक संस्थेच्या नावाची पाटी तिने बघितली– अकरावी दिशा.

अकरावी दिशा कशी काय?

दिशा तर दहाच असतात ना?

अकरावी दिशा ही परिवर्तनाची वाट आहे!

परिवर्तनवादी आहे. ते नाव दिशाने स्वतःला जोडून घेतले.

दिशा बसमधला प्रसंग सांगते. जेव्हा ती बसमध्ये प्रवास करते तेव्हा एखादी स्त्री तिच्या जवळ येऊन बसते आणि जेव्हा ती तिकीट काढायला आपला हात टीसी मास्टरसमोर करून आवाज देते तेव्हा तिचा पुरुषी आवाज ऐकून ती बाजूला बसलेली स्त्री तिथून उठून दुसऱ्या सीटवर जाऊन बसते. कविता लिहिणारे दिशाचे हात जेव्हा आठवडी बाजारात जाऊन टाळ्या वाजवतात तेव्हा तिला कसं वाटतं?

कधी कधी अतिशय वाईट प्रसंगाचा तिला सामना करावा लागतो. हातात पैसे ठेवताना पुरुषी अहंकार तिच्या हाताच्या तळव्यांना घासतो, रगडतो, तर कधी बाजारातून जाताना वेगवेगळे आवाज देऊन बोलावतो; पण ह्याच आठवडी बाजारात तिला मायेने जवळ घेऊन गालावर हात फिरवत माझी लेक म्हणून गोंजरणाऱ्या आज्याही भेटल्या.

दिशाने सांगितलेला एक प्रसंग. एकदा ती ट्रेनमधून प्रवास करत असते तेव्हा एक उच्चवर्णीय स्त्री तिच्या बर्थजवळ येऊन तिच्याजवळ येत म्हणाली, 'कहाँ कहाँ से आते है ये लोग।' तिचे हे बोलणे ऐकून दिशा तिला तेव्हाच ठणकावत म्हणाली, 'मॅडम, माइंड युअर लँग्वेज.' यावर उलट ती म्हणाली, 'ये फर्स्ट क्लास का डब्बा है।' दिशाने तिला उत्तर दिले, 'आपल्या देशात क्लास पैशांवरून ठरवतो. ज्याच्याजवळ जास्त पैसा तो फर्स्ट क्लासमध्ये मोडतो आणि ज्याच्याजवळ पैसा कमी आहे किंवा नाहीच तो खालच्या स्थानावर असतो; पण जेव्हा एखाद्याच्या माइंडवरून तो कुठे मोडतो हे ठरवले जाईल ना तेव्हा तुम्ही या डब्यात कुठेच नसणार.' दिशा एवढी बेधडक कधीच नव्हती; पण जेव्हा तिने अन्यायाला वाचा फोडली आणि परिवर्तन स्वीकारू लागली तेव्हापासून आता दिशा इतरांच्या नजरेत भरते.

दिशा ह्या नावामागचा इतिहास आपल्याला कळलाय. आता 'दिशा पिंकी शेख' हे तिचं संपूर्ण नाव कसं काय पडलं?

तर पिंकी शेख ह्या दिशाच्या गुरू आहेत आणि वडिलांच्या ठिकाणी त्यांचं नाव आहे.

तिच्या लिंगाविषयी काहीच अंदाज बांधू नका, असे म्हटले तर? मुद्दा असा की, आपण जजमेंटल बनलोय, कारण 'दिशा' ही स्त्री किंवा पुरुष नसून, ती एक तृतीयपंथी आहे. फर्गेट अबाऊट जेंडर! दिशाच्याच शब्दांत सांगायचं झालं, तर ती एक व्यक्ती आहे!

दिशाला येणारे अनुभव दिशाच्या तोंडून ऐकताना अंगावर काटा येतो. जेव्हा कुणी बाई तिला पैसे देताना, 'थांब ना, घाई काय करतेस? तुला थोडीच घरी जाऊन संसार करायचाय?' किंवा कुणी बाई 'तुला थोडीच घरी जाऊन लेकरं पाजायची आहेत?' असा प्रश्न करते, तेव्हा दिशा त्यांना हसत हसत 'मलाही संसार आहे. माझ्या घरी चल, तुला माझा संसार दाखवते' आणि 'लेकरं पाजणं म्हणजेच सगळं काही नाही' अशी अगदी सहज उत्तरं देते!

दिशा एक 'कवयित्री' आहे! हो, जेव्हा समाजात वावरताना अपमान, लाचारी, उपेक्षा सहन करावी लागते, तेव्हा कुणाच्या तरी खांद्यावर डोकं ठेवून सगळं शेअर करावं असं वाटतं! आणि याच वेळी शब्द तिच्या मदतीला धावून येतात. दिशाच्या कविता ऐकताना/वाचताना अंगावर काटा, डोळ्यांत पाणी, अंतरात एक शल्य आणि मनात एक चळवळ जन्म घेत असते! दिशा सातवीपर्यंत शाळेत गेली; पण ती वाचायला खरं तर सातवीनंतर शिकली! दिशाला वाचनाचा छंद आहे. तिच्या बऱ्याच कविता प्रवासात जन्मतात. दिशा जरी एका बाळाला जन्म देऊ शकत नसली, तरी कवितांच्या रूपाने तिची 'बाळंतपणं' होत असतात! दिशा एक भावनिक व्यक्तिमत्त्व आहे! दिशा एक भाषा आहे! दिशा एक अभिनेत्री आहे! मुलाखतीत बोलतानाची दिशा आणि सिग्नलवर उभी राहून पैसे मागणारी दिशा यांच्या भूमिका, पेहराव जसे वेगळे तशीच त्यांची भाषाही वेगळी – शिवराळ भाषा! आणि आपण जर त्या शिवराळ भाषेवरून दिशाला जज करत असू, तर त्यांची भाषा चांगली व्हावी म्हणून आपण वैयक्तिक किती प्रयत्न केले, हा प्रश्न आपण स्वतःलाच विचारावा, असं दिशा म्हणते! दिशा एक समानतावादी व्यक्तिमत्त्व आहे! दिशाचे विचार ऐकल्यानंतर मनात वणवा पेटल्याखेरीज राहत नाही! बऱ्याचदा 'हिजडे की औलाद' असं शिवी म्हणून बोललं जातं;

पण उद्या एखाद्या तृतीयपंथीयाने एक अपत्य दत्तक घेतलं, तर काय बिघडलं?

तेव्हाही तुम्ही–आम्ही त्यांच्यावर अविश्वास दाखवत त्यांची उपेक्षाच करणार का? या आणि अशा बऱ्याच गोष्टी आहेत, ज्या समाजात निर्मिल्या गेल्या आहेत, जेणेकरून अशा हजारो 'दिशांना' दिशाहीन ठेवलं जावं!

त्यांच्यावर अनेक अत्याचारही होतात. बलात्कार, मारहाण, खून, रोजचे शाब्दिक बलात्कार इ. अनेक अत्याचारांना सामोरं जाऊनही आज अनेक 'दिशा' खंबीर उभ्या आहेत! आणि या हजारो दिशांना प्रकाशमान करण्याचं काम 'शब्दवेडी दिशा' ऊर्फ 'दिशा शेख' या करत आहेत. दिशाच्या कविता ती फेसबुकवर अपलोड करत असते, तिथे आपण त्या वाचू शकतो.

तर अशा अनेक भूमिका निभावणारी दिशा एक खरीखुरी 'अभिनेत्री' आहे! आपल्याला लाजवणारे तिचे विचार आहेत! आपल्यापेक्षा हजारपटीने जास्त तिचा संघर्ष आहे! तरीही आपल्यापेक्षा सुंदर तिचं हास्य आहे! दिशापासून प्रेरणा घेऊन आता जेव्हा तुम्हाला कुणी 'दिशा' दिसेल, तेव्हा आपुलकीने तिची चौकशी करा, तिची विचारपूस करा, तिच्याशी संवाद साधा! त्यानंतर मग तुम्हीच इतरांना 'दिशा' द्याल, हे सांगणे न लगे!

दिशा मी तिच्याकडे सामान्य म्हणून आणि एक विशिष्ट माणूस म्हणून कधीच नाही बघू शकत. माझ्यासाठी माणुसकीच्या नात्यापलीकडे जाऊन एक रोल मॉडेल आहे. दिशा माझी काय आहे हे शब्दात मला व्यक्त करता येत नाही; ती क्रांतिज्वाला, ती म्हणजे माझ्या हृदयात तेवत ठेवलेली प्रेरणेची मशाल आहे. तिच्याच ह्या स्त्रियांवर लिहिलेल्या काव्यपंक्ती ज्या तिने शब्दबंध केल्यात.

ती जन्माला यायची पापाची फळे चाखण्यासाठी

पण, ते पाप त्याचं, ती स्वतःच्या भाळावर घेऊन जगत होती,

आज मात्र चित्र बदललंय, तिचे नाही तिच्या शोषण पद्धतीचे

कोणी तरी तिचा खून केला देह गटारात टाकून खाडीत तर कधी त्याच अंथरुणावर सोडून दिला

परवा भीक मागणारी ती चालती ट्रेन ओलांडताना कमरेतून दोन हिश्शांत विभागली

समज आली तिला ती शिक्षितही झाली

पण शोषण अटळ म्हणून मानसिकरीत्या हरली आणि फासावर मेली

उमेदीच्या पहाटेसाठी; स्वतंत्रतेच्या क्षितिजासाठी; परत ती नव्याने जन्माला आली आहे पण,

आता ती सहस्रावधी वर्षांच्या शोषणाविरुद्ध यज्ञात स्वतःची आहुती द्यायला नकार देते

आता ती आणि तिच्या पिढ्या होणार नाहीत स्वाहा

ह्या दिशाला मी 'मॅडम' हेच संबोधन देईन.. कारण, माझ्यासाठी दिशा गुरूच्या स्थानी आहे. तिच्यातली स्त्री, आतला आवाज डांबून न ठेवता स्त्री हक्काच्या अस्तित्वासाठी लढते आणि मरते. ह्याच समाजाने परिवर्तनाचा हिशोब न लावता सरळ घोषित केलेली तिची वागणूक झिडकारत ती बाजारात टाळ्याही वाजवत असली तरी अभिमान वाटतो. मला तिच्या जगण्याचा नवा आलेखही योजत तीच त्याचा आराखडा होते. आपली कूस उगवत नसली तरी नवी कविता ती जन्माला घालते. मी दिशाला जाणलं, मानलं. तुम्हीही शोध घ्या अशा दिशाचा आणि त्याच दिशेने चला जी तुम्हाला योग्य मार्गाने मार्गक्रमण करते.

– कोमल प्रकाश मानकर
वर्धा, भारत
mankar123komal@gmail.com

पहिला पाऊस

आज अचानक काजळाकाळे मेघ भरले आकाशी
भर दुपारी किरणे अडली असुनी सूर्य प्रकाशी ।।१ ।।
ग्रीष्मऋतूच्या तप्त हवेने त्रस्त झाली सृष्टी
शेत नांगरले बळीराजाने होईल आता वृष्टी ।।२ ।।
पाण्याचे बाष्पीभवन होई जलचक्राच्या द्वारे
महासागरावरून येती नैर्ऋत्य मौसमी वारे ।।३ ।।
आला आला वरूण राजा गडगड नाभी नगारे
स्वागत करण्या चंचल बिजली आकाश व्यापी सारे ।।४ ।।
मध्येच हलक्या मध्येच धो-धो कोसळती जलधारा
ओल्या मातीचा मृदगंध येई भारुनी आसमंत सारा ।।५ ।।
सुसाट वर पावसासवे भरभर घाली पिंगा
पाण्याचे मग तुषार उडती भिजविती अंतरंगा ।।६ ।।
पाऊस पाणी वाहुनी जाई अखिल सृष्टीचा मळ
सुविचारांचा निचरा होवो मन होई शांत निर्मळ ।।७ ।।
वरूणराजा बरसात जावो होवो धरित्री सुफला
सुखसमृद्धी आरोग्य नांदो होवो सृष्टी सुजला ।।८ ।।

– वैभव दातार
कल्याण, भारत
vaibhavdatar87@gmail.com

मी महासागराच्या खडकावर येऊन उभी होते. सागराला निरखून बघू लागली. आज मला जीवन म्हणजे ह्या महासागराच्या भरती-ओहोटीसारखं वाटायला लागलं. स्विमवेअर परिधान करीत खडकावरून मी महासागरात उडी मारली. सूर्य तांबूस होता. क्षितिजाच्या पल्याड मावळत होता. पक्षी निरभ्र काळसर अवकाशातून उडताना दिसत होते. मी तेवढ्याच जोमात पोहायला सुरुवात केली. आज मला खूप खोलवर खूप खूप दूर जायचं होतं. एका तासात मी आठ किलोमीटर दुरिच्या वेगाने खूप लांब निघून गेली, दक्षिणी महासागराला मागे टाकत, खोल भूगर्भात मी पोहत जात होती. खोल खोल दरीत निरनिराळ्या पानखुटी वनस्पतींची नव्याने ओळख होत होती.

सायंकाळची वेळ माणसाची नसतेच. रहस्यमय ओढ्यात बंदिस्त करून घ्यायला खोल खोल दरीत भूमातेच्या शोधात भटकणारा हा देह न थकता महासागरी प्रवासाच्या दिशेने झुकलेला असतो. भूगर्भ त्या दिवशी खवळलेल्या लाटांशी एकजूट होऊन मला ओढत खोल खोल दरीत ढकलू पाहत होता. अंगातलं सर्व त्राण एकवटून मी बाहेर निघण्याच्या प्रयत्नात होते. त्या खवळणाऱ्या लाटा मला ओढून घेणाऱ्या असफल ठराव्यात असंच काही झालं. बाहेरचा परिसर नजरेच्या दृष्टिक्षेपात पडला. आकाश निरभ्र होतं. सूर्य क्षितिजाच्या पल्याड जाऊन मला हसत असावा असा भास झाला. त्याची आणि माझी गट्टी न हरणाऱ्या भावनिक ओढीची होती; पण आता लुकलुकणाऱ्या चांदण्यांनी सडा पाडला होता. दोन हातांनी लाटांना मागे सारत सदर्नच्या किनाऱ्यावर येऊन हात लांब केला. दोन किनारी गोवलेल्या खडकाच्या आधारे वर आली. गिटो नेहमीसारखंच आजही त्याचे दोन्ही हात मला कवेत घ्यायला मोकळे करून उभा होता. त्याला आलिंगन देत मी विचारणा केली,

गिटो, ह्या महासागराच्या प्रवासात तुला कधी काही गवसलं का? गिटो माझ्याकडे नजर रोखून बोलू लागला. यस माय चाइल्ड, जगण्याचे धडे मला ह्या महासागराकडून मिळाले. मला त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या उत्तराच्या हव्यासात मी होते. हा मला काय सांगतो जगण्याचे धडे ह्या जलांतरित महासागरकडून मिळाले. मी जरा अवाक् होऊन विचारले, गिटो, ते कसं काय?

तुला सांगू, एकदा काय झालं?

हं!

नावाड्याने मला नाव चालवायला दिली; मी चौदा वर्षांचा असेन तेव्हा.

मग?

द लार्वे - हरवलेला देवमासा

मग काय? मला नाव चालवण्याची शैली अवगत नव्हतीच. तरीही वाट नेईल तिकडे मी सैरावैरा हा आसमंत धुंडाळू लागलो. वादळाने अचानक तीव्र रूप धारण केले. नाव घेऊन मी कोणत्या बांधावर येऊन पोहोचलो हे माझ्याच ध्यानात नव्हते. नाव मला ढासळू लागली. लाटा खवळू लागल्या. लाटांचा शिरकाव माझ्या तोंडापर्यंत पाणी उसळून फेकत होत्या. नाव डामलडोल होऊ लागली. स्ट्रेनजर माझ्याजवळ नव्हताच, मी त्या नावेवर मोठमोठ्याने विलाप करू लागलो, कोणी तरी वाचवा, मला वाचवा. माझ्या मदतीसाठी, माझ्या बचावासाठी साक्षात येशूसुद्धा येणार नव्हता. नावेने मला पाण्यात ढकलले. नाव लाटाच्या वेगात तरंगत होती. मी नावेला पकडून उठण्याच्या प्रयत्नात होतो तोच लाटा मला घेरत होत्या. एक मोठी लाट आली आणि त्या लाटेने मला दूर फेकले, नावेपासून खूप दूर. पाण्याच्या तुडुंब भरलेल्या त्या महासागरात माझ्या डोळ्यात पाण्याचा प्रचंड डोह साचला होता. काय करू मी तेव्हा विचार करण्यापेक्षा कृती करून बाहेर पडणे हितकर होते.

एवढ्यात मी ओरडून गिटोला म्हटले, बाप रे गिटो, पण तूच तर माझा स्विमिंग मास्टर आहेस आणि तुझ्यावर ही वेळ आली होती. मग तू बाहेर कसा पडलास?

ह्यावर गिटो आपल्या दोन्ही हातांनी मला खुणावत सांगत होता. त्या वेळेनेच मला स्विमिंग मास्टर बनवलं. कधी पोहायला न जाणारा मी दोन हात दोन पाय शाबूत आहेत म्हणून जोरजोराने त्या लाटांच्या तावडीतून हेलकावे देत पोहू लागलो. तेव्हापासून माझ्यात एक वेगळीच ऊर्मी संचारली. कोणत्याच शिकवणीचा आधार न घेता मी स्वतः एक स्विमिंग मास्टर झालो आणि तुला माहिती आहे, मी त्या मध्यरात्री जग धुंडाळत महासागराच्या दुनियेतून बाहेर कुठे येऊन पोहोचलो होतो?

प्रश्नार्थक नजरेने मी गिटोकडे बघत, कुठे, कुठे येऊन पोहोचला होतास गिटो तू?

समोर असलेल्या व्होडकावर नजर खिळवत गिटो उद्गारला, लुसिआ. तो तुझ्यासमोर असलेला व्होडका बघतेय सदर्न ऑसेनच्या ह्याच दक्षिणी किनारपट्टीवर येऊन मी मोकळा श्वास घेतला.

ओहहह! तर म्हणून तुला जगण्याचे धडे ह्या महासागराने दिले, असं म्हणतच मी गिटोचा निरोप घेतला. गिटोचा सहवास, त्याचा प्रेरणा देणारा संवाद माझ्या मनाला मोहून घेत असला तरी माझी जन्मदात्री घरी माझी वाट बघत दाराजवळ उभी असते, वाटेकडे टक लावून ...

तसं गिटो माझा स्विम मास्टर; पण तो मला स्वतःच्या लेकीसारखा जपतो. अलबतचं माय स्वीट चाइल्ड म्हणून कुरवाळतो. कधी त्याला मी त्याच्या परिवाराबद्दल विचारायला गेली तर तो विषय टाळण्याचा प्रयत्न करतो. आजपर्यंत गिटोने जगातल्या सर्व रहस्यमय ताकदीचा न उलगडणाऱ्या कोड्यात झोकून पाहण्याचा मला भरभरून हुरूप दिला. त्याचं वय तो मला बरोबर सत्तर वर्षं असल्याचं सांगतो; पण कधी त्याचा जन्मदिन असतो हे सांगत नाही. माझ्या जन्मदिनी मात्र मला नवनवीन भेटवस्तू तो मोठ्या कर्तबगारीने देत राहिला. सत्तरी ओलांडलेला गिटो मात्र आजही मला मनाने नवतरुण वाटतो, कारण ती धमक मी त्याच्यात पाहिली आहे. अजून आपल्याला खूप काही करायचं असल्याचं त्याच्या डोळ्यांतलं चैतन्य मला माझा नव्याने जन्म झाल्याचे डोहाळे लावतात. जसा साप कात टाकल्यावर नवं रूप नाही, पण नवा जन्म धारण करतो तसंच गिटोच्या बोलण्याने मी भारावून जाते.

आजपर्यंत मी आणि माझी लाडकी मैत्रीण मार्टिना म्हणजे माझी सर्वस्व, ह्या विश्वातली सौख्य, देन माझी मॉम. ह्या रक्ताच्या दोन नात्यांपैकी तिसरे नाते कधी अनुभवलेच नाही. मॉम म्हणायची, मला रक्ताचा भाऊ आहे, माझ्यापेक्षा चार वर्षं मोठा असलेला, पण तो अजून काही मला साक्षात भेटलेला नाही. त्याच्या भेटीसाठी मी आतुर आहे. त्याचं प्रेम नको मला. त्याचे खांद्यावर धीर देणारे हात नकोय; पण मला कोणी भाऊ आहे ह्याच कल्पनेने माझं मन भरून येतं. तो कुठे असेल आता? कसा दिसत असेल? दिसायला तो मार्टिना मॉमसारखा असेल की? मॉम मला त्याच्याबद्दल कधीच काही सांगत का नाही? ह्यावर मी तिला खूपदा विचारून तिच्या निरागस चेहऱ्यावर एक चिंतातुर स्पर्श करून गेलेली छटा बघून हा प्रश्न कधी विचारायचाच नाही म्हणून ह्या नात्याच्या भावविश्वातून स्वतःला दूर सारते.

एकदा मला अडगळीत एक फोटो फ्रेम दिसली. ती फ्रेम घेऊन मी मॉमजवळ गेली. तिला विचारणा करू लागली, मॉम, हा फ्रेममधला माझा भाऊच आहे ना! आणि ही त्याच्या कडेवर असलेली मी. तो किती प्रेम करायचा गं माझ्यावर? किती सुंदर वाटते ही फ्रेम. हे शब्द ऐकताच मॉमने माझ्या हातून ती फ्रेम हिसकावली आणि मला म्हणाली, हो, हा तुझा भाऊच आहे जॉन; पण तू ही फ्रेम... यापुढे काहीच न बोलता ती फ्रेम घेऊन तिथून निघून गेली. जॉन हे नाव फक्त मी ध्यानात ठेवत जॉन नावाच्या मिळेल त्या माझ्यापेक्षा वयाने चार वर्षं मोठ्या असलेल्या तरुणाशी मैत्री करून तो माझा भाऊ आहे का हे जाणण्याचा प्रयत्न करीत होती; पण अजूनपर्यंत माझ्या संपर्कात दोन जॉन येऊन गेलेत. ते माझे कोणी असणे शक्यच नाही. त्यांना पूर्ण परिवार आहे. जॉनचा शोध अद्यापही घेणे सुरूच होते.

आज घरी पोहोचायला मला नऊ वाजलेत. मार्टिना मॉम माझी वाट बघत बसली होती. माझ्या पायाचा आवाज येताच ती बाहेर आली .

बेटा, किती वेळ? चल, लवकर आत ये. मी आज तुझ्या आवडीची डिश बनवली.

आत शिरताच चिकन फ्रायचा खमंग वास घरभर दरवळत होता. हातपाय धुऊन मी चिकन फ्रायवर ताव मारला. मॉमच्या हातचं चिकन फ्राय खाण्यात काही वेगळाच स्वाद असतो. मी जेवण होताच अंथरुणावर लवंडली.

त्रासलेल्या देहाला रात्री झोप कशी लागली मला कळलंच नाही. मॉम सकाळीच स्कूलमध्ये निघून गेली. म्याक्सन माझी वर्गमैत्रीण, तिचा फोन वाजत होता. कधीची फोन करत असावी ती. मी फोन उचलताच तिने मला सुखद धक्का दिला,

हे, माय चॅम्प, तू तुझी पदवी पूर्ण केलीस. तू पदवी पास झाली ...

ओहह! म्याक्सन, मी तुझी खूप आभारी आहे, खूप खूप धन्यवाद. तू झाली ना पास?

हो हो, मीपण पदवी पास झाले. येत्या रविवारला जॅकसन जूरेनसोबत माझं लग्न ठरलंय. तू येशील नक्की?

अरे, एवढ्या लवकर लग्न करते?

तुला माहितीये न लुसिआ, मॉम त्यांना माझं शिक्षण अमान्य आहे.

पदवीचा निकाल पास होण्याचा आनंद काही औरच असतो; पण तो कुणाजवळ व्यक्त करणार? मॉम, ती तर पहाटे आवराआवर करून लवकर घरून निघून जाते. बर्गर खाऊन मी चर्चमध्ये निघून गेली. तिथे जाऊन माझं सर्व सुखंदु:खं मी गिटार वाजवण्यात संगीताच्या मंत्रमुग्ध दुनियेत जाते. आज आनंद व्यक्त करायला माझ्या हातात गिटार आणि सुरांची तार छेडायला स्वर होते.

अक्युस्टिक गिटार माझ्या हातात होता. बोट ताल छेडत होते. मी माझ्या दुनियेत हरवून गात होते. चर्चमध्ये रम्य शांतता वास करत होती. एवढ्यात एक नवतरुण माझ्या बाजूला जेसूच्या समोर उभा राहून माझं गायन एकाग्रतेने ऐकत होता. त्याच्याकडे लक्ष जाताच मी थबकली. त्याच्या नजरेवर नजर पडताच माझी बोटं गिटारवरून सुटली.

थांबली का? खूप छान गाते. तुझा सूर म्हणजे येशूने तुला दिलेलं गोड गिफ्ट आहे .... गा ना ! मला खरंतर कोणी ऐकत आहे ह्याचं भानच नव्हतं. माझ्या संगीताची वाहवा करणारा तो पहिलाच व्यक्ती जीवनात भेटला. अनोळखी व्यक्तीसोबत मी काय बोलावं म्हणून मी त्याला टाळण्याचा प्रयत्न केला. सॉरी मिस्टर, मला एकांतात गायला आवडतं. त्याच्या चेहऱ्यावर माझ्या बोलण्याने तिळमात्र नाराजी नव्हती. तो मला ओके म्हणून तिथून निघून गेला. मला जरा ओशाळल्यासारखं वाटलं. मी त्या अनोळखी व्यक्तीला दुखावलं तर नाही ना! त्याची क्षमा मागायला मी चर्चच्या बाहेर पाय ठेवला; पण तो दूरवर मला कुठेच दिसत नव्हता.

मी घरी गेले. सायंकाळ होत आली म्हणून मी स्विमिंगसाठी जायला निघाले. दार उघडलं तर मॉम माझ्यासमोर उभी. तिला घट्ट आलिंगन देत मी पदवी पास झाल्याचे सांगितले. तिच्या चेहऱ्यावर तो आनंद ओसंडून वाहत होता. तिने मला आज सरावाला न जाण्याची विनंती केली; पण माझ्यासाठी सराव खूप महत्त्वाची बाब होती. तिला आज मी लवकर येईन हे सांगून घराच्या बाहेर पडली.

किनारपट्टीवर जाताच मी गिटोला सर्वदूर शोधू लागली. गिटो मला कुठेच दिसत नव्हता. तिथे असलेल्या एका कोळ्याला मी विचारलं, गिटोला कुठे पाहिलंत का? तो माझ्याकडे बघत मला म्हणाला, हो. गिटोचा मुलगा आला आहे. तो आज येणार नाही. तो कालच मला बोलला.

ओहह! पण गिटोने मला असं काही सांगितलं नाही. गिटोच्या परिवारात आणखी कोण कोण सदस्य आहेत तुम्हाला माहिती आहे?

गिटोला त्याच्या मुलाशिवाय कोणीच नाही ह्या जगात. त्याचा मुलगाही परदेशात शिकायला होता. तो तीन-चार वर्षांनी त्याला भेटायला येत असतो.

ओके, मी सरावाला निघते. मला वेळ होत आहे. त्याचा निरोप घेत मी महासागराच्या खडकावर येऊन उभी होते. सागराला निरखून बघू लागली. आज मला जीवन म्हणजे ह्या महासागराच्या भरती-ओहोटीसारखं वाटायला लागलं. स्विमवेअर परिधान करीत खडकावरून मी महासागरात उडी मारली. सूर्य तांबूस होता. क्षितिजाच्या पल्याड मावळत होता. पक्षी निरभ्र काळसर अवकाशातून उडताना दिसत होते. मी तेवढ्याच जोमात पोहायला सुरुवात केली. आज मला खूप खोलवर खूप खूप दूर जायचं होतं. एका तासात मी आठ किलोमीटर दुरिच्या वेगाने खूप लांब निघून गेली, दक्षिणी महासागराला मागे टाकत, खोल भूगर्भात मी पोहत जात होती. खोल खोल दरीत निरनिराळ्या पानखुटी वनस्पतींची नव्याने ओळख होत होती.

एवढ्यात मला मागून पायाला थंड स्पर्श झालेला जाणवला. मी माझ्या पोहण्याची दिशा बदलत मागे वळली. ते भयाण रूप बघून मी चित्कारलीच. श्वास घेण्याचा वेग वाढला. जोराने हार्टबीट होतं होतं. माझ्यासमोर देवमाशाचं पिल्लू होतं. ते मला काही करेल म्हणून मी भीत होते; पण तो शांत. कसलीही हालचाल, ओढाताण न करता तसाच एखाद्या स्टॅच्यूप्रमाणे माझ्याकडे सारखा बघत होता त्याने त्याच्या शेपटीनी मला समोर जाण्यापासून रोखले. मी समोर जाण्याचा प्रयत्न करू लागली. तो हालचाल करते का म्हणून बघू लागली. मला समोर जाताना बघून तो माझा मागोवा घेत येऊ लागला. तो आता माझ्या अगदी बाजूला येऊन मी ज्या दिशेला वळण घेईल तसा वळू लागला. त्याच्या हालचालीकडे, त्याच्या शरीरयष्टीकडे बघून मला पुरती खात्री पटली हे देवमाशाचं नुकतंच एक महिन्याचं पिल्लू आहे.

मी त्याला जाणून घेण्याच्या प्रयत्नात होती. तो तोंडानी फूत्कारत मला काही सांगू पाहत होता; पण मला त्याची भाषा कळेना. मीही त्याला हेच विचारण्याच्या प्रयत्नात होती. देवमाशा, तू तुझ्या आईपासून हरवला आहेस का? तू कोणत्या दिशेने इकडे आला? तुझी आई कुठे असेल आता? आपण तिला शोधूयात का? इत्यादी प्रश्न. त्याला आणि मला संवाद साधता आला असता तर कदाचित त्याच्या आईला शोधणंही सोपं गेलं असतं.

आमच्याकडे देवमाशाच्या प्रजातीला लार्वे म्हणतात. लार्वे हे खूप चपळ असतात म्हणून त्या पिलाची आईही त्याचा शोध घेत असेलच ह्यात तिळमात्र शंका नव्हती. लार्वे माझ्या सोबत पोहत होता. त्याच्या सोबतीला तेवढ्या मोठ्या जलाशयात जलचर प्राणी सोडले तर माझ्याविना कोणीच नव्हतं. मी काय करावं म्हणून काही मिनिटांसाठी थांबली. देवमासा माझ्या पायथ्याशी कसाबसा चाचपडत होता. मी मागे परतण्याच्या प्रयत्नात दिशा बदलवली. देवमासा मला सोडायला तयार नव्हताच. मी किनाऱ्याच्या दिशेने व्होडका शोधत पोहू लागली. किनाऱ्याजवळ जाऊन कोणत्या नावाड्याला मला विचारायचं होतं, तुम्ही देवमाशाची टोळी बघितली का? वादळ विरुद्ध दिशेने येत होतं. लाटा खवळत होत्या. देवमासा भीत होता. त्याला माझ्यासोबत आता पोहता येणे शक्य नव्हतं. तो प्रयत्न करीत स्वतःला माझ्या सोबत जायचं म्हणून रेटत होता. त्याला माझ्यासोबत भीती नव्हती म्हणून तो माझ्या मागेमागे येत होता. त्याला आशा होती, मी त्याच्या आईला नक्कीच शोधून काढणार ही.

मी त्या खवळणाऱ्या लाटांचा प्रतिकार करत होती. लाटा अजून तीव्र वेग धारण करीत होत्या. एक उंच लाट आली आणि तिने लार्वेला माझ्यापासून खूप दूर नेऊन फेकले. मी लार्वेच्या दिशेने जायला सुरुवात केली तर त्या लाटा मला मागे ओढत होत्या. एक लाट उसळत खूप तीव्र तांडव धारण करून चक्रीवादळासारखी घुटमळत होती. त्या लाटेनेच मला ओढून घेतले. त्या लाटेत मी सतत दहा मिनिटे गोल गोल चक्रावत राहिली. त्या लाटेने मला लार्वे पासून एक किलोमीटर दूर अंतरावर नेऊन फेकले. लाटा उसळतच होत्या. ह्या लाटेनेच लार्वे आणि माझी ताटातूट केली. लार्वे मला शोधत होता का कुणास ठाऊक? मी दूरवरून लार्वेला माझ्याजवळ येताना बघत होती. तो एवढा वेळ पोहत मला शोधत माझ्या जवळ येत होता.

मी बाळमाशाला सांगत होती, आपण नक्की शोधून काढू तुझ्या आईला. कितीही वेळ झाला तरी तू फक्त माझी सोबत सोडू नको. उसळत्या लाटांचा सामना करत

व्हर्जिन

त्याने तिला अरेंज मॅरेज ठरल्यावर पहिल्या भेटीत विचारलं....
तू व्हर्जिन आहेस..... ?

ती भेदरली. हळूच अश्रू ओघळू देत म्हणाली,
मी व्हर्जिन नाहीये कशी असेन मी?

माझ्या सगळ्या शरीराला ओरबाडलंय...
बुभुक्षित नजरांनी....त्यातल्या व्यभिचाराने...
झाकलेलं अंग नग्नदृष्टी पाहून ओशाळलंय...
मी व्हर्जिन नाहीये.... कशी असेन मी?

कानांनी नको ते अर्वाच्य नावं ऐकलीत.....
माझ्या स्तनांच्या मापांचे कयास चौकात बांधलेत.....
धावून विस्कटल्या बटांवर शिंतोडे उडवलेत....
मी व्हर्जिन नाहीये.... कशी असेन मी?

गर्दीत राखीव जागांवर बसून बीभत्स नजरेने विटाळले.....
मला ढकलून नको तिथे चिमटेही काढले.....
माझ्या प्रत्येक भागाला वासनेनं घुसमटले...
मी व्हर्जिन नाहीये.... कशी असेन मी?

मला माझा भावही विचारून चुरगळले.....
नराधमांनी पीरियड चालु असताना पळवले.....
पीडित स्त्रीसारखी नजर घाबरून भिरभिरली....
मी व्हर्जिन नाहीये.... कशी असेन मी?

मात्र रात्री सातनंतर घराबाहेर नाही पडली....
सगळ्या मैदानी खेळांपासून वंचित राहिली....
त्यामुळे ह्यूशप मात्र सुरक्षित राहिले....
नाही तर तशी मानसिकरीत्या मी व्हर्जिन नाहीये!

त्यानंतर गळालेलं अवसान गोळा करून तिने विचारले
तू किती जणांची व्हर्जिनीटी मोडलीस आत्तापर्यंत?
अजूनपर्यंत ती वाट पहात आहे जोडीदाराची....
जो हा प्रश्न विचारणार नाही....
ज्याने मानसिक व्यभिचार कधी केला नाही.....

- राहुल करुरकर
रिकमन्सवर्थ, युनायटेड किंग्डम
karurkar@yahoo.com

आम्ही आता व्होडकाच्या अगदी जवळ होतो. दोन किलोमीटर दुरिच्या अंतरावरून व्होडका माझ्या नजरेला खुणावत होता. बाळमासा थकलेला दिसत होता. त्याच्यात पोहण्याचा त्राण उरलेला नसावा. आता मी वेग धारण केला. बाळमासा हळूहळू पोहत येत होता. माझी नजर समोर खडकाच्या दिशेने होती. मी समोर पोहण्याचा वेग धारण करत लार्वे माझ्यामागे आहे का हे बघत होती. किनाऱ्याच्या जवळ येताच मी नावाड्याला ओरडून ओरडून जवळ बोलावण्याचा प्रयत्न करीत होती. माझ्या आवाजाचा वेध घेत ते माझ्या जवळ आले. मी त्यांना विचारले, तुम्ही देवमाशाचा कळप सागरी प्रवाहाने जाताना कुठे बघितला काय? तेव्हा नावाडी म्हणाले, नाही नाही, मी तर नाही बघितलं; पण आताच मी कुणाच्या तरी तोंडून ऐकलं southern च्या उत्तरेस एक दहा-पंधरा देवमाशांचा कळप आला आहे. मी त्यांचे बोलणे ऐकून मोठ्या आशेने मागे वळली. ह्याचा अर्थ देवमाशाची आईही त्याचा शोध घेत होती.

मी देवमाशाच्या जवळ जाताच तो थबकला. तो खूप दमलेला मला भासत होता. त्याला भूक लागली असावी का? तो काय खाऊन जगत असेल बरं! तो त्याच्या आईवर अवलंबून राहत असेल तर आता त्याचं कसं होणार? तो समोर पोहू शकणार की नाही ह्याच काळजीने माझं मन बधिर झालं. देवमाशा! चल, आपल्याला तुझी आई भेटणार आहे. आपण लवकर तिच्यापर्यंत पोहोचू, असा धीर देत मी त्याच सागरी प्रवाहाने उत्तरेकडे निघाली. दहा वाजले होते. उत्तरेची सीमा गाठत आम्ही पोहत येऊन एवढ्या दूरवर मला देवमाशांचा कळप कुठेच दिसत नव्हता. देवमाशाने मात्र आता वेग धारण केला होता. तो माझ्या विरुद्ध दिशेने पोहत जाऊ लागला. त्याच्या मागोमाग मी. जणू त्याला त्याची आई आवाज देऊन जवळ बोलवत होती.

पाण्याच्या लहरीतून त्यांचा संवाद होत असेल का? होत असावा म्हणूनच देवमासा माझ्या विरुद्ध दिशेने पोहू लागला होता. मी पोहत त्याच्यापर्यंत गेली, पण तो आता थांबलेला होता. काय झालं लार्वे, चल ना समोर. असा थांबू नको. तुझ्या आईला शोधायचं ना आपल्याला? त्याच्या पाठीवर हात फिरवत मी मनातच बोलू लागली. तो चीत्कारत होता, जागेवर पंख हलवत होता; पण समोर जात नव्हता. मला काही कळेना ह्याला काय झालं असावं. माझ्या डोळ्यासमोर आता दूरवरून माशांचा कळप दृष्टीस पडत होता. पाण्याचा खळखळाट करत देवमाशांचा कळप आमच्यासमोर दहा फुटांवर येऊन थांबलेला होता. त्यातून एक मासा देवमाशाजवळ येत होता मी दूर होत होती, पण लार्वे सारखा माझ्याकडे डोकावत होता. लार्वेची आई जवळ येताच तो त्याच्या आईकडे बघून काही तरी त्याच्या भाषेत सांगत होता.

आता मला पक्की खात्री पटली होती, लार्वेला त्याची आई मिळाली होती आणि हीच त्याची आई होती. एका हरवलेल्या देवमाशाला त्याची आई मिळाली होती. मी माझा दक्षिण महासागर सोडून लार्वेसाठी दिशा बदलवली होती. आता मला आधी उत्तरेचा किनारा गाठायचा होता. मी मागे परतीच्या मार्गावर जायला आरूढ झाली तेव्हा माझ्या मागे संपूर्ण देवमाशांचा कळप होता आणि माझ्या बाजूला लार्वे. लार्वे आधीच खूप थकलेला होता; पण त्याची आई त्याला मिळाली म्हणून तो त्याच जोशात माझ्यासोबत येत असावा. ते माझ्यासोबत कुठवर येणार हे मलाही ठाऊक नव्हते. मी उत्तरेच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचली. खडकाला हात धरून किनाऱ्यावर पाय ठेवला तेव्हा तो देवमाशांचा कळप मला साथ करताना दिसत होता. मी किनाऱ्याच्या मधोमध येऊन मागे वळून बघितल्यावर मला देवमाशांचा कळप ज्या दिशेने आम्ही त्याच्या शोधार्थात गेलो त्याचं दिशेने परतताना दिसला. ते दृश्य मी माझ्या नजरेत कैद करून ठेवलं. खरंच, आज मला ह्या महासागराने कधी नव्हे ते अनोखं गिफ्ट दिलं. एका हरवलेल्या पाडसाला त्याचं मातृत्व भेटावं ह्यासारखी जगात आनंददायी सुखद गोष्ट दुसरी कोणती असू शकते.

- कोमल प्रकाश मानकर
वर्धा, भारत
mankar123komal@gmail.com

वसंत ऋतूची किमया !!

येता झुळूक वाऱ्याची
पाकळ्या अनेक उडती
जणू सहज गतीने
फुलपाखरांचे थवे
आल्हादे बसती !!

कधी रंग गुलाबी तर
जर्द केशरी वा
निळ्या पोपटी
नाजूक पाकळ्यांचे
सडे अनेक पडती
वसंत ऋतूची किमया मोठी
बहर येता आसमंत फुलविती
पडता सडे पाकळ्यांचे
वाऱ्यासंगे खेळ खेळती !!!

- चंद्रकांत बसोले
chandu.basole@gmail.com
कलोन, जर्मनी

आनंदाचा प्रवास

१.

चटचटणारं ऊन, त्या उन्हाने तापलेली माणसं, निसर्गच तो, त्याला स्वीकारून जगावंच लागतं प्रत्येकाला. असेच उन्हाने त्रासलेले, घामाने डबडबलेले सगळे प्रवासी गाडीत बसलेले. गाडी सुरू होण्याची वाट बघत, एक सीट रिकामी म्हणून तो पठ्ठ्या लवकर निघेना.

मला 'पुलं'च्या 'म्हैस' कथेतला प्रसंग आठवायला लागला, गाडीत घामाचे, भाज्यांचे, विडी–तंबाखूचे, डोकं उठवणाऱ्या वाळलेल्या माशांचा खूप वास सुटलेला होता, त्यातच एक पोरगं तार सप्तकात रडत होतं. शेवटी माझं आवडतं मेलोडी चॉकलेट मी त्याला शांत बसण्यासाठी लाच म्हणून दिलं आणि त्यानेही ते समजदारीने न लाजता स्वीकारलं आणि तेवढ्यापुरतं त्याचं तोंड बंद झालं. सगळे देवाची वाट पहावी तशी प्रवासाची वाट बघत होते. त्या वातावरणाने मन उदास झालं होतं. आयुष्यात कधी कधी हतबल होतो तेव्हा जसा फील येतो तसंच वाटत होतं. तितक्यात एक नाजूक ताई गाडीत बसल्या आणि आता गाडी सुरू होऊन वारा लागल्यावर तरी जरा प्रसन्न वाटेल या अपेक्षेने मी ड्रायव्हरकडे पाहू लागले.

ड्रायव्हर महाराज निवांत इतक्या तळपत्या उन्हात बाळंतीणबाईसारखं गाडीचा शेक घेत होते. हातात विडी होती. सगळे प्रवासी मराठी असून ओरडले, अरे भाई, चलो ना। तोही लगेच लगबग विडी फेकून गाडीत बसला, त्याबरोबर आलेल्या विडीच्या वासाने जीव गुदमरला. गाडी सुसाट निघाली आणि वासांचे रंग बदलायला सुरुवात झाली. मघाशी चढलेल्या नाजुकाने आपला डोक्याचा स्कार्फ काढला आणि क्षणभरात गाडी मंद सुगंधानं दरवळली. वैतागलेल्या मनाला खूप छान वाटलं. ही सुगंधाची जादू त्या नाजूकशीच्या डोक्यातील छोट्याशा दोन मोगऱ्याच्या फुलांची होती. मघाशी उन्हामुळे निसर्गावर रुसलेल्या मला परत निसर्गाच्याच ऋणात राहावेसे वाटले, कारण एवढ्या उन्हाळ्यात मनाला थंडपणे दरवळून टाकणाऱ्या या मोगऱ्याच्या फुलालाही त्यानेच घडविले.

परत मन जरा प्रसन्न झाले. एक नवीन विचार मनात आला, तप्त उन्हात जसं मोगऱ्यामुळे आल्हाददायक वाटलं, तसं ज्यांचे दात सुंदर त्याला मोगऱ्यांच्या कळ्यांची उपमा देतात. म्हणजे असं तर नसेल की, आयुष्यात जराही त्रस्त वाटलं तर आपल्या मोगऱ्याच्या कळ्या फुलू द्याव्या म्हणजे जरा आनंदाची झुळूक येईल आणि आपण परत प्रसन्न मनाने सज्ज होऊ, ह्या आयुष्याला तोंड द्यायला.

बघा, मला आपलं सहज सुचलं, बाकी मी तर तो सुगंध भरभरून घेऊन निघाले घराकडे. ते त्रस्त वास विसरून मोकळा श्वास घ्यायला.

२.

ऊन नुसतं चटचटत होतं. गरम वाफा, घाम, घशाला सारखी कोरड आणि जीपमध्ये ढोरासारखी माणसं कोंबल्यामुळे आलेला उबग. जाम बोर झाले होते मी. कधी एकदा उतरू असं वाटत होतं; पण अचानक सगळं वातावरण बदललं. गरम हवेच्या जागी गार झुळका यायला लागल्या. मातीचा तर घमघमाट सुटला. मघापासून तोंडाला रुमाल बांधलेली मी अधाशासारखी तो सुगंध भरभरून घेत होते. परिस्थिती एकदम बदलली आणि ज्या प्रवासाला मी कंटाळले होते तो संपूच नये असं वाटलं. मघाचा त्रागा तर मी विसरूनही गेले. असं आयुष्यातही बऱ्याच वेळा होतं ना. काही क्षण, प्रसंग असे येतात की, आपण खचतो, उदास होतो, नकोसं वाटतं जगणं आणि त्यातून बाहेर पडलो की वाटतं, भरभरून जगावं, उंच उडावं; अगदी आज आलेल्या या पावसासारखं. तो जसा भेटला या धरणीला आणि सुगंधित केलं सगळं तसं आयुष्यात जगावं आणि पसरू द्यावा आनंदाचा सुगंध सगळ्यांच्या जीवनात.

– स्वप्ना मुळे

श्रेयनगर, औरंगाबाद, भारत

smmayee@gmail.com

ऋणानुबंध

तो कसा दिसत असेल? आपण त्याला एवढ्या गर्दीत ओळखू शकू ना? भेटल्यावर आधी शेकहॅन्ड करावा की नमस्कारच बरा? गिफ्ट गेल्यागेल्या लगेच द्यायचं की जरा वेळाने? असे अनेक प्रश्न तिच्या मनात पिंगा घालत होते आणि त्याच उत्सुकतेमुळे तिचे तळहात गार पडले होते, पोटात फुलपाखरं बागडत होती.

हे सगळे विचार संपतात न संपतात तोवरच रिक्षा थांबली आणि ती पटकन रिक्षाचे पैसे देऊन खाली उतरली. आता तिची नजर एखाद्या भिरभिरणाऱ्या पाखरासारखी त्याला शोधत होती.

पाहिले न मी तुला, तू मला न पाहिले
ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले.......

भेटीचा दिवस अगदी उद्यावर येऊन ठेपला तसं तिचं मन आनंदाच्या हिंदोळ्यावर झुलत होतं. चांदण्यांच्या सोबतीने तिचा मुखचंद्रदेखील उजळून निघाला होता. एवढे दिवस ज्या क्षणाची वाट आतुरतेने पाहिली तो सुवर्णक्षण आता काही तासांवर येऊन ठेपला होता. मानवी मनाचीसुद्धा काय गंमत असते नाही, इतके दिवस त्याच्याशी मोकळेपणाने बोलणारी ती आता भेटीच्या कल्पनेनेच लाजत होती.

बेडवर पडल्या पडल्या तिला त्यांच्या आत्तापर्यंतच्या सगळ्या गप्पा आठवत होत्या.

'अहो'पासून सुरू होऊन नंतर 'अरे'पर्यंत येऊन पोहोचलेली मैत्री, वेगवेगळ्या विषयांवर भरपूर वेळ मारलेल्या गप्पा, त्याने केलेल्या शाब्दिक कोट्या, त्यावर आपलं खिदळणं, त्याचं ते गडगडाटी हास्य, दोघांनी मिळून केलेला टाइमपास, आपलं चिडणं, रुसणं, त्याने घातलेली समजूत. सगळं काही कालपरवा घडल्यागत तिच्या नजरेसमोरून तरळून गेलं.

या आठवांच्या बनात रमतानाच तिला कधी झोप लागली ते कळलंच नाही. सकाळी तिला अलार्म व्हायच्या आधीच जाग आली. इतर वेळी पाच मिनिटे अजून झोपू म्हणत लोळणारी ती आज सगळ्यांच्या आधी उठून आवरायला लागली होती. आन्हिकं आटोपून तिने कसेबसे चहाचे दोन घोट घेतले आणि तयार व्हायला पळाली.

कालच पार्लरची वारी करून आल्यामुळे चेहऱ्यावर तजेला होताच, पण त्याला भेटायच्या ओढीने गालांवर पसरलेली लाली पाहता कुणाही विश्वसुंदरीला लाजवेल अशीच ती दिसत होती.

नाजूक फुलांचे प्रिन्ट असलेला गुलबक्षी रंगाचा कुर्ता, त्याखाली पांढऱ्या रंगाची चुडीदार, गळ्यात मोत्याची सर, कानामध्ये दोन टपोरे मोती, डाव्या हातात शुभ्र पांढरं टायटनचं घड्याळ, तर उजव्या हातात सिल्व्हर ब्रेसलेट, खांद्यावर इस्बेडाची पर्स आणि पायात शोभेशी सॅन्डल. या सगळ्यावर कडी

करायला म्हणून आधीच टपोऱ्या असणाऱ्या डोळ्यांची शोभा वाढवत रेखीवपणे लावलेलं आय लाइनर, ओठांवर हलकीशी लिपस्टिक आणि अंगावर मंद सुगंधाचा वन मिलियन परफ्युम.

आहा! स्वतःचं ते रूप आरशात पाहून ती काही सेकंद हरखूनच गेली. तेवढ्यात मोबाइलवर मेसेज आल्याने ती भानावर आली. बघितलं तर त्याचाच मेसेज होता. सुप्रभात बाईसाहेब. तयार झाला असाल तर या आता भेटायला. वाट पाहतोय.

'अरे बाप रे... हा आलासुद्धा! आता अजून वेळ न दवडता निघायलाच हव,' असं म्हणून तिने घाईघाईत त्याच्यासाठीचं ग्रीटिंग आणि गिफ्ट घेतलं आणि पटकन रिक्षाला हात दाखवायला बाहेर पळालीसुद्धा!

तिच्या नशिबाने लगेचच एक रिक्षा मिळाल्याने ती रेस्तराँमध्ये जायला निघाली. रिक्षामध्ये बसल्या बसल्या तिच्या डोक्यात त्याच्याशी भेटल्यावर कसं वागायचं, काय बोलायचं याची रंगीत तालीमच सुरू होती.

तो कसा दिसत असेल? आपण त्याला एवढ्या गर्दीत ओळखू शकू ना? भेटल्यावर आधी शेकहॅन्ड करावा की नमस्कारच बरा? गिफ्ट गेल्यागेल्या लगेच द्यायचं की जरा वेळाने? असे अनेक प्रश्न तिच्या मनात पिंगा घालत होते आणि त्याच उत्सुकतेमुळे तिचे तळहात गार पडले होते, पोटात फुलपाखरं बागडत होती.

हे सगळे विचार संपतात न संपतात तोवरच रिक्षा थांबली आणि ती पटकन रिक्षाचे पैसे देऊन खाली उतरली. आता तिची नजर एखाद्या भिरभिरणाऱ्या पाखरासारखी त्याला शोधत होती. मुख्य दरवाजातून आत गेल्या गेल्या तिने सभोवार एक नजर टाकली आणि तेवढ्यात उजवीकडच्या कोपऱ्यातल्या टेबलावरून एक मनुष्य जोरजोराने तिच्याकडे बघून हात हलवत होता.

हाच तो! ती त्याच्याकडे बघून ओळखीचं गोड हसली आणि एखाद्या मॅग्नेटकडे खेचली जावी तशी झपाझप पावलं टाकत त्याच्याकडे जाऊन पोहोचली. त्यानेही पटकन उभं राहून तिच्यासमोर शेकहॅन्डसाठी हात पुढे केला. तिच्या नकळत तिने त्याच्या हातात स्वतःचा हात दिला. तो किंचितसा राकट हाताचा स्पर्श आणि त्याच्या खास खर्जातल्या आवाजातलं हॅलो ऐकून तर तिला काही सेकंद काय बोलावे तेच सुचेना.

पण तोही तिचा आवाज ऐकण्यासाठी आसुसलेला असावा. दोन सेकंदभर अनिमिष नेत्रांनी तो तिच्याकडे बघतच होता. जिच्याशी आपण इतक्या छान गप्पा मारतो ती आपली मैत्रीण खरंच किती गोड आहे असा काहीसा भाव त्याच्या डोळ्यत दिसत होता. एक क्षण दोघांची नजरानजर झाली आणि पटकन तिने मानेला किंचितसा झटका देत बोलायला सुरू केलं.

'हाय... सॉरी, अरे, जरा उशीरच झाला. तशी मी तयार होतेच, पण कुठे वेळ गेला ते समजलंच नाही.'

'ठीक आहे गं. फारही काही उशीर झाला नाही तुला.' इति तो.

संभाषणाला अशी इन्फॉर्मल सुरुवात झाल्यानंतर त्या दोघांच्या इतक्या मस्त गप्पा रंगल्या, की वेटरने येऊन चौथ्यांदा विचारल्यावर ब्रेकफास्टची काय ऑर्डर द्यायची ते त्यांनी ठरवलं.

निवांत गप्पा मारत, ब्रेकफास्ट करत त्यांनी भरपूर टाइमपास केला.

खरं तर तिथून उठावंसंच वाटत नव्हतं; पण बाहेर असणारे वेटिंग बघता ते टेबल रिकामं करणं भागच होतं. ब्रेकफास्ट झाल्यावर ते जवळच्याच एका गल्लीत असणाऱ्या झाडाच्या पारावर जाऊन बसले आणि एकमेकांचे आवाज फोनपेक्षाही प्रत्यक्षात कसे वेगळे आणि छान येतात इथपासून फेसबुकवर काय काय मज्जा चालते इथपर्यंत त्यांच्या सर्वसमावेशक गप्पा चालू झाल्या.

तेवढ्यात तिला आठवलं, 'अरे, आपल्याला मुव्ही बघायला जायचंय.' गप्पांना थोडं आवरतं घेत ते दोघं कॅब करून थिएटरला गेले. मुव्ही सुरू व्हायला अगदीच थोडा वेळ असल्याने पटापट जाऊन आपल्या जागेवर जाऊन बसले. मुव्हीमध्ये तिला विशेष

आपण आहोत तिथेच असतो का?

मनाने भिरभिरतो
शरीराने इथेच असतो
दुभंगल्या प्रतिमावानी
वावरताना एके ठिकाणी
नित्य अविरत विचारांनी!!
दोन अंगाची नित्यच घाई!
जगतो पृथ्वीच्या पाठीवर
नित्य मनानी
कुठेही दिसत नाही
अंगानी!
आपण आहोत
तिथेच असतो?
विचारांच्या लहरी-संगे
जगतो दूर कुठे
अज्ञात जगात!
आहोत तिथेच
असतो का?

- चंद्रकांत बसोले
कलोन, जर्मनी
chandu.basole@gmail.com

स्वारस्य नव्हतं; पण त्याला मुव्हीज् पाहणं भयंकर आवडतं म्हणून तिने हा प्लॅन केलेला.

मुव्ही संपल्यावर तो त्याविषयी भरभरून बोलत असताना ती मात्र त्याच्याकडे आणि त्याच्या त्या भावपूर्ण डोळ्यांकडेच बघत राहिली. 'तुला काय वाटतं गं?' या त्याच्या प्रश्नाने भानावर येत ती 'जेवताना बोलू' असं म्हणाली आणि ते दोघे एका मस्त महाराष्ट्रीय थाळी मिळणाऱ्या हॉटेलमध्ये जेवणाचा आस्वाद घ्यायला गेले.

भरपेट जेवण झाल्यानंतर त्याची खवय्येगिरी माहीत असल्याने तिने स्वतःहून, 'ए आपण पान खाऊयात का?' असं विचारलं. त्यावर तो प्रचंड खूश होत म्हणाला, 'नेकी और पुछ पुछ?' तो पटकन शेजारीच असणाऱ्या टपरीवरून दोघांसाठी मगई जोडी घेऊन आला आणि पान खाऊन पुन्हा उर्वरित गप्पांना सुरुवात झाली.

कसे काय आपण भेटल्यापासून सगळ्या चॅट्स आणि फोनवरच्या आठवणींना उजाळा देत असताना सूर्य कधी मावळतीला आला याची दोघांना जाणीवच नव्हती.

तेवढ्यातच तिला चहाची तल्लफ आल्याने ते दोघं जवळच्याच एका टपरीवर दोन कटिंग मारायला गेले. हातात चहाचा वाफाळता कप, रम्य संध्याकाळ आणि सोबतीला तो! काळ पुढे सरकूच नये असं तिला मनोमन वाटतं होतं; पण कितीही नको म्हटलं तरी निरोपाचा तो क्षण जवळ येतोय याची जाणीव तिला होतीच.

चहा घेतल्यावर सकाळपासून तिच्या पर्समध्ये दडवून ठेवलेलं गिफ्ट आणि ग्रीटिंग त्याच्या पुढ्यात देत ती म्हणाली, 'हे तुझ्यासाठी. बघ आवडतयं का?' 'अगं, याची काय आवश्यकता होती? तू पण ना... वेडीच आहेस,' असं म्हणत त्याने तिच्याचसमोर ते गिफ्ट उघडलं आणि पाहतो तर आतमध्ये त्याचं फेव्हरेट परफ्युम... अरमानी कोड! सोबत तिने स्वतः बनवलेलं ग्रीटिंग... त्याच्या चेहऱ्यावरचा आश्चर्यमिश्रित आनंद पाहून ती मनोमन सुखावली.

'मीपण तुझ्यासाठी एक गंमत आणली आहे हां,' असं म्हणत त्याने खिशातून एक छोटीशी डबी काढून उघडली, त्याच्यातले दोन टपोऱ्या मोत्यांचे कानातले पाहून ती खूप खूश झाली. त्या मोत्यांसारखीच चमक तिच्या डोळ्यांतही त्याला दिसत होती.

गिफ्ट्स वगैरे देऊन झाले. आता लवकरच घरी परत जावं लागणार हे दोघांच्याही मनाला मान्य नव्हतं; पण इलाजही नव्हता. एवढे महिने फोन, मेसेजस्मधून बोलणारे आपण दोघे आज भेटलो आणि जणू जगाला विसरूनच गेलो. अख्खा दिवस एकमेकांसोबत व्यतीत केला. किती छान वाटतंय, पण आता निरोप घ्यावाच लागणार.

निरोप घ्यायचा, पण पुढच्या भेटीच्या वचनासोबत असं ठरवून दोघेही आपापल्या घराच्या दिशेने मार्गस्थ झाले. रिक्षात बसल्या बसल्या नकळत ती गुणगुणू लागली,

'ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी.....भेटीत तुष्टता मोठी!'

–चिन्मयी पंडित

बेंगलोर, भारत
chinpop2008@gmail.com

मुक्या वेदनांचे वेटोळे

चार भिंतींच्या आत असो की
सताड मोकळ्या सडकेने
सुरक्षिता कुठे नामशेष झाली
गल्ली चौकाच्या रस्त्याने ।।

झपाटलेल्या सडकांवरून
भटकत रहावे अनंत यातना
सहन करत तिने, उद्रेक होतो
अतिमानुषतेचा, किती कळस गाठला
नीच्चतेचा अन् क्रूरतेचा ह्या नरभक्षकाने ।।

थोडंसं गंभीर व्हायचं
वर्तमानपत्रातल्या हेडलाइननं चारचौघात
दुःख व्यक्त करायचं, परत जैसे थे
सारं काही कॉमन झालं मॅन
रोज एक तासात घडणारे चार बलात्कारही ।।

खरखरत्या छातीवर बरबटले
असेन मुसंडी मारून तिला लिंगपिसाटानी तर
तिने मात्र न्यायव्यवस्थेला धक्काही देऊ नये
आंधळेपणाची पट्टी बांधली आहे
न्यायदेवतेने ।।

सरतेशेवटी सरतं सगळं
संपतो श्वास तिच्यातला....
तरीही पेटत नाही ठिणगी कुणाच्या दिमाखात
तो मातीमोल देह सरणावर पेटत जातो
ग्वाही देत परत परत ह्याच सरणावर निष्पाप जीव
भरडला जाईल म्हणत राख होतो....।।

– कोमल प्रकाश मानकर

वर्धा , भारत
mankar123komal@gmail.com

रामरावांची स्वारी आज भलतीच खुशीत दिसत होती. घरातपण एकदम चैतन्याचे वारे संचारले होते, रामरावांच्या सौ.ने जी जय्यत तय्यारी केली होती, ती दिवाळसणालासुद्धा लाजवणारी होती. अंगणात (म्हणजे घरासमोरील 'रस्त्यावर') काढलेली भलीमोठी रांगोळी, दारावर लावलेली तोरणे, घरभर पसरलेला धूपबत्तीचा सुवास, मिठाईची रेलचेल, रामरावांना शुगर, गोड खायला वर्ज्य होतं तरी आज ती मिठाई किचनमध्ये मस्त थाटात पडली होती. रामराव सारखे त्यांच्या गॅलरीत हाताची मागे घडी घालून येरझाऱ्या मारत होते आणि सारखे आपल्या घरासमोरील कॉर्नरकडे बघत होते. चिंताग्रस्त दिसत होते. तेवढ्यातच त्यांना नको असलेल्या श्री. म्हैपतरावांचे आगमन झाले. श्री. म्हैपतराव म्हणजे रामरावांच्या पारंपरिक शत्रू. म्हैपतरावांच्या आणि रामरावांच्या स्वभावात एकमेकांबद्दलचे 'वैर' ह्याखेरीज काहीही सामाईक नव्हते. मागच्याच उन्हाळ्यात रामरावांच्या घरी त्यांच्या ऑफिसातले एक बडे साहेब आले होते. त्यांचा पाहुणचार जर व्यवस्थित झाला तर 'आपली पगारवाढ नक्की' ह्या विचाराने रामरावांनी 'त्यांच्या पाहुणचारात कसलीही कसर ठेवणार नाही' असा पण केला होता. साहेब सपत्नीक सकाळी १० वाजता येणार होते. 'सपत्नीक' म्हटल्यावर त्यांनी दुपारचे १२ वाजवले यायला. वातानुकूलित गाडीतून साहेब आले. रामरावांच्या घरात ना एसी ना कुलर. एव्हाना साहेबांच्या अंगाला घामाच्या धारा लागल्या होत्या. रामरावांनी साहेबांना आजच काढलेल्या नवीन चकाकत्या ग्लासमधून पाणी दिले. साहेबांनी दोन घोट घेतले आणि रामरावांकडे असा काही दृष्टिकटाक्ष टाकला की रामरावांच्या तोंडचे पाणीच पळाले.

साहेबांच्या सौ.ने आमच्या ह्यांना बर्फ असलेलं सरबत लागतं, अशी माहिती पुरवली; पण रामरावांकडे तर फ्रिज नव्हते. रामराव

इंटरनेट आणि काटकोन त्रिकोण..!

दिवसेंदिवस परशा असा काही मग्न झाला त्या कॉम्प्युटरच्या विश्वात. त्याने मैदानाचे तोंड शेवटचे कधी पाहिले हेही त्याच्या स्मरणात नसावे.. रामरावपण इंटरनेटच्या विश्वात रमले होते. परशाने त्यांना स्मार्ट फोनपण घेऊन दिला होता. आत्ता बापलेक समोरासमोर कमी आणि 'व्हॉट्सअप' वरच जास्त बोलत होते. ज्या रामरावांना 'युट्युब'चा आणि आपल्या घरातल्या tube चा तिळमात्र संबंध नाही' हे पेटवायला परशाला अर्धा तास लागला होता तेच रामराव आत्ता तासन्तास 'युट्युब' वरचे व्हिडीओ बघण्यात घालवत होते. हे बापलेक सकाळी उठल्यावर फेसबुकवर 'पोस्ट' आधी करायचे अन् नंतर दातांना 'पेस्ट' करायचे.

विचारात पडले की, बर्फ आणावा तरी कुठून? (मनात) अरेच्चा! म्हैपतरावांकडे तर फ्रिज आहे; पण हे काम उंदराने मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्यासारखे कठीण होते; पण त्या दिवशी त्यांना फक्त त्यांचा वाढणारा पगार दिसत होता. ते सरळ घरातून निघाले आणि म्हैपतरावांना बर्फासाठी 'थंड' डोक्याने आर्जव केली, पण म्हैपतरावांनी, अहो, आमच्या हिने बर्फ करायच्या साच्यात पाणीच भरले नाही हो! अशी थाप मारून ती विनंती लाथाडली होती. रामरावांना त्यांच्या थापा लक्षात आल्या अन् त्या बर्फामुळे परत एकदा शीतयुद्ध पेटले होते. शेवटी बिनाबर्फाच्या 'सरबता'ने साहेबांची 'सरबराई' केली.

अहो रामराव..!!! म्हैपतरावांनी मोठ्याने थोबाड वासाडले.

तेव्हा रामराव विचारतंद्रीतून बाहेर आले.

तुम्ही लै चिंतेत दिसताय, एवढ्या येरझाऱ्या मारून तुमच्या मनातील प्रश्न सुटेल का हे मला माहीत नाही, पण तुमच्या 'सुटलेल्या' पोटाचा प्रश्न नक्की सुटेल, असं म्हणून त्यांचं ते सैतानी हास्य त्या प्रसन्न वातावरणाचा अंत करू पाहत होतं..

रामरावांनी 'गरम पोह्यातल्या कडीपत्त्या'कडे जसं आपण दुर्लक्ष करतो तसं त्यांनी म्हैपतरावांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

कशाची वाट पाहताय एवढी? जास्त वाट पाहणे तुमच्यासारख्या शुगर असलेल्या माणसाला धोकादायकच..! असं जेव्हा ते बरळले. तेव्हा रामरावांनी स्वतःला आलेला राग गटागट गिळून.. त्यांना ते कसं, असं विचारल्यावर,

क्यों की सब्र का फल हमेशा मिठा होता है..! म्हैपतराव बत्तिशी दाखवत हसत सुटले आणि त्यांना पाहून रामरावांना त्यांच्या बत्तिशीची 'ऐशी तैशी' करण्याचे विचार रेंगाळू लागले. तेवढ्यातच त्यांचे लक्ष घराच्या बाहेर गेले आणि पाहतात तर.. त्यांचा परशा (प्रशांत) ऑटोरिक्षातून बाहेर डोकावत अण्णा अण्णा.. अशी हाक देत होता. ते दृश्य पाहून राम वनवासाहून परतल्यावर अयोध्यानगरीतील प्रजेची जशी अवस्था झाली होती अगदी तशीच अवस्था ह्या रामाची झाली होती..जॉन अब्राहमच्या चेहऱ्यावर अभिनयाची रेषा उमटली आणि ती मायबाप रसिक प्रेक्षकांनी पाहिली तेव्हा त्यांना जेवढा आनंद होईल त्यापेक्षा जास्त आनंद आज रामरावांना झाला होता..त्यांचा हा आनंद पाहून म्हैपतरावांची मात्र दैना झाली होती..त्यांची अवस्था इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात वनडाऊनला पाठवल्यावर 'आशीष नेहरा'ची जशी व्हावी अगदी तशीच झाली होती.

रामरावांनी हाक मारली, अगं, ऐकतेस का? परशा आला बघ.

त्यांच्या सौ. हे ऐकल्यावर गोठ्यातून दावणीला बांधलेली जशी म्हैस सुटते तशा किचनमधून सुटल्या होत्या..

हॉलमध्ये येऊन चातक पक्षी जसा पावसाच्या प्रतीक्षेत आकाशाकडे बघतो अगदी त्याच नजरेने त्या आपल्या वंशाच्या दिव्याला पाहत होत्या..

ऑटोरिक्षा घरासमोर आली. परशा एक भला मोठ्ठा कॉम्प्युटर घेऊन घरात शिरत होता. तेवढ्यात त्याच्या मातोश्रीने त्याला अडवलं आणि आपण घरात गणपती जसा आणतो अगदी तशीच पूजा कॉम्प्युटरची केली. सगळे सोपस्कार पार पडले. कॉम्प्युटर शेवटी एका रूममध्ये विसावला. त्या दिवशी रामरावांनी सगळ्या गल्लीत पेढे वाटले व ते पाहून म्हैपतरावांचे तोंड कडू पडले हे आत्ता वेगळे सांगायची गरज नाही..

परशा कॉम्प्युटरच्या सगळ्या सेटिंग करत होता आणि त्याचे आईवडील आपला मुलगा एडिसन असल्यासारखा कौतुकाने

तिचा मेकअप

तिचा मेकअप म्हणजे असते पूर्ण सोवळं
मग आमच्याच अंगावर खेळती पोरंबाळं।

तिचा मेकअप चालू असतो निरंतर
दिलेल्या वेळेत नेहमीच पडते अंतर।

तिचा केशभार नेटका असतो फुललेला
फवारणीनंतर जसे सुगीचे दिवस पिकाला।

तिच्या ओठांचा होतो बऱ्याचदा चंबू
जेव्हा लिपस्टिकचे थर लागती लिंपू।

प्रत्येक ग्लासाला मिळतात गुलाबी ठसे
शेवटी ओठांवर उरते लिपस्टिक कसेबसे।

तिच्या गालावर लाली चढता विचारीन म्हणतो
लालीच पाहिजे का स्वस्त गुलालही चालतो?

बाहेर डोळे मोठे करण्या आय लायनर लागतो
माझ्यावर मात्र डोळा नुसता वटारून मोठा होतो।

तिच्या अंगावर दागिन्यांची रेलचेल इतकी होते
मग मलाच माझ्या श्रीमंतीचे कोडे पडते।

शृंगाराचा शेवटचा अंक नेहमी ठरलेला असतो
कशी दिसते? याला आमचा कबुलीजबाब असतो!

- राहुल करुरकर
रिकमन्सवर्थ, युनायटेड किंग्डम
karurkar@yahoo.com

त्याच्याकडे पाहत होते..

ते सगळं सुरू असताना म्हैपतराव असे काही गायब झाले होते जसे निवडणुकीनंतर लोकप्रतिनिधी..!

हचच्या जाहिरातीतला तो कुत्रा जसा त्या लहान मुलाच्या मागे तो जिथे जाईल त्याच्यामागे जातो तसं कॉम्प्युटर आला म्हणजे इंटरनेट आलेच..

परशाने सगळ्या सेटिंग्ज केल्या आणि त्याने वळून त्याच्या अण्णांकडे (रामरावांकडे) पाहिलं. एकूणच ते सगळं वातावरण इस्रोने सॅटेलाइट लाँच करायच्या वेळी जसं असतं अगदी तसंच होतं. अण्णा म्हणजे सीनियर वैज्ञानिक व परशा ज्युनियर वैज्ञानिक असल्यासारखे एकमेकांना सांकेतिक भाषेत बोलत होते व रामरावांच्या सौ. संरक्षणमंत्र्यासारख्या फक्त बघत होत्या. शेवटी परशाने पासवर्ड टाकून सॅटेलाइट लाँच करत असल्यासारखे एंटर बटन दाबले आणि होमस्क्रीन उघडली तसा घरात एकच जल्लोष. 'लगान' चित्रपटामध्ये जेव्हा भुवनची टीम जिंकते तेव्हा भारतीय कमेण्टेटर 'हम जित गये' असं म्हटल्यावर तेथील जनतेने जो काही गोंधळ घातला अगदी तसाच!

त्यांचा तो काटकोन त्रिकोण असलेला परिवार आनंदात न्हाऊन निघाला आणि त्या काटकोनातील दानशूर 'कर्णा'ने (रामरावांनी) सगळ्या शेजाऱ्यांना बासुंदी पाजली.

नंतर सुरू झाले परशाचे प्रौढ वर्ग. विद्यार्थ्यांमध्ये दस्तुरखुद्द रामराव होते. सगळ्यात आधी परशाने त्यांना सगळ्या सोशल मिडीया वेबसाईट्स जसे फेसबुक, व्हॉट्सअप, जिमेल, ऑर्कुट, बोरकुट (बोरकूट म्हणजे इत्यादी) बद्दल थोडक्यात सारांश पद्धतीने सांगितले.

नंतर सुरू झाले रामरावांचे प्रश्न आणि परशाची उत्तरे..

परशा एकदम 'सिद्ध' व 'सात्त्विक' मुनींसारखा बसला होता आणि त्याच्या शिष्याच्या सर्व समस्यांचे निराकरण करणे हे त्याला त्याचे परमकर्तव्य आहे असे वाटत होते आणि रामरावपण जिज्ञासू वृत्तीने त्याच्यासमोर बसले होते.

परशु (लाडात), फेसबुक 'अप्पा बळवंत चौकात' मिळेल ना रे, का आपल्याला ते मुंबईहून मागवावे लागेल? रामरावांनी करुणामय चेहऱ्याने विचारले.

त्या धक्क्याने सावरत परशा म्हणाला, अहो अण्णा, ती एक वेबसाइट आहे व ती इंटरनेटवर उपलब्ध आहे.

प्रश्नार्थक चेहऱ्याने अण्णा– कित्ती पानांचं पुस्तक आहे ते?

परशाला तिथून पळतापण येत नव्हतं. त्याची अवस्था चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी झाली होती.

तसं नाही हो अण्णा, ते पुस्तक नाही, ते एक मित्र जमवण्याचे साधन आहे. परशाने केविलवाण्या चेहऱ्याने सांगितले.

फेसबुकवर बोलताना परशाच्या तोंडाला फक्त 'फेस' यायचा बाकी राहिला होता.

दिवसेंदिवस परशा असा काही मग्न झाला त्या कॉम्प्युटरच्या विश्वात. त्याने मैदानाचे तोंड शेवटचे कधी पाहिले हेही त्याच्या स्मरणात नसावे.. रामरावपण इंटरनेटच्या विश्वात रमले होते. परशाने त्यांना स्मार्ट फोनपण घेऊन दिला होता. आत्ता बापलेक समोरासमोर कमी आणि व्हॉट्सअप वरच जास्त बोलत होते. ज्या रामरावांना 'युट्युब'चा आणि आपल्या घरातल्या ट्युबचा तिळमात्र संबंध नाही' हे पेटवायला परशाला अर्धा तास लागला होता तेच रामराव आत्ता तासन्तास युट्युब वरचे व्हिडीओ बघण्यात घालवत होते. हे बापलेक सकाळी उठल्यावर फेसबुकवर 'पोस्ट' आधी करायचे अन् नंतर दातांना 'पेस्ट' करायचे.

हसतंखेळतं कुटुंब आत्ता जेवायलासुद्धा एकत्र विरळच बसायचे. अरे, अमक्याने माझी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली नाही. तमक्याने मला टॅग केले नाही. थांब, मी त्याला Block करतो असे कलहाचे विषय सुरू झाले..

परशाने आईलापण शॉपिंगच्या ऑनलाइन दुनियेत आणलं. त्याने तिला फ्लिपकार्ट, मिंत्रा, अमेझॉन ह्या वेबसाइट्स दाखवल्या होत्या व त्यामुळे अण्णांचं दिवाळीच्या आधीच दिवाळं निघणार होतं. इंटरनेटमुळे सगळे जग जवळ आले होते, मात्र घरातली माणसं खूप दुरावली होती.

त्या काटकोन त्रिकोणाच्या तीन बाजू तीन समांतर रेषा झाल्या होत्या, कधीच न मिळणाऱ्या!

– आकाश बाबूराव कोकाटे
सांगवी, नांदेड, भारत
kokateakash@gmail.com

जखम जिव्हारी

आज मनावर ठसठसणारी
जखम जिव्हारी भळभळते
क्षणात पडता खपली
काजळी जखम जहरी चुरचुरते
द्विधा अवस्थेतूनी जहरी
नाग मनाचा डोलावी
फूत्कार सोडूनी सरपटत
बिळात घुशी तो विषारी!!!

– चंद्रकांत बसोले
कलोन, जर्मनी
chandu.basole@gmail.com

दिवस ऊन पावसाचे



मला तो दिवस आजही आठवतो जेव्हा मी माझी पहिली–वहिली नोकरी करण्यासाठी पुण्याला निघालो होतो आणि मला निरोप द्यायला माझे आई–वडील, मावशी–काका, आतेभाऊ, मामेभाऊ (सागर), चुलत भाऊ असा फौजफाटा होता. माझ्या माऊलीने तर गंगाजमुनेला डोळ्यांतून वाट मोकळी करून दिली. हे पाहून मलापण खूप गहिवरून आलं होतं. मग पुण्याला जाणारी बस लागली आणि मी सगळ्यांचा निरोप घेऊन जड पावलांनी बसमध्ये चढलो. हा सीमेवर लढायला चाललाय की काय असे सहप्रवाशांचे चेहऱ्यावरील हावभाव त्या बसमधील पिवळ्या मंद प्रकाशात मी अचूक टिपले. खिडकीतून नातेवाईकांना हात हलवताना माझ्या मनात हॉलिडे चित्रपटाचं 'नैना अश्क ना हो..' हे गाणं निनादत होतं आणि त्या गाण्यातले आपण परिस्थितीजन्य का होईना, पण अक्षयकुमार होण्याची भावना मनाला एक वेगळंच समाधान देऊन जात होती.

मुलगी जेव्हा पहिल्यांदा सासरी जायला निघते तेव्हा तिच्यासोबत जशी पाठराखीण पाठवतात तसं माझ्यासोबत माझा मामेभाऊ सागरला पाठवलं होतं. सागर माझा मामेभाऊ कमी आणि जिवलग मित्र जास्त आहे. आम्ही दोघांनीपण एकमेकांचे चांगले–वाईट दिवस खूप जवळून पाहिले होते. गाडीने वेग धरला तशा आमच्या गप्पांची मैफल सुरू झाली.

मी: अरे यार सागर, मी एवढ्या प्रतिष्ठित कॉलेजमधून B.Tech पूर्ण केलं आणि फक्त ६००० रु. पगाराची नोकरी करणार. मला तर लै टेन्शन येतंय. लोक काय म्हणतील?

सागर: (एकदम गंभीर स्वरात) हे बघ आकाश, तू 'जगा'चा विचार करू नको, बिनधास्त तांब्याने पाणी पी.

आणि टाळी देत हसत सुटला आणि मीही 'दुसरा काही पर्याय नसल्यामुळे' हसण्यात सामील झालो.

परत गप्पा सुरू झाल्या.

मी: सागर, जगाहून आठवलं. जगात पाणी नसेल तर आपण काय म्हणायला पाहिजे?

सागर: (जास्त विचार न करता) काय?

मी: जग सुना सुना सुना लागे रे.

परत हशा पिकला.

सागर: अरे हो, सुनाहून आठवलं. सध्या बॉलिवूडमध्ये 'सासू'वरचं गाणं खूप गाजतंय..!

मी: (चमत्कारिक उत्तराची अपेक्षा असल्याने जास्त विचार न करता) कोणतं रे?

सागर: सास मे तेरी सास मिली तो मुझे सास आई। मुझे सास आई।

परत हास्यकल्लोळ.

मी: अरे, ह्या गाण्यात आईपण आहे. विशेष म्हणजे सुनेने (कतरिना कैफ) दोघींनापण गाण्यात स्थान देऊन सुवर्णमध्य साधला आहे.

सागर: ॲण्ड व्हील स्मार्ट सुनबाई अवॉर्ड गोज टू कतरिना बाई.

हसण्याचा आवाज द्विगुणित झाला आणि आमच्या बाजूच्या सीटवर बसलेल्या मावशींनी आम्हाला तुंबलेल्या म्हशीसारखं बघितलं. तरीही आम्ही हसतच होतो.

असा आमचा 'सफर' सुरू होता आणि रस्त्याच्या दुरवस्थेमुळे हा सफर इंग्रजीतल्या सफर (Suffer) मध्ये परिवर्तित झाला होता.

ह्या गप्पांमुळे मनावर आलेले निराशेचे मळभ हटले होते.

गप्पा मारता मारता कधी डोळा लागला कळलंच नाही.

सकाळी ७:३० वाजता आम्ही पुण्यनगरीत पोहोचलो आणि पुणेरी अपमान पचवण्याची मनाची तय्यारी केली.

आम्ही माझ्या इंजिनिअरिंगच्या वर्गमित्रांकडे थांबलो होतो.

त्या मित्रांपैकी एक जण कॉलेजला असताना सगळ्यांना व्हिडीओ गाणी, मुव्हीज् डाऊनलोड करून द्यायचा, त्यामुळे आम्ही त्याचं नाव डाऊनलोडर ठेवलं होतं.

त्या आमच्या बेशिस्त मित्राने जेल लावून केसांना मात्र बरोबर शिस्त लावली होती.

आम्ही ज्या मित्राकडे गेलो होतो त्या मित्राच्या १ बीएचके फ्लॅटमध्ये ९ जण राहत होते. दुपारी जेवण केल्यानंतर सर्व जण असे काही झोपले होतो की, तो फ्लॅट कमी आणि निर्वासितांची छावणी जास्त वाटत होती.

शेवटी तो दिवस उजाडलाच. माझा पहिला दिवस ऑफिसमध्ये जाण्याचा. मी तेव्हा शिवाजीनगरला मित्राकडे होतो आणि माझी कंपनी हडपसरला होती. त्यामुळे सकाळी जरा लवकरच उठलो. त्या फ्लॅटवर आंघोळीला नंबर लावणे हे नोटाबंदीच्या काळात एटीएममधून पैसे काढण्याहून अवघड होते. तरी ते दिव्य मी लीलया पार पाडलं.

सागर त्याच्या मित्राकडे गेला आणि मी हडपसरला जाण्यासाठी निघालो. शिवाजीनगरहून एकही बस हडपसरला जात नव्हती. १० मिनिटांनी मी एका गृहस्थाला विचारलं तर त्याने सांगितलं, आज पालखी सोहळा आहे. त्यामुळे शिवाजीनगरहून बस नाही मिळणार. तुम्हाला म.न.पा.ला जावं लागेल. तिथून बस मिळेल अथवा तुम्ही ऑटो रिक्षा करूनपण जाऊ शकता.

ऑटोरिक्षाचा प्रवास खिशाला परवडणारा नव्हता. त्यामुळे मी बसने म.न.पा.ला गेलो आणि तिथून हडपसरला पोहोचलो..

कंपनीचा पत्ता विचारत विचारत एक सोसायटीमध्ये पोहोचलो. पत्ता तंतोतंत जुळत होता; पण कुठेही कंपनीचा बोर्ड दिसत नव्हता. मी तिथे बऱ्याच जणांना त्या कंपनीबद्दल विचारलं, पण कोणालाच माहीत नव्हतं. शेवटी एक व्यक्ती मला दिसला. त्याची देहयष्टी ही 'कुंग फु पांडा'मधील पांडासारखी होती आणि दिसायला एवढा काळाकुट्ट की कलर गेला तर पैसे वापस. मी घामाने डबडबलेला होतो. मी हातरुमालाने घाम टिपत त्या व्यक्तीला अडवलं आणि विचारलं.

मी: एक्सक्यूज मी काका, तुम्हाला ही कंपनी कुठे आहे माहिती आहे का? पत्ता तर इथलाच आहे, पण कुठे बोर्ड दिसत नाहीये कंपनीचा.

तो गृहस्थ: (एका अपार्टमेंटच्या दिशेने बोट दाखवत) हीच आहे ना. नवीन जॉईनी आहेस का?

मी: हो.

तो गृहस्थ: चल मग माझ्यासोबत.

असं म्हणून तो मला त्या अपार्टमेंटच्या चौथ्या मजल्यावर घेऊन गेला. लिफ्ट नसल्यामुळे चालत जावं लागलं.

शेवटी मला त्या कंपनीचा बोर्ड (बोर्ड म्हणण्यापेक्षा त्याला 'पाटी'च म्हटलेलं बरं. कारण, ती 'सुविचाराच्या पाटी'लाही लाजवेल एवढी छोटी होती.) आणि त्या पाटीवर कंपनीचं नाव सोडून बाकी काही वाचायचं असेल तर भिंग वापरण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

मी आत प्रवेश केला तर तेथे २ रूम होत्या. एका रूममध्ये दोन संगणक आणि एका संगणकावर तीन असे सहा जण बसले होते आणि दुसऱ्या रूममध्ये तीन कंपार्टमेंट होते. एकावर लिहिलं होतं एचआर, दुसऱ्यावर लिहिलं होतं अकाऊंट्स आणि तिसऱ्यावर लिहिलं होतं मॅनेजिंग डायरेक्टर (एमडी).

जो गृहस्थ मला वर घेऊन आला होता त्याने सगळ्यांना एकत्र जमवले आणि म्हटले 'गुड मॉर्निंग फ्रेंड्स, ही इज द न्यू जॉईनी.' तेव्हा सगळे जण 'निर्विकार' चेहरा करून माझ्याकडे पाहत होते. जणू ते म्हणत होते की, कशाला आलास रे?

त्यानंतर तो गृहस्थ माझ्याजवळ बसला. मी त्यांना विचारलं, तुम्ही इथं काम करता का?

त्यावर तो जोरात हसला आणि म्हणाला, मीच ह्या कंपनीचा एम.डी. आहे. तेव्हा मला वाटत होतं की, कोणी तरी मला उठवेल अरे. उठला नाही का अजून, ऊठ ऑफिसला नाही जायचं का? आणि मी खूश होईल की, अरे, हे तर स्वप्न होतं; पण तसं काही नव्हतं. मी स्वतःला चिमटा घेतला. तर तो चिमटा एवढा जोरात बसला की, पुढचे दोन दिवस माझ्या मनाप्रमाणे होत पण दुखत होता.

मग त्यांनी मला कंपनीची पॉलिसी सांगितली. पहिले तीन महिने बिनपगारी काम करावं लागेल, गरज पडली तर मार्केटिंगपण करावी लागेल. अशा जाचक अटींची शृंखलाच सुरू झाली. तरीही मी मनाचा पक्का निश्चय केल्यामुळे सगळ्या अटी मान्य केल्या. तेवढ्यात लंच ब्रेक झाला. जेवण झाल्यावर तो (एमडी) माझ्याजवळ आला आणि पाणी पीत मला त्याने विचारलं की, तुझ्याकडे पासपोर्ट तर असेलच ना? मला दिवसा तारे दिसले. मी भीतभीतच म्हटलं, नाही सर! हे ऐकल्यावर त्याची रिॲक्शन अशी होती जशी मी त्याला डांबरमॅन म्हणालो. अरे, असं कसं करता तुम्ही. जा पहिल्यांदा पासपोर्ट काढून या आणि नंतर जॉइन करा. मीही जास्त आढेवेढे न घेता तिथून निघालो ते मनाचा निर्धार करूनच.

पहिला दिवसच शेवटचा ठरला होता. आई-पप्पाचे मला निरोप देतानाचे चेहरे नजरेसमोरून हटत नव्हते. मनात विचारांचे काहूर माजले होते. घरी परत कसा जाऊ? काय सांगू जाऊन? वगैरे वगैरे..

पिकलं पान

धरून ठेवनं, पिकल्या पानाले
झाडाचे काम नाही ।
केव्हा? कसं? गळून पडेल
याचा आता नेम नाही ।। ध्रृ ।।

हिरवी पालवी - नवी आशा
ताठर पान - नवी दिशा
फांदीचं फळ - अभिलाषा
फूल म्हणजे - एक नशा

पिकल्या पानाला, झाडावरती
काहीच आता दाम नाही ..।
केव्हा? कसं? गळून पडेल
याचा आता नेम नाही ...।। १ ।।

अनुभव अधिक - पिकल्या पानाला
ध्यास एकच - फुलवावं झाडाला
आपलेच मानतो - खोडाच्या घावाला
जीवनाचा रस - झाडाला दिला

आपल्याचसाठी जगलं पान
झाडाचे मत ठाम नाही ...।
केव्हा? कसं? गळून पडेल
याचा आता नेम नाही ।। २ ।।

काळ बनून येईल वारा
फांदी सोडेल वेळ साधून
पडतानाही गिरकी घेईल
पाहण्या झाड अधूनमधून

असल्या थोर पिकल्या पानाचं
मरण आता लांब नाही ...।
केव्हा? कसं? गळून पडेल
याचा आता नेम नाही ।। ३ ।।

- संदीप शामराव गावंडे
९८५०३२७७१९
बुलढाणा, भारत
sandip.gawande15@gmail.com

बस स्टँडवर आलो हडपसरच्या तर शिवाजी नगरला जायला एकही बस नव्हती.. पालखीमुळे. खिशातून मोबाइल काढला सागरला कॉल करावा म्हणून तर फोन ड्रे्ड. करावं तरी काय. काही सुचत नव्हतं. मला नंबर पाठ होता त्याचा. म्हणून एकाला विनंती करून त्याचा मोबाइल वापरून त्याला कॉल केला आणि म्हटलं, आपल्याला निघायचं आहे आजच. तोही अवाक् झाला; पण तेवढा वेळ नव्हता सगळं सांगायला. मी फक्त त्याला म्हटलं, मी शिवाजी नगरला येतोय. तू थांब बसस्टँडबाहेर. बस. एवढंच बोलणं झालं. मग एक रिक्षा केली. तो म्हणाला, सगळे मुख्य रस्ते ब्लॉक आहेत. आपल्याला गल्लीबोळातून जावे लागेल. मी निःशब्द झालो होतो. मी फक्त मान डोलावली.

तो मला घेऊन निघाला. शिवाजीनगरला पोहोचलो तर संपूर्ण रस्ता वारकऱ्यांनी फुलून गेलेला आणि विठू माऊली कृपेने मला सागर दिसला. तो पालखीची नयनरम्य दृश्ये त्याच्या नव्या मोबाइलमध्ये कैद करत होता. मी हाक मारली आणि त्याला भेटलो. काय बरं वाटत होतं. मग मी त्याला सर्व कहाणी सांगितली. त्याने मला घरी कळवायला सांगितले; पण मला भीती वाटत होती की, घरचे कसे रिॲक्ट करतील.. पण मी तेव्हा हिम्मत केली आणि घरी सगळा इतिवृत्तान्त सांगितला.

तेव्हा वडिलांनी मला एवढंच सांगितलं की, अरे, नाराज होऊ नकोस. हा तुला भेटलेला शेवटचा चान्स होता का? अशा खूप संधी मिळतील तुला आणि तुझ्या नशिबात याहून चांगलं लिहिलं असेल. तू टेन्शन घेऊ नकोस. बिनधास्त घरी ये आणि खाऊन घ्या काही तरी. हॅलो, ऐकतोयस ना आकाश? हॅलो!

मला काहीही बोलता येत नव्हतं. मी अश्रू रोखू शकलो नाही. 'हो!' एवढंच म्हणून मी फोन ठेवला.

आणि सागरला आपण रडलोत हे कळू नये म्हणून रुमालाने अश्रू टिपूनच त्याच्याकडे गेलो. त्याने पण लगेच ओळखलं; पण त्याने विषय बदलला.

सागर: काय मस्त आहे ना इथलं वातावरण. एकदम भक्तिमय.

मी मान डोलावली.

सागर: (मला बोलतं करण्यासाठी) तुला माहीत आहे का, बॉलिवुडची सगळ्यात विठ्ठलभक्त अभिनेत्री कोणती?

मी: (मिस्कील हसत) कोण?

सागर: अरे, असं काय करतोस.. तुझी आवडती अभिनेत्री.. जेनेलिया..!

मी: काही तरीच काय रे..

सागर: अरे हो.. ती गाण्यात म्हणते ना.. 'मैं वारी जावा.. मैं वारी जावा'.

जोरात टाळी देत हसत सुटतो आणि मीही त्यात सामील होतो.

- आकाश कोकाटे
सांगवी, नांदेड, भारत
kokateakash@gmail.com

पारंपरिक आहार : शोध आणि बोध

महाराष्ट्रीय पारंपरिक आहार म्हटलं की, छानसं वाढलेलं ताट, डोळ्यांना, नाकाला आणि पोटालाही सुखावणारं समोर येतं! ताज्या भाताचा सुवास, लोणकढ्या तुपाचा छान वास आणि आमटीतल्या कढीलिंबाचा खमंग वास, गरम गरम भाकरीचा आणि चविष्ट भाजीचा वास अशा सुगंधांनी स्वयंपाकघर भरून गेलेलं जाणवतं! हे ताट दिसतंही किती सुंदर! छान रंगसंगती साधलेली दिसते. पांढऱ्या भाताची मूद, त्याच्यावर पिवळंधम्मक वरण, हिरवी चटणी, तांबड्या भोपळ्याचं भरीत, मोडाच्या मटकीची तपकिरी उसळ... किती वैविध्य!

आपला महाराष्ट्रीय पारंपरिक आहार संपूर्ण जगात सर्वोत्कृष्ट आहार म्हणून नावाजला जातो. शास्त्रीय दृष्टिकोनावर आधारित असल्यामुळे, आपल्या आरोग्यासाठी आवश्यक सर्व अन्नघटक, सुयोग्य प्रमाणात या आहारातून मिळतात. अमेरिकन डायेटेटिक असोसिएशन आणि नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ न्युट्रीशन एन् आय एन् यांच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे अन्नघटकांचा समतोल म्हणजेच, कार्ब्ज ५५%, प्रोटीन्स १५–२०% आणि फॅट्स २५–३०% आपल्या आहारात दिसतो. प्राचीन आयुर्वेदात आहाराचा सखोल अभ्यास दिसतो. चरकसूत्र आणि सुश्रुताचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथात आहाराबद्दल विस्तृत माहिती दिली आहे. काय खावं? काय खाऊ नये? अन्नावर संस्कार कसे आणि किती करावेत याबद्दल मार्गदर्शन मिळते.

पूर्वीच्या काळी घरातल्या सगळ्यांनी एकत्र जमून, खाली पाटावर बसून जेवायची पद्धत होती. मांडी घालून बसून जेवल्यामुळे आवश्यक तेवढ्याच प्रमाणात खाल्लं जातं आणि खाल्लेल्या अन्नाचं पचनही व्यवस्थित होतं. जेवणाआधी सर्वांनी एकत्र प्रार्थना म्हणण्याची प्रथा होती. त्यामुळे वातावरण शांत, प्रसन्न होत असे. शांत, एकाग्रचित्ताने खाण्यापिण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे, पाचकरस योग्य प्रमाणात स्रवतात. पदार्थांचं पचन होऊन, अन्नघटकांचं अभिशोषण व्यवस्थित होत असे.

सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आहे आपली ताट वाढायची पद्धत! अतिशय विचारपूर्वक, नियोजनबद्ध रीतीने ताट वाढलं जातं. कार्ब्ज आणि एनर्जी देणारे मुख्य पदार्थ म्हणजे भात, भाकरी/पोळी पोटभर खायचं असल्यामुळे ताटात मधोमध वाढलं जातं. डाव्या बाजूला असे पदार्थ वाढले जातात जे थोडेच खाणे अपेक्षित आहे. शेंगदाणे, तीळ, खोबऱ्यातून आवश्यक फॅटी अ‍ॅसिड्स मिळतात म्हणून त्यांची चटणी रोजच्या जेवणात हवीच; पण चटण्या तिखट असतात, लोणच्यामध्ये तेल आणि मीठ जास्त प्रमाणात असतं म्हणून थोड्याच प्रमाणात खायला हवं, फक्त तोंडी लावण्यापुरतंच. व्हिटामिन 'सी', 'ए' आणि 'बी' मिळण्यासाठी कच्च्या कोशिंबिरी खूप महत्त्वाच्या असतात; पण कच्चे पदार्थ पचायला जड असतात म्हणून त्यांचं प्रमाणही कमी असतं आणि त्या डावीकडे वाढल्या जातात. पापड, भजी तळलेली म्हणून

थोडीच खावीत जी ताटात डाव्या बाजूला असतात. भाजी, उसळ भरपूर खावी म्हणून उजव्या बाजूला वाढली जाते. गोड पदार्थ, पक्वान्न थोडंच खाल्लं जावं म्हणून त्याची वाटी ताटाबाहेर ठेवली जाते. मीठ जास्त खाऊ नये, कच्चं मीठ तर खाऊच नये म्हणून नैवेद्याच्या ताटावर मीठ वाढलं जायचं नाही. किती मोठा शास्त्रीय विचार! जेवणानंतर ताजं ताक प्यायची पद्धत आहे. ताकातून प्रोटीन्स, कॅल्शियम, व्हिटामिन 'डी' थोड्या प्रमाणात मिळतं आणि पचनशक्तीही वाढते.

आपल्या आहारात पदार्थांची केवढी विविधता दिसते. नाष्ट्यासाठीही असंख्य प्रकार केले जातात. पोह्याचे प्रकार, रव्याचे पदार्थ, धिरडी, थालीपीठ, धपाटे, उंडे आणि जेवणातही भाज्या, कोशिंबिरी, कायरस, पंचामृत असं वैविध्य दिसतं. भाताचे प्रकारही किती! गोड पदार्थ, पक्वान्न, पोळ्यांचे प्रकार फक्त आपल्याच आहारात आहेत. पदार्थ फोडणीवर टाकून शिजवणं किंवा वरून फोडणी घालणं हे भारतीय आहाराचं खास वैशिष्ट्य आहे. फोडणीतील मोहरी, हळद, हिंगाचे औषधी गुणधर्म वापरले जातात. तसंच तूप वापरायची पद्धतही फक्त भारतातच दिसते. सॅच्युरेटेड फॅटी ॲसिडची गरज तुपाने भागवली जाते.

पूर्वी भातासाठी हातसडीचा तांदूळ वापरला जायचा. या तांदळामध्ये पॉलिश्ड पांढऱ्या तांदळापेक्षा व्हिटामिन्स, मिनरल्स जास्त प्रमाणात असतात. 'बी' व्हिटामिन्स जास्त असतात. चांगल्या प्रकारचं मेद त्यात असतं. फायबर्स असतात. त्यामुळे हातसडीचा तांदूळ तब्येतीसाठी अतिशय चांगला असतो. कोलेस्टेरोल कमी राहतो. भाताबरोबर डाळीचं वरण किंवा आमटी खाल्ल्याने प्रोटीन्सची बायोलॉजिकल व्हॅल्यू वाढते. प्रोटीन्स २१ प्रकारच्या अमायनो ॲसिडपासून बनतात. त्यातील ७ अत्यावश्यक असतात. तांदळात आर्जीवीन नावाचं अमायनो ॲसिड असतं. तांदळात लायसीन नसतं, ते डाळीमधून मिळतं. जेवताना मागचा भात दहीभात खायची पद्धत आहे. दूध आणि दह्यामधून मिथिओनिन नावाचं अमायनो ॲसिड मिळतं.

तांदळापासून पोहे, चुरमुरे बनवण्याची पद्धत पूर्वीच्या काळीच सुरू झाली. पोह्यांमध्ये 'बी' व्हिटामिन थायमिन आणि आयर्न असतं. त्यामुळे ते तांदळापेक्षा पौष्टिक असतात. पोह्यांचे प्रकार – पातळ पोहे, जाड पोहे, भाजके पोहे, दगडी पोहे आपल्याकडे वेगवेगळ्या पदार्थांच्या स्वरूपात वापरले जातात.

आपल्या आहारात तांदळाशिवाय इतर धान्येही आलटूनपालटून वापरायची पद्धत पूर्वीपासून आहे. त्यामुळे इतर धान्यांतील वैशिष्ट्यपूर्ण अन्नघटकांचा फायदा होतो. गव्हामध्ये ग्लुटेन हे प्रोटीन असतं. ज्वारीमध्ये लुसीन हे अमायनो ॲसिड जास्त प्रमाणात आहे. बाजरीमध्ये आयर्नचं प्रमाण जास्त आहे. नाचणीत कॅल्शियम असतं. मक्यामध्ये बीटा कॅरोटीन असतं. ही धान्यं वापरून बनवली जाणारी भाकरी ही महाराष्ट्राची खासियत आहे.

वरण, भात, तूप, मीठ, लिंबू हा आपला सर्व महाराष्ट्रीयन्सचा आवडता खाद्य प्रकार! वरणभातावर आपण लिंबू पिळून घेतो, ही एक खूपच आरोग्यदायी पद्धत आहे. लिंबामधून व्हिटामिन 'सी' मिळतं. आयर्नच्या अभिशोषणासाठी आवश्यक रीडुसिंग एजंटही लिंबातून मिळतो. त्यामुळे जेवणातील आयर्नयुक्त पदार्थांचा फायदा मिळतो.

कडधान्यांना मोड आणून वापरायची पद्धत फक्त महाराष्ट्रातच आहे आणि अतिशय आरोग्यदायी आहे. मोड आणल्यावर व्हिटामिन्स 'बी', 'सी' आणि 'ई' वाढतात. प्रोटीन्सचं पचन सुलभ होतं. मधुमेह आणि हार्ट डिसीजला प्रतिबंध होतो असं सिद्ध झालंय. तृणधान्यांनाही मोड आणून वापरलं तर पौष्टिकता खूपच वाढते. गहू, ज्वारी, बाजरी, नाचणी मोड आणून वापरावी.

आपल्या स्वयंपाकात काही मसाले आणि पूरक पदार्थ वापरायची पद्धत आहे. आमसूल, चिंच, आमचूर, गूळ आणि काही ताजे मसाले म्हणजेच हिरवी मिरची, कढीपत्ता, कोथिंबीर, आलं, लसूण, पुदिना. काही कोरडे मसाले – लवंग, दालचिनी, तमालपत्र, काळी मिरी, धने, जिरे इ. यांच्यामुळे चव, स्वाद तर मिळतोच, शिवाय पदार्थांची गुणवत्ताही वाढते. मसाल्याच्या पदार्थांत आयर्न भरपूर असतं. पोटॅशियम आणि इतर क्षारही पुरेशा प्रमाणात असतात. काही मसाल्यांमध्ये औषधी गुणधर्म असतात. भूक वाढते, अन्नपचन सुधारते, पोटाचं आरोग्य चांगलं राहातं. जंतुनाशक गुणधर्म असतात. हळदीमधील करकुमीनमुळे कॅन्सरचा धोका कमी होतो. संशोधनाने असं सिद्ध झालंय की, दालचिनी, लवंग, तमालपत्राच्या वापराने मधुमेह आटोक्यात ठेवायला मदत होते. मात्र मसाल्यांचा अतिरेकी वापर हानीकारक असतो.

आपल्या पारंपरिक आहारात धान्य आणि डाळी किंवा कडधान्ये एकत्रित वापरली जातात. त्यामुळे प्रोटीनची प्रत सुधारते. उदाहरणार्थ : खिचडी – तांदूळ+मूग डाळ+दूध दही/तूप.

उंडे – तांदूळ+उडीद डाळ.

थालीपिठाची भाजणी–

तांदूळ+गहू+ज्वारी+बाजरी+अख्खे उडीद+काळे वाटाणे+हरभरे.

पुरणपोळी – गव्हाचं पीठ+हरभरा डाळ+गूळ+तूप/ दूध.

दशमी – गव्हाचं पीठ+दूध

दही पोहे – पोहे+दही+दूध.

गोकुळाष्टमीचा दहीकाला – धान्यांच्या लाह्या+दही+दूध+काकडी.

तसंच काही पदार्थ एकत्र खाण्याची पद्धत आहे. भाकरी+पिठलं+दाण्याची चटणी. वऱ्याचे तांदूळ+दाण्याची आमटी+तूप.

ऋतूनुसार आहारात बदल केला जायचा. श्रावणात तयार होणाऱ्या भाज्या – टाकळा, केनीकुर्डू, घोळ आवर्जून खाल्ल्या जायच्या. श्रावण आणि चातुर्मासात व्रतवैकल्यं केली जायची. वेगवेगळी बंधनं पाळून, मनावर ताबा ठेवण्याची सवय लावण्याचा प्रयत्न असायचा. अधूनमधून पोटाला विश्रांती द्यावी म्हणून उपास केले जायचे. उपासाच्या पदार्थांमधील राजगिरा अतिशय पौष्टिक आहे, प्रथिनयुक्त आहे. राजगिरा पिठाची भाकरी आणि उपासाची भाजी किंवा भाज्या घालून थालीपीठ परिपूर्ण पदार्थ आहेत; राजगिरा लाह्याही पोषण देतात. वरई, शिंगाडा, आरारूटही आवश्यक ऊर्जा पुरवणारे पदार्थ आहेत; पण बाहेरच्या देशातील साबुदाणा, बटाटा यांनी उपासाच्या मेनूत जेव्हा प्रवेश केला तेव्हा मात्र पोषकता कमी झाली. साबुदाणा उपासाच्या आहारातून वर्ज्य करावा.

ऋषीपंचमीला केली जाणारी ऋषीची भाजी किंवा बडम हा वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ आहे. राजगिरा पालेभाजी, अळूची भाजी, भेंडी, मावळी काकडी, तांबडा भोपळा शिजवून, थोडे वऱ्याचे तांदूळ आणि ओलं खोबरं वाटून लावून, ताक घातलं जातं. तेल, तूप, फोडणी न घालताही चविष्ट लागते आणि आहारशास्त्रदृष्ट्याही अतिशय परिपूर्ण आहे.

मांसाहारी लोक चातुर्मास किंवा श्रावण पाळतात. त्यामागेही शास्त्रीय विचार आहे. ह्या सुमारास पावसाळी हवेत पचनशक्ती कमी असते म्हणून पचायला थोडे जड मांसाहारी पदार्थ टाळले जातात. या सुमारास मासे खाऊ नयेत कारण माशांचा ब्रीडिंग काळ असल्यामुळे मासेमारी होत नाही.

श्रावणात केली जाणारी पुरणपोळी महाराष्ट्रीय जेवणाचं खास वैशिष्ट्य आहे. एकमेकांना पूरक अमायनो ॲसिड्स, गुळामधील कॅलरीज आणि आयर्न, दुधातील प्रोटीन आणि कॅल्शियममुळे एक परिपूर्ण पदार्थ आहे. फक्त पुरणपोळीबरोबरचा इतर बेत मात्र जास्त कॅलरीजचा नसावा. मेनू प्लानिंग विचारपूर्वक करावं. पारंपरिक मेनूत बटाटा भाजी, बटाटा आणि इतर भजी, मसालेभात, वरणभात, कटाची आमटी, काकडीची कोशिंबीर असते. पुरणपोळीतल्या हरभरा डाळीतून प्रोटीन्स मिळतात, पण ती वातकारक असते. त्यामुळे तिच्याबरोबर बेसन, बटाटा हे वातुळ पदार्थ वापरू नयेत. काकडीनेही काही जणांना वात, पित्ताचा त्रास होतो. पुरणपोळी, तूप, दुधातून भरपूर कॅलरीज मिळतात, त्यामुळे तळणातल्या भरपूर कॅलरीज टाळायला हव्यात. कोशिंबिरीतील फोडणी, दाण्याचं कूट नकोच. जास्त मसालेदार पदार्थ शक्यतो नकोत, मसालेभात नको. त्याऐवजी सुधारित मेनू – पुरणपोळी, तूप, दूध, गाजर स्लायसेस, कोथिंबीर वडी तांदूळ, डाळ भिजवून वाटून, वड्या न तळता फक्त वाफवून टोमॅटो सार, दहीभात.

पूर्वीच्या काळी पक्वान्नं फक्त सणावारालाच करत, हल्लीसारखी ऊठसूट नाही. दसरा, दिवाळीला गोडधोड, तळलेले फराळाचे पदार्थ खाल्ले जायचे; पण शेतात राबून, कष्ट करून धान्य पिकवल्यावरच. बायकाही काही वेळा शेतात मदत करायच्या. कांडण, टिपण, दळण, विहिरीतून पाणी काढणं अशी कामं करायला लागायची. त्यानंतर सुगीच्या काळात चांगलंचुंगलं खायची गरजच असायची. लाडू, चकल्या, करंज्या असे पदार्थ खास दिवाळीत व्हायचे. या पदार्थांमधून प्रोटीन्स, कार्ब्ज मिळतात, व्हिटामिन्स, मिनरल्स मिळतात; पण तेल, तूप, साखर खूप

डायट

मी दर दोन आठवड्यांनी
सुरू करते पुन्हा डाएट
डोळ्यांना प्रलोभने दिसतात
जिभेच्या नशिबी असतो वेट

पाणीपुरीचं गोड स्वप्न
पाहात जाते पहिली नाईट
मनात चालते सतत
खाऊ की नको फाईट

पोर्शन्स पाहून ताटात
कावळे करी पोटात रॉईट
पिझ्झा नाही चालत
तरीही चोरून खाते बाईट

राहते सॅलेड खात
पण होत नाही लाईट
वजनाचा काटा अडकतो
जात नाही खाली स्लाईट

ताटातले पदार्थ बदलतात
मी शोधते नवनवीन वेबसाईट
तशीच लढवते खिंड
कपडे तरीही होतात टाईट

चरबी नाही सुटत
पाहून होते धडपड क्वाईट
मीच कीव करते
पाहून माझी जाड प्लाईट

होतो पुनश्च निर्णय
नसतो राहिला आता पॉईंट
मनातून वाटू लागतं
रट्टाऊन जेवणच आहे राईट

मी दर दोन आठवड्यांनी
सुरू करते पुन्हा डाएट

– राहुल करुरकर
रिकमन्सवर्थ, युनायटेड किंग्डम
karurkar@yahoo.com

जास्त वापरल्यामुळे कॅलरीजही खूप असतात. हल्लीच्या काळी मात्र हालचाल, कष्टाची कामं कमी होत असल्यामुळे असे पदार्थ कमी प्रमाणातच खावेत. सणवार असतानाही आहारघटकांचा समतोल राखायला हवा.

आपल्या इथे पूर्वापार थंडीच्या दिवसांत तेलबिया – तीळ, दाणे तसंच गूळ, तूप यांचा वापर वाढवला जायचा. संक्रांतीला तिळगूळ, तीळवडी, गुळाची पोळी, तूप खाल्लं जायचं. थंडीमुळे वाढलेली ऊर्जेची गरज ती भरून काढतात. प्रोटीन्स, ओमेगा ३ फॅटस, व्हिटामिन 'ई' आणि फायबर्स असतात. संक्रांतीच्या आदल्या दिवशी, भोगिला पौष्टिक असा बेत असतो. तीळ लावून केलेली बाजरीची भाकरी आणि लोणी; लेकुरवाळी भाजी – गाजर, पापडी, वांगी, पावटे यांच्यामध्ये तीळकूट, गूळ घातलेली भाजी आणि मुगाच्या डाळीची खिचडी! अगदी समतोल बेत!

थंडीत केले जाणारे आळिवाचे लाडू भरपूर आयर्न आणि ऊर्जा देतात. डिंकाचे लाडू ऊर्जा, कॅल्शियम आणि प्रोटीन्सचा उत्तम स्रोत आहेत. मेथीचे लाडूही आयर्न, कॅल्शियम, ओमेगा तीन फॅटस आणि फायबर्स पुरवतात. आपल्याकडे गणपतीत आणि चतुर्थीला होणारे उकडीचे मोदक, श्रीखंड, आम्रखंड आणि पोळ्यांचे विविध प्रकार – सांज्याच्या, खव्याच्या पोळ्या आपली वैशिष्ट्ये आहेत, अतिशय चविष्ट आणि पोषकही आहेत.

हल्ली मात्र जास्तीच्या कॅलरीज, तेलतुपाची आवश्यकता नाही. त्यामुळे असे पदार्थ आधुनिक, आरोग्यदायी पद्धतींनी बनवावे – ग्रिलिंग, बेकिंग, स्टीमिंग, ब्रोयलिंग. पारंपरिक पद्धतीचे गोड पदार्थ लहान आकारात बनवावेत. वाढण्यासाठी आणि खाण्यासाठी छोटे चमचे, वाटी वापरावेत म्हणजे कमीच खाल्ले जातील.

आपला पारंपरिक आहार शास्त्रावर आधारित आहे. पाश्चात्त्यांचं अंधानुकरण न करता आपल्या पूर्वापारच्या आहारात काही छोटे, आवश्यक बदल करून घेऊ या आणि कायम आरोग्यपूर्ण राहू या !!

– सुकेशा सातवळेकर
पुणे, भारत
Diet Consultant | Nutrigenomics Counselor
०९४२३९०२४३४/ ०२०२४२२५८६१
dietitian1sukesha@yahoo.co.in

श्रद्धांजली : असे फार क्वचित घडते

असे फार क्वचित घडते
उत्तुंग व्यक्तिमत्वाचे माणूस जाते
सारे आसमंत हळहळते
पण त्या शोकातही शिस्त असते
असे फार क्वचित घडते
मिसेस कौल, नमिता
ही नावेही कालपर्यंत आपण न ऐकलेली
अचानक ह्या नावाचे संदर्भ
नाव नसलेले नाते
त्या जाणाऱ्या व्यक्तीशी जोडले जाते
तरीही कुणाच्या भुवया उंचावत नाहीत
वैडेवाकडे विचार येत नाहीत
कुठेही चर्चे पे चर्चा घडत नाहीत
असे फार क्वचित् घडते

एखाद्याच्या अंत्ययात्रेत
पंतप्रधान पायी चालताहेत दीड-दोन तास
कुणीही बघत नाही पक्ष, धर्म, जात
सगळेच बुडलेले शोकसागरात
तरीही कुठे अतिरेक नाही
दुःखाचं, आक्रंदनाचं प्रदर्शन नाही
अज्ञातवासातलं जर्जर आजारपण
त्याविषयी कुठं कधी चर्चा चौकशी नाही
असे फार क्वचित घडते

तेराच्या आकड्यानं दोनदा हूल दिल्यानंतरही
फिनिक्स पक्षांसारखी झेप घेत
पोखरण, कारगिलनं मान उंचावत नेत
म्हणतो- जय जवान जय किसान अन् जय विज्ञान!
मंत्रमुग्ध करणारी वाणी
प्रतिभावंत सारस्वत तत्वज्ञानी
अजातशत्रू राजकारणी
अनंतात विलीन विराणी
बेदाग, पारदर्शी, निःस्पृह, निःशस्त्र सेनानी
ज्याचे जाणे प्रत्येक हृदय पिळवटून जाते
असे खरंच फार क्वचित घडते

– विजय पांढरीपांडे,
७६५९०८४५५५
हैदराबाद, भारत,
vijaympande@yahoo.com

मेजवानी

उपवास स्पेशल

कढई भगर ढोकळा

साहित्य – भगर – १ वाटी, साबुदाणा – २ चमचे, दही – १ वाटी, मिरच्या – २ ते ३, कढीपत्ता – ९ ते १० पानं, कोथिंबीर (ऑप्शनल) व खोबऱ्याचा कीस – सजावटीकरिता, मोहरी (ऑप्शनल) व जिरे – प्रत्येकी १ चमचा, आलं पेस्ट – १/२ चमचा, तेल – २ चमचे, मीठ – चवीनुसार, खाण्याचा सोडा – १/२ चमचा, बेकिंग पावडर – १/४ चमचा

कृती – भगर व साबुदाणा मिक्सरमध्ये बारीक (रवाळ) वाटून घ्यावा. वरील मिश्रण, दही, आल्याची पेस्ट व मीठ असे सगळे एकत्र मिसळा. त्यात आवश्यकतेनुसार पाणी घाला व मिश्रण १५ मिनिटे झाकून ठेवा. १५ मिनिटांनंतर सोडा व बेकिंग पावडर घालून मिश्रण मिसळवून घ्या. कढई गॅसवर ठेवून त्यात तेल टाका. तेल गरम झाल्यावर मोहरी टाका. ती तडतडल्यावर जिरे घाला. जिरे तांबूस झाल्यावर त्यात वरील मिश्रण सोडा आणि न ढवळता २० मिनिटे झाकून ठेवा (मध्यम आचेवर). २० मिनिटांनंतर चाकूच्या साहाय्याने ढोकळा तपासून बघा. जर चाकूला मिश्रण चिकटले नाही म्हणजे ढोकळा तयार झाला आहे. ढोकळा थंड होऊ द्या. थंड झाल्यावर वरून कोथिंबीर व खोबरा कीस भुरभुरा.

– सपना धुप्पे
होफदोर्प, नेदरलँड्स
sapana.dhuppe@gmail.com

भरलेले टमाटे : स्टफ्ड टोमॅटोज्

साहित्य:– किसलेले ओलं खोबरं: १/२ वाटी, दाण्याचे कूट: १/२ वाटी, तिखट, मीठ, लिंबू, साखर: चवीनुसार, गोडा मसाला: १ छोटा चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर: १ वाटी, फोडणीसाठी तेल, जिरे, हिंग, टमाटे – ६ ते ७

कृती:– दिलेले सगळे साहित्य एकजीव होईल असे मिक्स करून घ्या. सगळ्या टमाट्यांचा देठाकडचा भाग गोल आकारात कापून घ्या. टमाट्याचा आकार बिघडणार नाही अशा रीतीने आतील जमेल तितका गर काढून घ्या. एकजीव केलेले सर्व मिश्रण थोड्या थोड्या प्रमाणात त्या टमाट्यांमध्ये भरून घ्या. पसरट पॅनमध्ये फोडणी करा. अलगद एकेक टमाटा पॅनमध्ये ठेवा. साधारणपणे ५ ते ७ मिनिटांत चांगली वाफ आली की गॅस बंद करा. वरून थोडीशी कोथिंबीर पेरा आणि सर्व्ह करा.

– सुप्रिया दाशरथे – सिंगारे
डेल्फ्ट, नेदरलँड्स
supriya.singare@gmail.com

मेजवानी

गोंगुरा लोणचे

प्रामुख्याने आंध्र प्रदेशात सर्वत्र गोंगुरा लोणचे मोठ्या प्रमाणात बनवले जाते. हे लोणचे पोळी किंवा भातासोबत साइड डिश म्हणून खाल्ले जाते.

साहित्य :– , ६ ते ७ जुड्या गोंगुराची पाने, २ चमचे तेल, १५ सुक्या लाल मिरच्या , १ चमचा धणे, १ चमचा जिरे, ३–४ मेथीचे दाणे, मीठ – चवीनुसार, ६ ते ७ लसूण पाकळ्या, १ मोठ्या आकाराचा कांदा, त्याचे जाड मध्यम आकाराचे तुकडे करून घेणे.

फोडणीसाठी:– २ चमचे तेल, १–१/२ चमचा चणा डाळ, १–१/२ चमचा उडीद डाळ, १–१/२ चमचा जिरे, १–१/२ चमचा मोहरी, ४ ते ५ सुक्या लाल मिरच्या, ६ ते ७ कढीपत्त्याची पाने

कृती:– सर्वप्रथम, सर्व पाने काढून घेऊन, त्यांना स्वच्छ धुऊन सुकण्यासाठी बाजूला ठेवा, जेणेकरून त्यांना ओलावा राहणार नाही. कढईत १ चमचा तेल घालून सर्व गोंगुराची पाने १० मिनिटे मऊसर शिजवून घ्यावी. वेगळ्या पॅनमध्ये, एक चमचा तेल घालावे. जिरे, धणे, मेथीदाणे घालावे. वाळलेल्या लाल मिरच्या घालून एक मिनिटभर परतून घ्यावे. त्यांना बाहेर काढून थंड होण्यासाठी एका बाजूला ठेवा. ब्लेंडरमध्ये, शिजवलेल्या मसाल्यात थोडे मीठ घालून त्याची बारीक पेस्ट बनवून घ्यावी. त्यात लसूण पाकळ्या घालून परत एकदा चांगले बारीक करा. त्यामध्ये गोंगुऱ्याची पाने घालून हलकेसे बारीक करा (पूर्णपणे नाही). हे लोणचे वाडग्यात घ्यावे आणि त्यात चिरलेला कांदा घालून मिक्स करावे व खाली नमूद केल्याप्रमाणे फोडणी द्या. एका पातेल्यात तेल घालून गरम करा. त्यात चणा डाळ, उडीद डाळ घालून चांगले परतून घ्यावे. त्यामध्ये जिरे, मोहरीचे दाणे घाला. सुकी लाल मिरची घालून काही सेकंद परतावा. कढीपत्ता घाला. ही फोडणी लोणच्यावर घाला. गरमागरम भात आणि तूप यासोबत सर्व्ह करा.

टीप:– जर हे लोणचे लगेच खाणार असाल तरच त्यात कांदा घालावा. जर बऱ्याच दिवसांसाठी साठवणार असाल तर कांदा घालू नये. त्यामुळे लोणचे खराब होऊ शकते.

– पूजा मंडलिक – दाशरथे
विशाखापट्टणम, भारत
poojamandlik87@gmail.com

पोहे वडी

साहित्य : ३/४ पोहे, १/४ कप डाळीचे पीठ, १/४ कप दही, २/३ टे.स्पून पांढरे तीळ, १ टे.स्पून जिरे, १ इंच आले, ५–६ लसूण पाकळ्या, ४–५ हिरव्या मिरच्या, १/४ भाजलेले शेंगदाणे, १/२ टे.स्पून हळद, १ टे.स्पून लाल मिरची पावडर, १. टे.स्पून. धने पावडर, १/४ टे.स्पून हिंग, मीठ.

कृती : पोहे स्वच्छ धुऊन त्यात १/४ कप दही व १/४ कप पाणी टाकून एकत्र करून ठेवावे. मिक्सरच्या भांड्यात जिरे, आलं, लसूण, मिरची, दाणे वाटून घ्यावे. पोहे मॅशरने बारीक करून घ्यावे व त्यात धने पावडर, बेसन, हळद, लाल मिरची पावडर, मीठ, तीळ, हिंग, कोथिंबीर, वरील वाटण, थोडे पाणी टाकून घट्ट मळावे व ज्या भांड्यात बनवायचे त्याला थोडे तेल लावावे व थोडे तीळ भुरभुरावेत व तयार सारण त्यात घालून हलकेसे थापावे. त्यावर पुन्हा तीळ वरून घालावे व एका भांड्यात थोडे पाणी ठेवून त्यात स्टँड ठेवून मिश्रणाचे भांडे त्यावर ठेवावे व वीस मिनिटे वाफवून घ्यावे.

वाफवलेले मिश्रण थंड झाल्यावर त्याच्या हव्या त्या आकाराच्या वड्या पाडाव्यात व त्या तव्यावर शॅलोफ्राय कराव्यात किंवा तळाव्यात (आवडीप्रमाणे)

– गायत्री सुधीर मेटे
द. हेग, नेदरलँड्स
swara.entp@gmail.com

मेजवानी

पंचकाज्य

साहित्य:– गूळ / ब्राऊन साखर: २/३ कप, वेलची पूड: १/४ टीस्पून, खोबऱ्याचा कीस: १ कप, पातळ पोहे: १–१/३ कप, तीळ – २ टेबलस्पून, बदामाचे काप: १ टेबलस्पून, तूप: १ टेबलस्पून, मध: १/२ टेबलस्पून, पिकलेलं केळं: १

कृती:– केळाच्या गोल चकत्या करून घ्या. त्यात मध मिसळून जरा मुरण्यासाठी एका बाजूला ठेवून द्या. कढईमध्ये तीळ आणि खोबऱ्याचा कीस वेगवेगळा गुलाबी रंगावर परतून घेऊन एका ताटलीत थंड होण्यासाठी ठेवा. त्याच कढईत गूळ, १/४ कप पाणी एकत्र करून या मिश्रणास साधारणपणे ५ मि. मंद आचेवर ते घट्टसर होईपर्यंत उकळी येऊ द्या. आता त्यात परतलेलं खोबरं, वेलची पूड टाकून एकत्र मिश्रण करा आणि लगेच गॅस बंद करा. या मिश्रणात पोहे, भाजलेले तीळ, बदामाचे काप, तूप घालून व्यवस्थित एकत्र होईल असे एकत्र करून घ्या. यात शेवटी केळं आणि मध यांचे मिश्रण घालून नीट एकत्र करून घ्या. पंचकाज्य तयार आहे.

हा गोडाचा प्रकार देवाला नैवेद्य म्हणून (विशेषतः गणपतीच्या दिवसांत) अतिशय उत्तम आहे.

– प्रीती राव
डेल्फ्ट, नेदरलँड्स
priti.arvind.rao@gmail.com

कर्नाटकी चटणी पुडी / पूड चटणी

साहित्य :– १ कप उडदाची डाळ, १–१/२ कप हरभऱ्याची डाळ, २० लाल सुक्या मिरच्या – बेडगी किंवा काश्मिरी , १–१/२ चमचे तपकिरी साखर किंवा गूळ, १ कप सुकं खोबरं, १–१/२ चमचे चिंचेचा कोळ, १ कप कढीपत्ता, ३/४ चमचे मीठ, २ छोटे चमचे तेल

कृती :– एका कढईत हरभऱ्याची डाळ, उडदाची डाळ (वेगवेगळ्या) लालसर रंग येईपर्यंत मंद आचेवर भाजून घ्या आणि थंड होण्यासाठी ताटात काढून ठेवा. त्यानंतर कढईत थोडे तेल टाकून त्यात कढीपत्ता, सुकं खोबरं आणि लाल मिरच्या (वेगवेगळ्या) परतून घ्या. हरभऱ्याची डाळ आणि उडदाची डाळ भरडसर (वेगवेगळी) मिक्सरमध्ये वाटून घ्या. उरलेले सर्व साहित्य (मीठ, चिंच कोळ, कढीपत्ता, मिरची, साखर, गूळ, खोबरं) एकत्र मिक्सरमध्ये भरडसर वाटून घ्या. दोन्ही मिश्रण व्यवस्थित एकजीव होतील असे मिसळून घेतले की चविष्ट चटणी पुडी तयार. गरम गरम तूप–भातासोबत खाता येईल अथवा दह्यात कालवून पोळी / पराठ्यांसोबत / ब्रेडसोबत खाता येईल.

– सौ. सोनाली सताळकर
गुलबर्गा, कर्नाटक
sonalisatalkar@gmail.com

मेजवानी

कणकेचे लाडू

कणीक महाराष्ट्रातील प्रत्येक घरात रोजच कणकेचा वापर होतो. पोळ्या, थालीपीठ, पराठे, धिरडे, शिरा इत्यादी अनेक पदार्थ आपण कणकेपासून बनवतो. त्यातच कणकेचे लाडू हा पदार्थसुद्धा खूप आवडीने खाल्ला जातो.

साहित्य :–१ वाटी कणीक, १ वाटी तूप, १ चमचा वेलची – जायफळ पूड, बदाम १०–१२– बारीक काप केलेले, १ वाटी गूळ

कृती :– एका कढईत अर्धा वाटी तूप घेऊन त्यात कणीक छान परतून घ्यावी. गुलाबी रंग येईपर्यंत कणीक परतावी व नंतर त्यात बदामाचे काप घालून पुन्हा छान परतावे.

गॅस बंद करून हे मिश्रण एका परातीत काढून घ्यावे, त्यात पुन्हा एक ते दोन चमचे तूप, जायफळ–वेलची पूड घालावी व वरून किसलेला गूळ घालावा.

हे मिश्रण गरम असतानाच छान एकजीव करून घ्यावे म्हणजे कणकेच्या उष्णतेत गूळ वितळेल. आता हाताला थोडेसे तूप लावून छान घट्ट लाडू वळावेत.

टीप :– १) कणीक कोरडी वाटली तरी त्यात पाणी किंवा दूध घालू नये किंवा घातल्यास ते लाडू लवकर संपवावेत. तूप आणि कणीक योग्य प्रमाणात घेतल्यास सहसा मिश्रण कोरडं होतं नाही. २) हे लाडू कोरडे असल्यामुळे जास्त काळ टिकतात. प्रवासाकरिता एक उत्तम पदार्थ म्हणून आपण हे लाडू नेहमीच सोबत ठेवू शकता. ३) ह्यात आपण गुळाचा वापर केल्याने हे लाडू पौष्टिक असतात, शिवाय पचायलासुद्धा हलके असतात. ४) आणखी पौष्टिकतेसाठी आपण ह्यात तीळ, अक्रोड ह्यांचासुद्धा वापर करू शकता.

– डॉ. मानसी सगदेव
द. हेग, नेदरलँड्स
manasi.mohril@gmail.com

बाल विभाग

पु.ल. देशपांडे – भाई

चित्र : श्रावणी शशिकांत पाटील
पुणे, भारत

बाल विभाग



चित्र : विदीप शशिकांत पाटील, ६ वर्षे
पुणे, भारत

बाल
विभाग

चित्र : सुरभि आणि सार्थक सिंगारे
डेल्फ्ट, नेदरलँड्स

बालमित्रांसाठी शाब्दिक कोडी ओळखा कोण?

१. आजीबाईच्या शेतात, एका सुपात, बारा कणसं, त्याचे तीस-एकतीस दाणे.
अर्धे काळे, अर्धे पांढरे, असे हे जीवनगाणे! ओळखा कोण?

२. इटुकली, पिटुकली, आहे ही धिटुकली. हिरवी असो वा लाल, सगळ्यांना प्रिय फार.
बघताच येते तोंडाला पाणी, आंबट-गोड हिची कहाणी. ओळखा कोण?

३. कितीही फिरवलं तरी थकत नाही, खिळ्याच्या आरीवर पिंगा घालत राही.
दोरीचा विळखा, सुंदर आकार, तळहातावर घेताच, गुदगुल्या होतात फार. ओळखा कोण?

४. पंख आहे, पण पक्षी नाही, जादू करते, पण जादूगार नाही.
प्रेमळ आहे, पण आई नाही, म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाही.
गोष्टीची पुस्तकं वाचा तर खरी, स्वप्नात येईल मग तुमच्या घरी. ओळखा कोण?

५. डोक्यावर तुरा असतो, कृष्णाच्या मुकुटावर सजतो.
आकाशात काळे मेघ दाटले, थुईथुई नाचण्यास पाऊल टाकले.
पावसाचे स्वागत करतो छान, भारताचा राष्ट्रीय पक्षी म्हणून घेतो मान. ओळखा कोण?

६. आभाळात दाटी, रंगीबेरंगी पतंगाची. प्रत्येकाला घाई तिळगूळ वाटण्याची.
आज होते सूर्याचे, मकरराशीत संक्रमण, 'गोड बोला' असा मंत्र देणारा हा एक सण. ओळखा कोण?

७. घरात येते लपूनछपून, दूध पिते डोळे झाकून.
उंदीरमामा हवा फराळाला, वाघाची मावशी म्हणतात हिला. ओळखा कोण?

८. सुपासारखे कान, खांबासारखे पाय. भिंतीसारखे पोट, झाडूसारखी शेपूट, गणपतीला तोंड, लांबच लांब याची सोंड. ओळखा कोण?

९. पांढरा, पांढरा कापसाचा गोळा, त्यावर लालगुंजेचा डोळा, चांदमामाचा रथ ओढत, पान पडलं तरी धूम ठोकत. ओळखा कोण?

१०. देवबाप्पा जेव्हा छोटा होता, तेव्हा तो शाळेत जात होता.
एकदा काय गंमत झाली, त्याची रंगपेटी पडली खाली.
रंग सारे सांडून गेले, ढगांनी ते पटकन गोळा केले.
ओळखा बरं ते रंग कोणाला दिले? कोण मग आकाशात 'सप्तरंगी' झाले? ओळखा कोण?

– वेगवेगळ्या वृत्तपत्रांमधून संकलित

(उत्तरे पान क्र. ९३ पहा)

बाल विभाग

लपलेली भारतीय वाद्ये शोधा

ज	र	चि	प	ळी	पॅ	ग	री	ड	का	ळ	तू	तं	पु	री
कृ	ढी	त	ख	जी	मृ	त	तं	बो	रा	टा	बो	गि	ढो	वा
ज	द	पं	ब	सं	बो	ता	ली	जो	द	प	सां	बो	ल	वा
न	ल	सा	नी	ल	ढो	शा	सं	ख	नी	रो	ग	सं	ए	दूं
सा	ळ	ल	वा	फ	ळी	ल	दि	ळी	दि	ळ	स	ता	न	ग
रं	जा	प	ख	वा	ज	दूं	मृ	म	वा	ए	क	ता	री	ज
गी	क	ला	ग	री	दि	ढो	र	तू	सं	ज	ब	क्ष	र	य
गी	शा	ता	मृ	दूं	ग	रा	नी	चि	ळी	टि	ज	झां	प	मृ

– मुक्ता वि. बापट
डेल्फ्ट, नेदरलँड्स
muktaxay@gmail.com

उत्तरं : १. वर्ष, महिने, दिवस–रात्र २. चिंच ३. भोवरा ४. परी ५. मोर ६. संक्रांत ७. मांजर ८. हत्ती ९. ससा १०. इंद्रधनुष्य

– वेगवेगळ्या वृत्तपत्रांमधून संकलित

बाल विभाग

उड्या मारणारा कागदी बेडूक

स्नेहा गोखले
डेल्फ्ट, नेदरलँड्स
snehagokhale45@gmail.com



१. चौकोनी कागदाचे एक टोक दुसऱ्या टोकावर ठेवून घडी घाला

२. त्रिकोणाच्या खालच्या बाजूस मध्यावर दुमडून छोटीशी घडी घाला



३. त्रिकोणाचे दोन्ही कोपरे मध्यापर्यंत दुमडा

४. कागद उलटा करून मागची बाजू वर आणा

५. उजवी बाजू मध्यरेषेपर्यंत दुमडा. दुमडताना मागचा छोटा त्रिकोण दुमडला जाणार नाही ह्याची काळजी घ्या.

६. डावी बाजू सुद्धा अशीच दुमडा

७. खालची आडवी बाजू चित्रात दाखवलेल्या काळ्या रेषेपर्यंत दुमडा

८. आता हीच बाजू पुन्हा खालच्या बाजूपर्यंत दुमडा

९. बेडकाचे तोंड उघडण्यासाठी वर दाखवल्याप्रमाणे हलकी घडी घाला

आता कागद पुन्हा उलटा करून बेडकाला उभे करा-

चित्रात दाखवल्याप्रमाणे एका बोटाने हलकेच दाब देऊन सोडून द्या, आणि बघा तुमचा बेडूक कसा टणाटण उड्या मारतो!

मनाच्या गप्पा

गजर करणाऱ्या घड्याळाचं तोंड बंद करून कराग्रे वसते जप उरकून दिवसाची सुरुवात, डबा, नाश्ता, रात्रीच्या जेवणाचं प्लानिंग, प्रोजेक्ट डेडलाइन सांभाळणे, मुलांची काळजी, त्यांच्या भविष्याची तरतूद, रोजच्या तारेवरच्या कसरतीत स्वतःला सावरत आपल्या भावी आयुष्याची गुंतवणूक, परदेशी असाल तर सगळ्या खर्चातून, वातावरण व वेगळ्या जीवनशैलीत तग धरून रुजण्याची तगमग, पैलतीरी आव्हानं पेलताना मायभूमीची आठवण येऊन कडा पाणावणारं मन, पॉश स्ट्रीटवर फिरताना आपल्या पेठेला, क्रिकेटगल्ल्या, मैदान, घराला साद घालणारं मन, अशा असंख्य लाटा उरी सांभाळत आयुष्यरूपी सागरात प्रत्येक जण प्रवास करत असतो. काम, शिक्षण, पैसा, करीयर, कुटुंब अशा विविध जबाबदाऱ्या पेलत कधी इतरांकरिता स्वतःला विसरून जातो, तर कधी धामधुमीत मला काय आवडतं हेच लक्षात नाही राहात. खरं सांगायचं तर हा लेख लिहिताना काय विषय निवडावा हेच सुचत नव्हतं. मन गुंतागुंतीत इतकं अडकतं की, त्या मनाला ही विश्रांती हवी हेच विसरलं जातं. अशा ह्या मनाची व्याख्या द्यायला किंवा हृदय, मन आणि मेंदू यांच्यातला अर्थभेद स्पष्ट करण्याइतकी मी श्रेष्ठ नाही; परंतु बुद्धी आणि हृदयाला जिवंत ठेवणाऱ्या या मनाची घट्ट ओळख झाली आहे आणि प्रत्येकाची ही आपल्या मनाशी अशी घट्ट बट्टी असली पाहिजे. या मनाला शब्दांत गुंफणारे अवली शिल्पकार पुलं म्हणतात, आयुष्यात उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयाचं शिक्षण जरूर घ्या. पोटापाण्याचा उद्योग जिद्दीनं करा, पण एवढ्यावरच थांबू नका. साहित्य, चित्र, संगीत, नाट्य, शिल्प, खेळ ह्यांच्यातल्या एखाद्या तरी कलेशी मैत्री जमवा. पोटापाण्याचे उद्योग तुम्हाला जगवतील; पण कलेशी मैत्री तुम्ही का जगायचं हे सांगून जाईल. जगणे शिकवणाऱ्या ह्या कलेचे व मनाचे अखंड ऋणानुबंध आहे. मनरूपी अदृश्य अवयव जोपर्यंत मानवी शरीरात जिवंत असतो तोवर त्याच्या आयुष्याला अर्थ असतो, मन नसलेल्या माणसाला सजीव यंत्रमानवच म्हणावे लागेल.

अशा ह्या बावऱ्या मनाला आपण खरंच जपतो का? शरीराची जशी आपण काळजी घेतो, जिम-योगाद्वारे याचे अस्तित्व जपतो तसे मनाचे जपतो का? शरीर आजारी पडलं तर पैरासिटामोल, नीमोसुलाइड, क्रोसिन वगैरे असतं तसं या मन आजारी असलं तर काही औषध असतं का हो? किंवा बरं वाटत नाही म्हणून माहिती असणाऱ्या डॉक्टर लिस्टमध्ये एखादी हक्काची योग्य मार्गदर्शक असते किंवा असतो का? प्रत्येकाचे दोन चेहरे असतात. एक जो जगाला माहीत असतो. एक जो स्वतःला माहीत असतो, जो मन पक्के ओळखून असतो. असे हे स्वयंभू मन स्वतः एक अविरत स्टोअरेज सिस्टम आहे. मला वाटतं मनाचे श्लोक लिहून स्वामींनी ते अचूक हेरले व आपल्याला जीवन कसे असावे याचे सार मांडले व मनास उद्देशून त्यांनी म्हटलंय,

मना सज्जना भक्ति पंथीची जावें,
जनी निंद्य तें सर्व सोडून द्यावे
जनी वंद्य ते सर्व भावे करावे
मना वासना दुष्ट कामा न ये रे,
मना सर्वथा पापबुद्धि नको रे,
मना सर्वथा नीति सोडू नको हो,
मना अंतरी सार विचार राहो.

आपल्याला योग्य दिशा दाखवणारं इतके काही असले तरी मन भरकटतंच ना. कधी चिडचिडतं, खेकसतं, हळहळतं, रडतं आणि या सोशल मीडियाच्या म्हणजे फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप अशा अनेक प्रलोभनाच्या आहारी जाऊन बसतं. आवड आणि गरज यात एक महिना लक्ष्मणरेखा असते ज्याची सीमा कधी न ओलांडलेली बरी. मनाची मर्यादा प्रत्येकाने राखायची असते. तांत्रिक साधनाशी एकनिष्ठ राहण्यापेक्षा अंगी असलेल्या कलेशी नातं जोडावं, विस्मरणात गेलेल्या कवितांचे पुस्तक, कधी काळी वाचलेले व्यक्ती आणि वल्ली, श्रीमान योगी आणि अशी असंख्य पुस्तकं, नाद विसरलेली वीणा, कॉलेजमध्ये तार छेडलेले गिटार, पॅक करून ठेवलेला तबला, शब्द विसरलेली लेखणी, रुसलेले घुंगरू, आलाप घेण्यासाठी वाट पाहणारा कंठ, भान हरपून थिरकणाऱ्या पावलांसाठी आसुसलेला मंच या सगळ्यांना कवेत

घ्यावे ते कधीही न सोडण्यासाठी.

मग काय बिशाद मनावर नैराश्याची छाया पडावी, एकटेपणाचे काटे टोचावे किंवा मन रोगट व्हावे. खरं तर मराठी विश्वाला पुलं, वपु, दुर्गाबाई, विंदा, स्वामींसारखे किती तरी दैवत लाभलेत. यांचा आशीर्वाद, साहित्यरूपी सहवास ज्याच्या आयुष्यात असेल त्या व्यक्तीचे मन व आयुष्य सदैव निरोगी, निर्मळ व निष्कलंक राहिलेच पाहिजे. अशा व्यक्तीला कुठल्याही क्षुल्लक किंवा निरर्थक गोष्टींवर आश्रित राहावे लागत नाही. असे जीवन नक्कीच अर्थपूर्ण व आदर्श असते.

एकटंबिकटं, आजारी किंवा थकलेल्या मनाला व्हिस्की, रम, वाइन, व्होडकाचे एक-दोन शॉट भारी जाणवतो व कोरड्या घशाला क्षणिक ओलावा देऊन गरम करत असतील हो, पण कायमस्वरूपी आल्हादायक शीतलता कुठे प्रदान करतात? हे क्षणिक स्वार्थी मित्रासारखे असतात, नारायण नारायण करीत येतीलही; पण आपल्या अंतर्मनातला नारायण त्यांच्या अंतर्मनाला कधी साद घालत नाही, एकतर्फी प्रेमाप्रमाणे आहारी घेऊन जातात आणि कधी कधी आपल्या मनाला गडद काळोखात नेतात!! त्यापेक्षा जड, आजारी किंवा एकटं पडलेल्या मनाला मांडीवर घेऊन मायेची फुंकर घालणारी माऊली, (तिला एक फोन पुरेसा असतो. 'हो बाळा, जप स्वतःला, काळजी नको करू, आहे मी, सांग काही वाटले तर' हे एवढे शब्द दोन लेकरांच्या बापालापण संकटांशी निर्भीड लढणारा बाजीप्रभू देशपांडे बनवून टाकतात), केसात अलगद हात घालून प्रेमरूपी ममतेचा वर्षाव करीत मेंदू शांत करणारी भार्या, आदळआपट, रडणे-लढणे झाल्यावर आलं, गवती चहाचा वाफळता कप समोर धरून, स्मित हसून मिठीत भरणारा जोडीदार, खांद्यावर हात टाकून मनाचं ओझं रिता करता येणारा जिगरी दोस्त, सगळ्या प्रॉब्लेमचं सोल्यूशन सांगणारा गुरू किंवा शुभचिंतक हे सगळे खरे तर आपल्या मनाचे डॉक्टर! आयुष्यात ही सगळी नाती जिवापलीकडे जपावी आणि आपुलकी- मायेचा झरा या नात्यांत अखंड वाहता ठेवावा. निराशा/डिप्रेशन ही आजीच्या गोष्टीतल्या भुता/खविस/बागुलबुवासारखे आहेत. यांचे अस्तित्व आपण अधोरेखित करतो. नाही तर कसलं काय? मला कल्पना आहे डिप्रेशन नावाचा मोड ऑन झाला आहे हेही कधी कधी आपल्याला जाणवत नाही किंवा सर्दी-खोकला जसा होऊ शकतो तसे मनही आजारी पडू शकते याची जाणीव होत नाही, त्याबद्दल बोलण्यातही संकोच वाटतो. सतत होणारी चिडचिड, विनाकारण फेबु/व्हॉट्सॲप चाळणारी बोटं, कोणाशीही बोलण्याची इच्छा न होणे, आपल्याला काहीच जमत नाहीये, समाधान हरवणे, सतत वाद होणे, एकाग्रता कमी होणे, जेवणाची इच्छा नसणे, आपल्याला समजून घेणारं कोणी नाही अशा अनेक गोष्टी बेचैनी वाढवत असतात आणि ते आपल्याला कळत नसतं किंवा जवळच कोणी योग्य दिशा दाखवणारं लवकर भेटत नाही. असं काही जाणवलं तर नक्कीच कुठलीही लाज किंवा संकोच न बाळगता तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला घ्यावा किंवा आपल्याला जवळच्या व्यक्तीत असं काही जाणवलं तर त्याला मानसिक आधार द्यावा व मनोबल वाढवावे. अति तिथे माती होतेच म्हणूनच अति व्यावहारिक, फटकळ व स्वार्थी नसावे माणसाने. याने नाती दुरावतात व मने घायाळ होतात. त्यापेक्षा आपली आवड, माणसं, कुटुंब, मित्रपरिवार, देश, समाज, काम, कला मनापासून जपावं. हे सगळं पुरेसं असतं उत्तम जीवन जगण्यासाठी. खरं सांगायचं तर तीव्र इच्छाशक्ती, प्रचंड आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोण, आपल्या कामाशी व कलेशी घनिष्ठ निष्ठा बहोत बड़ी चीज होती है बाबू, जिंदगी गुलजार है बस जिंदगी से बेइंतहा मोहब्बत होनी चाहिए फिर पूरी कायनात जन्नत में बदल जाती हैं। आणि कसं असतं ना, प्रॉब्लेम्स नसतात कोणाला? ते शेवटपर्यंत असतात; पण प्रत्येक प्रॉब्लेमला उत्तर असतंच. ते सोडवायला कधी वेळ हवा असतो, कधी पैसा, तर कधी माणसं. या तिन्ही गोष्टींपलीकडला प्रॉब्लेम अस्तित्वात नसतो; असं मी नाही आपल्या लाडक्या भाईंनी सांगितले आहे. त्यांच्यावर विश्वास आहे ना? झालं तर मग, मनावर जमलेली जळमटं काढून फेका आणि आपल्या मनाला तंदुरुस्त करा. घुंगरू, तबला, लेखणी, राग यमन, जुने रॅकेट्स, शूज, क्रिकेट सेट, दोन्ही हातांनी मिठी मारायला सज्ज उभे आहेत, कायमस्वरूपी त्यांना आपल्या आयुष्यात सम्मीलित करू या आणि आयुष्याला स्वर्गाहून सुंदर करूयात. आता म्हणाल, उपदेशाचे डोस सोप्पे असतात देणे. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. अहो, लेख लिहाणाऱ्यानेही असंच निराशेच्या अंधारात मोठ्या आशेने आपली हरवलेली लेखणी शोधून हे अनुभवाचे बोल लिहिलेत. 'यस्स, आय कॅन ॲण्ड आय वील' खूप मॅटर करतं मन सावरायला आणि पाय रोवून प्रत्येक आव्हान पेलायला. थोडा का होईना स्वतःचा वेळ स्वतःला द्यायचाच, मग रेलून पाय आडवे टाकून रिमझिम पावसात किशोरकुमार, रफी-लताजींना, कॉफीचा सिप घेत (युनिव्हर्सल तीर्थपण चालेल एक-दोन शॉट पण अति तिथे माती बरं का.. लक्ष्मणरेखा विसरायची नाही.) ऐकणे असावे किंवा रॉक जॅझ, क्लासिकल लावून बिनधास्त नाचणे, नाही तर कट्टा जमवायचा आणि नॉनस्टॉप गप्पांच्या मैफली रंगवायच्या. तरीसुद्धा कधी वाटलं न अडखळतोय, तोल जातोय, मग मनाचे श्लोक आणि विंदांची ही कविता आठवावी-

असे जगावे दुनियेमध्ये आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर

(पान क्र. : १०१ पाहा)

श्रीमंताची झोपडी

बूटपॉलिश ऽऽऽऽऽऽऽऽऽ

गजबजलेल्या रेल्वे स्टेशनवर तो बसलाय. स्टेशनवर गाड्या येतात–जातात. तिथे उभ्या असलेल्या सगळ्यांची नजर इंडिकेटरवर आणि मनगटापेक्षा नशिबाला चिकटलेल्या घड्याळाच्या काट्यावर; पण तो मात्र सगळ्यांच्या पायाकडे पाहतोय. एक नजर आपल्या पैशांच्या पेटीवर जाते, जिच्यात सकाळपासून फक्त ५–१० रुपयेच जमा होऊ शकलेत. याच पेटीतून त्याला त्याचा स्वर्ग उभा करायचाय. दुपार झाली तरी कुणीच कसं गिऱ्हाईक येत नाही? मनातला प्रश्न पायावर बसलेल्या माशीसारखा कधीचा उडतच नाहीय.

बाबांच्या बोटाला धरून ती स्टेशनवर उभी आहे. ८–९ वर्षांची असेल. गोरी–गोमटी, अंगात छान गुलाबी रंगाचा फ्रॉक घालून, पायात बूट घालून उभी आहे. बाजूच्याच एका बूटपॉलिशवाल्याकडे निरखून पाहते. काय करतोय तो? कसे छान बूट चमकावतोय, किती वेगवेगळ्या डब्यांतलं क्रीम लावतोय. बुटाला जसजशी चकाकी येत्ये तशी तिच्या चेहऱ्यावरच्या आनंदातही भर पडतेय. इतक्यात तिची नजर तिच्या बुटांवर गेली. शीऽऽऽऽ किती मळलेत. बाबा, मलापण बूट चमकवायचेत, ती हट्ट करते. बाबा नकार देतात. बिचारी हिरमुसली होऊन त्याच्याकडे पहाते.

त्याला गंमत वाटते. तो हसून तिला जवळ बोलावतो. बाबा, मी जाऊ? नजरेनेच बाबांना प्रश्न. बाबा हसून तिचं बोट सोडतात.

बाबांनी बोट सोडलंय म्हटल्यावर टुणकन उडी मारून ती पॉलिशवाल्याजवळ जाते. मघाचे काका कसे उभे होते ते तिला चांगलं आठवतंय. तीपण तशीच ऐटीत एक पाय लाकडी फळीवर ठेवते. त्याला तिचं कौतुक वाटतं. तिला मजा यावी

ती निघाली, त्याने तिला थांबवलं, आपल्या कळकट्ट कापडाला हात पुसले आणि तिचं नाणं तिच्या हातावर ठेवून मूठ बंद केली, 'ठेव तुझ्याकडेच' खुणेनेच त्याने तिला सांगितले. आता तिचा आनंद चमकल्या बुटांहूनही अधिक होता. तिने बाबांना नाणं दाखवलं. बाबांनी ते त्या काकांना परत दे, असं सांगितलं. त्याने हसूनच 'नको' म्हटलं; पण हिचे लक्ष होतं कुठे या सगळ्याकडे, ती तर आपल्या चमकल्या बुटांकडे पाहण्यात गर्क होती. तो तिचा हा आनंदाचा सोहळा डोळे भरून पाहतोय. आपलं इवलंसं बोट बाबांच्या हातात देऊन ती गर्दीत मिसळली. गाडी सुटली. सगळे जण आपआपल्या कामात गुंतले.

म्हणून तो उगीचच आपल्या सगळ्या डब्या उघडतो. आपल्या जवळच्या फडक्याने तिचे बूट पुसतो. एका डबीतलं क्रीम तिच्या बुटांना लावतो. आता आजूबाजूचीही काही माणसं तिची गंमत पाहतायत. तो जसजसा बुटांच्या सगळ्या बाजू पुसतोय तशी तिची मानही गरागरा फिरते. जणू तो प्रत्येक क्षण तिला आपल्या डोळ्यांत साठवायचाय. त्याचं पॉलिश चालूच आहे. एक बूट चमकला. त्याने फळीवर आपल्या जवळच्या ब्रशने आवाज केला. तिला कळलं, आता दुसरा बूट ठेवायचा. तिने आपला दुसरा बूट वर दिला. दोन्ही बूट चमकले. पठ्ठी भलतीच खूश झाली.

(पान क्र. : ९९ पाहा)

आगळावेगळा अनुभव निमित्त व्लादिमीर पुतिनचा शपथविधी

मागच्या महिन्यात कामानिमित्त भारतात येणे झाले. आठवडा बेंगळुरूमध्ये गेला. शनिवार-रविवारला जोडून एक दिवसाची रजा घेऊन आई-बाबांना भेटायला मुंबईत आलो व तेथूनच ॲमस्टरडॅमला परतलो. मी येणार हे माहीत असल्याने सुनेसाठी व नातींसाठी भलंमोठं पार्सल तयार होतं. अरे हे काय? मी काय कुरियर सर्व्हिस आहे की काय? आणि माझ्यासाठी यापैकी काहीच नाही?.....मी

आहे ना, नाही कसं! तुझ्या आवडीच्या विषयावर मराठीत नवीनच आलेलं पुस्तक तुला देणार आहे......इति आई.

वाचनवेड आम्हा दोघा भावांना आईकडून मिळालेली निसर्गदत्त देणगी! युरोपातील राजकारण, दहशतवाद, हे माझे आवडीचे विषय. बुद्धिबळ हा विरंगुळा. आईने श्री. गिरीश कुबेर लिखित 'पुतिन' हे पुस्तक लक्षात ठेवून मला दिले.

(ह्या विषयावरचे स्टीव्हन ली मायर्सचे The New Tsar: The Rise and Reign of Vladimir Putin मी पूर्वी वाचलं होतं.) कारण श्री. कुबेर यांचे 'तेल नावाचा इतिहास' व 'एका तेलियाने' ही दोन्ही पुस्तके मला खूप आवडली होती. विमानतळावरच पुस्तक उघडून चाळायला सुरुवात केली आणि फ्लाइटमध्ये चक्क अर्ध अधिक संपवलंसुद्धा!

वाचता वाचता पुतिन व त्याचा कडवा विरोधक गॅरी कॅस्परॉव्हपर्यंत पोचलो आणि तेथेच थबकलो. गॅरीची असामान्य बुद्धिमत्ता, विलक्षण स्मरणशक्ती व बौद्धिक कुवत याचे यथार्थ वर्णन वाचून मनानी एकदम आठवणींचं भांडारच खोललं. अगदी खुल जा सिम सिम. इंग्लंडमध्ये असल्यापासून मला ऑनलाइन चेसचे व्यसनच लागल्यागत झाले होते. पुढे ॲन्टवर्पला आल्यावरही हे चालूच राहिले. कंपनीच्या मॅगेझिनमध्ये लेख लिहिणे, घरी आल्यावरही खेळत राहणे, मॅचेस कंडक्ट करणे. काळवेळेचं भानच राहात नसे. मग तक्रारी, रागवारागवी टोकापर्यंत पोचल्या आणि एकदाचा तो डी डे आला. माझ्या चेसवेडाचं सार्थक झालं. तक्रारी, कुरबुरी, रागवारागवी सगळं बासनात गुंडाळून त्या वेडाचं कौतुकात रूपांतर झालं.

१ जून २०११ उजाडल्यापासून एक वेगळीच हुरहुर लागली. युवर नेक्स्ट मुव्ह बेल्जियमने गॅरी कॅस्पॅराव्हला आमंत्रित केले होते. तरुण मुलांमध्ये चेसची आवड निर्माण होण्यासाठी व एकूणच चेसच्या प्रसारासाठी गॅरी कॅस्पॅराव्ह बेल्जियममध्ये येणार होता. प्रथम शाळेतील १० उत्तम विद्यार्थ्यांबरोबर, नंतर १० राजकारणी व कॉर्पोरेट अधिकाऱ्यांबरोबर एकाच वेळी सामने खेळले जाणार होते. शेवटी ब्रिटिश ग्रँडमास्टर्स निगेल शॉर्टबरोबर प्रदर्शनीय सामने असा भरगच्च कार्यक्रम होता. मग हॉटेल हिल्टन, ॲटवर्पमध्ये मुलाखतीचा कार्यक्रम होता आणि काय सांगू, अहो भाग्यम्! मुलाखतकार म्हणून चक्क दस्तुरखुद्द माझी निवड झाली होती!

तो संपूर्ण आठवडा अगदी पछाडल्यागत गेला. मनोमन प्रश्नांची उजळणी चालू होती. अनपेक्षित प्रतिसाद आल्यास कसं सावरायचं. एक ना अनेक गोष्टी भुंगा घालत होत्या. गॅरी त्याच्या खेळण्यात खूप आक्रमक व निष्ठुर म्हणून जगप्रसिद्ध होता. त्यामुळे साहजिकच मी प्रचंड मनोवैज्ञानिक दबावाखाली होतो. अगदी कपड्यांपासून कसं बसावं येथपर्यंत!

एकदाचा तो दिवस उजाडला, ८ जून २०११. ठरलेल्या वेळेपूर्वीच मी व आदिती हॉटेलला पोचलो. वेळेआधीच गॅरी आला. सोबत पत्नी दाशा कॅस्पॅराव्हपण होत्या. पाच-दहा मिनिटे आमच्याशी बोलून त्याने आस्थेने आमची चौकशी केली. मी ॲन्टवर्पला राहतो व केवळ ह्या मुलाखतीसाठी आलो आहे ह्याबद्दल त्याने माझेच आभार मानले. मला लाजल्यासारखं झाल.. पण मी चक्क सांगून टाकलं ॲन्टवर्पच काय भारतातूनसुद्धा मी आलो असतो. अशी संधी आयुष्यात परत परत मिळत नसते. तू युरोपात आहेस तर आपली परत भेट नक्कीच होईल, अशी आशा त्याने व्यक्त केली व आम्ही मुलाखतीसाठी गेलो. दहा ते बारा मिनिटांची मुलाखत सुरळीत पार पडली. आपल्या अनेक नावाजलेल्या लढतींमधील सर्व चाली, उभयपक्षी चाली त्याच्या

स्मरणात होत्या. सर्व प्रश्नोत्तरे चेससंबंधीच होती. खरं तर त्या वेळी तो पुतिनविरोधात, लोकशाही टिकावी म्हणून हिरिरीने भाग घेत होता. मुलाखत झाल्यावर त्याने त्याचे नवीन पुस्तक मला सही करून भेट दिले, 'हाऊ लाइफ इमिटेट्स चेस' (HOW LIFE IMITATES CHESS).

निरोप घेताना मी त्याला आवर्जून विश केले, 'विशिंग यू एव्हरी सक्सेस इन युवर कॅम्पेन अगेंन्स्ड अप्रोचिंग विंटर इन रशिया.' त्याने फक्त एक स्माइल दिला व आमची भेट संपली. योगायोग असा की २०१५ मधील त्याच्या नव्या पुस्तकाचे नाव 'विंटर इज कमिंग' (Winter is coming) असे आहे.

प्रसंग नं २

संध्याकाळची वेळ, बहुधा ५, ६ एप्रिल २०१५, पण दिवस मोठा असल्याने लख्ख उजेड. ॲमस्टरडॅम शिफॉलचा विमानतळ नेहमीप्रमाणे गजबजलेला. माझी वॉरसाची फ्लाइट रखडल्याने मी कंटाळलेलो, कन्व्हेअरवरील सामानाच्या प्रतीक्षेत उभा.

मागच्यापुढच्या बेल्टवरही सामान प्रतीक्षेत अनेक जण उभे. अचानक प्रवाशांमध्ये कुजबुज सुरू झालेली मला जाणवली. माझ्या मागच्या बेल्टकडे बरेच जण कुतूहलपूर्ण नजरेने बघून कुजबुजत होते. मी वळून पाहिले तर दुसऱ्या बाजूस सामान प्रतीक्षेत चक्क गॅरी कॅस्पॅराव्ह. मी ४ वर्षांनंतर त्याला परत बघत होतो. माझ्या मागच्या बाजूस एक युगुल उभे होते व ती तरुणी बरोबरच्या तरुणास डचमध्ये काही सांगत होती. बहुधा त्यांची गॅरीबरोबर एखादा सेल्फी काढण्याची इच्छा असावी. शेवटी एकदाचा तो तरुण हिय्या करून गॅरीपर्यंत पोचला; पण बहुधा गॅरीने नकार दिल्याने तो हिरमुसला होऊन परत माझ्या मागे उभा राहिला. गॅरी तिथून त्याच्याकडे बघतच होता आणि त्याच वेळी माझी व त्याची नजरानजर झाली. सहजतेने हात उंचावून तो चक्क माझ्या दिशेने निघाला.

मी थांबायची खूण करून त्वरेने त्याच्यापर्यंत पोचलो. ४ वर्षांनंतरही तो मला ओळखेल असे स्वप्नातही वाटले नव्हते. अरे अटुल, तू नेदरलंडमध्ये कसा? येथून ॲन्टवर्पला ट्रेननी जाणार?

हे सगळं ऐकून माझी टोपीच पडली. आजूबाजूच्या प्रवाशांची माझ्याकडे तेही एका भारतीयाकडे कौतुकमिश्रित नजरेने पाहणे मला सुखावून गेले नसते तरच नवल. गॅरी मास्ट्रिक युनिव्हर्सिटीत लेक्चर देण्यास आला होता. विषय होता 'हाऊ लाइफ इमिटेट्स चेस' (HOW LIFE IMITATES CHESS)

रखडलेली वॉरसा-ॲमस्टरडॅम फ्लाइट मला एक वेगळीच अनुभूती देऊन गेली.

- अतुल वैशंपायन
द हेग, नेदरलँड्स
atul1008@gmail.com

(पान क्र. : ९७ वरून)

आजूबाजूच्या बुटांपेक्षा आपलेच बूट चमकतायत हे तिला आता सगळ्यांना जणू ओरडून सांगायचं आहे. तिने हसून त्याच्याकडे पाहिलं. त्याने आपला हात पुढे केला, ''पैसे?''

अरे बापरे, याचा विचार तिने केलाच नव्हता. तिने बाबांकडे पाहिले. बाबांनी हसून तिच्या पर्सकडे बोट दाखवलं. अरे हो, आहेत की पैसे माझे. इवल्याशा हातांनी ती छोटेखानी पर्स उघडली. दोन-चार चॉकलेटचे कागद खाली पडल्यावर तिला पैसे सापडले. तिने नाणं काढलं आणि त्याच्या हातावर ठेवलं. बाबांना मुलीच्या हुशारीचं कौतुक वाटतंय. इतक्यात त्यांची गाडी आली. बाबांनी तिला लवकर चलायला सांगितलं.

ती निघाली, त्याने तिला थांबवलं, आपल्या कळकट्ट कापडाला हात पुसले आणि तिचं नाणं तिच्या हातावर ठेवून मूठ बंद केली, 'ठेव तुझ्याकडेच' खुणेनेच त्याने तिला सांगितले. आता तिचा आनंद चमकल्या बुटांहूनही अधिक होता. तिने बाबांना नाणं दाखवलं. बाबांनी ते त्या काकांना परत दे, असं सांगितलं. त्याने हसूनच 'नको' म्हटलं; पण हिचे लक्ष होतं कुठे या सगळ्याकडे, ती तर आपल्या चमकल्या बुटांकडे पाहण्यात गर्क होती. तो तिचा हा आनंदाचा सोहळा डोळे भरून पाहतोय. आपलं इवलसं बोट बाबांच्या हातात देऊन ती गर्दीत मिसळली. गाडी सुटली. सगळे जण आपआपल्या कामात गुंतले.

तिचा आनंद त्याच्या डोळ्यांतून अजून जात नाही. मघाशी ते नाणं परत करताना त्याला त्याच्या रिकाम्या पैशाच्या पेटीचा विसर पडला होता. आता त्यानं पेटीकडे पाहिलं. काहीही न पडूनही भरल्यासारखी दिसत होती ती. पैशापेक्षा खूप मोठं काही तरी मिळालं होतं त्याला. आता त्याला आयुष्यभरासाठी श्रीमंत झाल्यासारखं वाटत होतं.

माझ्याच या सुखाने संपृक्त जाहलो मी
स्वर्गाहूनी निराळ्या गगनात मावलो मी

इवली गुलाबी काली ही मज गंध देऊन गेली
तो गंध सामावताना मृदगंध जाहलो मी

आनंद मी दिलेला परती मलाच आला
या झोपडीत माझ्या श्रीमंत जाहलो मी

- ललित विलास त्रिवेणी आठल्ये,
डोंबिवली, भारत
lalitvathalye@gmail.com

Advice...
सलाह...
सल्ला!!

जेव्हा जेव्हा माणसाच्या हातात नेतृत्व येतं तेव्हा तो सगळं आपल्याच पद्धतीने करण्याचा विचार करतो. म्हणून 'नेतृत्व आलं की सल्ला देणंही आपसूकच येतं.' आणि आपल्या सोबतच्या, आपल्यापेक्षा कनिष्ठांनी सांगितलेली गोष्ट आपल्याला पटेनाशी होते. उलट त्यांनी कसे करायला हवे, हा सल्ला आपल्याकडे तयारच असतो.

चार वर्षांपूर्वी एका मार्केटिंग कंपनीच्या सेमिनारला गेलो होतो. तेव्हा स्टेजवर एका तरुण मुलाची झोकात एंट्री झाली आणि त्याने सगळ्यांना एक प्रश्न विचारला, ''भारतात कोणती गोष्ट फ्री ऑफ कॉस्ट मिळते?'' सगळे विचारात होते आणि ऑडियन्समधून एक जोरात आवाज आला.

ॲडव्हाइस... सलाह... सल्ला!!

त्याच्या या प्रश्नावर त्या वेळी मी जास्त विचार केला नव्हता किंवा तसे अनुभव आले नव्हते. आले असतीलही, पण ते कळाले नव्हते. आज असाच एक लेख वाचला आणि चार वर्षांपूर्वीची ती घटना आणि ह्या चार वर्षांमधले या बाबतीतले अनेक अनुभव झर्रकन डोळ्यासमोरून गेले. त्याने विचारलेल्या प्रश्नामध्ये आणि दिलेल्या उत्तरांमध्ये खरेच तथ्य होते. अख्ख्या भारताचा विचार सोडाच, पण वैयक्तिक जीवनात आपल्याला पावलोपावली असे सल्ले मिळतात. पूर्वीच्या काळी लोकांच्या अनुभवातून ते एकमेकांना सल्ले देत असत. त्यामुळे कदाचित त्यांचं पालन होत असावं. आजच्या ह्या सोशल मीडियाच्या काळात अनेक सल्ले हे 'केवळ ऐकण्यातून, वाचण्यातून' दिलेले असतात. त्यामुळे त्यांच्या विश्वासार्हतेवर साशंकतेची तलवार टांगलेली असते.

असो....

एखादी गोष्ट मागणं आणि देणं यात मागणंच खूप अवघड आहे. मागताना मनात कमीपणाचा भाव असतो. देताना मात्र मनाचा मोठेपणा लागतो. सल्ल्याच्या बाबतीत हे तितकंसं खरं ठरत नाही. तो मागताना 'गरज' असते, देताना मात्र 'कौशल्य' अंगी असावं लागतं. बहुतांश वेळी आपण आपल्या अनुभवातून, आपण गेलेल्या परिस्थितीतून सल्ला देतो; पण ज्याला गरज असते त्याची परिस्थिती, त्याला येणारा अनुभव हा आपल्यापेक्षा नक्कीच वेगळा असू शकतो. म्हणून त्याला समजून घेण्यासाठी लागणारा 'संयम' आणि त्यानंतर विचाराअंती दिला जाणारा 'सल्ला' हा कौशल्यानेच दिला जाऊ शकतो.

शौनक अनेक दिवसांपासून वेगळ्याच विचारात, संभ्रमित अवस्थेत होता. त्याला त्याच्या मनात चालणारे वेगवेगळे खेळ कोणाला तरी सांगायचे होते. ज्यांना सांगण्याचा प्रयत्न त्याने केला त्यांनी त्याला लगेच त्यावर उत्तर देऊन त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. काका फार 'विवेकी' स्वभावाचे होते. त्यांनी त्याची सगळी कैफियत ऐकून घेतली आणि काहीच बोलले नाहीत. त्यानेही मी काय करू, असा प्रश्न विचारला नाही. तो काकांजवळ मनमोकळा झाला. काही वेळानंतर तो निघून गेला, हसत हसत मोकळ्या मनाने...

शौनक मोकळा होण्यासाठीच आला होता. त्याला सल्ला नकोच होता; पण आजपर्यंत तो त्याला मिळत गेला. त्याला मनातलं ऐकून घेणारं कोणी तरी पाहिजे होतं. ते त्याला काकांच्या रूपाने मिळालं.

साहिलचा स्वभाव मात्र काकांच्या विरुद्ध होता. तो सदान्‌कदा ज्याला त्याला त्याने काय करावं, कसं करावं सांगत असे. पहिल्यांदा आप्तेष्टांनी, मित्रांनी, लोकांनी त्याला ऐकून घेतलं; पण नंतर मात्र तो त्यांना नकोसा वाटत होता, फक्त नको तेव्हा सल्ला दिल्याने. काका त्यांच्या ऐकून घेण्याच्या स्वभावामुळे लोकांच्या मनात स्वतःच्या नकळत घर करून बसले. साहिल मात्र त्यांच्या मनातून दूर जातच राहिला, कायमच.. फक्त नको असलेला सल्ला दिल्याने.

वपु म्हणायचे, हवा असलेला माणूस त्या वेळी न मिळणं म्हणजे नरक. मला वाटतं, 'कोणी काय करावं हे त्याने विचारल्याशिवाय सांगणं हाही नरकच'. म्हणून सल्ला देतानाही कौशल्य लागतं. सल्ला मागणारा संभ्रमित अवस्थेत असतो. आपण आपल्या अनुभवाचे अर्धवट तपशील आठवतील तसे सांगून त्याच्या या अवस्थेत अजूनच संभ्रम निर्माण करत असतो. त्याची पार्श्वभूमी, त्याची जडणघडण झालेली स्थिती, त्याची वैचारिक क्षमता या सगळ्याचा आपण विचारही करत नाही आणि सल्ला देऊन टाकतो. एखाद्याला दिलेल्या सल्ल्याचे त्याच्यावर काय परिणाम होतील ह्याची आपल्याला काहीच चिंता नसते. तो दिलेला सल्ला यशस्वी झाला तर श्रेय मिळण्याची घाई असते. ''बघ, म्हणलं होतं ना, असं केल्यावर होऊन जाईल म्हणून'' असे वाक्य आपसूकच निघून जाते हेच ते श्रेय असतं; पण अपयश आलं तर ''अरे, असं नव्हतंच करायचं, हे थोडंसं चुकलंच तुझं'' म्हणून आपण पळवाट शोधतोच. हे प्रत्येकासोबत घडतं. कदाचित आपणही अशामधलेच एक असू. म्हणून सल्ला न देणं कधीही चांगलंच.

पण...

एवढ्या वर्षांची आपल्या समाजाला लागलेली ही सवय अशी लगेच जाणं शक्यच नाही. म्हणून सल्ला द्यायचाच तर तो कृष्णासारखा द्यावा. अर्जुनासमोर सगळे गुरू आणि त्याचे बंधू युद्धासाठी थांबलेले असताना, संभ्रमित झालेल्या अर्जुनाला, ''ऊठ आणि युद्ध कर'' असा आज्ञावाचक, ठाम, निश्चयी सल्ला कृष्णाने दिला होता. ''उठलास तर बरं होईल आणि जमल्यास युद्धही करता येईल. हासुद्धा पर्याय आहे, असं मला वाटतं'' असा सल्ला त्याने अर्जुनाला दिला असता तर गीतेतून मिळणारी शिकवण आपल्याला कधीच मिळाली नसती. त्या ठाम, निश्चयी सल्ल्याने अर्जुनाला धीर आला. तो युद्ध नुसताच लढला नाही तर जिंकलाही, कारण कृष्ण त्याच्या पाठीशी आहे हे त्याला माहिती होते. ही त्या सल्ला देणाऱ्याची भूमिका असावी. आपल्यासारखी नक्कीच नव्हे.

जेव्हा जेव्हा माणसाच्या हातात नेतृत्व येतं तेव्हा तो सगळं आपल्याच पद्धतीने करण्याचा विचार करतो. म्हणून 'नेतृत्व आलं की सल्ला देणं ही आपसूकच येतं.' आणि आपल्या सोबतच्या, आपल्यापेक्षा कनिष्ठांनी सांगितलेली गोष्ट आपल्याला पटेनाशी होते. उलट त्यांनी कसे करायला हवे, हा सल्ला आपल्याकडे तयारच असतो.

नोकरी, आजच्या कॉर्पोरेट इंडस्ट्रीमध्ये, आयटीमध्ये आलेले असे अनेक अनुभव आपल्या दिमतीला आहेतच; पण आपल्यापेक्षा वयाने, अनुभवाने, पदाने लहान असलेल्यांचा सल्ला हा त्यांच्या अनुभवानुसार, क्षमतेनुसार कधी कधी आपल्यालाही लागू होतो. रावणाचं वर्चस्व बघून एक वेळ रामही हतबल झाला होता आणि तेव्हा इंद्राने दिलेला सारथी मातली याने ''प्रभू, रावणाचा अंत जवळ आला आहे, तुम्ही गोंधळून का जाता? तुमच्याकडे असणाऱ्या पितामहास्त्राचा वापर कधी करणार?'' असा योग्य शब्दांत अचूक सल्ला दिला होता. म्हणून सल्लागार हा मातलीसारखा असावा. त्याने सल्ला घेणाऱ्याचा आत्मविश्वास वाढवावा. शल्यासारखा कर्णाला त्याचे दोष दाखवून संभ्रमित अवस्थेत टाकणारा नक्कीच नसावा.

शौनकला असं बोलण्यासाठी 'संयमी' काका भेटले. अर्जुनाला 'धीर देणारा' कृष्ण भेटला. रामाला 'आठवण करून देणारा' मातलीसारखा सारथी भेटला आणि मला माझेच 'डायरी आणि पेन' हे जुने सोबती पुनश्च भेटले. म्हणून आज हे मनातलं बोलावंसं वाटलं आणि म्हणूनच हा सगळा खटाटोप.

त्यांच्या साथीने त्यांच्यासोबत सल्ला नक्कीच नव्हे...

– मकरंद आयचित
लातूर, भारत
ayachit.makarand@gmail.com

(पान क्र. : ९६ वरून)

हसू असावे ओठांवरती काळीज काढून देताना
संकटासही ठणकावून सांगावे आता ये बेहत्तर
नजर रोखूनी नजरेमधे आयुष्याला द्यावे उत्तर
करून जावे असेही काही दुनियेतुनी जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या निरोप शेवटचा देताना
स्वर कठोर त्या काळाचाही क्षणभर व्हावा कातर
नजर रोखूनी नजरेमधे आयुष्याला द्यावे उत्तर..!

काय मग मंडळी, कुठल्या कलेशी हरवलेलं नातं पुन्हा जोडून घट्ट केलं, कळवणार न मला?

भेटू पुन्हा, आभार..!

– सोनल शिंदे-पिंगळे
+९१९८५०९०३३८७
पुणे, भारत
sonal.ss009@gmail.com

व्यक्त-अव्यक्त

या सगळ्याचा सारांश सांगायचा झाला तर, ''व्यक्ती म्हणून जगताना वेळोवेळी व्यक्त होणं भागच असतं, तिथे माध्यमांचा वा परिस्थितींचा विचार करायचा नसतो ह्याची आज शाश्वती झाली.'' कदाचित हे लिहिलेलं अनेकांनी अनुभवलं असेल. अनेकांना ते नवीनही असेल. माझ्यासारख्याच अनेकांनी मनातील भावनांच्या खेळांना व्यक्त करण्याचे स्वत:चे मार्गही शोधून काढले असतील. कागद-पेनाच्या साहाय्याने व्यक्त होण्याच्या ह्या मार्गात सुसूत्रता, साचेबद्धपणा आहे की नाही हे मीही जाणत नाही; पण मला मार्ग सापडला, व्यक्त होण्याचा. तुमचं काय?

लहानपणापासूनच तो असाच आहे; किंबहुना माझी आणि त्याची ओळख जेव्हा झाली तेव्हापासून तरी तो मला तसाच भासतो. वर्षभर त्याच्यासोबत राहिल्याने माझ्यामधील 'त्या' छोट्याशा बीजाचं बरंच मोठं रोपटं झालं. त्यामध्ये त्याची काहीच चूक नव्हती. बीजाला पोषक वातावरण मिळालं की त्याची वाढ होणारच, ही निसर्गत: चालत आलेली गोष्ट आहे. मग ते बीज जमिनीत पेरलेलं असेल किंवा आपल्यामध्येच अंगभूत असेल, पोषक वातावरणात ते वाढणारच आणि 'तो' त्या वातावरणाचाच एक भाग होता.

काहीच संदर्भ लागत नसेल. हो ना? कोण तो? कुठलं रोपटं आणि कसलं बीज? तो माझा जवळचा मित्र. त्याच्यासारखे अनेक जण पाहिले मी; समवयस्कही आणि मोठेही. समवयस्कांबाबतीत कोडं लवकर सुटायचं. मोठ्यांच्या बाबतीतील कोड्याला अर्थपूर्ण दृष्टीची चावी अशातच मिळाली. म्हणून ते जरा उशिरा सुटायला लागलं. मीही ह्या सगळ्यांसारखाच होतो. हो होतो; पण मला बदलणं भाग आहे हे जेव्हा कळायला लागलं तेव्हा मी प्रयत्नपूर्वक बदलण्यासाठी सुरुवात केली. हळूहळूच ती, कासवाच्या गतीने... कासवासारखीच..

नक्कीच संदर्भ अजूनही लागत नसणार आणि ज्यांना लागलाय त्यांना या संदर्भात स्पष्टीकरण अजूनच इंटरेस्टिंग असणार. नाही का? असो.

प्रत्येकाचा एक विशिष्ट स्वभाव असतो. त्या स्वभावाच्या अनेक पैलूंमधील एक पैलू म्हणजे ते बीज. त्याचंच ते रोपटं आणि काही जणांमध्ये झालेला त्याचा वटवृक्ष. अशातच अनेकांच्या अस्पष्ट स्वभावामध्ये मला हा पैलू स्पष्टपणे दिसून आला. कदाचित तो माझ्यामध्येही होता; किंबहुना अंशत: अजूनही आहेच म्हणून इतका स्पष्टपणे दिसला असावा.

'व्यक्ती हा शब्द फक्त माणसांनाच का लागू होत असावा, हा प्रश्न मला पडला होता आणि उत्तरासाठी एका क्षणाचीही उसंत न घेता, 'ज्याला व्यक्त होता येतं ती व्यक्ती' इतकं साधं, सरळ उत्तर त्या मनाने मला दिलं. मग बाकीचे प्राणी किंवा सजीव व्यक्त होत नाहीत का? ह्या खोलात मीही गेलो नाही. कदाचित माझ्या विचारांच्या पार्श्वभूमीला अनुसरून असणारी ह्या व्यक्तीची व्याख्या त्या मनाने तात्काळ माझ्यासमोर पेश केली. 'व्यक्त होता येणारी ती व्यक्ती.'

माझ्यासहित अनेकांच्या स्वभावात दिसलेला तो पैलू म्हणजे

'व्यक्त होता न येणं.' इथे हा न महत्त्वाचा... जेव्हा एकाच विचाराचा भुंगा आपल्याभोवती सारखा भ्रमण करत असतो आणि आपण त्याला धड पकडूही शकत नाही ना लांबही करू शकत नाही तेव्हा कोणाची तरी मदत घेऊन त्या भुंग्याला आपल्यापासून दूर सारणं आपल्यासाठी कधीही मानसिकदृष्ट्या चांगलं ठरतं, कारण शारीरिक ताणापेक्षा मानसिक ताणच माणसाला जास्त थकवतो. अशा वेळी जेव्हा आपल्याला एखाद्या गोष्टीचा विचार करायचा नसतो तेव्हा त्याच गोष्टीचा विचार आपण जास्त वेळ करतो. मग ती परिस्थिती असेल, व्यक्ती असेल, भविष्य, वर्तमान, भूतकाळ असेल. ते काहीही असू शकतं. त्याला सीमाच नाही. किती वेळ विचार करायचा ह्याची सीमा ज्याची त्याने ठरवायची असते; पण केवळ त्याच गोष्टीवर विचार केल्याने आणि मनात चाललेल्या प्रश्न–उत्तरांच्या खेळांना वाट न मिळाल्याने त्याचा परिणाम आपल्या रोजच्या जीवनावर होतो. हे तुमच्याआमच्यापैकी प्रत्येकानेच कधी न कधी अनुभवलं असेलच, कारण त्या मनातील प्रश्नाचं समाधान आपण दिलेल्या उत्तराने काही काळच होतं. त्यानंतर मात्र त्यांना योग्य उत्तराची आस असते आणि म्हणूनच ते डोकावतात, पुनःपुन्हा...

विनयसोबत असं अनेकदा होत असे. त्याला एखादी मनातील गोष्ट जेव्हा समोरच्याला सांगावीशी वाटत असे तेव्हा तो सांगू शकत नसे. एकदा त्याच्याच अत्यंत जवळच्या अणि त्याच्यापेक्षा वयाने मोठ्या असणाऱ्या व्यक्तीला सांगायची असलेली गोष्ट तो बरेच दिवस, महिने, वर्ष सांगू शकत नव्हता; परंतु तीच गोष्ट त्याला रोज खात असे. त्यांना सांगितल्यानंतरच्या परिणामांच्या भीतीने किंवा त्यांच्याप्रति असलेल्या आदरयुक्त भीतीपोटी तो या गोष्टीबाबत त्यांच्यासमोर खंबीरपणे उभा राहू शकला नसेल; परंतु एक दिवस मात्र त्याने पत्र लिहून त्यांना सगळं सांगून टाकलं आणि त्या क्षणापासून ते विचार अन् त्यांचा तो भुंगा त्याच्यापासून कायमचा दूर गेला. इतके दिवस ओझं वाटणारी गोष्ट जेव्हा त्याने पत्ररूपी का होईन व्यक्त केली तेव्हा त्याचंच मन हलकं झालं, असं तो म्हणाला आणि नंतर तीच गोष्ट सांगायला आपण उगीच इतका वेळ लागला. उगीच ते ओझं तसंच घेऊन राहिलो असं त्याला वाटायला लागलं. इथे त्याला त्या पत्राची मदत झाली, कारण त्याला त्या रोजच्या गरगरणाऱ्या भुंग्यापासून मुक्तता हवी होती आणि त्यासाठीच व्यक्तता नितांत आवश्यक होती. ते पत्ररूपी माध्यम फक्त एक रस्ता होता, अनेकांमधला एक. त्या रस्त्यावरून चालत जाऊन समोरच्याजवळ व्यक्त होणं त्याच्यासाठी महाकठीण काम होतं. म्हणूनच व्यक्त झाल्यानंतरचा आनंद त्याच्या मनाला हलकं करून गेला. चालत आलेला तो अवघड रस्ता मात्र त्याला सोपा वाटू लागला. म्हणूनच त्या रस्त्यावर चालणं महत्त्वाचं, समोरच्याजवळ व्यक्त होणं महत्त्वाचं, कारण माध्यमांपेक्षा त्याच्यानंतरच्या परिणामाची गरज आपल्याला जास्त असते. हो ना?

असो.

मधुराचंही असंच काहीसं होतं. तिच्याबद्दल मला अनेक मित्र–मैत्रिणी म्हणाले होते की, ती फारच सीक्रेटिव्ह आहे ॲण्ड ऑल. मलाही पहिल्यांदा भारी वाटायचं. आपल्या मनातील गोष्टी ती कोणालाच कळू देत नाही ही खासियतच झाली तिची. नाही का? आणि एक दिवस अचानक वाटलं, 'अरे, स्वतःच्या मनातील गोष्टी व्यक्त होण्यासारखा एकही माणूस हिच्या आयुष्यात नाही?' जेव्हा हीच गोष्ट मी तिला बोलून दाखवली तेव्हा तिच्या सीक्रेटिव्हपणाची तिलाच कीव आली आणि तिनेही स्वतःमधल्या एका नवीन बदलाला सुरुवात केली. आज ती आधीपेक्षाही आनंदी आहे अन् छोट्या छोट्या व्यक्ततेतून मुक्त होत आहे.

असे अनेक प्रसंग, घटना, व्यक्ती आपण सगळेच रोज अनुभवतो. आपल्याजवळही अनेक जण त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील गोष्टी व्यक्त करून मोकळे होतात. आपणही त्यांना योग्य सल्ला देऊन योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करत असतो. ज्या व्यक्तीजवळ अशा अनेक व्यक्ती व्यक्त होत असतात त्यालाच जेव्हा मनातील भावनांच्या खेळापासून व्यक्त होऊन मुक्त व्हायचं असतं तेव्हा तो तेवढ्याच सहजासहजी होऊ शकत नाही हेही तितकंच खरं. म्हणूनच त्याने त्या रस्त्यावर आपणहून चालायचं असतं, ते माध्यम आपणहून शोधायचं असतं, ती आपल्या आजूबाजूलाच असतात. त्यांची कमी कधीच नसते. जसं गाणं गाणाऱ्यासाठी सूर पक्का असणं आवश्यक असतं अन् ते नसल्यास कच्च्या सुरांना रियाझाने पक्के करता येतं तसंच माणसाला आनंदी राहण्यासाठी मन शांत असणं आवश्यक असतं अन् ते नसल्यास हडबडलेल्या मनाला व्यक्ततेच्या आधाराने मुक्त, शांत करता येतं.

या सगळ्याचा सारांश सांगायचा झाला तर, 'व्यक्ती म्हणून जगताना वेळोवेळी व्यक्त होणं भागच असतं, तिथे माध्यमांचा वा परिस्थितीचा विचार करायचा नसतो ह्याची आज शाश्वती झाली.' कदाचित हे लिहिलेलं अनेकांनी अनुभवलं असेल. अनेकांना ते नवीनही असेल. माझ्यासारख्याच अनेकांनी मनातील भावनांच्या खेळांना व्यक्त करण्याचे स्वतःचे मार्गही शोधून काढले असतील. कागद–पेनाच्या साहाय्याने व्यक्त होण्याच्या ह्या मार्गात सुसूत्रता, साचेबद्धपणा आहे की नाही हे मीही जाणत नाही; पण मला मार्ग सापडला, व्यक्त होण्याचा. तुमचं काय?

– मकरंद अयाचित

लातूर, भारत

ayachit.makarand@gmail.com

प्राध्यापकाचा सत्याग्रह

आय.आय.टी. ही जागतिक दर्जाची उच्च शिक्षण संस्था आहे हे आपल्याला माहिती आहे. ह्या संस्थेत प्रवेश घ्यायचा असल्यास द्यावी लागणारी परीक्षा, त्या परीक्षेच्या तयारीसाठी निर्माण झालेली कोचिंग क्लासेसची फॅक्टरी ह्याचीदेखील आपल्याला माहिती आहे. आतापर्यंत एखाद्-दुसरा अपवाद वगळता ह्या प्रवेश परीक्षांच्या बाबतीत काही गोंधळ, भ्रष्टाचार झाल्याचे फारसे ऐकिवात नाही हेही तितकेच खरे; पण कोणतीही व्यवस्था परिपूर्ण नसते. ह्यात कुठे ना कुठे 'लूप होल्स' असतातच. अशाच त्रुटी संबंधित व्यवस्थापनाच्या नजरेस आणून, त्याविरुद्ध फार मोठा लढा एका आय.आय.टी.च्याच प्रोफेसरने दिला. त्याची मात्र अनेकांना माहिती नसणार. जेव्हा एखाद्या निर्णयाविरोधात, सरकारविरोधात मोर्चे निघतात, जाळपोळ होते, आंदोलने होतात तेव्हा तो चर्चेचा विषय होतो. माध्यमं त्याला उचलून धरतात. पण केवळ एकट्या व्यक्तीने दिलेला लढा मात्र दुर्लक्षित राहतो.

अशा एका प्रोफेसरने दिलेल्या सत्याग्रहाच्या लढ्याची ही गोष्ट.

प्रोफेसर राजीव कुमार हे त्या व्यक्तीचे नाव. ते आय.आय.टी. खडकपूर येथे कॉम्प्युटर सायन्स विभागात प्राध्यापक होते. तिथून त्यांना बळजबरीने, नाइलाजाने निवृत्त व्हावे लागले. सध्या ते जे.एन.यू. दिल्ली येथे प्रोफेसर आहेत.

२००६ साली प्रा. कुमार यांनी आय.आय.टी.च्या प्रवेश परीक्षेच्या निकालाच्या पद्धतीला आव्हान दिले होते. विशेष म्हणजे या परीक्षेची जबाबदारी त्या वेळी आय.आय.टी. खडगपूरच्याच प्रशासनाकडे होती; ज्या संस्थेत स्वतः प्रा. कुमार कार्यरत होते. त्या वेळी त्यांनी सुरू केलेला लढा, हाय कोर्ट, सुप्रीम कोर्ट अशा वेगवेगळ्या पायऱ्या चढत दहा वर्षे चालला. असे संघर्ष हे सोपे नसतात. अशा लढाया लढण्यासाठी इनफायनाइट पेशन्सची गरज असते. लढा वैयक्तिक असला तर पैसेही खर्च होतात अन् कोर्टाच्या पायऱ्या चढायच्या तर ह्या रकमा अवाढव्य असतात. समाजात प्रत्येक जण बोटचेपे धोरण स्विकारीत असल्या कारणाने, इतर कुणाची मदतदेखील शक्य नसते. किनाऱ्यावर उभे राहून टाळ्या पिटण्यात मजा अनुभवणाऱ्यांचीच संख्या जास्त असते. दिल्ली, कोलकाता येथील हाय कोर्ट, नंतर सुप्रीम कोर्ट, नंतर सेंट्रल व्हिजिलन्स कमिशन (केंद्रीय दक्षता विभाग) अशा सर्व स्तरांवर प्रो. कुमार ह्यांनी एकट्याने हा लढा दिला.

आश्चर्य म्हणजे त्यांच्या ह्या लढ्यामुळे गेल्या सात-आठ वर्षांत आय.आय.टी.च्या प्रवेश परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदल झालेत. त्यात बऱ्याच प्रमाणात पारदर्शकतादेखील आली. आता दोन परीक्षा होताहेत. परीक्षेची फीदेखील जाहीर केली जाते. आता तर उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रतदेखील दिली जाणार. विशेष म्हणजे प्रत्येक विषयात ठरविण्यात येणाऱ्या कट ऑफ मार्कांचे सूत्रदेखील जाहीर करण्यात आलेय. पूर्वी हे सगळे गुप्ततेच्या नावाखाली दडवून ठेवले जायचे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी जे सूत्र वापरले जाते, नियम तयार केले जातात, ते वेळोवेळी बदलतात; पण ते नियम नेमके काय आहेत, कोणत्या सूत्रानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार होते हे सारे फक्त व्यवस्थापनाला, त्यातही विशिष्ट कॉन्फिडेंशिअल टीमलाच, म्हणजे आतल्या गोटातील निवडक प्राध्यापकांनाच माहिती असायचे. त्याची कधीही बाहेर वाच्यता होत नसे. प्रा. कुमारांनी नेमके ह्या त्रुटीवरच बोट ठेवले.

प्रा. कुमार ह्यांना ह्या लढ्यामुळे खडकपूरच्या प्रशासनाचा चांगलाच रोष अनुभवायला मिळाला. त्यांनी स्वतःच्याच मातृ संस्थेला आव्हान दिल्यामुळे त्यांना २०११ साली निलंबित करण्यात आले. त्यानंतर २०१४ साली त्यांना सक्तीची निवृत्ती घेण्यासाठी भाग पाडले गेले. सुदैवाने हा सक्तीच्या निवृत्तीचा आदेश तेव्हाचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी २०१७ साली रद्द केला.

ह्या सर्व प्रकरणाची सुरुवात कशी झाली हे पाहणे मनोरंजक ठरेल. २००६ साली प्रा. कुमार ह्यांना खडकपूरच्या संस्थेत रुजू होऊन सहा वर्षे झाली होती. ते मूळचे उत्तर प्रदेशातील पीलभीत ह्या गावचे. तिथून एम.एस्सी. केल्यानंतर त्यांनी आय.आय.टी. खिरकी येथून एमटेक केले, कॉम्प्युटर सायन्स ह्या विषयात. त्यानंतर काही वर्षे हैदराबाद, तर काही काळ देहरादून येथील डी.आय.डी.ओ.च्या प्रयोगशाळेत काम केल्यानंतर त्यांनी १९९४ ते ९७ या कालावधीत पीएचडीचे संशोधन केले; युनिव्हर्सिटी ऑफ शेफिल्ड, यूके येथून. यू.के.तून परतल्यानंतर काही काळ बिटस पिलानीत नोकरी केल्यानंतर ते २००० साली आय.आय.टी. खडकपूरला रूजू झाले.

ज्यांनी एका हाती एवढा मोठा लढा दिला त्या व्यक्तीची पार्श्वभूमी माहिती असणेदेखील तेवढेच गरजेचे असते. ही लढाई

कुणी सोम्यागोम्याने दिलेली नाही हे कळावे हा त्यामागचा उद्देश.

२००६ साली त्यांच्या मुलाने आय.आय.टी.ची प्रवेश परीक्षा दिली. परीक्षेत चांगले गुण मिळूनही त्यांच्या मुलाला गुणवत्ता यादीत नांव न आल्यामुळे आय.आय.टी.त प्रवेश मिळाला नाही. प्रा. कुमारांना आश्चर्य वाटले. त्या वेळी फक्त यादी जाहीर होत असे निवडीस पात्र असलेल्यांची. मार्क्स किती मिळाले, कसे मिळाले, गुणवत्ता यादी कशी तयार झाली वगैरे काहीही जाहीर होत नसे. (आता ह्यात बरीच सुधारणा झालीय. त्याचे पूर्ण श्रेय– निदान बरेचसे श्रेय प्रो. कुमार ह्यांच्या लढ्याला जाते.)

२००६ साली सप्टेंबर ते नोव्हेंबर ह्या काळात त्यांनी ही प्रवेश परीक्षा घेण्याची जबाबदारी असणाऱ्या आय.आय.टी. खडकपूरच्या प्रशासनाकडे बरीच लेखी निवेदने दिली. २००५ च्या आरटीआय कायद्याप्रमाणे विचारणा केली. २००७ साली त्यांना प्रत्येक विषयाचे कट ऑफ मार्क्स कळविण्यात आले. त्यांनी स्वत: मेहनत घेऊन सुमारे ५०० विद्यार्थ्यांच्या कट ऑफ मार्क्सचा सखोल अभ्यास केला. कट ऑफ मार्क्सच्या कॅलक्युलेशनमध्येच काही तरी गडबड, गोंधळ आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी २००७ साली कलकत्ता हायकोर्टात धाव घेतली. आश्चर्य म्हणजे कोर्टाने खडकपूरच्या व्यवस्थापनाला जाब विचारल्यानंतर तीन वेळा आयआयटीने तीन वेगवेगळ्या पद्धती सादर केल्या– गुणांकन ठरविण्याच्या. म्हणजे प्रशासनातच सुसूत्रता नव्हती, एकवाक्यता नव्हती हे सिद्ध झाले. प्रो. कुमार स्वत: कॉम्प्युटर सायन्सचे प्राध्यापक असल्याने त्यांनी आयआयटीने सादर केलेल्या गुणसूत्रानुसार वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी उत्तरे मिळायची. त्याचा गुणवत्ता यादीशी काहीही मेळ नसायचा. कोर्टाने नियुक्त केलेल्या दोन तज्ज्ञांचेदेखील हेच मत झाले. हे तज्ज्ञ इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स अन् इंडियन स्टॅटिस्टिकल इंस्टिट्यूटचे होते! २००८ साली आयआयटी प्रशासनाचा भोंगळ कारभार निदर्शनास येऊनही हायकोर्टाने केस डिसमिस केली, कारण काय? तर विद्यार्थ्यांनी (म्हणजे अर्जदारांनी कुमारांच्या मुलाने) परीक्षेला बसण्यापूर्वी अर्ज भरताना लिहून दिले होते की, आम्हाला आय. आय.टी.चा रिझल्ट मान्य असेल. प्रवेश परीक्षेसंबंधात आय. आय.टी. प्रशासनाचा निकाल हा अंतिम असेल.

तसं पाहिलं तर असे डिक्लेरेशन हे अनेक अर्जांत असतेच. ह्याचा अर्थ परीक्षा घेणाऱ्या संस्थेला वाटेल ते करण्याचे स्वातंत्र्य आहे असा होत नाही; किंबहुना जे काही न्याय्य, कायदेशीर सूत्र गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी वापरले जाते ते जाहीर करणे हे प्रशासनाचे कर्तव्य ठरते. म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला जरी ते कळले नाही तरी ह्या केसमध्ये अर्जदाराला, कोर्टाला सांगणे, स्पष्ट करणे गरजेचे ठरते; पण तसे झाले नाही.

कुमारांचा संघर्ष थांबला नाही. त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली निकालासंबंधीचे डिटेल्स, रिक्त जागांची संख्या, परीक्षेचे पेपर्स, त्यांची उत्तरं, आय.आय.टी.च्या प्राध्यापकांच्या मुलामुलींना दिले गेलेले प्रवेश ह्या संबंधित बरीच माहिती गोळा केली अन् साहजिकच खडकपूर प्रशासनाची नाराजी ओढावून घेतली.

मध्यंतरीच्या काळात कुमारांच्या मुलाने जादवपूर विद्यापीठातून २०१० साली पदवीदेखील घेतली अन् बहुराष्ट्रीय कंपनीत चांगली नोकरीसुद्धा मिळवली; पण मुलाला आय.आय.टी.ला प्रवेश मिळाला नाही त्याचे नेमके कारण काय, हे जाणून घेण्याची प्रा. कुमारांची जिद्द मात्र संपता संपली नाही.

एप्रिल २०१० साली त्यांनी कलकत्ता हाय कोर्टाच्या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात अर्ज दाखल केला; पण ही बाब त्या कोर्टाच्या कक्षेत येत नसल्याचे कारण देत तो अर्ज नाकारण्यात आला; पण प्रा. कुमारांच्या प्रयत्नांमुळे आय.आय. टी. प्रवेश परीक्षेत आमूलाग्र बदल झाले, करावे लागले ह्याची सुप्रीम कोर्टाने नोंद घेतली हे विशेष...

पुनवेचा चंद्र

पुनवेचा चंद्र आज विलसतसे नभी गगना
ज्योत्स्नान्कित तव तनु ही भुलवी आज मम मना
।।धृ.।।

तव शब्दे अमृत हे पाझरते जणू रसना
मृदू भाषे बोलुनिया तृप्त करी मम श्रवणा
तव हास्ये हृदयी मम जागवी प्रेमभावना
पुनवेचा चंद्र आज विलसतसे नभी गगना ।।१।।

धुंद मस्त मंद पवन उधळीत तव केशाला
देखुनिया मोहित मन केशनकशी तव भाला
मोगऱ्याचा सुगन्ध रोमांचित करी मम तना
पुनवेचा चंद्र आज विलसतसे नभी गगना ।।२।।

हस्तद्वये बाहुपाश आलिंगूनी मम वपुला
उष्ण श्वास ओष्ठ स्पर्श मदिराक्षी म्हणू तुजला
प्रणयरम्य आज सख्ये सुखविशी तव मनरमणा
पुनवेचा चंद्र आज विलसतसे नभी गगना ।।३।।

– वैभव दातार
कल्याण, भारत
vaibhavdatar87@gmail.com

(‘संगीत सौभद्र’ नाटकातील ‘नच सुंदरी करू कोपा मजवरी धरी अनुकंपा’ ह्या नाट्यपदांच्या चालीवर आधारित एक ‘प्रणयगीत’ मी लिहिले आहे.)

२००६ च्या प्रश्नपत्रिकेतील चुकादेखील प्रा. कुमारांनीच कोर्टाच्या नजरेस आणून दिल्या. ह्यामुळे प्रशासनाला बरेच महत्त्वपूर्ण क्रांतिकारक बदल करावे लागले; पण प्रा. कुमारांचा मात्र मानसिक छळ झाला. त्यांच्या आय.आय.टी.च्या क्वार्टरवर हल्लादेखील झाला.

प्रा. कुमार एवढ्यावरच थांबले नाहीत. आय.आय.टी.च्या लॅपटॉप खरेदीतील उणिवादेखील त्यांनी प्रशासनाच्या नजरेस आणून दिल्या. जे लॅपटॉप आय.आय.टी.ने खरेदी करण्याचा निर्णय घेतला त्यापेक्षा जास्त क्षमतेचे, दर्जाचे लॅपटॉप कमी किमतीत उपलब्ध असल्याचे त्यांनी डीनच्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. संस्थेचे पैसे वाचवणे हा प्रा. कुमारांचा प्रामाणिक उद्देश असूनही, खरेदीचे नियम न पाळल्याबद्दल त्यांनी कुमारांनाच दोषी ठरवले. (कमी किमतीत लॅपटॉप खरेदी केल्याबद्दल) ही बाब त्यांनी मिनिस्ट्री ऑफ एचआरडी अन् सेंट्रल इनफर्मेशन कमिशनच्या नजरेस आणून दिली.

ह्या सर्व प्रकरणाचा प्रा. कुमारांच्या कुटुंबावर परिणाम झाला. ज्या पत्नीने त्यांना कोर्टाच्या वाऱ्या करण्यासाठी, त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी पुरेपूर साथ दिली तिचे ह्या कार्यकाळात (२०१६) दम्याच्या विकाराने निधन झाले. आय.आय.टी. प्रवेश मिळूनही त्यांच्या मुलीने भीतीपोटी तो स्वीकारला नाही.

एप्रिल २०१३ मध्ये त्यांचे निलंबन मागे घेण्यात आले. नंतर ते आय.आय.टी. कानपूर येथे अतिथी प्राध्यापक म्हणून जॉइन झाले. ह्या काळात दिल्ली हाय कोर्टाने आय.आय.टी. प्रशासनाला प्रवेश परीक्षा पद्धतीत बरेच बदल करण्यास भाग पाडले. त्यामुळे कॉमन कौंसिलिंग सुरू झाले. प्रश्नांची उत्तरे (की) जाहीर करण्यात आली. कट ऑफ मार्क्सचे विशिष्ट, लॉजिकल सूत्र ठरविण्यात आले. जॉइंट एंट्रस, मेन अन् त्यानंतर ॲडव्हान्सड् टेस्ट अशी दुपदरी परीक्षा पद्धत सुरू झाली.

आय.आय.टी. खडकपूरने प्रा. कुमारांवर संस्थेची बदनामी करण्याचे, कोड ऑफ कंडक्ट न पाळल्याचे अन् खरेदी समितीला डावलून स्वतःच लॅपटॉप विकत घेतल्याचे (तेही कमी खर्चात!) आरोप केले. खासगीत कुमारांना अनेक जण मदत करीत, आधार देत; पण जाहीररीत्या मात्र त्यांना कुणीही मदत केली नाही. कुणीही त्यांची बाजू उचलून धरली नाही. ह्यावरून आपली सामाजिक जाण, मनोवृत्ती किती स्वकेंद्रित आहे हेच दिसून येते.

संस्था एखाद्याचा किती अन् कसा छळ करू शकते ह्याचे हे जीवंत उदाहरण; तीही आय.आय.टी.सारखी उच्च शिक्षण संस्था! जे. एन.यू.मध्ये कन्फर्म झाल्यानंतर त्यांनी आय.आय.टी. खडकपूरचा राजीनामा दिला. (जून २०१६); पण तो प्रशासनाने स्विकारला नाही. सुदैवाने २०१४ चा निवृत्ती आदेश राष्ट्रपती प्रणव मुखर्जी महोदयांनीच रद्द केला. शेवटी हाय कोर्टाच्या निर्देशानुसार २०१५ पासून त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला. ह्या सर्व भानगडींचा संबंध अर्थातच त्यांच्या रिटायरमेंट बेनिफिटशी होता.

ह्या संपूर्ण प्रकरणात प्रा. कुमारांचीच बाजू घेणे हा मुळीच उद्देश नाही. अशी लढाऊ प्रवृत्तीची माणसे कधी कधी विक्षिप्तासारखी वागतात अन् परिणामस्वरूप प्रशासनाचा, वरिष्ठांचा रोष ओढावून घेतात हेही तितकेच खरे. ह्या लढाईत प्रा. कुमारांचा प्रत्यक्ष न्यायालयीन विजय झाला नसला (म्हणजे त्यांच्या मुलाला प्रवेश मिळाला नसला) तरी आय.आय.टी. प्रवेश परीक्षेच्या गुणवत्ता यादी तयार करण्याच्या पद्धतीत त्रुटी होत्या हे बाहेर (चव्हाट्यावर) आले. कट ऑफ मार्क्स ठरविण्याची पद्धतही लॉजिकल नव्हती हेही सिद्ध झाले. परिणामस्वरूप ह्या एकूणच प्रोसीजरमध्ये बऱ्याच प्रमाणात पारदर्शिकता आली हेही तितकेच खरे.

डीन, कुलगुरू ह्या पदांवर काम केल्यामुळे परीक्षेच्या संदर्भातल्या अनेक गोष्टी 'जशाच्या तशा' उघड करता येत नाहीत, त्या संदर्भातले बरेच निर्णय हे कॉन्फिडेन्शिअल असतात. बाहेर जाहीर करायचे नसतात ह्याची मला कल्पना आहे; पण ह्या बदलत्या जगात प्रत्येकाला प्रत्येक माहिती जशीच्या तशी हवी असते. तुम्ही जर अन्याय केला नाही, गडबड केली नाही, तर मग जे आहे ते जसेच्या तसे जाहीर करायला काय हरकत आहे, असा युक्तिवाद केला जातो; पण सीक्रेसीच्या नावाखाली अनेकदा प्रशासन आपल्याच चुकांवर पांघरूण घालते. प्रा. कुमार ह्यांच्यासारखा कुणी लढाईला सज्ज होईपर्यंत सारे काही 'ऑलवेल' चालून जाते; पण नेटाने लढलेल्या सत्याग्रहामुळे कधीकधी प्रशासनाचे बिंग फुटते. प्रशासनाला क्रांतिकारक बदल करणे भाग पाडले जाते.

शेवटी एका गोष्टीचा उल्लेख करणे गरजेचे आहे. प्रा. कुमारांशी माझा व्यक्तिगत परिचय नाही. एका ॲक्रिडिशन कमिटीच्या संदर्भात एकदाच आमची भेट झाली. तेव्हा हा लढा जोरावर होता. त्यामुळे त्यांनी थोडीफार कल्पना दिली. मीही आय. आय.टी. खडकपूरचाच, म्हणून ते अधिक मोकळेपणाने बोलले एवढेच; पण वेळोवेळी वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातम्यांचा मी (त्याच क्षेत्रातला म्हणून) वेध घेत राहिलो. त्या बातम्यांच्याच आधारे एका प्राध्यापकाचा हा संघर्ष सामान्य जनतेला, विद्यार्थी–पालकांना (अन् इतर प्राध्यापकांनाही) कळावा म्हणून हा लेखनप्रपंच. ह्यात आय.आय.टी. प्रशासनाचीदेखील थोडी वेगळी बाजू असू शकते; पण ती जगजाहीर होणं जरा कठीणच!

– विजय पांढरीपाडे
७६५९०८४५५५
हैदराबाद, भारत
vijaympande@yahoo.com

चिनी माती

हम थे वो थे और समा रंगीन
समझ गये ना!
जाना था जपान पहुंच गये चीन
समझ गये ना!
याने याने याने चीनसे प्यार हो गया!

या सुट्टीत कुठे जायचे? या प्रश्नावर विचारमंथन चालू असताना सहजच चीनची प्रचंड भिंत, थ्री गॉर्जेस धरण, चायनीज फूड, तिबेटचे पठार, चायनीज मेडिसिन, गोबीचे वाळवंट, हर्बीन आइस फेस्टिव्हल, तिआन-आन-मेन स्क्वेअर, फॉरबिडन सिटी, लि रीव्हर क्रुझ रीड फ्लूट केव्हज, चीनमधले पुरातन पॅगोडे आणि आधुनिक शहर अशी ही यादी नूडलसारखी लांबतच गेली आणि चौकशी करायला गेलेले आम्ही बुकिंग करून परत आलो.

चीनचा बेस्ट सीझन स्प्रिंग म्हणजेच वसंत ऋतू आपल्या मे महिन्यात येतो. त्यामुळे सुट्टीचा प्रश्न सुटला व आनंदाने तयारी करून आम्ही बीजिंगच्या दिशेने प्रयाण केले. हाँगकाँगला चार तासांचा स्टॉप ओव्हर होऊन आम्ही सकाळी ९-९.३० च्या सुमारास बीजिंगला पोहोचलो. बीजिंगच्या प्रदूषणाची चित्रे टीव्हिवर पाहिल्यामुळे मास्क तयार ठेवले होते, पण एअरपोर्टच्या बाहेर सुंदर फुलांचे ताटवे, हिरवीगार वृक्षराजी पाहून डोळे सुखावले. सर्वत्र काही तरी कापसासारखं उडत होतं. अगं बाई, हे काय आता, असं म्हणत असतानाच त्या म्हाताऱ्या असल्याचं लक्षात आलं आणि आम्ही हसत हसत बसमध्ये चढलो. हॉटेलवर जाऊन फ्रेश होऊन आम्ही चीनची सफर सुरू केली! चीनमध्ये आम्ही चार ठिकाणांना भेट दिली. बीजिंग, शिआन, गुईलीन व शांघाय!

अतिशय रुंद, खड्डे नसलेले व दुतर्फा गुलाबांचे फुलेले ताटवे व त्यामागे हिरवीगार झाडे व मागे उंच उंच इमारती असलेले रस्ते. त्यावरून आम्ही डोण्ट राइड जस्ट ग्लाइड असे तिआन-आन-मेन स्क्वेअरच्या दिशेने निघालो. वाटेत ट्रॅफिक होतं; पण जॅम कुठेच नव्हता. एक गोष्ट पहिल्याच दिवशी लक्षात आली, की या खंडप्राय देशात प्रत्येक गोष्ट प्रचंड मोठी व अतिशय सुंदर आहे. इतिहासप्रसिद्ध चीनची भिंत असो वा आधुनिक थ्री गॉर्जेस धरण असो, अति प्रचंड प्रोजेक्ट्स आणि अति महत्त्वाकांक्षी राज्यकर्ते. कला असो अथवा सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, दोन्ही अप्रतिम. तिआन-आन-मेन स्क्वेअरचा इतिहास, तिथे झालेली विद्यार्थ्यांची निदर्शने या पार्श्वभूमीमुळे उत्सुकता होती. ३०० मी. x ५०० मी.चे फरसबंद पटांगण, बाजूने फुलांचे ताटवे, मधोमध मॉन्युमेंट टू पीपल, शेतकरी, कामगार, सैनिक व सर्वसाधारण जनता यांचे स्मारक. चार बाजूंना पार्लमेंट हाऊस, विविध देशांचे दूतावास, नॅशनल म्युझियम व जुन्या किल्ल्याची उरलेली तटबंदी.

कमालीची स्वच्छता, सुंदर नक्षीकाम केलेली बाकं, दिव्याचे खांब, कठडे. प्रत्येक गोष्ट सुंदर. ठिकठिकाणी उभे असलेले हिरव्या गणवेशातील गार्ड्स व गाईडचे माहितीपूर्ण विवेचन!

संपूर्ण प्रवासात जाणवलेली गोष्ट म्हणजे सामान्य माणसाला राजकारणात अजिबात रस नाही. नगरसेवक, एमपी, मंत्री कोण आहेत, कुठे राहतात, पार्लमेंटमध्ये ते काय करतात कोणास ठाऊक? पण आम्ही आनंदात आहोत. आता आर्थिक सुबत्ता आहे हे दिसतच आहे. कपडेलत्ते, औषधपाणी, मुलांची शिक्षणं, मनोरंजन, सुखसोयी उत्तम आहेत. खेळ, काव्य, शास्त्र, व्यापार-उदीम, सायन्स टेक्नॉलॉजी यात आम्ही पुढे आहोत, मग आम्ही

राजकारणात लुडबुड का करावी? असा या लोकांचा दृष्टिकोन. आपल्या अगदी विरुद्ध. आपल्याकडे 'बच्चा बच्चा जानता है' की आज महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत काय झालं.

बीजिंगमधलं दुसरं आकर्षण होतं एक हजार वर्षे जुनी फॉरबिडन सिटी अर्थात राजवाडा. सामान्य जनतेसाठी प्रवेश बंद. म्हणून फॉरबिडन सिटी आता टुरिस्ट अ‍ॅट्रॅक्शन! बाहेरची तटबंदी ३० फूट उंच व एकात एक सात तटबंदी. ९०,००० लोक मावतील एवढं बाहेरील पटांगण. आतमध्ये ८७०६ दालनं (खोल्या) २४ सम्राटांचं वास्तव्य! राजवाड्यात ३००० ते १०,००० लोक व ३००० दास, दासी, तृतीयपंथी व सम्राटांची अंगवस्त्रे (दासी) रहात असत. राजघराण्यातील व्यक्तींना राजवाड्याबाहेर जाण्याची परवानगी नसे. अधिकाऱ्याच्या दर्जाप्रमाणे राजवाड्यातील घरांच्या छताचा रंग व कलाकुसर अवलंबून असे. सम्राटाच्या निवासस्थानाला सोनेरी छत व कलाकुसरीला सोन्याचा मुलामा. ठिकठिकाणी राज्यसत्तेचं प्रतीक म्हणून सिंह व त्यांच्या पंजाखाली पृथ्वीचा गोल व ड्रॅगन. तसाच सुंदर सरोवराच्या मध्यभागी असलेला समर पॅलेस.

फॉरबिडन सिटीपासून जवळच टेंपल ऑफ हेवन पंचमहाभूतांचे मंदिर. ऑनफ्युयाजन आर्किटेक्चरनुसार बांधलेल्या मंदिरात मूर्ती नाही! त्याऐवजी निळे छत तोलून धरायला मध्यभागी चार सोन्याचा मुलामा लावलेले खांब, चार ऋतू दर्शविणारे, त्याच्या बाहेर १२ खांब १२ महिने दर्शविणारे व त्यानंतर १२ खांब चिनी पद्धतीनुसार दिवसाचे १२ भाग दर्शविणारे. मंदिरात प्रार्थना व बळीसाठी राजा वर्षातून दोनदा मिरवणुकीने येत असे. वसंत संपात दिन व शरद संपात दिनी स्प्रिंग इक्विरॉक्स व ऑटम इक्विरॉक्स या दिवशी.

दुसऱ्या दिवशी ग्रेट वॉल ऑफ चायनाला भेट दिली. ११००० किमीपेक्षा जास्त लांबीची. ५०० बीसीपासून अठराव्या शतकापर्यंत बांधकाम चालू होतं. यलो सीमधील शानहुई गुआनपासून सुरू होऊन पाच राज्ये व २ अलटोनोनस रिजन्समधून जात. गोबीच्या वाळवंटापर्यंत जाणारी महाप्रचंड भिंत. उत्तरेकडून येणाऱ्या शत्रूंपासून रक्षण करण्यासाठी बांधलेली, एका वेळेला घोडेस्वारांच्या तीन ओळी जाऊ शकतील एवढी रुंद. ठरावीक अंतरावर बांधलेल्या चौक्या व व्यापाऱ्यांकडून कर वसूल करण्यासाठी मधे मधे नाकी!

चीनच्या भिंतीवर उभं राहिल्यावर सहजच मनात आलं की जितं मया! हेच तर मला करायचं होतं. तिथलं विहंगम दृश्य पाहून परत येताना जगात फक्त गोबीच्या वाळवंटात सापडणारा दोन मदारींचा उंट बघायला मिळाला.

चीनच्या अप्रतिम वास्तुकलेचं मूळ कशात आहे हे माझ्या लक्षात आलं. जे लोक ११००० किमीची भिंत बांधू शकतात, थ्री जॉर्जज् धरण बांधू शकतात तर ते काहीही बांधू शकतात. भारतातल्या प्रत्येक स्थापत्य अभियंत्याला वर्षभर चीनमध्ये इंटर्नशिप करायला पाठवायला हवं. खास करून आपल्या सार्वजनिक बांधकाम विभाग व त्यांच्या कॉन्ट्रॅक्टर्सना!

तिसऱ्या दिवशी शिआन (चीनची पूर्वीची राजधानी)ला गेलो, फेमस टेराकोटा आर्मी बघायला. उत्सुकता होतीच. मध्यंतरी मोदीजींचे फोटो पाहिले होते टेराकोटा सोल्जर्सबरोबरचे.

चीनचा पहिला सम्राट क्वीन-ची-हुआंगडी याने स्वतःच्या मृत्यूपश्चात जीवनासाठी जमिनीखाली प्रचंड महाल बांधला होता. जवळपास २२०० वर्षांपूर्वी सात हजार कारागिरांनी ३६ वर्षांत बांधकाम पूर्ण केले. १९७६ मध्ये एका शेतकऱ्याला याचा शोध लागला. त्यात ७००० सैनिकांचे पुतळे सापडले. अजून उत्खनन पूर्ण झालेले नाही. विशेष म्हणजे प्रत्येक पुतळ्याचा चेहरा वेगळा आहे व सैनिकांच्या हुद्द्याप्रमाणे त्यांची केशरचना, अंगरखा, शस्त्रे, पादत्राणे वेगवेगळी आहेत.

ठिकठिकाणी मोती व जेडचे दागदागिने, चायना सिल्क, बोन चायना, क्रोकरी, चायनीज पेंटिंग्ज व शेकडो चायनीज मेड मेमेन्टोज् विकण्यासाठी रंगीबेरंगी गर्दीने फुललेले बाजार पर्यटकांच्या स्वागतासाठी उत्सुक होते.

शियान शहराभोवती पुरातन ३० फूट रुंद भिंत आणि खंदक आहे. आता तो जाणीवपूर्वक सांभाळत आहे. रोज रात्री त्यावर लायटिंग असते. येथेच दायन-ता-पॅगोडा (ग्रेल वाइल्ड गूस) पॅगोडा आहे. आपल्या दृष्टीने त्याचे महत्त्व म्हणजे तिसऱ्या-चौथ्या शतकात चिनी प्रवासी ह्यु-अन-त्संग भारतात येऊन गेला. त्याने परत जाताना प्रचंड ग्रंथसंपदा नेली. ते सर्व ग्रंथ पॅगोडाच्या म्युझियममध्ये जतन करून ठेवले आहेत.

एक विशेष बाब म्हणजे चीनमध्ये मोटरबाइक्स, स्कूटर्सना परवानगी नाही. बॅटरी ऑपरेटेड १०० सी ई इक्विव्हॅलंटपेक्षा कमी क्षमतेच्या दुचाकी दिसल्या. त्यामुळे भन्नाट वेगात मोटरबाइक राइडची मजा चायनीज तरुणांना माहीतच नाही. अर्थात त्यामुळे अपघातही नाहीत.

बीजिंग, शांघाय, हाँगकाँग, चेंगडू आदी दहा मोठ्या शहरांत रहाण्यासाठी सरकारची परवानगी लागते. एक ठरावीक गलेलठ्ठ रक्कम भरल्याखेरीज या शहरांमध्ये कायम वास्तव्य करता येत नाही. तसेच कार घ्यायची असल्यास पार्किंगची व्यवस्था दाखवावी लागते व कारसाठीपण फी भरावी लागते. आपापल्या हुद्द्यानुसार नंबर प्लेटचा रंग वेगवेगळा असतो. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरात येणारे लोंढे नाहीत व बकाल वस्त्या नाहीत. नोकरी व घराची व्यवस्था असेल तरच शहरात या, नाही तर येता येणार नाही.

नुकतीच चीनने एकल मूल तत्त्व गुंडाळून आता दोन मुले तत्त्व आणले आहे.

यानंतर आमचा पडाव होता निसर्गसुंदर गुईलीन येथे.

चुनखडीच्या टेकड्यांनी वेढलेले, ली नदीच्या काठी वसलेले नितांत सुंदर गुईलीन. जगप्रसिद्ध ली रिव्हर क्रुझ व रीड फ्लूट केव्हज्! गुईलीनला पोहोचल्यावर आम्हाला चायनीज फूट मसाज दिला गेला, पूर्ण एक तासभर. काही तरुणींनी अत्यंत मन लावून पूर्ण एक तास पायांना मसाज केला. पारंपरिक चायनीज औषध उपचार पद्धती फारच प्रभावी व उपयुक्त आहे. (त्याशिवाय चीनची एवढी प्रचंड लोकसंख्या तग धरणार नाही.) गेल्या पाच हजार वर्षांपासून लिखित स्वरूपात अस्तित्वात असलेली, अगणित विचारवंत तत्त्ववेत्ते व विद्वानांच्या विचारमंथनातून तयार झालेली हंड्रेड स्कूल मेथड, ॲक्युपंक्चर, ऑक्युप्रेशर, विविध मसाज औषधे यांचा समावेश असलेली पद्धत. यातील दोन महत्त्वाचे प्रकार म्हणजे ओन्फ्युसिआस पद्धत व डाओइझम (तिओइस्म) पद्धत.

सकाळ-संध्याकाळ ठिकठिकाणी ताईची व्यायाम प्रकार, खेळ, नृत्य करणारे विविध वयोगटांतील स्त्री-पुरुषांचे गट दिसायचे. सर्वत्र चटपटीत आणि स्लिम लोक पटापट काम करताना दिसत होती. कोणीही गप्पा छाटत तंबाखू मळत बसलेले दिसत नाही. अत्यंत कमी तेलात बनवलेले जेवण व सतत गरम ग्रीन टी पिण्यामुळे आपोआपच वजन कमी रहातं. प्रत्येक स्त्री-पुरुष काम करतात. शहरात बेकारी नाही.

गुईलीनच्या आजूबाजूला हजारो चुनखडीचे डोंगर आहेत. पाटावर एकापाठोपाठ सांडगे घालावेत असे ते सुटे डोंगर आहेत व त्यातून सुंदर 'ली' नदी वाहते.

त्या दिवशी रात्री एका सरोवरच्या दोन किनाऱ्यांवर असलेले सन व मून पॅगोडा पाहून आलो. भव्य सोनेरी रंगाचा सन पॅगोडा व त्यापेक्षा लहान रुपेरी रंगात न्हालेला मून पॅगोडा. चायनीज लोकांच्या सौंदर्यदृष्टीला सलाम.

यानंतरच्या दिवशी सर्वात सुंदर असा ४ तासांचा 'ली' नदीवरचा क्रुझ होता. चीनच्या प्रवासातील हा परमोच्च बिंदू होता. चायनीज चहा आणि भारतीय भोजनाचा आस्वाद घेत घेत निसर्गसौंदर्याचा खजिनाच लुटला. 'बहुरत्ना ही वसुंधरा'. पृथ्वीच्या सौंदर्याला तोड नाही. या चार तासांत अति सुंदर धबधबे, गुहेत गुप्त होणारे प्रवाह, दोन नद्यांचा संगम, ढगांत आणि धुक्यात लपलेले विविध आकारांचे डोंगर, ऊनपावसाचा पाठराखणीचा खेळ अशी निसर्गाची विविध रूपे पाहिली आणि रीड फ्लूट केव्हज् पहायला गेलो. पाण्यामुळे चुनखडी विरघळून लवण स्तंभ स्टालेइटीलर आणि स्टॅलाग्माइट्स तयार झालेल्या गुहांमध्ये आता नयनरम्य लायटिंग केलेले आहे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे गुहांमधील स्वच्छता. (नाही तर आपल्याकडे अजिंठा, वेरुळ गुहांमध्ये कबुतरं, वटवाघळं, उंदीर, घुशी व घाण वास यांचं साम्राज्य की कधी एकदा तिथून निघून जातोय असं होतं.)

याचबरोबर प्रत्येक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होते. बीजिंगला एका नाटकात फिरत्या रंगमंचावर चक्क पाण्याच्या मोठ्या लाटा निर्माण केल्या होत्या.

शेवटचा पडाव शांघायला होता. चीनमधील सर्वात आधुनिक शहर आणि आर्थिक राजधानी. गेल्या फक्त २५ वर्षांत नवीन रूप धारण केलेलं शहर. चीनच्या प्रशासनाने काय केलं? तर शांघायच्या आसपासची ४०-५० खेडी नकाशावरून पुसून टाकली. (तेथील लोकांचे काय झाले? असे प्रश्न विचारायचे नाहीत.) व प्रचंड मोठं सुनियोजित महानगर उभं केलं. ४-४ स्तरांचे उड्डाणपूल, ५० मजल्यांच्या १००० इमारती, तर १०० मजल्यांच्या वर ५० इमारती, हुआंग-पो नदीवर १२ पूल आणि या सर्वाला सपोर्ट करणारे इतर इन्फ्रास्ट्रक्चर, वीज आणि पाणीपुरवठा, बाजारपेठा, हॉस्पिटल्स इत्यादी फक्त पंचवीस वर्षांत.

पूर्वेकडील पॅरिस हे नामाभिधान सार्थ करणारं नितांत सुंदर शहर. जगातील सर्वात वेगवान मॅग्नेट ट्रेन इथेच आणि त्याचबरोबर अठराव्या शतकातला युयुआन रॉक गार्डनही इथेच. फेंग शुई प्रणालीनुसार बांधलेल्या इमारती, उद्यान, बौद्धविहार, हॉस्पिटल्स, शैक्षणिक संस्थासुद्धा इथेच. अशा सुंदर व समृद्ध चीनची सफर पार पडली. हो, शेवटी चायनीज फूड भारतातच खावं. एक गोष्ट मात्र सतत जाणवत राहिली, की समृद्धी आहे, प्रगती आहे, पण लोकशाही नाही. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, एवढंच काय विचारस्वातंत्र्यही नाही. प्रत्येक गोष्ट सरकारी नियंत्रणाखाली. कोणाशी बोलायला कुठे जायचं, काय करायचं, काय शिकायचं सर्व सरकार ठरवणार.

माझा भारत गरीब, अस्वच्छ, अशिक्षित असला तरी माझ्या देशात लोकशाही आहे आणि हेच आपले सर्वात मोठे बलस्थान आहे. आपण आपलं मत व्यक्त करू शकतो. प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क आहे आणि दर पाच वर्षांनी आपण तो बजावतो. संपूर्ण भारतात आपण कोठेही जाऊन राहू शकतो. कसंही असलं तरी सरकार आपलं असतं आणि आपण 'स्वतंत्र' आहोत. भारत माझा देश आहे.

- विनया बाम
पुणे, भारत
mukundbam1234@gmail.com

शब्दकोडे



आडवे शब्द :–

१. २०१८ चे एशियाड खेळ या देशात भरले होते

५. २०१८ चे एशियाड खेळ या शहरात झाले होते.

७. २०१८ च्या एशियाड स्पर्धेत १०. मी. एअर पिस्तूलमध्ये सुवर्णपदक पटकावणारा एक भारतीय नेमबाज

१२. धारणा, समजूत; सूर्याभोवती फिरणारे नऊ गोल

१३. समान, हुबेहूब

१५. पत्त्यातील तांबड्या रंगाचे एक पान; सुक्या मेव्यातील एक पौष्टिक पदार्थ

१६. ऐकण्याचे इंद्रिय

१७. पर्ण, पत्र

१८. तीर्थस्थळाची नियमित यात्रा

१९. पुढारी, लीडर

२२. नारी, स्त्री

२३. लाट, लहर,

२४. शरीर, देह, काया

२५. सासरी होणारा छळ, जाच

२६. जडणघडण, निर्मिती

२९. फळातील मऊ भाग, मगज

३०. विनोद खन्ना, फिरोज खान, माधुरी दीक्षित, अमलाचा एक चित्रपट

३२. भृंगिराज; एक औषधी वनस्पती

३३. देश, वतन

३४. गणपतीचे एक नाव

३६. ईर्षा, चढाओढी; शिजलेल्या भातातील न शिजलेला तांदूळ, कणी

३७. विषारी

३९. दानशूर, दानवीर

४०. अकस्मात, एकाएकी

४४. विश्रांती, विश्राम
४४. ढोंग, सोंग
४५. फणसाची एक जात
४६. घाण पाणी वाहून देणारा नाला
४८. हात, हस्त; खंड, टॅक्स, सारा
४९. मोड, कोंब, अंकुर
५१. कॉम्प्युटर
५३. सैन्याचा दाणागोटा
५५. मकरंद
५६. निष्कपटी, सालस, भोळा
५८ न हलणारा, स्थिर
५९. मस्तक, शिर
६२. तळे, जलाशय
६३. नम्र, लीन, झुकलेला
६५. पसरलेले, उथळ
६७. डुक्कर, सुव्वर
६८. ओढा, प्रवृत्ती
६९. माराची खूण, डाग, वण
७०. एक लवचीक ताणला जाणारा पदार्थ
७२. दोन दगड्यांमधील खोल भगदाड, चीर
७३. आश्चर्य, अद्भुत, नवल
७४. सूत काढण्याचे यंत्र
७६. 'बाजीराव मस्तानी', 'पद्मावत', 'बेफिक्रे' या चित्रपटांतील अभिनेता (नाव)
७८. बकरी
७९. छोटा मुलगा
८०. मंदिर, देऊळ
८३. विजय, फत्ते, जय
८४. वेग
८६. वायफळ बडबड, वटवट
८७. वटाचे झाड
८८. वधू-वराची मिरवणूक
९०. एक जुने वजनी माप; वाघ (हिंदी)
९१. विष, जहर
९४. गोमाता
९६. पाषाण, खडक
९७. सर्व, संपूर्ण
९९. शिट्टी
१०१. चामखीळ
१०३. मृत माणसाबद्दल धरावयाचा विटाळ
१०४. दुश्मनी, भांडण
१०५. गाल व कपाळ यातील भाग
१०७. दरदिवशी; गुलाब (इंग्रजी)
१०९. शैली, ढब
१११. रांग, ओळ
११३. फिकीर, पर्वा
११५. प्रत्येक; शंकर
११६. एखाद्यावर अचानक हल्ला करण्यासाठी लपून बसणे
११७. 'सांगते ऐका', 'घरकुल', 'मोहित्यांची मंजुळा' या चित्रपटांतील नायिका
११८. मच्छर, चिलट
११९. सहस्र ही संख्या
१२०. चंबू, खुजा

उभे शब्द :-

१. यांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले.
२. खोल पाण्याची जागा; नदी, तळे यातील खोल भाग
३. घृणा, तिटकारा
४. मित्र, सखा
६. तन, देह, अंग
७. सुभाष घई दिग्दर्शित दिलीपकुमार व राजकुमार यांचा एक चित्रपट
८. एक विदेशी मद्य
९. फलंदाजाच्या चार धावांचा फटका
१०. पैसा, द्रव्य
११. जम्मू-काश्मीरची राजधानी
१४. जनगणना, शिरगणती,
१७. निष्णात, हुशार, कुशल
१८. उणीव, न्यून
२०. नक्षत्र, चांदणी
२१. 'अभिमान', 'नमकहराम', 'शोले' या चित्रपटांतील एक विनोदी सहकलाकार
२२. अनेक, विविध; 'क्रांतिवीर', 'अब तक छप्पन', 'प्रहार' या चित्रपटांतील अभिनेता (नाव)
२४. सज्ज, सिद्ध
२७. छोटा डाव
२८. कन्या, मुलगी
३०. दहीकालाचा उत्सव
३१. भेट, उपहार
३४. एकला, स्वतंत्र
३५. शिक्षा, सजा
३८. अमिताभ, रजनीकांत, गोविंदा, किमी काटकर, डॅनी, कादरखान यांचा एक चित्रपट
३९. मोठी सुई
४०. अमर्याद, पुष्कळ, भरपूर
४१. रोख, रोकड
४२. भारताचा एक प्रसिद्ध जलतरणपटू
४४. दोन जमावांमधील हिंसा
४७. निरुपयोगी कागद, वृत्तपत्रे
४८. एक प्रसिद्ध दिवंगत नाट्य कलावंत व दिग्दर्शक xxxxx सारंग
५०. पाताळलोक
५१. संग्रह, साठा, ढीग
५२. कंबरेजवळील जागा
५४. एक अधिक पाव
५७. घर, गृह
५८. बिरबलाचा राजा
६०. कचरा, घाण
६१. मोठे उथळ ताट
६२. नवरामुलगा, वर
६४. थर, पडदा
६५. साडीचा आंचल
६६. सूत कातण्याची चाती; वटवट
६७. उलटी, ओकारी
७१. 'नमकहलाल', 'लावारीस', 'सुहाग' या चित्रपटांतील खलनायक
७४. चरबीयुक्त, चरबीने माखलेले
७५. कपाळ, ललाट
७७. अंगठा व करंगळी ताणून होणारे अंतर
७८. कृषी; भारतीयांचा प्रमुख व्यवसाय
७९. पाठीला आलेला बाक, कुबड
८१. मोठी वाटी
८२. जव, सातू
८४. सापाचे विष, जहर
८५. मुसलमानांतील घटस्फोट
८६. शक्ती, सामर्थ्य
८९. केतूचा जोडीदार ग्रह
९०. किसान
९१. हिंदी चित्रपटांतील एक प्रसिद्ध गीतकार xxxx जयपुरी
९२. जडच्या विरुद्ध
९३. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध उंच शिखर
९५. काळ, मृत्युदेवता
९६. सापाने टाकलेली त्वचा
९८. विलंब, वेळ लागणे
१००. कमळ, पंकज
१०२. अखंड, बिनसांध्याचा
१०३. चांगल्या घाटाचे, सुंदर, रेखीव
१०६. पाट, कालवा
१०८. जीत, विजय
११०. काठ, बाजू
११२. पाण्याचा माठ, मडके
११४. मास, महिना
११६. मूल्य, किंमत, भाव

- संजीव उपरे

निर्माण होतील. वरिष्ठांशी न पटण्याचे योग आहेत.

कुंभ : खर्च वाढतील, पण त्याबरोबर आर्थिक आवकही वाढेल. आजारपणावर थोडे पैसे खर्च होतील. काही गोष्टी आपल्या मनाविरुद्ध होतील. आरोग्य तक्रारी राहतील. औषधांवर खर्च होईल.

मीन : योग्य-अयोग्य निर्णय कोणता हे समजणार नाही. चुकीचे निर्णय होऊ शकतात. योग्य व व्यावहारिक निर्णयास प्राधान्य द्या. आपल्या मर्जीनुसार कामे होणे थोडे कठीण आहे.

नोव्हेंबर २०१८

मेष : मनावर ताण असणे महत्त्वाचे आहे. ग्रहमान जरी अनुकूल असेल तरी आर्थिक आवक-जावक यावर लक्ष ठेवणे जरुरीचे आहे. आर्थिक व्यवहार सांभाळा.

वृषभ : प्रकृती आणि चिंता या सारख्या सतावतील. आहार-विहारावर काळजी घ्या. मानसन्मान मिळतील. घरगुती कटकटी वाढतील. घरातील समस्यांवर नियंत्रण ठेवा.

मिथुन : शेअर बाजारावर जर गुंतवणूक केली असेल तर थोडी वाट पाहावी लागेल. घराचे योग चांगले आहेत. गुंतवणूक करू शकता किंवा नवीन पहिले घर घेऊ शकता.

कर्क : पित्ताचा त्रास होऊ शकतो. परदेशगमन संधी येऊ शकतात. प्रवासात काळजी घ्यावी लागेल. महत्त्वाची कागदपत्रे हरविण्याची शक्यता आहे. सोन्यात गुंतवणूक चालेल.

सिंह : एखादा धाडसी निर्णय महागात पडण्याची शक्यता आहे. व्यवहार जपून करावेत. काही व्यवहारांमध्ये नुकसान होईल. महिना तसा त्रासदायक जाईल. मित्रांपासून जपून रहा.

कन्या : खेळाडू अथवा ज्यांना खेळाडू म्हणून पुढे करीअर करायचे आहे त्यांना उत्तम संधी येतील. यामध्ये त्यांचा आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे. मानसन्मान मिळतील.

तूळ : कलाकारांना मानसन्मान मिळतील. एखादे जुने येणे वसूल होईल. आर्थिक फायदा संभवतो. विवाहयोग येण्याची शक्यता आहे. युक्तीचा वापर करा. बरेच प्रश्न सुटतील.

वृश्चिक : शेतकऱ्यांना बरे दिवस येतील. मागील तूट भरून निघेल. शेतकऱ्यांना काही नवीन कल्पना सुचतील. मौल्यवान वस्तू सांभाळा. कोणास उधार किंवा उसनवारी टाळा.

धनू : जोडीदाराचे आरोग्य सांभाळा. शक्यतो पार्टनरशिप व्यवहार या महिन्यामध्ये टाळावा. मित्रमंडळींकडून सल्ला घेणे टाळा. आर्थिक प्राप्ती संभवते. प्रेमात पुढे जाण्यास काहीही हरकत नाही.

मकर : कौटुंबिक अस्वस्थता वाढेल. मागील काही समस्या वर डोके काढतील. अकारण गैरसमज वाढतील. नोकरीमध्ये थोड्या समस्या

डिसेंबर २०१८

मेष : व्यवसायामध्ये थोडी वृद्धी होण्याची शक्यता आहे. पार्टनरशिप व्यवहार टाळावेत. प्रकृती मध्यम राहील. मागील देणे वसूल होईल. कामाचा ताण वाढेल. आर्थिक प्राप्ती बरी असेल.

वृषभ : तुमचा सल्ला इतरांना उपयोगी पडेल. धार्मिक कार्ये घडतील. थोडा प्रवासाचा योग संभवतो. प्रेमात गैरसमज निर्माण होतील. आर्थिक परिस्थिती चांगली असेल. पैसा मिळेल.

मिथुन : आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढणे तुम्हाला जमेल. मुलांच्या बाबतीत थोडी चिंता राहील. जोडीदाराबरोबर थोडे मतभेद होण्याची शक्यता आहे. उपासना चालू ठेवा. मार्ग निघेल.

कर्क : जास्त वयाच्या व्यक्तीने जपून रहाणे गरजेचे आहे. पडणे किंवा शरीरास इजा होण्याची शक्यता आहे. जुने दुखणे डोके वर काढेल. आजाराची शक्यता असून उपचार वेळीच करावेत.

सिंह : मतभेदाची शक्यता जास्त आहे. मनावर ताबा ठेवावा. शब्दाने शब्द वाढत जाईल. दुसऱ्याचे मन सांभाळावे. थोडी माघार घेतली तरी चालेल. दुखापतीपासून सावध रहाणे योग्य होईल.

कन्या : मिळालेला मानसन्मान टिकवून ठेवणे गरजेचे आहे. प्रेमात धोका होऊ शकतो. फसवणुकीची शक्यता आहे. बरेवाईट अनुभव येतील. अनुभवातून शहाणपण येत असते. त्यांचा उपयोग होईल.

तूळ : निरेषेतून प्रकाशमानाकडे प्रवाह चालू आहे. त्याचा कसा उपयोग करायचा हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. पुढील काही आराखडे मांडा. योग्य विचारातून काही चांगले घडण्याचा योग आहे.

वृश्चिक : अचानक धनलाभाचा योग संभवतो. योग्य ठिकाणी गुंतवणूक फायदेशीर राहील. मनाचा कोंडमारा होतोय असे नेहमी वाटत राहील; परंतु तसे काही होणार नाही. प्रवासात जपा.

धनू : 'आपण भले आपले काम भले' अशा प्रकारची प्रवृत्ती या महिन्यात होईल. कोणास जामीन राहू नका अगर गाफील राहू नका. जे काम करणार असाल ते मनापासून करा. यश निश्चित.

मकर : मागील खालावलेले ग्रहमान जागेवर येईल. मनावर व जिभेवर ताबा ठेवा. 'अति परिचयात अवज्ञा' अशी स्थिती होईल. प्रेमप्रकरणे घडतील. काही नवीन मार्ग सुचतील.

कुंभ : आधी आपणास कोठे जायचे आहे ते नक्की करा. मार्ग निघतील, परंतु जर आपले मन चंचल असेल तर अडथळे येण्याची शक्यता आहे. व्यवहार जपून करावेत हे बरे.

मीन : अति घाई थोडे त्रास देईल. नोकरीत चांगले दिवस येतील. बढतीचे योग संभवतात. सर्वांशी जुळवून घेणे गरजेचे आहे. चुकीच्या व्यक्तीवर विश्वास ठेवू नये. त्रासदायक होईल.

जानेवारी २०१९

मेष : या राशीला पोवळे हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. धार्मिक कार्ये होतील. देवधर्मानिमित्ताने प्रवास होतील. अति काळजी करण्याचे सोडून द्या.

वृषभ : या राशीला हिरा हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. काही चुकीच्या घटनांचा तुमच्यावर परिणाम होईल, परंतु योग्य ग्रहमानामुळे त्यातून सुखरूप बाहेर पडाल.

मिथुन : या राशीला पाचू हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. आर्थिक घडी सावरेल. तुमच्या मतांचा इतरांवर प्रभाव पडेल. मागील कार्ये मार्गी लागतील.

कर्क : या राशीला मोती हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. काय करावे हे सुचत नाही अशी परिस्थिती निर्माण होईल. मार्ग काढण्यासाठी प्रयत्नशील रहाल.

सिंह : या राशीला माणिक हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. घर, जागा, दुकान अशा स्थावर मालमत्ता घेण्याचे योग आहेत. त्याप्रमाणे आवक होईल.

कन्या : या राशीला पाचू हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. कोणी दिलेली मदत आपण स्वीकारू शकता, कारण ती परत फेडणे आपणास शक्य होणार आहे.

तूळ : या राशीला हिरा हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. आधीपासून जो प्रवास चांगला सुरू झाला आहे तो राहील. नवीन मार्ग सापडतील. शांतता लाभेल.

वृश्चिक : या राशीला पोवळे हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. कायदेशीर कटकटी वाढतील. थोडी चिडचिड होईल; परंतु काही कालावधीनंतर परिस्थिती मध्यम असेल.

धनू : या राशीला पुष्कराज हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. समंजसपणा दाखविल्यास पुढे मार्ग काढणे सोपे पडेल. नोकरी–व्यवसायात भरभराट होऊ शकते.

मकर : या राशीला नीलम हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. शिक्षणाच्या नवीन संधी उपलब्ध होतील. संतती होण्याच्या संधी येतील. मध्यम ग्रहमान.

कुंभ : या राशीला नीलम हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. पतीपत्नीमध्ये थोडा दुरावा निर्माण होऊ शकतो. सतत विचाराने मन ग्रासेल आणि काळजी असेल.

मीन : या राशीला पुष्कराज हे रत्न योग्य असते. बॉडी ओरा स्कॅनिंग करून हे रत्न वापरू शकता. नवीन जबाबदाऱ्या वाढतील. कामाचा ताण जाणवेल. मोठ्या लोकांच्या भेटीगाठी होतील.

फेब्रुवारी २०१९

मेष : शैक्षणिक प्रगती संभवते. नवीन कोर्सेस शिकण्याची इच्छा होईल. घराला हातभार लागेल. काही गोष्टी मनासारख्या झाल्यामुळे मनातील चुकीचे विचार कमी होतील. आनंदी रहाल.

वृषभ : परदेशगमन संधी चालून येतील. मधे आलेले सर्व अडथळे कमी होतील. नोकरी–व्यवसायाला एखादी चांगली दिशा मिळेल. आर्थिक प्राप्ती समाधानकारक असेल.

मिथुन : सुरळीत झालेली आर्थिक घडी पाहून समाधान वाटेल. प्रेमप्रकरणात यश संभवते. नोकरी–व्यवसायात आवडीचे काम मिळेल. प्रकृती ठीक राहील. कामाचा ताण वाढत जाईल.

कर्क : कामात येणारे अडथळे दूर होतील. जबाबदारी वाढेल. मनावर थोडा ताण येईल. काय करावे हे सुचणार नाही; परंतु शुभग्रहांचे प्राबल्य आपणास योग्य त्या मार्गाने नेईल.

सिंह : प्रसिद्धी मिळेल. मानसन्मानाचे योग येतील. एखादी परदेशगमन संधी येईल. विवाहाचे योग येतील. वाहन चालविताना काळजी घ्यावी. विचारांचा गोंधळ उडेल. मनाची द्विधा मनःस्थिती राहील.

कन्या : परिस्थितीचा विचार करून आपण निर्णय घ्याल. परिस्थिती मध्यम राहील. मनाचा गुंता होईल. महिनाअखेरपर्यंत एखादी चांगली बातमी मिळेल. मुलांच्या प्रगतीची वार्ता येईल.

तूळ : आर्थिक आवक चांगली राहील. विचारांचा समतोल राहील. शैक्षणिक प्रगती होईल. प्रकृती मध्यम राहील. घरगुती मतभेदांपासून दूर रहा. योग्य मित्रांची गाठ पडेल.

वृश्चिक : कोर्टकचेऱ्यांमध्ये यश प्राप्त होईल. जागा, जमीनजुमला यामध्ये बरेच व्यवहार होतील. कामे मार्गी लागतील. हातून थोडा खर्च होण्याची शक्यता आहे. प्रगतीचा आलेख चांगला राहील.

धनू : कामाचा ताण वाढेल. पैसे काटकसरीने वापरा. घरातील एखाद्या व्यक्तीचे आजारपण येणे संभवते. खर्च वाढल्यामुळे मनावर दडपण वाढेल, पण बरी ग्रहस्थिती राहील.

मकर : सुवार्ता योग. सुखद घटना घडतील. अचानक आर्थिक धनलाभ होईल. पैसे योग्य ठिकाणी गुंतवावेत.

कुंभ : विचाराने आणि कष्टाने मार्गक्रमण कराल. नातेवाईक यांच्याकडून फसवणुकीची शक्यता आहे. चुकीचे ऐकून चुकीचे निर्णय घेऊ नका. मोठे व्यवहार टाळावेत. गुपित उघड करू नये.

मीन : 'अति तिथे माती' असा योग येऊ शकतो. कोणताही निर्णय घाईघाईने घेऊ नका. मनावर ताबा असेल तर निर्णय योग्य होऊन प्रगती साधेल. मित्रमंडळींपासून नुकसान होऊ शकते.

मार्च २०१९

मेष : मतप्रवाहात भिन्नता ही बाब समजून शांत राहणे गरजेचे आहे. मधे काही गोष्टी मनाविरुद्ध होतील. कारण समजणे शक्य नाही. जास्त विचार न करता कार्यमग्न रहा. छोटी कामे होतील. मनावर ताबा ठेवा.

वृषभ : संधीचे सोने करणे तुमच्या हातात आहे. नवीन संधी घेताना काळजी घ्या. कारण नवीन संधीची माहिती तुम्हाला नाही. व्यवहाराने निर्णय घेणे हा तुमचा स्वभाव असला तरीही तो कृतीमध्ये आणा.

मिथुन : करायला गेलो एक असे होऊ शकते. निर्णय विचार करून घ्या. चोरी किंवा एखादी वस्तू गहाळ होण्याची शक्यता आहे. पडणे, दुखापतीपासून जपणे गरजेचे आहे. एकूण मध्यम ग्रहमान आहे.

कर्क : प्रेमप्रकरणे मार्गी लागतील. 'इकडे आड तिकडे विहीर' अशी अवस्था होईल. पार्टनरशिप व्यवसायाच्या संधी येतील, परंतु त्या किती योग्य असतील ते पहाणे गरजेचे आहे. अति घाई करू नका.

सिंह : पोटाच्या तक्रारी राहतील. खाणे आणि पथ्य यावर लक्ष ठेवा. संसर्गजन्य आजारापासून जपा. वैयक्तिक स्वच्छता ठेवा. आर्थिक परिस्थिती बरी राहील. होणाऱ्या घटनाक्रमावर बारीक लक्ष ठेवा.

कन्या : कायदेशीर कटकटीपासून दूर राहा. प्रसंगातून बाहेर पडाल. धीराने तोंड द्या. कोणाशीही अकारण मैत्री वाढवू नका. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. विद्यार्थ्यांना यश लाभेल.

तूळ : कामात मग्न असणे हे आपले वैशिष्ट्य आहे. या कामाची तपासणी करून कोणते काम योग्य आहे हे ठरविणे गरजेचे आहे. मनासारखे सर्व घडते आहे असा आपला गैरसमज होईल. कामात राहा.

वृश्चिक : आर्थिक घडी सावरेल. बचतीचा योग्य मार्ग काढणे गरजेचे आहे. कामाचा ताण वाढेल. घाईमध्ये काही चुका होण्याचा संभव आहे. मनाची द्विधा अवस्था होईल. मेडिटेशन करा.

धनू : काम कसे करावे याचे नियोजन करावे. प्रत्येक निर्णय विचार करून घ्यावा लागणार आहे. चिडचिड होऊ देऊ नये. थोडी संकटे आली तरी त्यातून मार्ग निघेल. कोणताही अतिरेक करू नये.

मकर : स्थिरावलेली आर्थिक परिस्थिती ही जमेची बाजू आहे. देशपरदेश भ्रमण होईल. धार्मिक, ऐतिहासिक ठिकाणांना भेटी द्याल. काही किमती वस्तूंची खरेदी होईल. एकूण महिना छान आनंदात जाईल.

कुंभ : देशांतर्गत प्रवास होतील. फिरण्यामुळे काही वेळा थोडा आजारपणाचा त्रास संभवतो. गुडघेदुखी, अंगदुखी वाढेल. ज्यांना आधीपासून त्रास होत आहे त्यांनी योग्य उपचारांची व्यवस्था करावी.

मीन : निर्णायक क्षमता जर वाढली तर प्रगतीची शिखरे खूप चांगली आहेत. कष्टातून प्रगती करणे हे ध्येय ठेवणे गरजेचे आहे. सर्वसामान्य दृष्टिकोनातून पाहिल्यास तर मध्यम ग्रहमान आहे.

एप्रिल २०१९

मेष : अशांततेतून सुरुवात. कुसंगत, अति विचित्र ग्रहमान, काय केले आणि काय झाले हे समजणार नाही. उत्तरार्धात परिस्थिती निवळेल. घरात थोडी कुरबुर सुरू राहील असे वातावरण.

वृषभ : विद्यार्थ्यांना सुवार्ता मिळतील. विवाहयोग आहेत. मधूनमधून आनंदी क्षण येतील. वेळ खूप मिळेल. त्याचा सदुपयोग करणे जरुरीचे आहे. कामाची एकाग्रता वाढवा. पुढे उपयोग होईल.

मिथुन : आर्थिक परिस्थिती मध्यम. काही कामे होतील. काही कामे पुढे ढकला. मिक्स ग्रहमान आहे. चांगल्या कामाचा उपयोग होईल.

कर्क : नोकरी-व्यवसायात मध्यम स्थिती असेल. आरोग्य समस्या जाणवतील. आहारावर ताबा ठेवा. पोटाचे अथवा डोकेदुखीचे आजार संभवू शकतात. त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

सिंह : घटनाक्रम बदलत जाईल. बदलाचे वारे वाहत आहेत. जे योग्य आहे त्याच्या पाठीमागे रहा. उपयुक्त गोष्टींचा संचय करा. पुढे उपयोग होईल. अकारण मनावर ताण आणू नका.

कन्या : मध्यम ग्रहमान, मनावर ताण राहील. विचारांची गुंतागुंत वाढेल. 'मन चिंती ते वैरी न चिंती'. अति काळजी सोडा. थोडा कालावधी गेल्यावर सर्व परत व्यवस्थित होईल.

तूळ : नोकरी-व्यवसायात उत्कर्ष. सतत आवक. योग्य निर्णयाची अपेक्षा. जबाबदारी वाढेल. गुंतवणूक योग्य ठिकाणी करावी. पुढील धोरणे आखावीत, की जेणेकरून त्याचा योग्य वापर होईल.

वृश्चिक : सुधारलेली आर्थिक घडी याचा योग्य उपयोग करून घ्यावा. कुठे गुंतवणूक करायची हे तज्ज्ञांशी बोलून ठरवावे. जागा ओपन अगर बांधीव जागा यामध्ये यश संभवते.

धनू : जलद विचार करण्याची संधी. काही अचानक धनलाभाची शक्यता. विवाहयोग. कुसंगती टाळा. अकारण एखादा विषय ताणू नका. माझेच खरे असा विचार करू नका. कामात मग्न रहा.

मकर : नकारात्मक बाजू कमी करा. अकारण शरीरात निगेटिव्हिटी वाढवू देऊ नका. नातेवाईक व मित्रमंडळींपासून त्रास. काही गोष्टी पूर्वी केल्या पाहिजे होत्या, असा विचार मनात येईल.

कुंभ : आजारपणाची काळजी घ्यावी लागेल. जुनी दुखणी डोके वर काढतील. तब्येत नरमगरम असल्यामुळे सतत थकवा जाणवेल. ज्या गोष्टींशी आपला संबंध नाही त्यामध्ये रस घेऊ नये.

मीन : असलेल्या गोष्टी आणि न मिळालेल्या गोष्टी यामध्ये आपल्या मनाचा गोंधळ होऊ शकतो. जे मिळेल ते समाधानाने घेणे गरजेचे आहे. आपण सतत कामात राहणे योग्य ठरणार आहे.

मे २०१९

मेष : कामे मार्गी लागण्यास सुरुवात होईल. मातृपितृ चिंता. आर्थिक परिस्थिती थोडी कमीजास्त झाली तरी काळजी करण्याचे कारण नाही. पुढील परिस्थितीचा विचार करून निर्णय घ्या.

वृषभ : मिळालेल्या आनंदी क्षणांचा वापर करा. पर्यटन योग येतील. परदेशगमन योगसुद्धा येतील. आनंदी वातावरण राहील. आलेल्या परिस्थितीचा योग्य तो उपयोग करणे हा प्रांत आहे.

मिथुन : येणाऱ्या परिस्थितीचा कसा सामना करायचा हे तुम्हाला चांगले जमेल. आर्थिक परिस्थिती मध्यम राहील. प्रकृती नरमगरम

राहील. काही संकटे दूर होण्याची शक्यता आहे.

कर्क : आजारपणातून थोडी सुटका होईल. सतत समस्या का येतात याचा विचार करीत राहू नका. परिस्थिती थोडी कमीजास्त झाली तरी काळजी करण्याचे काही कारण नाही. मार्ग निघेल.

सिंह : विवाहयोगाची शक्यता. काहींना प्रेमप्रकरणातून मनासारखा जोडीदार मिळेल. कशात समाधान मानायचे हे आपल्या हातात असते. जास्त अपेक्षा ठेवू नका. मनाची शांतता राखा.

कन्या : मनाचा मोठेपणा दाखवा. काही वेळा नको असलेला खर्च उद्‌भवेल, परंतु तो करणे गरजेचे आहे. पुढे याचा योग्य उपयोग होईल. खर्चाची बाब आली की नको असे करून ते टाळू नका.

तूळ : कष्टामुळे शरीर थकेल. मित्रमंडळींचा सल्ला योग्य असेल तरच घ्या. एखाद्या विक्षिप्त वागणाऱ्या व्यक्तीचा त्रास तुम्हाला सहन करावा लागेल. गाडी घेण्याचा योग संभवतो.

वृश्चिक : जे निर्णय योग्य विचाराने घ्याल त्यावर तुम्ही ठाम रहा. कोणाचा चुकीचा सल्ला हा तुम्हास महागात पडू शकतो. नको ते लोक आपल्या बाजूला आहेत का याचा विचार करा.

धनू : ग्रहमान मध्यम असल्यामुळे काही कामे रेंगाळतील. पुढे काय मार्ग काढावा, असा विचार सतत मनात येईल. मार्ग तर निघणार आहे, परंतु त्यासाठी धीर धरणे अगदी आवश्यक आहे.

मकर : शरीरातील नकारात्मक बाजू काढण्यासाठी योग्य उपाय करा. धार्मिकतेकडे आपला कल मध्यम राहील. कोणावर विश्वास ठेवावा अथवा कोणावर विश्वास ठेवू नये अशी मनाची स्थिती असेल.

कुंभ : चिकित्सक वृत्ती कधी कधी त्रास देईल. पूर्वी कधी एखादी गोष्ट आपल्या मनात असेल ती या महिन्यात होऊन जाईल. गाडी चालविताना थोडी जपून चालवा.

मीन : नातेवाईक व मित्रमंडळींपासून सावध रहावे. कागदपत्रांवर सही करताना ती नीट तपासून पाहा. तुमच्या स्वभावाचा कोणी गैरफायदा घेते का ते पाहणे अगदी उचित ठरणार आहे.

जून २०१९

मेष : आलेली परिस्थिती कशी हाताळायची हे ठरवावे लागेल. ग्रहमान मध्यम आहेत. निर्णय घेताना विचारपूर्वक घ्या. उत्तरे मिळत जातील. मनात काय योजना आहे ती योग्य व्यक्तीस सांगा.

वृषभ : गृहलाभाचा योग आहे. वाहनयोग येतील. एखादी चांगली संधी चालून येईल. प्रयत्न थोडे वाढवावे लागतील. मित्रमंडळींवर विश्वास ठेवू नका. चुकीचा सल्ला आपणास मिळू शकतो.

मिथुन : प्रेमप्रकरणात सावध रहा. एखाद्या प्रकरणात आपण अडकू शकता. मृगजळाच्या मागे लागू नका. चुकीच्या व्यक्तीचे ऐकून काही योग्य निर्णय घेण्यामध्ये चूक होऊ शकते. काळजी घ्या.

कर्क : वाहनांपासून जपा. फक्त वाहनांपासूनच असे नाही तर कोणत्याही गोष्टींपासून छोटी दुखापत अथवा जखमा होऊ शकतात. मन स्थिर ठेवावे. आर्थिक परिस्थिती मध्यम रहाणार आहे.

सिंह : शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना नवी संधी प्राप्त होईल. त्यामध्ये काही नवीन शिकण्यासाठी परदेशगमन संधी प्राप्त होतील. एखादी नवीन जबाबदारी पार पाडताना कसरत होईल.

कन्या : सतत विचारांचा तुम्हाला त्रास होईल. इतरांना त्याचा त्रास होऊ देऊ नये अशी काळजी घ्या. कारण नसताना इतर उद्योगांमध्ये पडू नका. नोकरी–व्यवसायामध्ये मध्यम आवक राहील.

तूळ : कामाचा वेग वाढेल. फारसा ग्रहमानामध्ये बदल संभवत नाही. दोन्ही बाजूंनी समतोल विचार हा वाढवणे आपणास योग्य राहील. नवीन संधी चालून आल्या तरी जुनी कामे चालू ठेवा.

वृश्चिक : आर्थिक घडी सावरणार आहे. काही निर्णय जे बरोबर घेतलेले आहेत त्याचा उपयोग तुम्हाला या महिन्यात खूप होईल. आनंदी क्षण येतील. नातेवाईक व मित्रांमध्ये तुमचा बराच वेळ जाईल.

धनू : काही गोष्टी जरी आपल्या मनाविरुद्ध झाल्या तरी शांत रहा. आपल्या बोलण्यामुळे कोणी दुखावले जाईल का ते पाहणे जरुरीचे आहे. शब्दाने शब्द वाढत जातो. अशा वेळी माघार घेणे योग्य.

मकर : जसजशी नकारात्मक बाजू कमी होईल तेवढे मनावरील दडपण कमी होईल. नवीन विचार सुचतील. मार्ग कसा काढावा हेही सुचत जाईल. दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वत:मध्ये बदल करावा.

कुंभ : खेळाडूंना नवीन संधी मिळेल. नव्या कल्पना अथवा नवीन विचारांना इतरांकडून चांगला प्रतिसाद मिळेल. संधी जर एखादीच चालून आली तर ती सोडू नका. जास्त विचार न करता काम करा.

मीन : प्रगतीची लक्षणे तुम्हाला जाणवतील. कामाचा वेग वाढेल. 'आपण भले आपले काम भले', असा स्वभाव ठेवावा लागेल. आपल्या चांगुलपणाचा कोणी गैरफायदा घेत तर नाही ना याचा विचार करावा लागेल.

जुलै २०१९

मेष : वास्तुयोग, सुवार्ता, मुलांबद्दल चांगली बातमी यामुळे मन खूश होईल. परदेशगमन होईल. एखादी महागडी वस्तू खरेदी कराल. निर्णयामध्ये अचूकता हे या महिन्याचे वैशिष्ट्य आहे.

वृषभ : मधूनमधून, होणारी मनाची द्विधा मन:स्थिती हे या महिन्याचे वैशिष्ट्य आहे. जुनी येणी वसूल होतील. खर्चाला हातभार लावणारा एखादा व्यवसाय तुम्हाला मिळून जाईल.

मिथुन : काय करावे आणि काय करू नये हे आपणास त्वरित लक्षात येईल. लबाड मित्र व चुकीचे सल्ले देणारे नातेवाईक हे आपणहून बाजूला सरकतील. बिघडलेली घडी सावरू लागेल.

कर्क : मीपणाचा त्रास तुम्हाला जाणवेल. माझेच खरे करण्याच्या मध्ये थोडे नुकसान होईल. सारासार विचार करून कोणताही निर्णय घ्या. घरगुती वातावरण नरमगरम राहील. बोलण्यावर ताबा ठेवा.

सिंह : कामाचा ताण, नवीन जबाबदारी यामुळे थोडे थकण्यास होईल. घेतलेली जबाबदारी नीटपणे पार पडेल. नवीन काही संधी चालून येतील. नोकरी–व्यवसायामधील परिस्थिती नेहमीप्रमाणेच राहील.

कन्या : परिस्थितीमध्ये हळूहळू बदल होतील. बदलाचे वारे वहात आहे त्याप्रमाणे आपल्या मनाची तयारी करा. कामावर जास्त लक्ष

द्या. चुका तर होणार नाहीत ना याची खबरदारी घेणे योग्य होईल.

तूळ : परदेशगमन संधी येत राहतील. घरी मोठी कार्ये होतील. एखाद्या अशा व्यक्तीची गाठ पडेल; की जेणेकरून तुमच्यासाठी आर्थिक वाढीची शक्यता निर्माण होईल. जोडधंदा करण्यास हरकत नाही.

वृश्चिक : काही शुभग्रहांचा प्रभाव या महिन्यात तुमच्यावर राहील. मागील कामे जी कधी झाली नाहीत ती होत राहतील. एखादी चांगली संधीसुद्धा येईल. तोचतोचपणा कमी होईल व आनंदी रहाल.

धनू : मनावर ताबा ठेवा. एखादी गोष्ट जरी तुमच्या मनासारखी झाली तरी लगेच हुरळून जाऊ नका. मृगजळपण असू शकते. प्रत्येक घटनेचा सारासार विचार करून मगच निर्णय घेणे हे योग्य ठरेल.

मकर : बदल घडत राहतील. तुम्हाला त्यावर बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. योग्य तो मार्ग कसा काढायचा हे तुम्हाला ठरवावे लागेल. मध्यम ग्रहमान, काही वाईट घटना घडण्याचा संभव आहे.

कुंभ : संधीचे कसे सोने करायचे याचा विचार करा. अकारण विचार, चुकीच्या संगतीमध्ये येणे हे टाळा. कोणी आपणास चुकीचा सल्ला देत आहे का ते पडताळून पहा आणि मग निर्णय घ्या.

मीन : माझेच खरे करण्याच्या स्वभावाचा तुम्हाला त्रास होईल; पण काही जण याग्य सल्ला देतील; परंतु कंटाळा येत असल्यामुळे तो तुम्ही दुर्लक्ष कराल. चुकीचा निर्णय तुम्हाला त्रास देत राहील.

ऑगस्ट २०१९

मेष : आलेल्या संधीचा फायदा घ्या. नवीन काही यापुढे लगेच संधी येणार नाहीत; परंतु त्या आल्या तरीही त्याचा उपयोग करून घ्या. योग्य त्या ठिकाणी गुंतवणूक करा. मागील गुंतवणुकीचा फायदा होईल.

वृषभ : काही चुकीचे लोक तुमच्या आयुष्यात तुम्हाला मदत करण्याच्या निमित्ताने येतील; परंतु अशा लोकांचा वेळीच समाचार घ्या. कारण नसताना जर कोणी मदत करत असतील तर अशी मदत घेऊ नका.

मिथुन : काही जमेच्या बाजू या महिन्यात येत राहतील तुम्ही पूर्वी कोणास केलेली मदत याचा तुम्हाला चांगला उपयोग होईल. प्रकृती बरी राहील. आहारावर योग्य ते नियंत्रण ठेवणे जरुरीचे आहे.

कर्क : अगदीच अडचणी आल्या तर तज्ज्ञांची मदत घ्या. केवळ तो माझ्या ओळखीचा आहे म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवू नका. कोण किती योग्य आहे ते ओळखून पुढे जावे. बाकी ग्रहमान मध्यम आहे.

सिंह : पती-पत्नीमध्ये सुसंवाद राहील. तुमचे म्हणणे घरचे लोक ऐकून घेतील. पूर्वी कधी एखाद्या व्यक्तीशी दुरावा निर्माण झाला असेल तर तोही संपुष्टात येईल. जुने मित्र, नातेवाईक जवळ येतील.

कन्या : नव्या संधी खुणावू लागतील. आपण केलेल्या कामाचे चीज होईल. कामात चुका टाळाव्यात. काळाप्रमाणे योग्य तो बदल आपणास फायदेशीर राहील. आर्थिक आवक बरी राहील.

तूळ : जोडधंद्यातून आर्थिक प्राप्ती होत राहील. मदतीचे हात पुढे येत राहतील. अपचन, गॅसेस असे थोडे त्रास उद्भवतील. विचारांमुळे कधी कधी नैराश्य येईल. मनाचा कोंडमारा सहन करावा लागेल.

वृश्चिक : मिळालेली सुसंधी आणि शुभ ग्रहांची साथ यामुळे हा महिना आनंदी जाईल. अकारण चिंता सोडून द्या. हे करायचे राहिले आणि ते करायचे राहिले याचा विचार करीत बसू नका.

धनू : कधी कधी अति घाई नुकसान करेल. प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणे होते म्हणजे यापुढे होत राहील असे नाही. ग्रहमान बदलत असले तरी आपले काम पुढे नेण्यामध्ये यशस्वी व्हाल.

मकर : हळूहळू ग्रहमान बदलत जात आहे. प्रत्येक वेळी नुकसान होईल किंवा फायदा होईल याचा विचार करीत बसू नका. आपले कामावर नीट लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्या कामाची कॉपी घेऊ देऊ नका.

कुंभ : सुखद क्षण जरी या महिन्यात आले तरी आपले काम व आपण असेच रहा. क्षण बदलत असतात. अकारण सल्ला देणारे यापासून आपण दूर राहणे इष्ट असेल. प्रकृती मध्यम राहील.

मीन : काही आनंदी क्षण तुमच्या आयुष्यात येत राहतील. त्याचा पुढे कसा उपयोग करून घेणार हे तुम्हाला ठरवावे लागेल. सतत संघर्षाचा अगर भांडणाचा पवित्रा घेऊ नका. समोरचा काय सांगतो ते ऐकून घ्या.

सप्टेंबर २०१९

मेष : कामाचा वेग वाढेल. थोड्या अडचणी आल्या तरी पुढे जाता येते. कारण नसताना नको ते विचार करू नका. आर्थिक परिस्थिती मध्यम राहील. प्रेमयोग आहेत. विवाहयोग संभवू शकतात.

वृषभ : नवीन कल्पना सुचतील. नोकरी-व्यवसायामध्ये कामात वाढ होईल. आर्थिक प्राप्ती चांगली राहील. मागील पूर्वी केलेली गुंतवणूक त्यामधून फायदे सुरू राहतील. मध्यम ग्रहमान आहे.

मिथुन : परदेशगमनाचा योग आहे. नवीन संधी चालून येतील. येणाऱ्या आव्हानाला तुम्ही सामोरे जा. कामाचा वेग वाढेल. प्रकृती नरमगरम राहील. काही आनंदी क्षणांमुळे तुम्हाला बरे वाटेल.

कर्क : गुंतवणूक करताना काळजी घ्या. फसवे योग येऊ शकतात. कोणत्याही आमिषांना बळी पडू नका. कष्टाशिवाय पुढे जाणे कठीण आहे. सतत कार्यमग्न रहा. संकटे कमी होतील.

सिंह : आलेल्या चांगल्या संधीचा फायदा घ्या. योग्य वेळ, योग्य टायमिंग ठरवून कामाचे नियोजन करा. आर्थिक परिस्थिती चांगली राहील. काही जुनी कामे होतील. पर्यटन योग येतील.

कन्या : नोकरी-व्यवसायात नवी संधी येतील. एखादा नवीन प्रकल्प मिळेल. कामाचा ताण जरी वाढला तरी काळजी करू नका, कारण काम वाढले तर लोड वाढेलच. प्रकृती मध्यम राहील.

तूळ : आधी घेतलेली जबाबदारी पूर्ण करा. जमत असेल तर पुढील जबाबदारी स्वीकारा. आपल्या बोलण्याने कोणी दुखावले जाईल का ते पहाणे गरजेचे आहे. कोणते काम करावे हे लवकर लक्षात येणार नाही.

वृश्चिक : विवाहयोग येतील. काही चांगल्या संधी चालून येत आहेत त्याचा स्वीकार करा. मनाची शांतता फार महत्त्वाची आहे. अडचणी

येत असतील तर तज्ज्ञांचा सल्ला घ्या. मध्यम ग्रहमान.

धनू : घेतलेले निर्णय अचूक ठरतील. आपल्या कार्यात आपण पुढे जा. ग्रहमान आपल्याबरोबर आहे. कामामध्ये कारणे शोधत बसू नका. नकारात्मकता सोडा. मुलांचा उत्कर्ष दिसेल. आनंदी रहाल.

मकर : पती-पत्नीमध्ये सुसंवाद निर्माण होतील. मागील काही झालेल्या चांगल्या-वाईट घडामोडींचा विचार करत बसू नका. थोडेफार जे चांगले ग्रहमान आहे त्याचा वापर करून पुढे जा.

कुंभ : ग्रहमानात फारसे बदल होणार नाहीत. मागील काम करत राहणे योग्य ठरेल. कार्यमग्न राहा. आर्थिक घडी जागेवर आणणे हे आपल्यासमोरील मोठे आव्हान आहे, ते होईल.

मीन : धार्मिकतेकडे आपला कल राहील. जुनी येणी वसूल होतील. महत्त्वाची कामे मार्गी लागतील. नोकरीत नवीन संधी चालून येतील. थोडा त्रास झाला तरी कामाला कंटाळू नका.

ऑक्टोबर २०१९

मेष : प्रसिद्धी मिळेल. मानसन्मान मिळतील. चांगल्या गोष्टी घडू लागल्या की, मनाला प्रसन्नता लाभते. वादविवादाचे प्रसंग टाळा. कोणाच्या अधेमध्ये पडू नका. आसपासच्या लोकांवर लक्ष ठेवा.

वृषभ : देण्याघेण्याचे व्यवहार सांभाळून करा. नको त्या गोष्टींवर जास्त लक्ष देऊ नका. आपले लक्ष विचलित करून कोणी आपला फायदा घेणार नाही यासंबंधी विचारपूर्वक मार्ग काढा.

मिथुन : संधीची सुसंधी कशी करता येईल याचा विचार करा. ग्रहमान वेगवान आहे. त्याप्रमाणे पुढील आराखडा करा. नवीन नातेसंबंधांना सुरुवात होईल. बोलताना दुसऱ्यांची काळजी घ्या.

कर्क : महिन्याच्या मधील काळात काही चांगल्या घडामोडी होतील. अचानक काही चांगल्या गोष्टी घडतील. समारंभ, उत्सवांमधून आनंदाचे क्षण वाट्यास येतील. विद्यार्थी वर्गास चांगला काळ आहे.

सिंह : फिरण्याचा तुम्हाला आनंद होईल. जुन्या मित्रमंडळींची गाठ पडेल. भेटीगाठी वाढतील. निर्णय घेताना घरी विचारून घ्या. मोठे निर्णय हे तज्ज्ञांना विचारून घेणे सोईस्कर जाईल.

कन्या : काही गोष्टी आधीच ठरल्या आहेत. त्या फक्त आता घडत आहेत याची तुम्हाला जाणीव होत राहील. घरगुती पाळीव प्राणी यांच्यापासून दुखापत संभवते. त्यांच्यापासून काळजी घ्या.

तूळ : कामामुळे प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. एखादे जुने दुखणे डोके वर काढेल. संसर्ग आजार यापासून जपा. गर्दीमध्ये जाणे टाळावे. उपाय करण्यास टाळाटाळ करू नये.

वृश्चिक : वेगवान ग्रहमान. वाहन, घरसुख लाभेल. काही महागड्या वस्तूंची खरेदी होईल. कर्ज प्रकरणे मार्गी लागतील. थोडे पैसे बाजूला बचतीसाठी ठेवा. योग्य ठिकाणी गुंतवणूक करा.

धनू : या महिन्यात आपल्या ग्रहमानामध्ये फारसा फरक पडणार नाही. मागील काही गोष्टी ज्या घडल्या आहेत त्याची या महिन्यात पूर्तता होईल. आर्थिक प्राप्ती चांगली राहील.

मकर : जे काही चांगले मिळेल ते ते घेत रहावे. योग्य व्यक्तींकडून चांगले सल्ले मिळतील. कोणता सल्ला योग्य आहे ते पाहून पुढील कार्यक्रम ठरवा. द्विधा मन:स्थिती कमी होईल.

कुंभ : आर्थिक घडी नीट राहील. चांगली आर्थिक प्राप्ती होईल. घरात मोठी कार्ये होतील. सोने खरेदी करू शकाल. मानसन्मान मिळेल. खेळाडूंना बक्षिसे मिळण्याच्या संधी आहेत.

मीन : घरामध्ये आणि ऑफिसमध्ये आनंदी वातावरण राहील. मनासारखे काम मिळाले की बरे वाटते असा योग आहे. आनंदी वातावरणामध्ये काही विघ्नसंतुष्ट लोक मिसळतील. त्यांना दूर करा.

- डॉ. प्रसाद गजेंद्रगडकर
पुणे, भारत
९२२६१०६०२७

शब्दकोडे उत्तरे : (शब्दकोडे पान क्र. ११०)

आडवे शब्द :

१) इंडोनेशिया ५) जकार्ता ७) सौरभ चौधरी १२) ग्रह १३) सारखा १५) बदाम १६) कान १७) पान १८) वारी १९) नेता २२) नार २३) तरंग २४) तन २५) सासुरवास २६) रचना २९) गर ३०) दयावान ३२) माका ३३) राष्ट्र ३४) एकदंत ३६) हीर ३७) जहरी ३९) दानी ४०) अचानक ४३) आराम ४४) दंभ ४५) कापा ४६) गटार ४८) कर ४९) डीर ५१) संगणक ५३) रसद ५५) मध ५६) साधा ५८) अचल ५९) डोके ६२) तलाव ६३) नतमस्तक ६५) पसरट ६७) वराह ६८) कल ६९) वळ ७०) रबर ७२) दरी ७३) करामत ७४) चरखा ७६) रणवीर ७८) शेळी ७९) पोर ८०) देवालय ८३) जीत ८४) गती ८६) बकबक ८७) वड ८८) वरात ९०) शेर ९१) हलाहल ९४) गाय ९६) कातळ ९७) सकल ९९) शीळ १०१) मस १०३) सुतक १०४) वैर १०५) कानशील १०७) रोज १०९) लकब १११) रीघ ११३) तमा ११५) हर ११६) दबा ११७) जयश्री गडकर ११८) डास ११९) हजार १२०) सुरई

उभे शब्द :

१) इंग्रज २) डोह ३) शिसारी ४) यार ६) काया ७) सौदागर ८) रम ९) चौकार १०) धन ११) श्रीनगर १४) खानेसुमारी १७) पारंगत १८) वानवा २०) तारका २१) असरानी २२) नाना २४) तयार २७) चमचा २८) लेक ३०) दहीहंडी ३१) नजराणा ३४) एकटा ३५) दंड ३८) हम ३९) दाभण ४०) अपार ४१) नगद ४२) वीरधवल ४४) दंगल ४७) रद्दी ४८) कमलाकर ५०) रसातळ ५१) संच ५२) कडोसरी ५४) सवा ५७) धाम ५८) अकबर ६०) केर ६१) परात ६३) नवरदेव ६४) स्तर ६५) पदर ६६) टकळी ६७) वमन ७१) रणजीत ७४) चरबट ७५) भाल ७७) वीत ७८) शेती ७९) पोक ८१) वाडगा ८२) यव ८४) गरळ ८५) तलाक ८६) बल ८९) राहू ९०) शेतकरी ९१) हसरत ९२) हलका ९३) कळसूबाई ९५) यम ९६) कात ९८) उशीर १००) सरोज १०२) सलग १०३) सुबक १०६) नहर १०८) जय ११०) कड ११२) घडा ११४) माह ११६) दर

व्यंगचित्रांच्या चौकटीतून पाहताना...

मी नीरज सबनीस. कलेचा कोणताही वारसा नसलेल्या सामान्य कुटुंबात जन्मलो. सुरुवातीला फक्त चित्रच रेखाटायचो, पण २०१६ मध्ये युवा महोत्सवात व्यंगचित्राला मिळालेल्या प्रथम क्रमांकाने व्यंगचित्राकडे वळलो. सुरुवातीला व्यंगचित्र प्रकार माहितीदेखील नव्हता. मग नंतर बाळासाहेब ठाकरे, आर. के. लक्ष्मण अशा माहितीत असलेल्या व्यंगचित्रकारांची पुस्तके चाळली, तेव्हा एक व्यंगचित्र काय करू शकते हे समजले. आर. के. लक्ष्मण यांचे स्ट्रोक्स आणि बाळासाहेबांचे फटकारे नीट समजून घेतले. सुरुवातीला प्रयत्न केले तेव्हा काही कागद वाया गेले; पण नंतर नंतर माझ्याही फटकाऱ्यांना अर्थ आला आहे हे मला जाणवलं. हळूहळू अजून थोडं निरीक्षण करून व्यंगचित्रांच्या गाभ्यापर्यंत पोहोचायचा प्रयत्न केला आणि सुरुवात झाली माझ्या फटकाऱ्यांना!

दररोज घडणाऱ्या घडामोडी आणि त्यावर सुचणारी कलाकृती कागदावर उतरवत गेलो. कालांतराने सोशल मीडियावर पोस्ट केले. (इन्स्टाग्राम, फेसबुक) माझी व्यंगचित्रं पाहून येणारा प्रतिसाद मला प्रोत्साहन देत होता; पण आपण टिपिकल मांडणी करायची नाही असं ठरवून सुरुवात केलेली. व्यंगचित्रांना भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ असतो. भूतकाळात घडलेली घटना वर्तमानात रेखाटून ती सर्वांपर्यंत पोहोचवली जाते; पण ती कलाकृती भविष्यात कोणत्या ना कोणत्या प्रसंगाशी नक्कीच जुळते. उदाहरण द्यायचे झाले तर बाळासाहेबांची व्यंगचित्रे. त्यांनी रेखाटलेली व्यंगचित्रे आजही कोणत्या ना कोणत्या परिस्थितीला मार्मिक ठरताना दिसतात!

सुरुवातीला मी फक्त व्यंगचित्रे, त्यातील घटना, पात्रं, विनोद हा दृष्टिकोन फक्त कागदावर करायचो; पण कालांतराने चित्रांकडून केव्हा व्यंगचित्रांत हरवलो समजलं नाही आणि व्यंगचित्रांच्या चौकटीतून दुनियेकडे बघायला लागलो. आजही मी जेव्हा कोणाला बघतो तेव्हा पहिल्यांदा मी त्या व्यक्तीत व्यंग शोधतो किंवा ते सापडतेच मला. म्हणजे आधी मी कोणाशीही बोलायचो तेव्हा पुढची व्यक्ती किती छान आहे असं असायचं; पण आता व्यंग आणि त्यातल्या त्यात जास्त जाड किंवा पूर्णच हडकुळी व्यक्ती दिसली तर माझ्यातला व्यंगचित्रकार आपोआप जागा होतो!

व्यंगचित्रकलेमुळे मी स्वतःचा जास्त उरलो नाही. राजकारण, समाज, देश, दुनिया असा विचार चालू झाला आणि एक समजलं की, व्यंगचित्र एखाद्याला चांगले म्हणूनदेखील समाजासमोर आणू शकतो आणि वाईट म्हणूनसुद्धा. सध्या कॉलेजमध्ये शिकत असल्यामुळे तब्येतीने बारीक असलो तरी सहसा कोणी माझ्या नादी लागत नाही, कारण अनेकांना माहिती आहे हा व्यंगचित्र काढतो!

जेव्हा जेव्हा व्यंगचित्रांच्या चौकटीतून पाहतो तेव्हा सगळं कॉमेडी, भावनिक, क्रोध, सामान्य अशा वेगवेगळ्या नजरेतून बघतो. एकच घटना विनोदी नजरेने, परत तीच घटना दुःखी नजरेने आणि नंतर तीच घटना सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून बघतो तेव्हा ती घटना नेमकी कोणत्या पद्धतीने मांडावी हे समजतं. खरं तर कलाकार, मग तो कोणताही असो त्याला किंवा त्याच्या कामाला चौकट नसते आणि नसावीच, या मताचा मी आहे; पण माझी चौकट ही कागदापुरती. एकदा का ती घटना कागदावर उतरली की चौकट बाजूला!

आत्ता व्यंगचित्रांची ताकद समाजात अजूनही टिकून आहे.

व्यंगचित्र म्हणजे न बोलता बरंच काही. व्यंगचित्रे एखाद्याला गप्प बसवू शकतात आणि एखाद्याला गप्प बसू देऊ शकतदेखील नाहीत!

माझा व्यंगचित्रांचा प्रवास असाच चालू आहे. मला जमेल त्या पद्धतीने मी व्यंगचित्रं पोहोचवत आहेच. पुढेही अजून बरंच अनुभवेन आणि लिहीन..

आत्तापुरते एवढे फटकारे पुरेसे आहेत !!!

– नीरज सबनीस (व्यंगचित्रकार)
Instagram - Cartoonistšniraj
Facebook page - Niraj Sabnis
Email ID - nirajsabnis70@gmail.com
Contact on whatsapp - +918308630255


ReSound GN
ऐकू कमी येते...?
अत्याधुनिक डिजिटल
श्रवणयंत्रे वापरा.
दांडेकर
हिअरिंग सर्व्हीसेस
Made for iPhone
hearing aids.
Anandi-Gopal Apartment, Fergussion Road, Shivaji Nagar, Pune 411 005.
www.DandekarHearing.com • Nilesh.Dandekar@gmail.com
Mob : +91 9822944444

India Gate TokoVosje

I.G

For all your Indian food, cosmetics and groceries.

Come and enjoy our wide range of:

All types of rice and flours – Sweets – Festival Items – Frozen Food – Fresh Vegetables

FREE HOME DELIVERY IN NEARBY AREAS* *CONTACT US FOR MORE INFORMATION AND POSSIBILITIES

PARLE ® — MTR PURE AND PERFECT SINCE 1924

Maggi ®

NEW NEW: Home Delivery in 33 Europian countries. Just mail your grocceries and you will be provided of all Indian grocceries with the lowest price on the market! Check our Facebook for more information and questions!

*Parcel cost will be charged. Parcel weight up to 30Kgs. Track And Trace will be provided

Please contact Navjot Singh on 0031685137379 for all deliveries

India Gate	**Daily opened**	**Daily opened**	**Liquor store 't Vosje**
Hobbemaplein 50	**Mo-Sat: 09:00-19:00**	**Mo-Sat: 09:00-21:00**	**Hobbemaplein 42**
2526JB Den Haag	**Sun: 11:30-18:00**	**Sun: 11:00-20:00**	**2526JB Den Haag**
070-3563062	*All Festivals opened*	*All Festivals opened*	**070-3644104**
Find us on Facebook	**www.india-gate.nl**	**info@india-gate.nl**	

Liquor store Slijterij 't Vosje

Specialized in hard drinks and soft beverages.

Leading brands and personal choice establish the finest collection :

Whisky - Vodka – Rum – All types of whine – Local and Foreign beer – Soft Drinks